# “गणेश प्रभाकर प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास” (इ.स.१९२२ ते २०१० )

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेल शोधप्रबंध

संशोधक

श्री. नानाभाऊ पाटीलबुवा कुरूमकर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस.एम.गावडे

ऑक्टोबर २०१६

## प्रतिज्ञापत्र

मी **श्री. नानाभाऊ पाटीलबुवा कुरूमकर** प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **"गणेश प्रभाकर प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास" (इ.स.१९२२ ते २०१० )** हा संशोधन प्रबंध स्वतः लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

हा संशोधन प्रबंध यापूर्वी कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : श्रीगोंदा                                        संशोधक

दिनांक:

श्री. नानाभाऊ पाटीलबुवा कुरूमकर

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. नानाभाऊ पाटीलबुवा कुरूमकर** यांनी **“गणेश प्रभाकर प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास”** **(इ.स.१९२२ ते २010 )** या विषयावर संशोधन प्रबंध स्वतः लिहीलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतः लिहीला असून तो इतर कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतर कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या(यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस.एम.गावडे
इतिहास विभागप्रमुख,
मुधोजी महाविद्यालय,
फलटण जि.सातारा

स्थळ : फलटण
दिनांक :

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, **“गणेश प्रभाकर प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास”** (इ.स.१९२२ ते २०१० ) submitted by Shri. Kurumkar Nanabhau Patilbuva to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph. D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Interview and pre-submission Viva.

Place: Pune                                        Signature of Research Guide

Date -                                        Signature of Head of the Department

Office seal

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखातंर्गत इतिहास या विषयातील पीएच.डी.प्रबंध 'ग.प्र.प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास' या विषयावर विद्यावाचस्पती(पीएच.डी.) शोधप्रबंध सादर करत आहे. पुणे जिल्हयाच्या जडण–घडणीत अनेक थोर स्वातंत्र्य सैनिक व अनेक समाज सुधारकांचे मोलाचे योगदान आहे. त्यापैकी एक म्हणजे ग.प्र.प्रधान हे होय. त्यांचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर असे खूप मोठे योगदान आहे. त्यामुळे मी हा विषय पीएच.डी.साठी निवडला आहे.

या प्रबंधास मूर्त स्वरूप देण्यासाठी ज्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले ते माझे गुरूवर्य प्रा.डॉ.एस.एम.गावडे सर यांचे मी आभार मानण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करीन. त्याचप्रमाणे त्यांच्या पत्नी सौ.संगिता गावडे यांचेही सहकार्य लाभले, त्यांचेही मी आभार मानतो.

माझ्या संशोधनाच्या विषय निवडीपासून ते पूर्ण होईपर्यत विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता आदरणीय श्री.विजय कारेकर, सामाजिक शास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचे बहुमोल मागदर्शन लाभले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. इतिहास विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ.कुंभोजकर मॅडम यांनीही मार्गदर्शन केले व वेळोवेळी सूचना केल्या. त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. त्याचबरोबर सन्माननीय डॉ.कार्लेकर सर, अधिष्ठाता टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, तसेच प्रा.डॉ.नलिनी वाघमारे, इतिहास विभाग प्रमुख व प्रा.डॉ. सरला कुलकर्णी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांचेही मी आभार मानतो. त्याचप्रमाणे सर्व कार्यालयीन सेवक यांचाही मी ऋणी आहे.

माझ्या संशोधन कार्यासाठी साधना साप्ताहिकाचे विद्यमान संपादक श्री.विनोद शिरसाठसाहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन करून सर्वतोपरी सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच अवकाश निर्मित प्रधान चरित्र, प्रधान विचार यांचे निर्माते श्री.समीर शिरपुडकर यांनी प्रधान सरांच्या मुलाखतीची सी.डी. व छायाचित्रे उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. तसेच भारत इतिहास मंडळ, गोखले इन्स्टिटयुट पुणे, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, भारतीय जैन महाविद्यालय वाघोली, श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा, ज्ञानज्योत सार्वजनिक

वाचनालय चिखलठाणवाडी येथील ग्रंथालय कर्मचारी व कार्यालयीन सेवकांनी विशेष सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

मी कार्यरत असणाऱ्या शारदा विद्या निकेतन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय श्री.मुरलीधर आण्णा होनराव यांनी माझ्या संशोधनासाठी परवानगी देऊन आशीर्वाद दिले, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे संस्था विश्वस्त डॉ.अशोक खेंडके यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

त्याचप्रमाणे माझे एम.फिल.पदवीचे मार्गदर्शक प्रा.डॉ.राजदेव सर यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार आहे. तसेच साईकृपा कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेळके यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच माझ्या संशोधनासाठी आवश्यक असणारी आवश्यक साधने मला उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रा.डॉ.फडतरे, प्रा.डॉ.मोकाटे, प्रा.डॉ.शिंदे, मुधोजी महाविद्यालय फलटण, प्रा.रमेश थोरात यांचाही मी ऋणी आहे.

त्याचप्रमाणे शारदा विद्या निकेतनचे प्राचार्य श्री.मखरे बी.टी., प्रा.नष्टे तसेच माझे सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच माझे संशोधक मित्र प्रा.भापकर, प्रा.रणसिंग, प्रा.डॉ.रघुराज कुरूमकर, प्रा.पिसे सर, माझे मित्र बाळासो मोरे पाटील व दादासो चिखलठाणे (माजी चेअरमन), गौतम मुळे(माजी सरपंच), दादा शेळके क्षीरसागर सर, आव्हाड सर, काटे सर,श्रीमती वाळके एन.जी., श्रीमती हाटकर एल.जे. यांनीही केलेल्या सहकार्याबद्दल आभार. तसेच प्रा.दिपक होनराव यांनी आवश्यक असे फोटो उपलब्ध करून दिले. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

माझे आई वडिल यांनी मला आशिर्वाद देऊन संशोधनासाठी विशेष प्रोत्साहन दिले. तसेच माझे वडिलबंधू श्री.तात्यासाहेब कुरूमकर व वहिनी सौ.जयश्री यांनीही मला शिक्षणासाठी प्रेरणा दिली, त्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. माझे सासरे, श्री.मच्छिंद्र गाडेकर व मेहुणे श्री.किशोर गाडेकर व सौ.विद्या गाडेकर यांनीही अनमोल सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे माझी पत्नी सौ.सविता कुरूमकर हिने संशोधन करत असताना घराची व मुलांची पूर्ण जबाबदारी स्वीकारून संशोधनासाठी मला पूर्णवेळ मुक्त केले, त्याबद्दल तिचेही आभार मानतो.

तसेच माझी पुतणी कु.हर्षदा, चि.ओंकार, कन्या कु.योगिता व अच्युत यांनी संशोधनासाठी त्यांच्या परीने सहकार्य केले. त्याचप्रमाणे या प्रबंधाचे अचूक व सुबक टंकलेखन करून त्यास मोहक रूप दिल्याबद्दल समृध्दी टाईपरायटरच्या प्रो.प्रा.सौ.वैशाली कोरडे यांचेही मी आभार मानतो.

संशोधक

श्री.कुरुमकर एन.पी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| • | प्रतिज्ञापत्र | I |
| • | प्रमाणपत्र | II |
| • | प्रमाणपत्र | III |
| १. | पार्श्वभूमी<br>संशोधन विषयाचे नाव, संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहितके, सिंद्धात कल्पना, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने, संशोधन पद्धती, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, प्रकरण नियोजन व पार्श्वभूमी | १–३४ |
| २. | ग.प्र.प्रधान यांचे प्रारंभिक जीवन | ३५–५७ |
| ३. | ग.प्र.प्रधान यांचे राजकीय कार्य | ५८–१०६ |
| ४. | ग.प्र.प्रधान यांचे साधना साप्ताहिकाचे संपादकीय कार्य | १०७–१२६ |
| ५. | ग.प्र.प्रधान यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील कार्य | १२७–१६७ |
| ६. | उपसंहार | १६८–१८९ |
| • | संदर्भ ग्रंथ सुची | १९०–१९५ |
| • | परिशिष्टे | १९६–२०८ |
| • | नकाशे | २०९–२१० |
| • | छायाचित्रे | २११–२२५ |

# प्रकरण पहिले
# पार्श्वभूमी

## १.१ प्रस्तावना :-

स्थळ, काळ, व्यक्ती ही इतिहासाची त्रिसूत्रीप्रमाणे आणि कार्लाईल या इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे, इतिहास म्हणजे थोर पुरूषाचे चरित्र व त्यांनी केलेली कामगिरी होय. या तत्त्वाला अनुसरून आणि इतिहासकार स.म.गर्गे यांनी म्हटल्याप्रमाणे "अंधार दिसेल, तेथे बॅटरी मारा" या उक्तीप्रमाणे तसेच रा.श्री.मोरवंचीकर यांनी सांगितल्याप्रमाणे इतिहासाच्या अभ्यासाने राष्ट्रनिर्मितीसाठी ज्यांनी आपल्या प्राणाचा त्याग केला, त्यांच्या चरित्रातून भावी पिढीस प्रेरणा मिळते. महाराष्ट्रातील काही व्यक्तींनी भारतातील इतर राज्यांप्रमाणे स्वातंत्र्य लढयामध्ये सहभाग घेतला. महाराष्ट्रातील पुणे जिल्हयाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. पुणे जिल्हयाच्या जडणघडणीत अनेक थोर नेत्यांचे व कार्यकर्त्याचे मोठे योगदान लाभलेले होते. त्यामधील एक म्हणजे ग.प्र.प्रधान(सर) हे होय. समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचा संकल्प मॅट्रिकला असताना अबोध वयात त्यांनी सोडला. साने गुरूजी त्यांना त्यांच्या मित्रासह नामदार गोपाळ गोखलेच्या स्मारकाजवळ घेऊन गेले. वेळ रात्रीची होती. फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर साने गुरूजींनी आवाहन केले, गोखल्यांनी येथेच देशसेवेची शपथ घेतली व जीवनभर पाळली. तुम्हीही आज शपथ घेतली व जीवनभर पाळली. तुम्हीही आज शपथ घ्या की, आपली मायभूमी स्वतंत्र होण्यासाठी तुम्ही सर्वस्व अर्पण कराल. प्रत्येकाने आपल्या मनाशी शपथ घ्या. मला खात्री आहे की, तुम्ही हे पाळाल. या पुढच्या स्वातंत्र्य लढयात आपण तुरूंगात भेटू. मास्तरांनी शपथ घेतली. सन १९४२ मध्ये येरवडा तुरूंगात साने गुरूजींच्या बरोबर राहण्याचा भाग्ययोगही त्यांना प्राप्त झाला. पुढे सुटका झाल्यावर पुण्याला उपचारासाठी असलेल्या महात्मा गांधीच्या निवासस्थानी स्वयंसेवक होण्याचा योग आला.

कुटुंबासाठी कॉलेजमध्ये नोकरी करण्याची गरज पडली. वीस वर्षे नोकरी झाल्यावर पूर्णवेळ राजकारण करण्याचा निर्णय प्रधान सरांनी घेतला, पण खरी कसोटी घेणारा निर्णय पुढेच होता.प्रधान सरांनी १९६५ साली नोकरीचा राजीनामा देऊन पक्षाचे काम सुरू केले.

त्यांनी पूर्णपणे काम करायचे ठरवले आणि दुर्दैवाने त्याचवेळी समाजवादी पक्ष दुभंगला. प्रधानांचे जवळचे मित्र बॅ.नाथ, पै.मधु दंडवते, दत्ता ताम्हणे यांचे आणि प्रधानांचे स्वभाव जुळणारे होते.

अठरा वर्षे आमदारकीचे कार्य अत्यंत यशस्वीपणे सरांनी पूर्ण केले. पुन्हा ते चौथ्या वेळी उभे राहिले असते तर निश्चितपणे निवडून आले असते; परंतु सरांनी तसे न कराता दुसऱ्यांना संधी दिली. पुढे राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी 'साधना' साप्ताहिकाचे संपादक म्हणून काही काळ काम पाहिले. नंतर त्यांनी आपला वेळ पुस्तक लेखनात घालवला.

अशाप्रकारे उत्तम प्राध्यापक, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, विधान परिषद सदस्य, विरोधी पक्षनेते, साप्ताहिक संपादक, पुस्तकाचे लेखक या बिरूदावल्या मिळविणारे प्रधान सरहोते.

भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. महाराष्ट्रामध्ये ३५ जिल्हे आहेत. त्यामध्ये बहुतेक जिल्हयांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हयाचे योगदानही मोठे आहे. पुणे जिल्हयात अनेक थोर स्वातंत्र्य सैनिक(क्रांतिकारक) होऊन गेले आहेत. पुणे जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी खूप मोठी आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना याच जिल्हयातून केली. शिवाजी महाराजांचे बालपण याच जिल्हयात गेले. पुढे पेशव्यांनी आपला राज्यकारभार याच पुण्यातून सुरू केला. त्यामुळे पुण्याला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात पुण्यामध्ये अनेक चळवळी झाल्या. याच पुण्यामध्ये महात्मा फुले, लोकमान्य टिळक, छ.शिवाजी महाराज, पेशवा थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, सावित्रीबाई फुले, वासुदेव बळवंत फडके, कस्तुरबा गांधी, गोपाळकृष्ण गोखले, असे अनेक थोर पुरूष होऊन गेले. त्यांच्याप्रमाणे लाभलेले ग.प्र.प्रधान हे एक होत. साने गुरूजींचा सहवास लाभल्यामुळे मॅट्रिकमध्ये असताना स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेण्याचा संकल्प केला आणि पुढे प्रत्यक्षात अमंलात आणला.

## १.२ प्रबंधाचे शीर्षक :-

"गणेश प्रभाकर प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास"(१९२२ ते २०१०)

## १.३ संशोधन विषयाची निवड :-

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये स्वातंत्र्याचा इतिहास अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यासाठी अनेक चळवळी झाल्या आणि त्या चळवळी घडवून आणण्यासाठी अनेक थोर

पुरूष, स्वातंत्र्य सैनिकांनी योगदान दिले. प्रसंगी आपल्या कुटुंबाचा विचार न करता, स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. सर्वस्वाचा त्याग केला परंतु आज त्या व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. त्यांचा इतिहास आजच्या तरूण पिढीस नक्कीच दीपस्तंभाप्रमाणे काम करील.

अशाच एका थोर स्वातंत्र्य सैनिक, थोर विचारवंत, समाजसेवक, संपादक, लेखक अशा अनेक उपाधी लावता येतील, असे ग.प्र.प्रधान सर एक होत. त्यांचा जन्म पुणे जिल्हयात झाला. त्यांचे शिक्षण पुणे, नगर जिल्हयात झाले. पुढे त्यांचे कुटुंब पुण्यामध्ये सदाशिव पेठेत स्थाईक झाले. तेथेच त्यापुढील शिक्षण पूर्ण झाले. मॅट्रिकला असताना स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेण्याचा संकल्प केला आणि तो पार पाडला. पुढे परिस्थितीमुळे नोकरी करावी लागली. २० वर्षे नोकरी केल्यानंतर राजकारणात सक्रीय भाग घेतला. १८ वर्षे विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम केले. याच काळात विधान परिषदेचे उपसभापती, विरोधी पक्षनेता असे काम त्यांनी केले. पुढील काळात राजकीय निवृत्ती स्वीकारून 'साधना' साप्ताहिकासाठी काही काळ संपादक म्हणून काम केले. याच काळात त्यांनी विपुल लेखन केले. त्यांचे मराठी व इंग्रजी असे दोन साहित्य आहे. स्वतःची हयात समाजासाठी घालविली. शेवटी देहदानाचे कार्य केले. स्वतःचे पुण्यातील सदाशिव पेठेतील घर 'साधना' साप्ताहिकाला दान दिले. त्याची किंमत आज कोटयावधी आहे. अशा थोर पुरूषाचा इतिहास आजच्या तरूण पिढीला निश्चितच प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल. म्हणून मी माझ्या संशोधनाचा विषय "ग.प्र.प्रधान यांचे जीवन व कार्यः एक अभ्यास" निवडला आहे.

## १.४ संशोधन विषयाचा कालखंड :-

संशोधन विषयाचा कालखंड हा इ.स.१९२२ ते २०१० असा आहे. ५ ऑगस्ट १९२२ रोजी ग.प्र.प्रधान यांचा जन्म झाला. पुढे २९ मे २०१० रोजी पुण्यामध्ये त्यांचे वृद्धापकाळामुळे निधन झाले. म्हणून संशोधनासाठी १९२२ ते २०१० हा कालखंड निवडला आहे.

## १.५ संशोधन विषयाची उद्दिष्टे :–

१. भारतीय स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयाचे फार मोठे योगदान आहे. त्याचे विश्लेषण करणे.

२. पुण्यामध्ये अनेक थोर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक होऊन गेले, त्यांच्या कार्याचा आढावा घेणे.

३. ग.प्र.प्रधान यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान विशद करणे.

४. ग.प्र.प्रधान यांचे शैक्षणिक कार्य विशद करणे.

५. ग.प्र.प्रधान यांचे राजकीय कार्य विशद करणे.

६. ग.प्र.प्रधान यांचे विधान परिषदेतील कार्य विशद करणे.

७. ग.प्र.प्रधान यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य विशद करणे.

८. ग.प्र.प्रधान 'साधना' साप्ताहिकाचे संपादक असतानाच्या कार्याचा आढावा घेणे.

## १.६ संशोधनाची गृहितके :–

१. टिळकयुगीन व गांधीयुगीन स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयात अनेक स्वातंत्र्य चळवळी झाल्या. त्यामध्ये पुणे जिल्हयाचे योगदान मोठे आहे.

२. भारतीय स्वातंत्र्य लढयाचा परिणाम पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांवर झालेला दिसतो.

३. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव चळवळ यासारख्या चळवळी पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांनी नेटाने पार पाडल्या.

४. ग.प्र.प्रधान यांच्या जीवनावर साने गुरूजी व महात्मा गांधीजींचा प्रभाव होता.

५. ज्ञानदानाच्या क्षेत्रात ग.प्र.प्रधान सर यांचे कार्य मोलाचे आहे.

६. विधान परिषदेचे सदस्य व विरोधी पक्षनेते या काळातील ग.प्र.प्रधान यांची कारकीर्द महत्त्वाची आहे.

७. ग.प्र.प्रधान यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य मोठे आहे. तसेच 'साधना' साप्ताहिकाची संपादन कारकीर्द महत्त्वाची आहे.

## १.७ संशोधन समस्या :-

संशोधनातील पहिली पायरी म्हणजे संशोधन कशाचे करायचे हे ठरविणे व शब्दात मांडणे होय. पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य लढयात ग.प्र.प्रधान यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी अनेक चळवळीमध्ये भाग घेतला. त्यासाठी त्यांना प्रसंगी तुरूंगात जावे लागले. ग.प्र.प्रधान यांच्या कार्याचे दोन भाग करता येतील. त्यांचे स्वातंत्र्यापूर्वीचे कार्य व स्वातंत्र्योत्तर कार्य. या कार्याचा स्वातंत्र्य चळवळीत समावेश होतो. तर स्वातंत्र्योत्तर कार्यामध्ये त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व लेखक अशा विविध अंगात भरलेले आहे. कोणत्याही देशाचा विकास त्या देशाच्या चारित्र्यवान नेता व नागरिकावर अवलंबून असतो. समाज चारित्र्यवान घडवावा म्हणून सदर संशोधनाचा विषय "ग.प्र.प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास"(१९२२ ते २०१०) हा आहे. हा विषय निवडण्याचे कारण ग.प्र.प्रधान यांचे कार्य खूप मोठे आहे. त्यांनी निःस्वार्थी भावनेने केलेले कार्य व त्याग समाजासाठी व तरूणांसाठी निश्चितच मोलाचा ठरणार आहे. म्हणून त्यांचे जन्म, बालपण, त्यांच्यावर झालेले संस्कार, त्यांची कामगिरी, त्यांना मिळालेले पुरस्कार आजच्या तरूण पिढीस निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. म्हणूनच हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

## १.८ सिद्धांत कल्पना :-

१. पुणे जिल्हयास व पुणे शहरास खूप मोठा ऐतिहासिक वारसा आहे.
२. ग.प्र.प्रधान यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान महत्त्वाचे आहे.
३. ग.प्र.प्रधान यांचा जन्म जरी सामान्य मध्यम वर्गात झाला असला तरी त्यांनी समाजापुढे एक उदात्त आदर्श ठेवला आहे.
४. ग.प्र.प्रधान यांनी आपली हयात समाजकार्यासाठी घालविली.
५. निःस्वार्थी भावनेने व त्यागी वृत्तीचे ग.प्र.प्रधान यांचे कार्य समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

## १.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

संबंधित संशोधन विषयाची व्याप्ती १९२२ ते २०१० अशी आहे. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडाचा अभ्यास करणार आहे. तेव्हा हा विषय स्वातंत्र्याशी व स्वातंत्र्य सैनिकांशी संबंधित आहे. स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती तशी भारतभर आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रभर सुद्धा आहे. त्यामुळे या विषयाची व्याप्ती वाढते.

"ग.प्र.प्रधान यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास" या विषयाचा संबंध संपूर्ण महाराष्ट्राशी येता असला तरी या शोधप्रबंधात केवळ ग.प्र.प्रधान यांचे स्वातंत्र्य विषयाचा, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक कार्य यांचा आढावा घेतला आहे.

## १.१० संशोधन तंत्र :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाच्या काही तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. यासाठी मूळ विषयांचे संदर्भातील साधनांचे प्राथमिक साधने व दुय्यम साधने असे विभाजन करून निवडलेल्या साधनांच्या आधारे प्रस्तुत विषयाचे विश्लेषण केले आहे. निवडलेल्या साधनांच्या आधारे घटनांची सत्यता तपासण्यात आलेली आहे. प्रस्तुत 'साधना' च्या आधारे तळटिपा दिलेल्या आहेत. संदर्भ यादी, निवडक छायाचित्रे व योग्य परिशिष्टे दिलेली आहेत. ग.प्र.प्रधान यांचे समकालीन लोकांशी चर्चा करून काही घटनांचे विश्लेषण केले आहे. योग्य त्या संशोधन तंत्रांचा वापर केलेला आहे.

## १.११ संशोधन पद्धती :-

जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे ही माणसाची मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो. त्यापासून विविध प्रकाराचे अनुभव घेतो. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. आपण कोणती पद्धती वापरायची हे संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. तसेच कोणत्या प्रकारची माहिती आपल्याला गोळा करावयाची आहे. त्यावरही आधारित असते. या शोधप्रबंधासाठी ऐतिहासिक पद्धती, सर्वेक्षणात्मक पद्धती, संदर्भ पद्धतीचा उपयोग केलेला आहे.

कागदपत्रांच्या आधारे प्रचलित ज्ञानामध्ये भर घालून एखाद्या प्रश्नावर नवा प्रकाश टाकणे तसेच मूलभूत संशोधनामध्ये काहीतरी भर घालणे हा ऐतिहासिक संशोधनाचा हेतू असतो.

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीसाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या पाठीशी असलेल्या सैद्धांतिक संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक किंवा गुणात्मक पद्धती, सैद्धांतिक व विश्लेषणात्मक पद्धतीचाही वापर केलेला आहे. विविध समस्यांचे अन्वयार्थ सांगण्यासाठी योग्य त्या ठिकाणी तळटिपा दिलेल्या आहेत. वृत्तपत्रे, शासकीय अहवाल, गॅझेटियर, संस्थांनांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे.

## १.१२ संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन :-

ग.प्र.प्रधान यांच्या कार्याबद्दल त्यांचे स्वतःचे 'माझी वाटचाल' हे आत्मचरित्र प्रकाशित झाले असून त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेतलेला आहे. त्यानंतर 'प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्मय' डॉ.नीला पांढरे यांनी ग.प्र.प्रधान यांच्या संपूर्ण जीवनावर व त्यांच्या वाङ्मयावर प्रकाश टाकणारा ग्रंथ लिहिला. पहिली आवृत्ती ३० जून २०११ रोजी प्रकाशित केली आहे.

ग.प्र.प्रधान यांच्या निधनानंतर महाराष्ट्रतील अनेक थोर समाजसुधारक, राजकीय नेते यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. तसेच प्रा.भूषण फडतरे यांनी पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास यामध्येही ग.प्र.प्रधान यांच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. मात्र, या संशोधनात मी ग.प्र.प्रधान यांचे जीवन व कार्य यांचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. यामध्ये ग.प्र.प्रधान यांच्या सर्व कार्याचा आढावा घेतलेला आहे. हे या प्रबंधाचे वेगळेपण आहे.

## १.१३ संशोधनाचे महत्त्व :-

भारतीय स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्राचे व त्यामध्ये पुणे जिल्हयाचे मोलाचे योगदान आहे. त्याच पुणे जिल्हयात अनेक थोर नेते, स्वातंत्र्य सैनिक, क्रांतिकारक, समाजसुधारक होऊन गेले. यामध्ये एक म्हणजे 'गणेश प्रभाकर प्रधान' यांचा समावेश प्रामुख्याने होतो.

इतिहास म्हणजे थोर पुरूषांची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय. या तत्त्वाला अनुसरून आणि इतिहासकार रा.श्री.मोरवंचीकर यांनी सांगितल्याप्रमाणे इतिहासाच्या अभ्यासाने राष्ट्रनिर्मितीसाठी ज्यांनी आपल्या प्राणाचा त्याग केला, त्यांच्या चरित्रातून भावी पिढीस प्रेरणा

मिळते. असेच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे पुणे जिल्हयातील ग.प्र.प्रधान हे होय. अशा प्रकारचे संशोधन म्हणजे आपल्या तरूण पिढीसाठी दीपस्तंभ हे या संशोधनाचे महत्त्व आहे.

## १.१४ संदर्भ साधने :–

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करणार आहे.

### १.१४.१ प्राथमिक साधने :–

**१) ग.प्र.प्रधान यांची ग्रंथसंपदा**

**अ) इंग्रजी ग्रंथ** :–

1) ‘Acharya Jawadekar’ : A Satyagrahi Socialist

2) ‘Mahatma Gandhi’ : Snehwardhan Prakashan, 2005

3) ‘Lokmanya Tilak’ : National Book Trust, 1994, 2001, 2005

4) ‘Sane guruji’– Sahitya Academy, 1995

5) ‘Ram Ganesh Gadkari’ – Sahitya Academy, 1992

6) ‘Letters to Tolstoy’ – Popular Publication, 2006

7) ‘Pursuit of Ideals’ – Ameya Prakashan, 2005

8) ‘Indian Freedom Struggle’, Snehawardhan Prakashan, 2005

**ब) मराठी ग्रंथ :–**

१) ‘हाजीपीर’, ‘कांजरकोट’, ‘सोनार बांगला’, ‘साता उत्तराची कहानी’, ‘महान नेता जयप्रकाश नारायण’, ‘महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम.जोशी’, ‘स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत’, ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याच शब्दात’, ‘भारताचे सुपूत्र लोकमान्य टिळक’, ‘माझी वाटचाल’, ‘भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू’, ‘भारतीय स्वातंत्र्य संग्राम’, ‘लोकमान्य टिळक व्यक्ती व वाङ्‌मय’, ‘आठा उत्तराची कहानी’, इत्यादी.

**क) विविध कार्यालय व संस्थाचे रेकॉर्ड, गोखले इन्स्टीट्युटचे धनंजयराव गाडगीळ ग्रंथालय पुणे, ‘साधना’ साप्ताहिकाचे जुने अंक इ.**

### १.१४.२ दुय्यम साधने :–

१) विविध संदर्भ ग्रंथ

२) एम.फिल. व पीएच.डी प्रबंध

३) विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक व सहामाही अंक.

४) विश्वकोश व संस्कृतिकोश खंड

५) स्मरणिका व नियतकालिके

७) पुणे जिल्हा गँझेटियर

९) आत्मचरित्रे व अभिनंदन ग्रंथ

## १.१५ प्रकरण नियोजन :–

### प्रकरण पहिले – पार्श्वभूमी

या प्रकरणात संशोधन विषयाचे नाव, संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिंद्धात कल्पना, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने, संशोधन पद्धती, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, प्रकरण नियोजन, पुणे जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी यामध्ये भौगोलिक स्थान व सीमा, हवामान व पीकपद्धती, पुणे जिल्हयाची लोकसंख्या, पुणे जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळ, पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिक इत्यादीचा समावेश केला आहे.

### प्रकरण दुसरे

### ग.प्र.प्रधान यांचे प्रारंभिक जीवन

या प्रकरणात मूळचे प्रधान घराणे, त्यांचा व्यवसाय व त्यामुळे त्यांना पुणे व नगर जिल्हयात शिक्षण घ्यावे लागले. पुणे येथे राहून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. प्रधान मास्तरांवर घरचे झालेले संस्कार, त्यांचा थोर व्यक्तिंशी आलेला संपर्क, त्याचप्रमाणे त्यांच्या कुटुंबाची जडणघडण या प्रकरणामध्ये दिली आहे व शेवटी ग.प्र.प्रधान यांचा जीवनपट दिलेला आहे.

**प्रकरण तिसरे**

**ग.प्र.प्रधान यांचे राजकीय कार्य**

यामध्ये पुणे जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेऊन त्यामध्ये सहभागी असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची माहिती दिली आहे. ग.प्र.प्रधान यांना साने गुरूजींच्या सहवास लाभल्यामुळे त्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यामुळे त्यांनी मॅट्रिकला असताना स्वातंत्र्य लढयात भाग घेण्याचे ठरवले व त्यांच्या सहभागामुळे त्यांना शिक्षा भोगावी लागली. तसेच त्यांना मिळालेल्या पुरस्कारांचाही उल्लेख केला आहे.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा राजकीय घडामोडीचा आढावा, तसेच ग.प्र.प्रधान यांनी अठरा वर्षे विधान परिषदेचे आमदार म्हणून केलले कार्य, याच काळात त्यांनी विरोधी पक्षनेता त्याचप्रमाणे विधानपरिषदेतील सभापती पदी असतानाचे कार्य, तसेच ग.प्र.प्रधान यांचे लोकशाही समाजवादाविषयी ग.प्र.प्रधान यांचे विचार दिले आहेत.

**प्रकरण चौथे**

**ग.प्र.प्रधान यांचे ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादकीय कार्य**

या प्रकरणात ग.प्र.प्रधान यांचे ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादकीय कार्य, ‘साधना’ ’ साप्ताहिकाचा पहिला अंक, ग.प्र.प्रधान व ‘साधना’ साप्ताहिकातील कार्य, ग.प्र.प्रधान यांचे ‘साधना’तील सहसंपादक असतानाचे लेखनकार्य, ग.प्र.प्रधान साधनाचे संपादक असतानाचे लेखनकार्य, एस.एम.जोशी यांची शाबासकी, ‘साधना’तील अडचणींवर मात, साधनातील अडचणी, साधनातील कामानिमित्त ईशान्य दौरा, राहते घर साधना ट्रस्टला देणगी, ‘साधना’ साप्ताहिकाचा हीरकमहोत्सवी कार्यक्रम, साधनामधील त्यांचे सहकारी, यदुनाथ थत्ते, वसंतराव बापट, सदानंद वर्दे इ.ची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**प्रकरण पाचवे**

**ग.प्र.प्रधान यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील कार्य**

या प्रकरणात ग.प्र.प्रधान यांना परिस्थितीमुळे वीस वर्षे फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरी करावी लागली व नंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर राजकीय कार्य सुरू झाले. यानंतर त्यांच्या जीवनाचा टप्पा म्हणजे सक्रीय राजकारण सोडून त्यांनी आपले आयुष्य लेखन, वाचन

व विचार मंथन याकडे वळवले. या काळात त्यांचे मराठी व इंग्रजी असे विपुल लेखन झाले आहे. त्यांच्या लेखन साहित्याचा थोडक्यात आढावा दिला आहे.

**प्रकरण सहावे**

**उपसंहार**

या प्रकरणात सर्व प्रकरणांचा निष्कर्ष काढलेला आहे.

## १.१६ पुणे जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी :–

### १.१६.१ पुणे जिल्हयाचे भौगोलिक स्थान व विस्तार :–

पुणे जिल्हयाचे भौगोलिक स्थान हे महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सहयाद्री पर्वताला लागून आहे. पुणे जिल्हयाचा भोगोलिक विस्तार हा १७° ५४° ते १९° २४° उत्तर अक्षांश व ७३° १९° ते ७२° १०° पूर्व रेखांश या दरम्यान आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयाची लोकसंख्या ९४,२६,९५९ एवढी आहे.[१]

पुणे जिल्हयाच्या पश्चिमेस रायगड जिल्हा, उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेस सातारा जिल्हा, वायव्येस ठाणे जिल्हा व आग्नेयेस सोलापूर जिल्हा आहे. या जिल्हयात पुणे शहर, इंदापूर, बारामती, दौंड, भोर, पुरंदर, वेल्हे, खेड, शिरूर, जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी व हवेली असे चौदा तालुके आहेत. पुणे हे या जिल्हयाचे मुख्य ठिकाण आहे.[२]

### १.१६.२ क्षेत्रफळ :–

पुणे जिल्हयाचे क्षेत्रफळ हे १५,३६७ चौ.कि.मी. आहे. या जिल्हयाची लांबी सुमारे १७१ कि.मी.असून दक्षिणोत्तर लांबी सुमारे १५५ कि.मी.आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टिने पुणे जिल्हयाचा महाराष्ट्रात दुसरा क्रमांक लागतो.[३]

पुणे जिल्हयाचे उपविभाग पुढीलप्रमाणे पाच आहेत. यामध्ये बारामती, भोर, हवेली, खेड व मावळ हे होत.या जिल्हयात एकूण चौदा तालुके आहेत. ते म्हणजे पुणे शहर, हवेली, राजगुरूनगर(खेड), आंबेगाव, जुन्नर, शिरूर, दौण्ड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर, बेल्हे, मुळशी व मावळ हे होत.[४] तर पुणे प्रशासकीय विभाग हे पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर हे होत.[५]

### १.१६.३ पुणे जिल्हयाचे हवामान :-

पुणे जिल्हयाचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे आहे. जिल्हयाचा पश्चिम भाग डोंगराळ व उंच असल्याने हवामान थंड असते. या भागात उंच डोंगरामुळे ढग अडविले जाऊन पाऊस पडतो.[६] येथे मे महिन्यात कमाल तापमान ४१$^{\circ}$ पर्यत वाढते आणि जानेवारीत ते किमान ५.६$^{\circ}$ पर्यत असते. पुणे जिल्हयात नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाचे प्रमाण जून ते सप्टेबर महिन्यात सरासरी जास्त असते. सहयाद्री पर्वतामुळे घाटमाथ्यावर भरपूर (४३१ सेमी.) पाऊस पडतो. घाटमाथ्याच्या पूर्वेकडील प्रदेशात पावसाचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४५ सेमी. आहे. पुणे येथे ६५ सेमी. पाऊस पडतो. पुणे जिल्हयात दौंड, शिरूर, बारामती, इंदापूर, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर व खेड या तालुक्यात नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाची अनिश्चिती असल्याने तेथे वारंवार अवर्षण पडते.[७]

### १.१६.४ पुणे जिल्हयातील नदीप्रणाली :-

पुणे जिल्हयातून प्रमुख १० नद्या वाहतात. या नद्या पश्चिमेकडील सहयाद्री पर्वतात उगम पावून पूर्व व आग्नेय दिशास वाहतात. भीमा, मीना, कुकडी, वेल, घोड, पुष्पावती, इंद्रायणी, मुळा वायव्य दिशेस वाहते. या जिल्हयाच्या भीमा नदीच्या डाव्या तीरावर वेल व घोड या नद्या वाहतात. तर उजव्या तीरावरून भीमा, इंद्रायणी, मुळा, मुठा, नीरा या मुख्य नद्या आहेत. मीना, कुकडी, घोड, पुष्पावती, या नद्या जिल्हयाच्या उत्तर भागातून वाहतात. पुणे जिल्हयाच्या मध्य भागातून भीमा, इंद्रायणी, मुळा, मुठा, पवना या नद्यांची खोरी आहेत. जिल्हयाच्या सरहद्दीवरून नीरा नदी वाहते.[८]

### १.१६.५ पुणे जिल्हयातील धरणे व तलाव :-

जिल्हयाच्या पश्चिम भागात नद्यावर धरणे बांधली असून त्यापासून जल-सिंचन व काही प्रमाणात विद्युतनिर्मिती केली जाते. पुणे जिल्हयामध्ये भाटघर, वीर, खडकवासला, पानशेत, वरसगाव, पवना, येडगाव, माणिकडोह इत्यादी धरणे आहेत. याशिवाय डिंभे, वडज, पिंपळगाव व घोड प्रकल्प ही धरणे आहेत. पुणे शहराला खडकवासला, पानशेत व वरसगाव या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पिंपरी चिंचवडला पवना प्रकल्पामधून पाणीपुरवठा केला जातो. पुणे जिल्हयात टाटा कंपनीने मुळशी येथे धरण बांधून त्यामधून वीजनिर्मिती केली आहे.[९]

अशाप्रकारे पुणे जिल्हयात पाषाण तलाव, भोसरी तलाव, खडकवासला धरण, मुळशी धरण, भाटघर धरण, पानशेत धरण, कुकडी धरण, दर्याबाई आणि हरवडी डोह, मंदोशीचे धबधबे व लेक व्हायटिंग इत्यादी धरणे व तलाव आहेत.[१०]

**१.१६.६ पुणे जिल्हयातील भूरूपे :–**

पुणे जिल्हयाचा आकार सामान्यतः त्रिकोणाकृती असून पश्चिमेकडील सहयाद्री पर्वत हा त्याचा पाया, तसेच आग्नेय कोपऱ्यामध्ये भीमा व नीरा या नद्यांचा शिरोबिंदू येतो. जिल्हयाचे भूरूपानुसार तीन विभाग पडतात. ते म्हणजे घाटमाथा, मावळ व देश  हे होत.[११]

पुणे जिल्हयात विविध भूरूपे आहेत. भीमा नदीच्या खाऱ्याचा बहुतेक भाग सपाट मैदानाचा आहे. जिल्हयाच्या उत्तर सीमेवर हरिश्चंद्र डोंगर आहे. याशिवाय शिंगी, तसुबाई, पुरंदर, ताम्हिणी, अंबाला, इत्यादी डोंगरही आहेत. जिल्हयाच्या पश्चिमेस सहयाद्री पर्वताचा उंच भूभाग आहे. या प्रदेशात हरिश्चंद्रगड, तसुबाई, कळसुबाई, भीमासंकर, शिंगी इत्यादी उंच शिखरे आहेत.

जिल्हयाच्या डोंगराळ भागात बोर किंवा खंडाळा, वरंधा, माळशेज, नाणे इत्यादी घाट आहेत. पुण्याजवळ कात्रज व दिवे घाट आहेत. भुरूपांच्या उंचसखलपणावरून प्राकृतिक रचना समजते. पुणे जिल्हयाचे प्राकृतिक रचनेनुसार पुढील विभाग पडतात.

**१.१६.७ प्राकृतिक विभाग :–**

१. **पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेश :–**

   जिल्हयाच्या पश्चिम भागात सहयाद्री पर्वताचा भाग आहे. हा भाग उंच व डोंगराळ आहे. यात अनेक उंच शिखरे आहेत.

२. **टेकडयांचा उंचसखल प्रदेश :–**

   सहयाद्रीचा पूर्व भाग डोंगराळ व टेकडयांचा आहे. या प्रदेशात नद्यांची खोरी आहेत.

३. **पूर्वेकडील पठारी प्रदेश :–**

   जिल्हयाचा मध्य व पूर्व भाग सपाट आहे. हा प्रदेश पठार म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात भीमा व तिच्या उपनद्यांची खोरी आहेत.[१२]

### १.१६.८ पुणे जिल्हयातील पिके :-

पुणे जिल्हयातील एकूण सिंचनाखालील क्षेत्र १,३६,००० हेक्टर आहे. तर शेतीतून भात, ज्वारी, बाजरी, मूग, कापूस, गहू, ऊस, हरभरा, करडई, भुईमूग, नाचणी, तसेच फूलशेती, भाजीपाला, तेलबिया इत्यादीचे उत्पादन घेतले जाते.[१३]

### १.१६.९ पुणे जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे :-

शैक्षणिक व सांस्कृतिक नगरी म्हणून सर्वज्ञात असलेले पुणे शहर असंख्य बाबींसाठी प्रसिद्ध आहे. या शहराला फार मोठा ऐतिहासिक वारसा आहे. येथील गणेशोत्सव विशेष प्रसिद्ध आहे. या काळात असंख्य पर्यटक शहरास भेट देतात.[१४]

पुण्यात पेशवेकाळातील बांधलेल्या वास्तूमध्ये शनिवारवाडा, पर्वती, वानवडी येथील शिदेंची छत्री, पाताळेश्वर लेणी, चतुःशृंगी, कसबा गणपती, ओंकारेश्वर, लाल देऊळ, आळंदी, थेऊर, देहू, जंगली महाराज, राजा केरूरकर, वस्तु संग्रहालय, पंडित भीमसेन जोशी संग्रहालय, सिंहगड किल्ला इत्यादीचा समावेश होतो.[१५]

### १.१६.१० पुणे जिल्हयातील वाहतूक(दळणवळण) व व्यापार :-

पुणे जिल्हयाची वाहतूक रस्ते, लोह व विमान या मार्गाने चालते. तर पुणे जिल्हयातून जाणारे महत्त्वाचे रस्ते म्हणजे मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग, पुणे- सोलापूर- हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग, पुणे- नाशिक राष्ट्रीय महामार्ग, पुणे- मुंबई दृतगती महामार्ग(एक्सप्रेस वे) याशिवाय अहमदनगर- पुणे- बारामती इत्यादी. पुणे जिल्हयातून जाणाऱ्या लोहमार्गामध्ये मुंबई- पुणे, पुणे- सोलापूर, व पुणे- मिरज लोहमार्ग आहेत. पुण्याजवळ लोहगाव येथे विमानतळ आहे. तेथून राष्ट्रीय स्तरावरील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही देशामध्ये विमान सेवा उपलब्ध आहे.

पुणे जिल्हयातून भाजीपाला, फळे, फुले, दुचाकी वाहने, रिक्षा, मोटारी, यंत्रसामुग्री, औषधे, विविध उपकरणे, कापड इत्यादी माल जिल्हयाबाहेर पाठवला जातो. मीठ, पेट्रोल, नैसर्गिक वायू, तयार कपडे, कापड यंत्रे, मसाल्याचे पदार्थ, कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल इत्यादी माल इतर जिल्हयातून किंवा राज्यातून जिल्हयात मागविला जातो.[१६]

## १.१७ पुणे जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :–

पुणे शहराच्या इतिहासाचे स्थूलमानाने तीन कालखंड पडतात. ते म्हणजे प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन असे होत. मध्ययुगीन कालखंडात शिवकाळ, पेशवेकाळ हे दोन कालखंड पडतात. तर आधुनिक कालखंडात आंग्लकालीन व स्वातंत्र्योत्तर कालखंड व अलीकडील कालखंड असे होत.[१७]

प्राचीन काळापासून पुणे हे विकासाच्या मार्गाने वाटचाल करीत आले आहे. चारही बाजूला हिरव्यागार उंच उंच गगनचुंबी टेकडया, गड, भक्कम किल्ले आणि नद्यानी हा भाग समृद्ध केला आहे. अशा ऐतिहासिक वास्तूंमुळे दुग्धशर्करा योग घडून आला आहे.[१८]

मुळा आणि मुठा या छोटया नद्या याच शहरातून वाहतात व त्यांचा संगम होतो. शिवकाळापासून पुण्यात कुंभार वेस, केजर वेस ही गावात येण्याची ठिकाणे होती. शहराला तटबंदी होती. नदीला घाट असून नदीकाठी खूप मंदिरे होती. सन १६२० मध्ये आदिलशहाने पुणे उद्‌ध्वस्त केले नंतर रायाराव नावाच्या सरदाराने पुणे लुटले. मोठ–मोठी घरे–दारे पेटवून दिली. त्यांच्या वस्तीवर गाढवाचा नांगर फिरवला. गावातील प्रमुख चौकात एक लोखंडी पहार जमिनीत ठोकली. त्यावर एक मोठी फुटकी कवटी व तुटकी वहाण टांगून ठेवली. याचा अर्थ पुणे बर्बाद झाले. शिवाजी महाराजांनी पुण्याची जमीन सोन्याच्या फाळाने नांगरून गावात स्वतःचा वाडा बांधून पुणे नादंते केले.[१९]

इ.स.६१३ पुणे येथे एक लहानशी वाडी होती. तिच्या पूर्व बाजूस कुंभार्ली व कासार्ली ही दोन गावे होती. राजा कृष्णराज पहिला याच्या इ.स.७६८ मधील ताम्रपटात पुणे शहराचा उल्लेख 'पूनक विषय' असा केलेला आहे. त्यानंतर राष्ट्रकुटांच्या इ.स.९६० मधील ताम्रपटात पुणे शहराचा उल्लेख 'पुनकवाडी' असा केलेला आढळतो.[२०]

सन १९५७ साली ह.धि.सांकलिया यांनी पुणे शहरात उत्खनन केले. पुढे सन १९६२–६३ मध्ये डॉ.राजगुरू व मुजुमदार यांनी मुठा नदीच्या पात्रामध्ये उत्खनन केले. त्यावेळी तेथे अश्मयुगीन हत्यारे व काही वस्तू सापडल्या. या दोन्ही उदाहरणावरून पुणे येथे एक ते दीड लाख वर्षापूर्वी वस्ती होती, हे स्पष्ट होते.[२१]

पुणे शहरावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे राज्य होते. सातवाहनानंतर पुणे येथे राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. दहाव्या शतकाच्या अखेरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी

राष्ट्रकुटांचा पराभव करून पुणे आपल्या वर्चस्वाखाली आणले. सन १२०० मध्ये ही गावे जुन्नर सुभ्याखाली होती. हा सुभा त्यावेळी मुसलमानांकडे होता. तेथे सुमारे दहा पंधरा घरे होती. त्यात ब्राह्मण, कोळी, वाजंत्री यांची घरे होता. [२२]

दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने इ.स.१२९४ साली यादवांचा पराभव केला त्यामुळे पुणे सुलतानांच्या ताब्यात गेले. पुढे १४ व्या शतकात तुघलकांनी खिलजीचा पराभव करून दिल्ली येथे खिलजी घरण्याची सत्ता स्थापन केली. त्यावेळी इ.स.१३४० मध्ये मुहम्मद तुघलक दौलताबादहून पुण्यावर स्वारी करण्यासाठी आपल्या फौजेसह कोंढाणा किल्ल्यावर आला. त्यावेळी कोंढाणा किल्ल्याचा किल्लेदार नाग नाईक याने सुलतानापुढे क्षमायाचना केल्याने युद्ध टाळले गेले, मात्र कोंढाणा किल्ल्यासह पुणे सुलतानाच्या ताब्यात गेले. त्यावेळी पुणे येथे तुघलकांची सत्ता निर्माण झाली.

पुढे तुघलकाचा सरदार हसन गंगु बहामनी याने बंड करून बहामनी राज्याची स्थापना इ.स.१३४७ साली केली. त्यामुळे पुणे बहामनी राज्यात सामील करण्यात आले. पुढे अंतर्गत कलहामुळे बहामनी राज्याची पाच शकले होऊन पुणे हे अहमदनगरच्या निजामशहाच्या ताब्यात गेले. या निजामशाहीत भोसले कुळाचा नावलौकिक होऊन इ.स.१५४५ साली मालोजी भोसले यास पुण्याची जहागिरी निजामशहाने दिली. पुढे काही दिवसांनी ही जहागिरी आदिलशहाकडे गेली.

अहमदनगरच्या निजामशहाने शहाजी भोसले यास इ.स.१६२१ मध्ये पुणे जिंकून घेण्याची आज्ञा केली. त्यावेळी पुणे येथे आदिलशहाच्या वतीने रायराव नावाचा एक अंमलदार कारभार पहात होता. शहाजीराजांनी त्याच्यावर हल्ला करून त्याला पुणे–शिरवळ परगण्यातून हद्दपार केले. अशाप्रकारे शहाजीराजे जोपर्यत आदिलशाहीमध्ये (इ.स.१६२५ ते १६२८) नोकरी करीत होते, तोपर्यत पुणे जहागिरी ही शहाजीराजांच्या ताब्यात होती. मलिक अंबरच्या काळात पुणे येथे रंगो बाबाजी धडपळे हा पुण्याचा ठाणेदार होता. पुढे इ.स.१६३१ साली आदिलशाही सरदार मुरारजगदेव याने पुण्यावर हल्ला केला. पुढे १६३६ मध्ये मुघल व आदिलशहा यांनी एकत्र येऊन निजामशाही नष्ट केली, शहाजीराजे आदिलशाहीत नोकरी करू लागले. निजामशाहीच्या प्रदेशाची वाटणी करताना आपला पुणे–सुपे–इंदापूर हा जहागिरीचा मुलूख हल्लीचा पुणे जिल्हयातील भाग वगळून इतर सर्व प्रदेश मोगल आणि विजापूरकर यांना देऊन

टाकला. १६३६ साली आपल्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी शहाजीराजांनी दादोजी कोंडदेव यांची नियुक्ती केली.[२३]

दादोजी कोंडदेव यांनी पुणे येथे लालमहाल हा वाडा बांधला. मातोश्री जिजाबाई व छत्रपती शिवाजी यांच्या राहण्याची सोय लालमहाल वाडयात केली. त्यांनी पुणे शहराच्या संरक्षणाच्या दृष्टीने चोख बंदोबस्त करून परागंदा झालेल्या रयतेला बोलावून त्यांना सवलतीने जमिनी लागवडीसाठी दिल्या. अशा प्रकारे पुण्याची पुन्हा निर्मिती केली. छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या स्वराज्याच्या कार्याची मुहूर्तमेढ पुणे जिल्हयातील तोरणा किल्ल्यावर केली. पुढे शिवाजी राजांचा पुण्याशी प्रत्यक्ष संबंध सन १६६३ मध्ये मुघल सरदार शाहिस्तेखान पुण्यातील लाल महाल वाडयात येऊन राहिला होता. त्यावेळी आला होता. शाहिस्तेखानाला पुण्याबाहेर हाकलण्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी ६ एप्रिल १६६३ च्या रात्री खानावर छापा घातला. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या हल्ल्यात शाहिस्तेखानाच्या हाताची बोटे तुटून तो जखमी झाला. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजांचा धसका घेऊन पुणे सोडले.[२४]

छत्रपती शिवाजी राजांनी राजगड किल्ल्याची स्वराज्याची राजधानी म्हणून निवड केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी पुणे जिल्हयातील त्यांनी तोरणा, सिंहगड व पुरंदर हे किल्ले जिंकून घेतले. तानाजी मालुसरे यांनी आदिलशहाच्या ताब्यातून कोंढाणा किल्ला जिंकून घेतला. परंतु त्यात त्याला प्राण गमवावे लागले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेच्या पहिल्या लुटीनंतर स्वराज्याची राजधानी राजगडावरून रायगड किल्ल्यावर नेली. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात पुणे शहरात फारशा महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत. छत्रपती राजाराम महाराजांचा कालखंड हा धावपळीचा गेला होता. शेवटी छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू सिंहगड किल्ल्यावर इ.स.१७०० मध्ये झाला. सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराजांची समाधी आहे. छत्रपती शिवाजीराजांच्या निधनानंतर दिल्लीचा औरंगजेब बादशहा मराठेशाही संपविण्यासाठी मराठी राज्यात आला होता. त्याने कोंढाणा किल्ला जिंकून पुण्यात वास्तव्य केले. त्याचवेळी त्याचा नातू मुहि–उल्मिलत याचा इ.स.१७०३ मध्ये मृत्यू झाला. म्हणून त्याचा स्मरणार्थ पुण्याचे नामांतर 'मुहियाबाद' असे करण्यात आले. पुण्याच्या विद्यमान 'बुधवार पेठे' चे नावदेखील 'मुहियाबाद पेठ' असे ठेवले होते. पण ही दोन्ही नावे फार काळ टिकली नाहीत.[२५]

पुण्याजवळचे जुन्नर हे ठिकाण ख्रिस्तपूर्व ९० मध्ये दख्खनच्या हिंदू राजांच्या राजधानीचे शहर असून पुढे साधारण इ.स.पहिली तीन शतके बौद्ध धर्मियांचे मुख्य स्थान होते. असाही एक उल्लेख मिळतो. नंतर हा परिसर पुढे चालुक्य व राष्ट्रकूट या राजवटींनी प्राचीन काळात आपली सत्ता गाजविली. मध्युयुगात यादवांचा अंमल पुणे शहरावर होता. बहामनी, निजामशाही व आदिलशाही राजवटीही पुण्यावर होत्या. शिवाजी महाराजंचा जन्म याच जिल्हयात 'जुन्नर' जवळील 'शिवनेरी' येथे झाला. त्यांचे सारे बालपण पुण्यातच गेले. हिंदवी स्वरज्य हे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रथम विचार शिवाजी राजांच्या मनात याच भूमीत आला. मराठा राजवटीत पुणे हे एक महत्त्वाचे राजकीय केंद्र होते. शिवाजी महाराज व पुणे यांचे अतुट नाते आहे. भारतमातेच्या कमरेला लटकलेली तलवार असे ज्या सहयाद्री पर्वताचे वर्णन केले जाते अशा सहयाद्री पर्वतरांगा या जिल्हयात आहेत.[२६]

'पुणे तेथे काय उणे' अशी देशभरात 'पुणे' शहराची ख्याती आहे. जिल्हयाचे मुख्य ठिकाण, मुळा नदीच्या काठी वसलेले, एकेकाळी पेशव्यांची राजधानी असलेले हे शहर आज महाराष्ट्रातील महत्त्वाचे ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व औद्योगिक केंद्र मानले जाते. विद्येचे माहेरघर म्हणूनही या नगरीचा परिचय सर्वदूर आहे. पुणे शहर आणि जिल्हयाला इतिहासकाळापासूनच अनन्य साधारण महत्त्व आहे. या शहराला वा जिल्हयालाही पडणारी काही स्वप्ने आहेत, तसाच गौरवशाली भूतकाळही आहे.[२७]

छत्रपती शाहू मराठयांचा छत्रपती असेपर्यंत सातारा राजधानीला महत्त्वाचे स्थान होते. परंतु सन १७४९ नंतर सातारचे महत्त्व कमी होऊन पुणे येथील पेशव्यांचे महत्त्व वाढीस लागले. त्यामुळे पुण्याचे ही ऐतिहासिकदृष्टया महत्त्व वाढीस लागले. सातारच्या छत्रपतीचा संबंध हा फक्त पेशव्यांना पेशवे पदाची वस्त्रे देण्यापुरता मर्यादित राहिला.

बाळाजी विश्वनाथ या पहिल्या पेशव्यांने इ.स.१७१९ मध्ये मोगलाकडून स्वराज्याच्या सनदा आणल्या व तसेच मोगलाईत असलेले पुणे स्वराज्यात दाखल केले. बाळाजी विश्वनाथ याने पुण्याचा आर्थिक विकास केला. इ.स.१७२५ मध्ये छत्रपती शाहूने पेशवा पहिल्या बाजीरावास पुणे दिले. तेव्हापासून पुण्याचे महत्त्व वाढीस लागले. बाजीरावाने पुणे येथे बापूजी श्रीपत चित्रावशास्त्री याची पहिला सुभेदार म्हणून नियुक्ती केली. पुण्यातील खाजगीवाले आणि तुळशीबागवाले हे चित्रावशास्त्रीचे जवळचे सहकारी होते. त्यामुळे पुण्याचा कारभार

तुळशीबागवाले पाहू लागले. या तिघांनी सुरूवातीच्या काळात पुण्यात पेठा वसविणे, व्यापार–उदिम वाढविणे, बंदोबस्त ठेवणे ही कामे केली. म्हणून पहिल्या बाजीराव पेशव्यास पुण्याचा आद्य संस्थापक असे म्हटले जाते.

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर (इ.स.१७४९) नानासाहेब पेशव्याने मराठयांच्या राजकारणांची सर्व सूत्रे पुण्याहून हलविण्यास प्रारंभ केला. नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे, नारायण पेशवे नंतर सवाई माधवराव पेशवे हे पेशवे पदावर आले. पुणे येथे अनेक सरदारांचा उदय झाला. त्यांनी आपले वाडे पुणे शहरात बांधले. उदा. तुळशीबागवाले, रास्ते, मेंहदळे, घोरपडे इत्यादी होत. पुणे येथे पेशव्यांनी व त्यांच्या सरदारांनी अनेक वास्तू व मंदिरे बांधली. मराठयांचे सरदार महादजी शिंदे यांची समाधी वानवडी येथे उभारण्यात आली आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रजाबरोबर पुणे येथे तिसरे युद्ध सुरू झाले युद्धात इंग्रजांनी मराठयांचा दारूण पराभव केला आणि पुण्याच्या शनिवार वाडयावर 'युनियन जॅक' फडकविला. अशाप्रकारे पुणे हे ठिकाण पेशव्यांच्या ताब्यातून ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. त्यामुळे पुण्याबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला.

पुण्याचा इतिहास हा अत्यंत स्फूर्तिदायक व कुठल्याही तरूणाला स्फुरण चढावे असाच आहे. नंतरच्या काळात पुणे येथे बाजीराव पेशव्यांनी आपली राजधानी वसवली. परंतु नंतर पेशव्यांना दीर्घकाळ ती टिकविता आली नाही. इ.स.१८१८ मध्ये दुर्दैवी घटना घडली. ती म्हणजे मराठेशाही सम्पुष्टात आली. पुण्याच्या इतिहासाला नवे वळण मिळाले. येथील शनिवार वाडयावर भगव्या झेंडयाची जागा ब्रिटिशांच्या युनियन जॅकने घेतली. अशाप्रकारे पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले.[२८]

## १.१८ ब्रिटिश कालखंडातील पुणे (इ.स.१८१८ ते १९४७)

इ.स.१८१८ साली पुणे हे दख्खन विभागातील ब्रिटिशांचे एक प्रमुख लष्करी ठिकाण म्हणून उदयास आले. ब्रिटिशांनी पुण्यातील विश्रामबाग वाडयात ६ ऑक्टोबर १८२१ रोजी आधुनिक पद्धतीची पाठशाळा काढली. पुढे सन १८५१ मध्ये डेक्कन कॉलेज ही संस्था स्थापन करण्यात आली. इ.स.१८५७ मध्ये भारतात ब्रिटिशांच्या विरोधात जे बंड झाले, त्यामध्ये पुण्यातील नागरिकांनी फारसा सहभाग घेतला नाही.

८ फेब्रुवारी १८४० रोजी ब्रिटिशांनी पुणे येथे नगर वाचन मंदिर सुरू केले. १२ फेब्रुवारी १८४९ रोजी 'ज्ञानप्रकाश' नावाचे मराठी वर्तमानपत्र सुरू करण्यात आले. सन १८५१ मध्ये पुण्यात पहिली इंग्रजी शाळा स्थापन केली. तसेच तत्पूर्वी महात्मा जोतिराव फुले यांनी पहिली मुलीची शाळा स्थापन केली. १८५४ मध्ये पुण्यापासून मुंबईपर्यंत तारायंत्र सुरू झाले. पुण्यात १ जून १८५७ रोजी पुणे शहर नगरपालिकेची स्थापन झाली. सन १८६७ मध्ये इंग्रज सरकारने टपालाचे खाते सुरू केले. अशाप्रकारे पुणे शहरात व जिल्हयात ब्रिटिशांनी अनेक सुधारणा करून पुण्याची प्रगती केली.

**१.१८.१ सार्वजनिक सभा :-**

पुणे सार्वजनिक सभेच्या स्थापनेच्या पूर्वी शहरात काही संस्था अस्तित्त्वात होत्या. इंग्लंडमध्ये सन १८५३ मध्ये कंपनी सरकारची सनद बदलण्यासाठी हालचाली सुरू झालेल्या होत्या. त्याची माहिती कंपनी सरकारची सनद बदलण्यासाठी हालचाली सुरू झालेल्या होत्या. त्याची माहिती पुण्यातील सरदार वर्गांना समजताच आपला फायदा करून घेण्यासाठी त्यांनी डेक्कन असोसिएशन ही संस्था स्थापन केली. परंतु ही संस्था अल्पकाळ टिकली.[२९]

**१.१८.२ वासुदेव बळवंत फडके यांचे क्रांतिकार्य :-**

आधुनिक भारतातील आद्यक्रांतिकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांचे नाव घेतले जाते. पेशवाईच्या अस्तानंतर (इ.स.१८१९) ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सर्व किल्लेदारांना 'दुर्ग' सरकारी नियंत्रणाखाली देण्यास सांगितले. अनंतरावांनी मात्र दुर्ग दडपण्यास नकार दिला. शेवटी अनंतराव व ब्रिटिश सैन्य यांच्यात कर्नाळा दुर्गावर तीन दिवस लढाई झाली. तिसऱ्या दिवशी अनंतरावांचा पराभव झाला. अशा स्वाभिमानी घराण्यात वासुदेवांचा जन्म झालेला होता.

वासुदेव बळवंत फडके यांची बदली पुण्यात झाली. हिच घटना कांतिकारी जीवनाला कलाटणी देणारी ठरली, असे म्हणावे लागेल कारण त्याना क्रांतिकार्याची प्रेरणा याच काळात मिळाली होती.

**१.१८.३ पुण्यातील संघटन :-**

सार्वजनिक काका व न्यायमूर्ती रानडे हे सार्वजनिक सभेच्या माध्यमाद्वारे कार्य करत होते. रानडेंच्या 'स्वदेशी व्यापार' या विषयावरील व्याख्यानमालेला वासुदेव बळवंत फडके

उपस्थित होते. त्यांच्या मनावर व्याख्यानाचा खूप मोठा परिणाम झाला होता. पुढे ते सार्वजनिक सभेचेदेखील सदस्य झाले.

### १.१८.४ लोकजागृती व प्रेरणास्थान :-

फुले, आगरकर, टिळक, गोखले अशा थोर व्यक्तींनी वृत्तपत्राच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक जागृती घडवून आणली होती लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने दि. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी भाषेतील व ४ जानेवारी १८८१ राजी 'केसरी' हे मराठी भाषेतील वृत्तपत्र सुरू झाले. अनुक्रमे लोकमान्य टिळक व गोपाळ गणेश आगरकर हे त्यांचे संपादक होते. दोन्ही वृत्तपत्रामधून जहाल विचारसरणी मांडलेली होती. या वृत्तपत्रांच्या पूर्वी विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेतून टिळक व आगरकरांनी राजकीय सुधारणेच्या संदर्भात लेखन केलेले आहे.[३०]

### १.१८.५ पुणे राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशन :-

अकरावे राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशन आणि राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन आणि पुणे शहर यांचे ऋणानुबंधांचे संबंध आहेत. सन १८९५ च्या पूर्वी दोन वेळी राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन पुणे शहरात घेण्याचा प्रयत्न झालेला होता. पहिले अधिवेशन प्लेगच्या साथीमुळे मुंबईला घेण्यात आले होते. सन १८८९ मधील आर्थिक बिलबुक कमी असल्यामुळे पुन्हा मुंबईत घेण्यात आले. राष्ट्रीय काँग्रेसचे ११ वे अधिवेशन सन १८९१ मध्ये पुणे शहरात घेण्याचे निश्चित केले.

लोकहितवादी, रानडे, आगरकर, टिळक, गोखले अशा थोरांचे कार्य येथून सुरू झालेले आहे. त्यांच्या कार्यामुळे पश्चिम भारताची बौद्धिक राजधानी म्हणून पुणे शहर संपूर्ण देशाला परिचित झालेले होते. अशा बौद्धिक राजधानीच्या ठिकाणी काँग्रेसचे पहिले अधिवेशन घेण्याचे निश्चित झाले होते. परंतु काही कारणास्तव ते मुंबईला घेतले गेले. असे असले तरी येथील ही राजकीय विचारधारा सातत्याने टिकून असल्यामुळेच मुंबई प्रांतिक परिषदा इ.स.१८८८ पासून सलग पाच वेळा पुणे शहरात घेण्यात आलेल्या आहेत.[३१]

### १.१८.६ लोकमान्य टिळक कालखंड (१८६८ ते १९२०)

लोकमान्य टिळकांच्या कार्याची सुरूवात सन १८८० सालापासून झाली. त्यांनी आपल्या ४० वर्षाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रासह भारतावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला

होता. २ जानेवारी १८८१ रोजी लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी 'मराठा' या वृत्तपत्राची व ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' या वृत्तपत्राची स्थापना केली.[३२] या वृत्तपत्रातून लोकजागृती, लोकशिक्षण व ब्रिटिश सरकारच्या जुलमी राजवटीविरूद्ध असंतोष पसरवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. पुणे येथे सन १८९५ साली श्रीगणेशोत्सव व सन १८९६ मध्ये श्री शिवजयंती उत्सव हे दोन उत्सव टिळकांनी सुरू केले.[३३] सन १९१६ साली सर परशुरामभाऊ महाविद्यालयाची स्थापना झाली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना सन १८७५ साली झाली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री–शिक्षणाचा प्रसार केला. पुणे येथील ब्रिटिशांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुणे सार्वजनिक सभेची स्थापना सार्वजनिक काका उर्फ गणेश वासुदेव जोशी यांनी केली.[३४]

क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशाविरूद्ध बंड पुकारले होते. त्यावेळी त्यांचे वकीलपत्र सार्वजनिक काकांनी घेतले होते. क्रांतिवीर चाफेकर बंधूनी इंग्रजी अधिकारी रँड याची २२ जून १८९७ रोजी हत्या केली. त्यावेळी त्यांना ब्रिटिशांनी फासावर चढवले. तेव्हा चाफेकर बंधूनी आनंदाने फाशीची शिक्षा स्वीकारली.[३५]

### १.१८.७ शिवजयंती व गणपती उत्सव :–

आपल्या राष्ट्रपुरूषाचे महोत्सव आपण साजरे करू लागलो म्हणजे त्यांच्या पराक्रमाचे अनुकरण करण्याची स्फूर्ती जनतेला मिळेल आणि राष्ट्रोद्धारासाठी, त्याग काण्यासाठी ते सिद्ध होतील. राष्ट्रातील महापुरूषांचे स्मरण हे एक राष्ट्रीयत्व राहण्यास चांगले साधन आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्या ठिकाणी १६७४ मध्ये राज्याभिषेक झाला, त्या रायगड किल्ल्यावर १५ एप्रिल १८९६ रोजी पहिला शिवजयंती उत्सव टिळकांच्या नेतृत्त्वाखाली साजरा करण्यात आला. लोकमान्य टिळकांनी याच वेळी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला.[३६]

### १.१८.८ लोकमान्य टिळकांचे राष्ट्रसभेतील पुढारपण :–

सुरतच्या अधिवेशनात मवाळ व जहाल फाटाफूट होताच मवाळांना जवळ करून जहालांना झोडपून काढण्याचे दडपशाहीचे तंत्र राज्यकर्त्यांनी स्वीकारले. कलकत्यातील एका बॉम्ब स्फोटावर लेख लिहून 'राजद्रोह' केल्याचा आरोप लोकमान्य टिळकांवर ठेवून त्यांना सन १९०८ मध्ये काळया पाण्याची सजा दिली गेली. त्यांची मंडालेच्या तुरूंगात रवानगी झाली.

लोकमान्य टिळकांच्या बंदिवासामुळे राष्ट्रसभेतील जहालवाद्यांच्या चळवळीस आवर बसून राष्ट्रसभा पूर्णपणे मवाळवाद्यांच्या हाती गेली. इ.स.१९१५ सालापर्यंत राष्ट्रसभेवर मवाळांचे वर्चस्व होते. दरम्यान, सन १९१४ मध्ये लोकमान्य टिळकांची कारावासातून सुटका झाली आणि देशातील जहालवाद्यांच्या चळवळीस पुन्हा चैतन्य प्राप्त झाले.

**१.१८.९ दामोदर चाफेकर :–**

इंग्रजी जुलमाला आव्हान देणार वर्ग हिंदी तरूणांत तयार होत होता. मगरूर इंग्रज बंदुकीच्या गोळयाशिवाय वठणीवर येणार नाहीत, या भावनेने दामोदर चाफेकर या तरूणांन जुलमी प्लेग कमिशनर रँड याचा खून केला. २२ जून १८९७ रोजी खून झाला, तो दिवस हिंदुस्थानात व्हिक्टोरिया राणीचा हिरक महोत्सवाचा दिवस म्हणून मोठया दिमाखाने साजरा केला गेला.

दामोदर चाफेकर सर्व महाराष्ट्रभर कीर्तन करत फिरत. कीर्तनातून ते प्रखर राष्ट्रवादी तत्त्वज्ञान पसरवीत. केवळ शिवाजींचे नाव घेऊन चालणार नाही, तर आपण त्यांचे कृतीत अनुकरण केले पाहिजे.[३७]

**१.१८.१० स्वातंत्र्यवीर सावरकर :–**

सन १९०२ मध्ये वि.दा.सावरकर यांनी पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. नाशिकमधील क्रांतिकार्याप्रमाणे पुण्यामध्ये देखील क्रांतिकारकांची संघटना स्थापन करावी, असा विचार त्यांच्या मनामध्ये आला असावा, कारण चाफेकर बंधूंच्या बलिदानानंतर येथील क्रांतिकार्याला शिथिलता आलेली होती. म्हणूनच फर्ग्युसनमधील विद्यार्थ्यांना एकत्र करून 'मित्रमेळा ' या क्रांतिसाठी संघटनेच्या शाखेची स्थापना केली. फर्ग्युसनमधील वि.दा.सावरकर, सोलापूरचे वि.गो.रानडे, जुन्नरचे गा.वा. जोगळेकर, दाजी नागेश आपटे, श्रीकृष्ण शिवराम परांजपे, अंमळनेरचे मावसभाऊ वि.म.भट, लोकमान्य टिळकांचे चिरंजीव विश्वनाथ पंत टिळक अशा अनेक विद्यार्थ्यांचा 'मित्रमेळा' संघटनेत सहभाग होता.[३८]

**१.१८.११ क्रांतिकार्याचे मूल्यमापन :–**

सन १९२४ ते १९३४ या दशकातील क्रांतिकार्याची व त्यामागील विचारसरणीची तुलना तत्पूर्वीच्या क्रांतिकार्याशी केल्यास दोहोतील साम्य व भेद स्पष्टपणे दिसून येतो. ब्रिटिश शासक भारतीयांच्यावर करीत असलेल्या अनन्वित अत्याचारांचा व अन्यायांचा सूड ब्रिटिश

अधिकाऱ्याच्या हत्या करून घ्यावयाच्या आणि ब्रिटिश शासकवर्गात दहशत निर्माण करायची लक्षावधी भारतीयांच्या मनात धुमसत असलेल्या धगधगत्या असंतोषाला ह्या मार्गाने वाचा फोडायची हे हेतू नसले तरी सन १९२४ नंतर क्रांतिकारकांचे उद्दिष्ट ब्रिटिशांचा सूड घेणे हे नव्हते. त्यांनी आपल्या कार्याला निश्चित तात्त्विक स्वरूपाची बैठक दिली होती.[३९]

लोकमान्य टिळकांनी पुणे शहराचे नाव संपूर्ण भारतभर केले. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला सन १९०८ मध्ये भरण्यात आला होता. त्यानुसार त्यांची रवानगी मंडालेच्या तुरूंगात झाली होती. त्यावेळी त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच." ही राष्ट्रप्रेमाची स्फूर्ती सर्वांना दिली. त्यांना असंतोषाचे जनक असे म्हणतात. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात 'गीतारहस्य' या ग्रंथाची निर्मिती केली.[४०]

गोपाळ कृष्ण गोखले हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांना महात्मा गांधीजीनी आपल्या गुरूस्थानी मानले होते. त्यामुळे पुण्याचे नाव आणि लौकिक भारतभर झाला.[४१]

पुणे जिल्हयात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणा केल्याचे दिसून येते. त्यामध्ये डॉ.आनंदीबाई जोशी, महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, महात्मा फुले, गणेश वासुदेव जोशी इत्यादींनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह, शेतकऱ्याचे प्रश्न, अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, उच्च-नीच भेदभाव निर्मूलन, सती प्रथा, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर संघर्ष यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी पुणे शहर व जिल्हा या ठिकाणी सुधारणा करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.[४२]

लोकमान्य टिळकांच्या काळात येथील स्वातंत्र्य लढा हा तेल्यातांबोळयापर्यंत गेला होता. हाच लढा पुढे गांधी काळात संपूर्ण पुणे जिल्हयातील सामान्य लोकांपर्यंत गेला होता. त्याच काळात येथील युवकांची चळवळ अधिक बहरली होती. त्यामुळेच मुंबई प्रांतिक युवक काँग्रेसचे पहिले अधिवेशन जानेवारी १९२८ व दुसरे अधिवेशन जानेवारी १९२९ मध्ये पुणे शहरात भरले होते. अशा स्वरूपात देश पातळीवरील राजकीय हालचालींच्या दृष्टीने पुणे जिल्हा महत्त्वाचा होता. आंदोलनातील लोकांनी ब्रिटिशांचा लाठीमार, गोळीबार सहन तर केलाच आहे. पण त्याचबरोबर तुरूंगावासाची शिक्षा देखील भोगलेली आहे. स्वतःच्या कुटुंबाचा कोणताही विचार न करता. देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलेले आहे.[४३]

### १.१८.१२ महात्मा गांधी युग (सन १९२० ते १९४७)

महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाचा प्रभाव पुणे जिल्हयातील काकासाहेब जोशी, केशवराव जेधे, शंकरराव मोरे व अच्युतराव पटवर्धन या युवकांच्यावर पडलेला होता. या युवकांनी काँग्रेसचा प्रसार पुणे शहरासह जिल्हयात केला. महात्मा गांधीजीनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत पुणे जिल्हयातील या कार्यकर्त्यानी तसेच सर्वसामान्य जनतेने ही सहभाग घेतला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांचा सन १९३२ चा 'पुणे करार' पुणे येथील येरवडा कारागृहातच झाला होता. सन १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनामध्ये पुणेकरांनी आत्मीयतेने भाग घेतला होता.[४४]

### १.१८.१३ असहकार आंदोलनाचा ठराव व स्वरूप :–

असहकार आंदोलनाचा ठराव मांडण्यापूर्वी सन १९२० च्या एप्रिलमध्ये महात्मा गांधी व लोकमान्य टिळकांची सिंहगडावर भेट झाली होती. ब्रिटिश सत्तेच्या राजकारणावर त्यांच्यात चर्चा झालेली होती. लोकमान्य टिळक महात्मा गांधीजीना म्हणाले, 'माझा जन्म इंग्रजांशी सतत आणि कटु संघर्ष करण्यात खर्ची पडला आहे. मी इंग्रजांना पुरते ओळखतो आणि ते ही मला ओळखतात. तुम्हालाही केव्हातरी इंग्रजांचा त्यांचा कुटिल नीतीचा आणि क्रूरतेचा अनुभव आला म्हणजे तुम्ही इंग्रजांना विरोध करण्यात माझ्याही पुढे जाल.' असे कुमार केतकरांनी कथा स्वातंत्र्याची या संदर्भग्रंथात नमूद केलेले आहे आणि हे पुढे सत्य झाले. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली १ ऑगस्ट १९२० रोजी देशभर असहकार आंदोलन सुरू झाले. याच दिवशी लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. सतत तीन दशकाहून अधिक ब्रिटिश सत्तेला प्रखर विरोध करणाऱ्या लोकमान्य टिळकांचा अस्त झाला. तर पुढे दोन शतकाहून अधिक काळात ब्रिटिश सत्तेला विरोध करणाऱ्या महात्मा गांधीजींचा उदय झाला.[४५]

लोकमान्य टिळक, नामदार गोखले, महात्मा गांधी या केवळ व्यक्ती नाहीत, तर विचार आहेत. भारतीय राजकारणातील हे विचारप्रवाह आहेत. हे सगळे एका प्रवाहात मिसळून गेले. असा भाबडा वाद ग.प्र.प्रधान यांच्या मनात नव्हता. इतिहासाने देखील हे दाखविले नाही. वेगवेगळया वेळी त्यांचे एकमेकांशी मतभेद झाले. तसे काही वेळेला ते एकत्रही आले होते. म्हणून वेगवेगळया विषयांवरील त्यांची भूमिका तपासून पाहिल्या पाहिजेत, असे ग.प्र.प्रधान यांनी म्हटले होते.[४६]

### १.१८.१४ पुणे युवक संघ :–

स्वराज्य पक्षाचा प्रभाव कमी होत असतानाच पंडित जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली देशभर युवक संघटना उभ्या राहू लागलेल्या होत्या. २१ व २२ जानेवारी १९२८ रोजी मुंबई प्रांतिक स्तरावर युवक कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन बॅरिस्टर के.एफ.नरिमन यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. याच अधिवेशनात युथ लीगची स्थापना होऊन युसूफ हैदर अली यांची निवड झाली. पुण्यातील तरूणांना संघटित करून करून युवक संघ स्थापन करण्यात न.वि. गाडगीळ यांनी पुढाकार घेतला होता. ३ व ४ मे १९२९ रोजी सहावी महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरली. अध्यक्षस्थानी सुभाषचंद्र बोस होते.[४७]

### १.१८.१५ सायमन कमिशन :–

सायमन कमिशनच्या नियुक्तीच्या बातमीने हिंदुस्थानातील सर्व नेत्यांना व राजकीय संघटनांना धक्का बसला. एकही हिंदी माणूस नसलेले कमिशन हिंदुस्थानचे राजकीय भवितव्य कसे ठरविणार ? नव्हे अशा कमिशनला भवितव्य ठरविण्याचा अधिकार नाही अशी प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त केली जाऊ लागली. जे मवाळ सरकारनिष्ठ समजले जात त्यांनाही या गोष्टीचा संताप आला. हिंदी समाजाचा हा हेतुपुरस्पर अवमान आहे. हे सांगताना सर तेजबहाद्दूर सप्रु म्हणतात, कमिशनमध्ये एकही हिंदी माणूस न नेमून हिंदी लोकांना निकृष्ट दर्जा आहे. हे तर इंग्रजांनी ठरविलेच, शिवाय स्वतंत्र देशाची घटना कशी असावी? हे ठरविण्याचा अधिकार इंग्रजांनी हिरावून घेतला. ही गोष्ट हिंदी लोकांचा जाणूनबुजून अपमान करणारी आहे.[४८]

ज्या दिवशी सायमन कमिशन आले, त्या दिवशी पुण्यातील अनेक व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवलेली होती. सायंकाळी ६.०० वाजता शनिवार वाडयासमोर शि.म.परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. पुणे जिल्हयातील हजारो स्वयंसेवक सभेसाठी जमलेले होते. शि.म.परांजपे यांनी अध्यक्षीय भाषणात नमूद केले होते की, स्वराज्याच्या चळवळीत तुम्ही सक्रिय सहभाग घेतला. सायमन येथील मते पाहण्यासाठी व आजमविण्यासाठी येथे आले आहेत. त्यांनी आपले लोकमत पाहिले असल्यामुळे कमिशनास जनतेची अनुकुलता किती? हे त्यांच्या लक्षात आल्यावाचून राहिले नसेल. युसुफ मेहेरअलींनी नमूद केले की, हिंदू–मुस्लिमांनी स्वराज्याच्या ध्येयाखली एक व्हावे. केशवराज बांगडेनी नमूद केले की, इतकी वर्षे

इंग्रजांचे हिंदुस्थानवर नाव आहे. प्रथम इंग्रजांची नोकरशाही येथे काम करत आहे, याची प्रथम सायमनने चौकशी करावी.[४९]

### १.१८.१६ सविनय कायदेभंग चळवळ :–

सन १९३० साली भारतात दुसऱ्या व्यापक राष्ट्रीय आंदोलनास प्रारंभ झाला. हे आंदोलन सविनय कायदेभंगाचे आंदोलन म्हणून प्रसिद्ध आहे. हे आंदोलन करणे आणि कधी सुरू करायचे, याबाबत निर्णय काँग्रेसने गांधीजींच्यावर सोपविला होता. त्यानुसार त्यांनी मार्च १९३० च्या प्रारंभी मीठाचा कायदा मोडून सत्याग्रह सुरू करण्याचा आपला निर्णय जाहीर केला. हा त्यांचा निर्णय काहींना हास्यास्पद वाटला. काहींनी त्याची टवाळीही केली. परंतु काही काँग्रेस श्रेष्ठींनी मात्र या निर्णयाचे महत्त्व तात्काळ ओळखले. मिठाचा कायदा मोडण्याचा निर्णय देशातील अगदी तळागाळाच्या सामान्यातील सामान्य माणसालादेखील स्पर्शून जाणारा होता. मीठ ही सर्वानाच अगदी सामान्य माणसाला देखील दैनंदिन जीवनात लागणारी वरवर दिसायला शुल्लक; परंतु गरजेची वस्तू. अशा वस्तूवर सरकारने कर लावणे हा भारतीयावर मोठा अन्याय आहे. याची जाणीव या निर्णयाने सामान्य माणसाला करून देण्याचा गांधीजींचा मानस होता.

### १.१८.१७ सविनय कायदेभंग आंदोलनास पारंभ :–

सविनय कायदेभंग आंदोलनाने ब्रिटिश साम्राज्यशाहीपुढे एक जबरदस्त आव्हान उभे केले होते. या आंदोलनापूर्वी सायमन कमिशनविरूद्ध देशभर झालेली निदर्शने लाहोर अधिवेशनातील संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय, २६ जानेवारी १९३० रोजी देशभर साजरा झालेला स्वातंत्र्य दिन या सर्वामधून सविनय कायदेभंग आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झालेली होती. या आंदोलनापूर्वी महात्मा गांधीजींनी स्वराज्याचे सार असलेल्या १० मागण्या मान्यतेसाठी लॉर्ड आयर्विनकडे पाठविल्या होत्या. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असे सूचित करण्यात आले होते.[५०]

१२ मार्च  १९३९ रोजी साबरमती आश्रमातून महात्माजींनी आपल्या ७५ निष्ठावान अनुयायासह दांडी यात्रेला निघाले होते. सर्व हिंदुस्थान त्यांच्या पदयात्रेकडे प्रायोजित मनाने पहात होता.[५१]

१२ मार्च पोपटलाल शहा यांच्या नेतृत्वाखाली श्रीशिवाजी मंदिरामध्ये सकाळी ८.०० वाजता झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला. जमलेल्या लोकांनी सविनय कायदेभंग आंदोलनाची

माहिती पोपटलाल शहा व दत्तूपंत गुरव यांनी दिली. सायंकाळी देखील त्याच ठिकाणी वस्ताद दस्तगीर यांच्या अध्यक्षतेखली श.द.जावडेकर, एस.एम.जोशी, त्र.र.देवगिरीकर, ह.यो.जोशी, ग.ना. कानिटकर, यांची भाषणे झाली. या सर्वांच्या भाषणांचे सार म्हणजे सविनय कायदेभंग चळवळीसाठी स्वयंसेवकांची मानसिकता निर्माण करणे होय.

### १.१८.१८ फर्ग्युसन कॉलेजमधील ध्वजप्रकरण(१९३५):-

१९३५ हे वर्ष महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. २१ एप्रिल १९३५ रोजी महाविद्याल्याच्या मैदानात डॉ.चंद्रशेखर व्यंकटरामण यांच्या अध्यक्षतेखाली पहिला कार्यक्रम झालेला होता. जवळजवळ एक हजार विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यामुळे सुवर्ण महोत्सवी वर्षाची सुरूवात चांगली झालेली होती. या कार्यक्रमात वार्षिक स्नेहसंमेलनाच्या दिवशी ध्वजावरून झालेला गोंधळ व त्यांची दैनिक ‘लोकशक्ती’मध्ये छापून आलेली बातमी यामुळे येथील कार्यक्रमास वेगळीच कलाटणी मिळाली होती.[५२]

### १.१८.१९ प्रांतिक निवडणुका व पुणे जिल्हा :-

सन १९३६ च्या प्रांतिक निवडणूकांच्या वेळी सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला नसला तरी मतदारांची संख्या बरीच मोठी होती. त्यामुळे निवडणुकांच्या निकालावरून लोकमताचा कौल बऱ्याच अंशी स्पष्ट होणार होता. त्यादृष्टिने सन १९३९ च्या प्रारंभी आलेल्या प्रांतिक निवडणुकांचे निकाल बोलके ठरतात. प्रांतातील एकूण १५८५ जागांपैकी ८०६ जागा सर्वसामान्य मतदार संघासाठी होत्या व उर्वरित जागा वेगवेगळया गटांत विभागल्या गेल्या होत्या. ८०८ जागापैकी ७११ जागा कॉंग्रेसने ५८ जागांसाठी आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी २८ जागा जिंकल्या होत्या. त्यापैकी १९ उमेदवार वायव्य सरहद्द प्रांतातील होते. कामगार वर्गाने ३८ जागांपैकी २० जागा लढविल्या व १८ जागा जिंकल्या.

### १.१८.२० ‘छोडो भारत’ आंदोलन :-

भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या पर्वाला त्यावेळी सुरूवात झाली होती. सन १९४२ चे ‘छोडो भारत आंदोलन’ सुभाषचंद्र बोस यांच्या नेत्रदिपक सशस्त्र संग्राम, साताऱ्यातील प्रतिसरकारची लढाऊ चळवळ, नाविकांचे बंड आणि त्यांचे इतर सैन्यातील पडसाद असे एकाहून एक स्वातंत्र्य लढयांनी उग्र आविष्कार प्रकट होऊ लागले आणि त्यावेळेस

स्वातंत्र्याच्या दिशेने होणाऱ्या घटनात्मक हालचाली, वाटाघाटींनाही प्रारंभ झाला. सत्ता वाटप तपशील, मसुदे, मसुदे आणि स्वरूप ठरू लागले.[५३]

पुणे जिल्हयातील सासवड येथील प्रेमाताई लिमये यांनी २१ ऑक्टोबर १९४० रोजी युद्ध दिशेने भाषण करून पहिला वैयक्तिक सत्याग्रह केला. या सत्याग्रहाची पूर्वकल्पना येथील जिल्हाधिकाऱ्यांना दिलेली होती. सत्याग्रह केला म्हणून भालचंद्र महेश्वर गुरूजी व आचार्य विष्णू प्रभाकर लिमये यांना पोलिसांनी अटक केली. पुण्यातील ॲडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने Rule 38(5) (1) 2 of the defence of India rules 1939 नुसार दोघांनाही प्रत्येकी एक वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा दिली.

पुणे शहरात ९ ऑगस्ट रोजी निघालेल्या मिरवणुकीत जे. एस.कांची होते. ते पुण्यातील काँग्रेसचे नेते असून प्रसिद्ध व्यापारी देखील होते. मिरवणुकीच्या दुसऱ्या दिवशी त्यांना अटक झाली. ही वार्ता व्यापारी बाजारपेठेत समजताच सर्व दुकाने बंद झाली. कांचीना पोलीस चौकीत अटक केली होती. तेथे लोकांचा जमाव जमा होत गेला. जमलेल्या लोकांनी 'छोडो भारत', 'करेंगे या मरेंगे', कांची झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या.

**१.१८.२१ पुणे जिल्हयातील भूमिगत चळवळ :–**

पुणे शहरातील डेक्कनवरील प्रभात रोडजवळ कचरु पाटील यांच्या विहिरीजवळ असणाऱ्या या पडळीत शिरूभाऊ लिमये यांनी दोन खोल्या मिळवलेल्या होत्या. या जागेस 'जम्मत' असे सांकेतिक नाव दिलेले होते. प्रत्येक रविवारी काही तरूण एकत्र येऊन तेथे देशभक्तीपर चर्चा करत होते. शेवटी न.वि.गाडगीळ, चि.तु.करंदीकर, शिरूभाऊ लिमये यांचे समवेत झेंडावंदन झाल्याबरोबर 'विजयी विश्व तिरंगा प्यारा' असे गीत गात होते. या ठिकाणच्या विचारापासून ग.प्र.प्रधान यांना स्वातंत्र्य आंदोलनात येण्याची प्रेरणा मिळाली होती.

पुणे शहराप्रमाणेच ग्रामीण भागात भूमिगत आंदोलन सुरू झालेले होते. सासवड येथे राष्ट्रसेवा दलाची शाखा होती. तिचे प्रमुख धोंडो रंगनाथ बोकिल हे होते. पुरंदर तालुक्यातील सासवड हे आंदोलनाचे मुख्य केंद्र होते. तेथील अनेक लोकांनी आंदोलनात सहभाग घेऊन तुरूंगवास भोगला होता. सासवड शहर व परिसरात भूमिगत मार्गाने लढा सुरू होता. नारायणपूर जवळील शेतात टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या. त्यामुळे काही दिवस दूरसंचार बंद पडले होते.[५४]

या सर्व चळवळी पुणे शहरात घडून आल्या होत्या. त्याचा परिणाम अनेक तरुणांवर झाला होता. त्यात ग.प्र.प्रधान यांचाही सहभाग होता. त्यामुळे ग.प्र.प्रधान हे या चळवळीकडे झुकले होते.

## १.१९ समारोप :–

भारतीय स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयाची कामगिरी मोलाची आहे. पुणे जिल्हयात आणि पुणे शहरामध्ये अनेक सुधारक, स्वातंत्र्य सैनिक, थोर व्यक्ती होऊन गेल्या आहेत. पुणे शहर आणि पुणे जिल्हा ऐतिहासिक व भौगोलिकदृष्टया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय इतिहास लेखनाबरोबरच स्थानिक पातळीवरील इतिहास आपण ज्याला प्रादेशिक इतिहास म्हणतो, की ज्याचा इतिहास लेखनशास्त्रात मोठया प्रमाणात वापर होताना दिसतो. स्थळ, काळ आणि व्यक्ती या इतिहासाच्या त्रिसूत्री आहेत. या त्रिसूत्रीप्रमाणे आणि कार्लाईल इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे, इतिहास म्हणजे थोर पुरूषांची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय. म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर, त्यांच्या जडघडणीत चांगला व वाईट परिणाम होत असतो. पुणे जिल्हयाची रचना निसर्गाने अशी केली आहे की, ज्याप्रमाणे म्हटले जाते. 'पुणे तेथे काय उणे' त्याप्रमाणे पुण्याची परिस्थिती पाहावयास मिळते. नैसर्गिक साधन संपत्तीने परिपूर्ण असा हा जिल्हा आहे. नद्या, धरणे, डोंगर, किल्ले , गिरी, दुर्ग, थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे, प्रेक्षणीय स्थळे, शैक्षणिक सोयी, उद्योग वाहतूक, व्यापार दळवणवळण, रस्त्यांचे जाळे, लोहमार्ग, विमान मार्ग या सर्व गोष्टी पुणे जिल्हयात आढळून येतात.

ज्याप्रमाणे भौगोलिकदृष्टया पुणे जिल्हयाचे महत्त्व खूप आहे. त्याचप्रमाणे ऐतिहासिक दृष्टयासुद्धा पुणे जिल्हयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण पुणे जिल्हयाचे ऐतिहासिक दृष्टया तीन कालखंड पडतात. यामध्ये प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक असे होत. या जिल्हयाला खूप ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म या जिल्हयातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. पुढे हिंदवी स्वराज्याची शपथ याच जिल्हयात घेतली गेली. त्यांचे बालपण याच जिल्हयात गेले.

पेशव्यांनी आपला राज्यकारभार याच जिल्हयातून म्हणजे पुण्यातून केला. त्यांनी या काळात अनेक मोठया वास्तू या जिल्हयात व पुणे शहरात बांधल्या. त्या इतिहासात ऐतिहासिक ठेवा म्हणून आज पाहावयास मिळतात. पेशवाईच्या कालखंडानंतर इंग्रज काळ आला आणि

याच पुणे जिल्हयामध्ये इंग्रजाविरूद्ध अनेक उठाव झाले. या पुणे जिल्हयाने अनेक थोर पुरूष, महापुरूष, स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक दिले आहेत. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये या जिल्हयाचे योगदान खूप मोठे आहे. म्हणूनच राष्ट्रीय सभेच्या अनेक नेत्यांची पुणे जिल्हयाला भेटी दिल्या होत्या. भारताच्या स्वातंत्र्य लढयात ज्या–ज्या चळवळी झाल्या. त्या त्या चळवळी पुणे जिल्हयामध्ये पार पाडल्या पुणे जिल्हयामध्ये फक्त स्वातंत्र्य चळवळी झाल्या नाहीत तर समाज सुधारणेसाठी सुद्धा मोठया प्रमाणात प्रयत्न झालेले दिसतात. मग ते शिक्षणाचा प्रयत्न असो किंवा विधवा विवाह किंवा अस्पृश्यता निर्मूलन असेल, या सर्वामध्ये पुणे जिल्हयातील समाजसुधारकांनी प्रयत्न केले आहेत. अशाप्रकरे पुणे जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य लढयातील सार्वजनिक सभेच्या स्थापनेपासून क्रांतिकारी चळवळ, सायमन कमिशन, स्वदेशी आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळीचे पहिले व दुसरे पर्व, वैयक्तिक सत्याग्रह, राष्ट्रसेवा दलाचे कार्य, छोडो भारत आंदोलन, भूमिगत चळवळी इत्यादीमध्ये भाग घेऊन स्वातंत्र्य चळवळीचे कार्य पुणे जिल्हयातील क्रांतिकारकांनी मोठया नेटाने पार पाडले.

## संदर्भ /तळटिपा :-


१) पाठक अरूण (संपा.), पुणे जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९९९, पृ.१२७२

२) कित्ता, पृ.७८८

३) सौताडेकर विवेक, पुणे जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, २०११ पृ.७

४) देशमुख रा.नी., आपला पुणे जिल्हा, कल्पना प्रकाशन, सुधारित आवृत्ती-२०१२, पृ.५

५) सौताडेकर विवेक, उपरोक्त, पृ.७

६) वंजारी सारिका अशोक व काळे शृती, पुणे जिल्हा, प्रकाशक विवेक गोसावी(नियंत्रक) प्रथम आवृत्ती २००८, तिसरे, २०१२, पृ.२१

७) पाठक अरूण (संपा.), उपरोक्त, पृ. १३०

८) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड- ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतिकोश मंडळ, मुंबई, १९८०, पृ.७८८

९) कित्ता, पृ.७८८

१०) सोसे दिपाली आतिष, पुणे जिल्हा विशेष, आपलं प्रकाशन पुणे, प्र.आ.१२ डिसेंबर २०१०, पृ.१०

११) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड- ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८०, पृ.७८७

१२) सौताडेकर विवेक, उपरोक्त, पृ.७

१३) कित्ता, पृ.७

१४) जाधवराव देवा, पुणे जिल्हा, ओम व्हिजन अॅकेडमी, पुणे, पृ.२०

१५) कित्ता, पृ.१६

१६) कुलकर्णी चंद्रकांत, अंकुर, अंक १५ वा, मार्च २०११, पृ.२९

१७) दीक्षित म.श्री., असे होते पुणे, प्रकाशक-सौ.सविता जोशी, पुणे, प्रथम आवृत्ती, १९ मे २००३, पृ.९

१८) सोसे दिपाली आतिष, उपरोक्त, पृ.१७

१९) खरे जयंत, पेशवाईतील आठवणी, प्रकाशक सौ.सविता जोशी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट २००४, पृ. ७

२०) मंगुडकर मा.प., बदलते पुणे, प्रकाशक सौ.सविता जोशी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी २००१, पृ. १६

२१) महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, २००४, पृ.८

२२) महाजन शां.ग., उपरोक्त, पृ. १६

२३) कित्ता, पृ.१७

२४) रानडे म.गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, मुंबई, १९८९, पृ. ७६

२५) कित्ता, पृ.७९

२६) सौताडेकर विवेक, उपरोक्त, पृ.६

२७) फडतरे भूषण गोविंद, स्वातंत्र्य लढयाचे पाईक, अथर्व प्रकाशन, पुणे, ११ मार्च २०१५, पृ.२५

२८) कित्ता, पृ.६

२९) फडतरे भूषण गोविंद, भारतीय पुणे जिल्हयातील योगदान, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट २०१३, पृ.१५

३०) कित्ता, पृ.२५

३१) कित्ता, पृ.१

३२) फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड–१, विद्या प्रकाशन पुणे, १९८९, पृ. १०३

३३) जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, २००४, पृ.५९

३४) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४

३५) फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड–१, उपरोक्त, पृ. १०४

३६) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, चौथी आवृत्ती, ११ जून २००४, पृ. ४७

३७) फडकेय.दि., लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक, विद्या प्रकाशन पुणे, १८९८, पृ. ९

३८) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.३४

३९) जाधव व्ही. के., उपरोक्त, पृ.६०

४०) कित्ता, पृ.१२१

४१) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४

४२) फडके य.दि., उपरोक्त, पृ.५९

४३) सौताडेकर विवेक, उपरोक्त, पृ.६

४४) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २५

४५) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.४५

४६) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, दुसरी आवृत्ती, ८ मार्च २००४, पृ.१०७

४७) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.७१

४८) जाधव व्ही. के., उपरोक्त, पृ. ६२

४९) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.७१

५०) फडकेय.दि., उपरोक्त, पृ.११

५१) कित्ता, पृ. २४

५२) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.७९

५३) जावडेकर श.द., आधुनिक भारताचा, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, पृ.११५

५४) फडतरे भूषण, उपरोक्त, पृ.१३८ ते १७१

# प्रकरण दुसरे

# ग.प्र.प्रधान यांचे प्रारंभीचे जीवन

## २.१ प्रस्तावना :–

प्रधान सरांच्या जीवन काळात एकूण पाच ते सहा वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांनी त्या त्या वेळेस निर्णय घेऊन आपल्या स्वकर्तृत्वाने कामाचा ठसा उमटवला आहे. कारण त्यांच्या बालवयात घरी आणि शाळा, कॉलेज आणि मित्र यांच्याकडून तसे संस्कार झाले होते. साने गुरूजी, महात्मा गांधी, नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी यांसारख्या थोर पुरूषांचा सहवास त्यांना लाभला होता. त्यामुळे त्यांचे जीवन उजळून गेले.

ग.प्र.प्रधान यांचे बोलणे व वागणे आणि विचार यात कमालीची सुसंगती होती. शिवाय त्यांनी स्वतःवर परिणाम करणाऱ्या घटकांबद्दल, ते जगले त्या कालखंडातील राजकीय–सामाजिक घडामोडीबद्दल आणि स्वतःच्या गुण–दोषाबद्दल किंवा सामर्थ्यस्थाने व कच्चे दुवे यांबद्दल अतिशय स्वच्छ व स्पष्ट शब्दांत आणि निःसंकोचपणे लिहिले आहे. त्यामुळे त्यांचे जवीन व कार्य समजावून घेता येणे तुलनेने सोपे आहे.

या प्रकरणात ग.प्र.प्रधान यांच्या प्रारंभीच्या जीवनाची माहिती दिलेली आहे. त्यांच्यावर बालपणी, आई व वडील, शालेय जीवनात म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन जीवनात कशाप्रकारचे संस्कार झाले, याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच त्याच्या सहवासात आलेल्या व्यक्तींनी त्याच्या जीवनावर कोणकोणते परिणाम घडवून आणले त्याची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## २.२ प्रधान घराण्याची कौटुंबिक पार्श्वभूमी :–

प्रधान कुटुंब मूळचे ठाणे जिल्हयातील मुरबाड गावचे. त्यांचे त्या ठिकाणी घर, जमीन असे काहीच नसल्याने सारेजण उपजीविकेसाठी बाहेर पडले. प्रधानांच्या चुलत भावंडांनी मुंबईमध्ये बँका, कस्टम्स अशा खात्यात नोकऱ्या केल्या. सर्वजण सरळमार्गी, सुस्वभावी आणि मध्यमवर्गीय होते. त्यांना फार मोठया महत्त्वाकांक्षा नव्हत्या परंतु त्यांच्या कुटुंबात एकोपा होता.[१]

ग.प्र.प्रधान यांचा जन्म याच कुटुंबात २६ ऑगस्ट १९२२ ला झाला. त्यांच्या जन्मदिनी गणेश चतुर्थी असल्यामुळे त्यांचे नाव 'गणेश' असे ठेवण्यात आले. आई–वडिलांच्या मायेच्या

सावलीत ते वाढले. ३५ वर्षांचे होईपर्यंत त्यांच्यावर वडिलांचे छत्र होते. त्यांना नऊ भावंडे होती. गणेश हे सर्वात धाकटे होते. त्यांची सहा भावंडे लहानपणीच वर्ष–दीड वर्षांची असताना मृत्यू पावली, असे त्यांची आई सांगत. त्यांची सर्वात थोरली बहीण प्रभाताई गणेशहून अकरा वर्षांनी मोठी होती. तिचे लग्न सोळाव्या वर्षी झाले आणि अकाली एकोणतिसाव्या वर्षी प्लूटसीच्या आजाराने त्या मृत्यू पावल्या. गणेश यांना त्यांचा थोडासा सहवास मिळाला. त्यांच्या बहिणीला वाचनाची फार आवड होती. त्यांच्या चार मुलांपैकी एकच मुलगा जगला. तिचे यजमान गंगाधर म. खोपकर उर्फ बाबासाहेब हे अतिशय हुशार व सुस्वभावी होते. तिचा मुलगा आनंद हाही असामान्य होता. आनंद हा स्वतःच्या हिमतीवर इंग्लंडला जाऊन टिकला आणि बी.ओ.ए.सी.मध्ये फोटोग्राफी डिपार्टमेंटमध्ये झाला.[२]

### २.२.१ ग.प्र.प्रधान यांचे बालपण :–

ग.प्र.प्रधान यांचे आजोळघर म्हणजे मूळचे कल्याणचे चौबळयांचे घर. त्यांना तीन मामा आणि एक मावशी होती. ते सगळे त्यांच्या आईपेक्षा वयाने लहान . थोरले मामा एलफिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षक होते. मधले मामा पुण्याला नावाजलेले वकील होते. धाकटे मामा जन्मगावच्या हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक होते. ते साने गुरूजींचे मित्र होते. त्यांच्या भाऊमामांमुळेच ते १९४० पासून खाकी वापरू लागले.[३] ग.प्र.प्रधान यांचा स्वभाव बुजरा आणि एकलकोंडा होता. त्यामुळे मित्रापेक्षा पुस्तकात त्यांचे मन अधिक रमायचे.[४]

### २.२.२ कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रभाव :–

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मुलगा आप्पा पाटील हा प्रधान यांचा मित्र होता. त्याच्याबरोबर साताऱ्यातील मंगळवार पेठेत धनिणीच्या बागेतील वसतिगृहात प्रधान एकदा गेले तेथील वातावरण पाहून ते चकित झाले. मुले स्वतः भांडी घासतात, झाडतात, जात व धर्माचा विचार न करता एकाच पंक्तित मजेत जेवतात. हे सारे त्यांना नवीन आणि अनपेक्षित होते. त्यामुळे प्रधान यांच्या आत्तापर्यंत जगत असलेल्या पांढरपेशा आयुष्याला हादरा बसला. आपल्या सुरक्षित पण संकुचित घरकुलापेक्षा हे विशाल कुटुंब, वातावरण त्यांना अधिक भावले. घरी सोवळे ओवळे नसले तरी धार्मिक वातावरण होते. त्यापेक्षा आण्णांच्या सावलीत आणि शिस्तीत कष्ट करणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मुक्त जीवन त्यांना अधिक आकर्षक वाटले.[५]

### २.२.३ ग.प्र.प्रधान यांचे प्राथमिक शिक्षण :–

ग.प्र.प्रधान यांचा पांढरपेशा कुटुंबात जन्म झाला होता. त्यांचे वडील सन १९१० मधील ग्रॅज्युएट होते. त्यांच्या आईवडिलांना वाचनाची फार आवड होती. त्यामुळे लहानपणापासून प्रधानसरांच्या भोवती भरपूर पुस्तके असत. मुलांसाठी असलेली आनंद आणि सालापत्रक ही दोन मासिके त्यांच्याकडे नियमित येत असत. 'आनंद'च्या 'राजा शिवाजी' खास अंकात वासुदेव गोविंद आपटे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे छोटे व रसाळ चरित्र लिहिले होते. ते प्रधान सरांनी तिसऱ्या इयत्तेपासून वाचले होते व त्यांना ते फार आवडले होते. म्हणून त्यांना वाचनाचा छंद लागला होता.

ते पुणे जिल्हयातील इंदापूरच्या लोकल बोर्डाच्या शाळेत चौथी पास होईपर्यंत शिकले होते. त्यावेळी त्यांचे शिक्षक स्वभावाने चांगले होते. त्यांच्यामुळे गणित आणि भाषा हे विषय पक्के बनले होते. नंतर वडिलांची बदली सातारा येथे झाली. सातारा हायस्कूलमध्ये पाटणकर सर चांगले इंग्रजी शिकवित होते. शिवाय घरी वडील तर्खडकर भाषांतर पाठमाला करून घेत असत. त्यामुळे इंग्रजी विषय त्यांना आवडू लागला होता. वडील त्यांना सातारच्या शहर वाचनालयात घेऊन जात असत. तसेच त्यांचे नावही सभासद म्हणून नोंदले होते. या वाचनालयातून त्यांनी 'गड आला पण सिंह गेला' ही ह.ना.आपटे यांची कादंबरी, 'सावळया तांडेल' ही नाथ माधवांची कादंबरी, 'सुखाचा मूलमंत्र' हे नारायण हरी अपटे यांचे पुस्तक त्यांनी वाचले होते.[६]

### २.२.४ ग.प्र.प्रधान यांचे माध्यमिक शिक्षण :–

माध्यमिक शाळेत असताना वाय.जी.पटवर्धन नावाच्या शिक्षकामुळे प्रधानांना लागलेली इंग्रजी भाषेची गोडी. त्याचा परिणाम म्हणजे फार कमी वयात इंग्रजी कादंबऱ्या वाचायला प्रधानांनी सुरूवात केली. 'माझी वाटचाल' या पुस्तकात या संदर्भात एक आठवण सांगताना प्रधान म्हणतात, 'एकदा पटवर्धन सरांनी आमच्या वर्गावर सिनॉनिम्स म्हणजे 'समानार्थी शब्द' हा व्याकरणाचा पाठ शिकवला. पण नंतर पुस्तक बाजूला ठेवून म्हणाले की हे झाल परीक्षेच्या दृष्टीने, पण मुलांनो या जगात कोणतेही दोन शब्द समानार्थी नसतात. प्रत्येक शब्दाला वेगळी छटा असते. हे त्यांनी उदाहरणासहीत सांगितले होते. प्रधान सरांचे 'मला उमजलेले' हे पुस्तक प्रकाशित झाले त्यावेळच्या समारंभात ते म्हणतात की, 'मला समजलेले' असे नाव मी या

पुस्तकाला जाणीवपूर्वक दिलेले नाही. कारण ती प्रक्रिया फार पुढची आहे. म्हणजे खांडेकर, महिपती व पटवर्धन या तिघांचा विलक्षण प्रभाव कुमार–किशोर अवस्थेतील प्रधानावर पडला होता. वयाच्या १८ व्या वर्षी स्वातंत्र्यलढयात भाग घेण्यात, वयाच्या २३ व्या वर्षी इंग्रजीचे प्राध्यापक होण्यात आणि भावी काळात सुबोध शैलीतील लेखन करण्यात अनुक्रमे पटवर्धन, खांडेकर, महिपती या तिघांचे संस्कार कारणीभूत ठरले.[७]

**२.२.५ ग.प्र.प्रधान यांचे महाविद्यालयीन जीवन :–**

मॅट्रिकच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून गणेश पास झाला आणि त्यांनी कॉलेजला प्रवेश घेतला. आर्ट साईड घेतल्यामुळे अवांतर गोष्टींना भरपूर वेळ मिळत असे. ते सोशॉलिस्ट स्टडी सर्कलमध्ये जाऊ लागले. प्रधानांनी एस.एम.जोशी, ना.ग.गोरे यांची बौद्धिके तेथे ऐकली. शिरूभाऊ लिमये यांची भेटही तिथेच झाली. या स्टडी सर्कलमध्ये ना.ग.गोरे हे जयप्रकाश नारायण यांच्या 'व्हाय सोशॅलिझम' या पुस्तकाचे वाचन करत असत. ते एस.एम.जोशी, बंडू गोरे, मधू लिमये वगैरे कार्यकर्ते राजकारणावर चर्चा करत असत. प्रधान सुरूवातीला केवळ श्रोते होते. कन्या शाळेसमोरच्या वाडयात काँग्रेसचे कार्यालय होते आणि तिथेच शिरूभाऊंची खोली होती. शिरूभाऊंनी प्रधानांना राजकारणावरील बरीच पुस्तके वाचायला दिली. प्रभात रोडवरील एका आडबाजूला मैदानाजवळची छोटी खोली शिरूभाऊंनी मिळवली होती. त्या जागेस त्यांनी 'जंमत' असे नाव दिले होते. दर रविवारी हे सगळे मित्र तिथे जमून राष्ट्रध्वजाला वंदन करत असत. 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झँडा उँचा रहे हमारा' हे गीत म्हणत असत.[८]

शिरूभाऊंच्या खोलीत एक जुन कपाट होते. त्यामध्ये ब्रिटिश सरकारने जप्त केलेली अनेक पुस्तके होती. क्रांतिकारकांची चरित्र, त्यांच्या संघटनांची माहिती, सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न कसे झाले याची माहिती व वर्णने त्यात होती. प्रधानांना महाराष्ट्रातील आणि बंगालमधील क्रांतिकारंकाच्या कार्याची माहिती तिथेच वाचायला मिळाली त्यामुळे तरूण वयात त्यांना सशस्त्र क्रांतीचे आकर्षण वाटू लागले. नंतर त्यांच्या गटातील कार्यकर्ते स्वातंत्र्य लढयाची तयारी करण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी गेले. पण प्रधानांना मात्र त्यावेळी तसे धाडस झाले नाही. बंडू गोरे त्यांच्याशी विस्ताराने चर्चा करत असे. त्या चर्चेत वास्तव सांगत होते. त्यामुळे प्रधानांना वास्तवाचे भान आले. त्यांच्या विचारातील गोंधळ कमी झाला.

पुण्यात चालणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाच्या स्टडी सर्कलमधील मार्क्सवादासंबंधीची भाषणेही त्यांनी ऐकली होती. भाई डांगे यांची वक्तृत्वशैली त्यांना आवडली. तर रॉयिस्ट पक्षाच्या स्टडी सर्कलमधील जी.डी.पारीख यांची व्याख्याने त्यांना आवडली. य.गो.जोशी यांनी 'वादविवेचनमालात' प्रसिद्ध केलेली पुस्तके त्यांनी वाचली. आचार्य जावडेकरांची 'लोकशाही' आणि 'राष्ट्रवाद' ही पुस्तके, ना.ग.गोरे यांचा 'विश्वकुटुंबवाद' हे पुस्तक आणि पा.वा.गाडगीळांचे 'फॅसिझम' ही पुस्तके त्यांना विशेष आवडली. त्या काळातील विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य कसे मिळावे, असे वाटत असले तरी, ते कोणत्या मार्गाने मिळवायचे याबद्दल मतभेद होते. कोणी रॉयवादी, कोणी कम्युनिस्ट, कोणी गांधीवादी तर कोणी संघात जाणारा, अशी विविधता होती. आगरकरांचे लेख वाचून, राजकीय सुधारणाएवढाच सामाजिक सुधारणांचा मार्ग अवघड आहे. याची तीव्र जाणीव प्रधानांना झाली.[९]

प्रधान सरांबद्दल दत्ता ताम्हाणे म्हणतात, 'गणेश प्रधानांचा व माझा पन्नास वर्षांचा संबंध होता'. राष्ट्रसेवा दलाच्या माध्यमातून हा स्नेह जुळला. राष्ट्र सेवादलाच्या माध्यमातून प्रधान वाढत होते. नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी, अच्युतराव पटवर्धन यांच्या सहवासात तर; तर माझा सत्संग होता. शंकरराव देवगिरीवर, स्वामी आनंद इत्यादींबरोबर त्यामुळे माझ्यावर गांधीवादाचे संस्कार होत होते, तर प्रधान कट्टर समाजवादी होते.[१०]

गणेश प्रधान कॉलेजच्या पहिल्या वर्षापासूनच स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले पण काकांना त्याची नीटशी कल्पना नव्हती. १९४२ साली ते पकडले गेले. तेव्हा त्यांना फार दुःख झाले. त्यांचे वडील गणेश यांची फार काळजी करत. त्यावेळी राजबंदयांना नातलगांना भेटण्याची परवानगी नव्हती. सुटका झाल्यानंतर १९४३ च्या अखेरीस ते त्यांच्या वडिलांना भेटले. गणेश सुटल्याचा त्यांना इतका आनंद झाला की, गणेश हे त्यांच्या मनाविरूद्ध वागले हे ते विसरूनच गेले. काही दिवसांनी त्यांचे वडील एवढेच म्हणाले, 'तू तुझ्या मनासारखा चळवळीत गेलास, पण पुढे तुझा काय विचार आहे? मी आता रिटायर झालोय. घर विकत घेण्यासाठी सगळा प्राव्हिडंट फंड संपलाय, मला फक्त आठ रूपये पेन्शन आहे. बँकेत तुटपुंजी शिल्लक आहे. तुला आता नोकरी केली पाहिजे. यापुढे संसार तू सांभाळला पाहिजेस'.गणेश त्यांना म्हणाले,  मला एम.ए.व्हायचयं, नंतर मी नोकरी करीन. तुमचे आणि आईचे आयुष्यात कसलेही हाल मी होऊ देणार नाही. त्या उत्तराने त्यांच्या वडिलांना मोठे समाधान वाटले. ते

म्हणाले, तू एम.ए.हो. एक दीड वर्ष आपण कसंही काढू. या वेळी नोकरी करू नकोस. एम.ए.ला क्लास मिळवून तू प्रोफेसर व्हावेस इतकीच माझी इच्छा आहे. वडिलांची अपेक्षा पूर्ण केल्याने गणेश प्रधान यांना फार मोठा आनंद वाटला.[११]

ग.प्र. प्रधान अठराव्या वर्षी फर्ग्युसन कॉलेजात प्रथम दाखल झाले. तेव्हा म्हणजे १९३९–४० च्या सुमारास दुसऱ्या महायुद्धाची धामधूम सुरू होती आणि भारतीय स्वातंत्र्य संग्राम एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपला होता. गांधीजींच्या नेतृत्वाखाली कॉँग्रेस अंतिम लढा उभारण्याच्या तयारीत होती आणि कॉँग्रेसमधील एक गट समाजवादी समाजरचना आणण्याच्या दिशेने विचार करीत होता. नेमके त्या काळात सोशॅलिस्टांच्या स्टडी सर्कलमध्ये तारूण्यात पदार्पण केलेले प्रधान दाखल झाले होते. त्यानंतर १९४२ ची 'चले जाव' चळवळ सुरू झाली. तेव्हा कॉँग्रेस सोशॅलिस्ट भूमिगत झाले. प्रधानही भूमिगत राहून काम करू लागले आणि पकडल्याानंतर तुरूंगात त्यांना साने गुरूजींचा सहवास लाभला. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू झाल्यावर, तुरूंगातून सुटका झालेले तरूण राजकीय कैदी कौटुंबिक आघाडीवर स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करू लागले. प्रधानांनीही तेच केले. एम.ए.पूर्ण करून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले.[१२]

**२.२.६ ग.प्र.प्रधान यांच्यावर वाचनातून झालेले संस्कार :–**

समाजासाठी झिजण्याचा संकल्प मॅट्रीकला असतानाच अबोध वयात त्यांनी सोडला. साने गुरूजी त्यांना मित्रासह नामदार गोखलेंच्या स्मारकाजवळ घेऊन गेले. वेळ रात्रीची. स्थळ कॉलेजच्या मागची टेकडी. साने गुरूजींनी आवाहन केले, गोखल्यांनी इथेच देशसेवेची शपथ घेतली व जीवनभर पाळली. तुम्हीही आज शपथ घ्या की आपली मायभूमी स्वतंत्र होण्यासाठी तुम्ही सर्वस्व अर्पण कराल. प्रत्येकाने आपल्या मनाशी शपथ घ्या. मला खात्री आहे तुम्ही ती पाळाल. यापुढच्या स्वातंत्र्य लढयात आपण तुरूंगात भेटू. गणेश प्रधान यांनी शपथ घेतली.[१३]

प्रधानांच्या आयुष्यातील पहिला टप्पा हा त्यांच्या वयाच्या १८ वर्षांपर्यंतचा मानता येईल. त्यांचे वडील सरकारी नोकरीत असल्याने इंदापूर, सातारा, पारनेर व पुणे या ठिकाणी त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले होते. त्या वेळच्या मध्यमवर्गीय घरात वाढल्याने वाचनाचे संस्कार होणे स्वाभाविक होते. प्रधानांच्या आई–वडिलांना तर वाचनाची विशेष आवड होती. त्या कालखंडात तीन घटकांनी प्रधानांवर दूरगामी परिणाम केला असं दिसतं.

पहिला घटक म्हणजे वि.स.खांडेकरांच्या कादंबऱ्यांनी, विशेषतः 'दोन ध्रुव' व 'उल्का' या दोन कादंबऱ्यांनी कुमार वयातील प्रधानांना हलवून सोडले. पांढरपेशा जगण्याचा बाहेर डोकावण्यास त्यांना भाग पडले. त्या वेळच्या राजकीय, सामाजिक स्थितीचे भान येण्यात त्या दोन कादंबऱ्या प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या. उदात्त ध्येयवाद, देशासाठी, समाजासाठी झोकून देण्याची उर्मी, त्यागी प्रवृत्ती, साधी सात्विक जीवन शैली या सर्वांचे बीज तिथे पडले.

दुसरा घटक म्हणजे महिपती या संत चरित्रकाराची पुस्तके. प्रधानांची आई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यामुळे त्यांना धार्मिक पुस्तके वाचून दाखवणे हे काम किशोरवयीन प्रधानांकडे होते. अठराव्या शतकात महिपतीने भक्तविजय, संतविजय, पांडवप्रताप अशा काही पोथ्या किंवा संत चरित्रे लिहिली. जवळपास अडीचशे संतांची लहान चरित्रे लिहणाऱ्या महिपतीची भाषा अत्यंत रसाळ व उद्‌बोधक होती. सामान्यातील सामान्य माणसाच्या मनात लक्ष वेधून घेणारी होती. महिपती हा काही संस्कृत पंडित नव्हता, त्यामुळे संस्कृतच्या प्रभावापासून त्याची भाषा मुक्त होती. असे म्हटले जाते की, राजा रविवर्म्याने हिंदू देवदेवतांना चेहरा, रंग–रूप दिले, मानवी आकृत्या बहाल केल्या; तसेच महिपतीने विस्कळीत स्वरूपातील माहिती एकत्र करून संतांची चरित्रे रेखाटली. महिपतीने लिहिलेली चरित्रे आईला वाचून दाखविण्याच्या निमित्ताने प्रधानांवर महिपतीच्या भाषेचा मोठा प्रभाव पडला. तो प्रभाव इतका आहे की, त्यानंतर खांडेकऱ्यांच्या कादंबऱ्यांनी प्रधानांचे भावविश्व व विस्तारविश्व ढवळून काढले असले तरी खांडेकरांच्या भाषेचा किंचितही परिणाम प्रधानांच्या भाषेवर झालेला दिसत नाही. एवढेच नव्हे तर प्रधानांनीच लिहून ठेवले आहे की, 'कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक, निबंध, वैचारिक लेखन हे सर्व वाचायला मला आवडत असले तरी चरित्र, आत्मचरित्रपर लेखनाचे प्रमाण जास्त असे.

'जंमत' च्या स्टडी सर्कलच्या ठिकाणी कोपऱ्यात एक जुने कपाट होते. त्यामध्ये ब्रिटिश सरकारने जप्त केलेली अनेक पुस्तके होती. क्रांतिकारकांची चरित्रे, त्यांच्या संघटनांची माहिती, सशस्त्र क्रांतिकार्याचे प्रयत्न कसे झाले, याची माहिती व वर्णने त्यात असत. प्रधानांना महाराष्ट्रातील आणि बंगालमधील क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती तिथेच वाचायला मिळाली. त्यामुळे तरूण वयात त्यांना सशस्त्र क्रांतिचे आकर्षण वाटू लागले. नंतर त्यांच्या गटातील कार्यकर्ते स्वातंत्र्यलढयाची तयारी करण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी गेले. पण प्रधानांना मात्र

त्या वेळी तसे धाडस झाले नाही. बंडू गोरे त्यांच्याशी विस्ताराने चर्चा करत असे, त्याने प्रधानांना सांगितले, स्वातंत्र्य लढयाकडे रोमँटिक, स्वप्नार्थ दृष्टीने पाहणे योग्य नाही.[१४]

### २ .२.७ ग.प्र.प्रधान यांचे वडील :–

गणेश प्रधान यांच्या वडिलांचे नाव प्रभाकर प्रधान . गणेशचे चुलतभावंडे त्यांना काका असे म्हणत. प्रभाकर हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांचे आई–वडील वारले. त्यांना थोरल्या भावाचा थोडाफार आधार मिळाला. त्या काळात मॅट्रिकच्या वर्गात जाण्याआधी त्यांचे लग्न झाले होते. त्यांची पत्नी अकरा वर्षांची होती. त्यांचे माहेर पुणे होते. त्यांचे शिक्षण चौथीपर्यंत झाले होते. त्यांना वाचनाची आवड होती.[१५] प्रभाकर मुंबईत राहून विल्सन कॉलेजमध्ये बी.ए.झाले. त्यांचे संस्कृत उत्तम होते. मुलींना संस्कृत यावे अशी त्यांची इच्छा होती. इंग्रजीतील डिकन्स आणि स्कॉट हे त्यांचे आवडते लेखक होते. मुलांना ते नेहमी पुस्तके आणून देत. त्यांनी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. मुलांकडून तर्खडकर भाषांतर पाठमाला करून घेतली. मुलांसाठी ते ‘शालापत्रक’, ‘आनंद’ ही मासिके घेत असत.[१६]

प्रभाकर प्रधान यांनी प्रथम रेव्हेन्यू खात्यात नोकरी धरली. परंतु परीक्षा त्यांना धार्जिणी नसल्यामुळे ते त्या खात्याची परीक्षा पास होऊ शकले नाहीत. पुढे पाच वर्षांनी ते नोंदणी खात्यात गेले व तेथे मात्र पास झाले आणि सब रजिस्ट्रार झाले, परंतु त्यांचे मन त्या खात्यात कधीच रमले नाही. त्यांच्या सरळ एकमार्गी स्वभावाला अनेकदा फार ताप होई. ते नेहमी सांगत, ‘काही झाले तरी माझ्या खात्यात नोकरी धरू नकोस’. त्यांना शिक्षण खात्याबद्दल मात्र प्रेम होते.[१७]

प्रभाकर प्रधान यांची बदली पारनेरला झाली. तिथे हायस्कूल नसल्यामुळे गणेशच्या आईने मुलांच्या शिक्षणासाठी पुण्यात राहण्याचा निर्णय घेतला. गणेशचे मामा पुण्यात वकीली करत होते. १९३५ मध्ये गणेशची आई, बहीण आणि गणेश पुण्यात आले. १९३८ साली त्यांच्या वडिलांनी पुण्यात सदाशिव पेठेमध्ये लहानसे घर घेतले. ‘प्रभाकर भवन’, ९२६ सदाशिव पेठ, पुणे याच घरात त्यांचे ६६ वर्षे वास्तव्य होते.

गणेश पुण्यामध्ये मॉडर्न हायस्कूलमध्ये जाऊ लागला. ती शाळा तेव्हा नवीनच निघाली होती आणि शनिवार पेठेतील मेहुणपुऱ्यात दोन –तीन वाडयांमध्ये भरत होती. तिथे इंग्रजीसाठी वाय.जी.पटवर्धन हे सर होते. त्यांच्यामुळे इंग्रजी भाषा आणि साहित्य यातील सौदर्यं गणेशला

समजले. पटवर्धन सर ग्रंथालय प्रमुख होते. त्यांनी गणेशला अनेक इंग्रजी पुस्तके वाचायला दिली. इ.६वी च्या परीक्षेत गणेश प्रथम आला, तेव्हा त्यांनी 'हेल्स ऑह शेक्सपिअर' आणि 'इलेव्हन प्लेज ऑफ इब्सेन' ही दोन पुस्तके बक्षीस म्हणून दिली. त्या वयात इब्सेन त्यांना समजला नाही; पण त्याने गणेशला आयुष्यभर साथ केली.[१८]

डिकन्सच्या कादंबऱ्यामुळे त्याच्या मनात गरिबाबद्दल सहानुभूती निर्माण झाली. तसेच वि.स.खांडेकरांच्या 'उल्का' आणि 'दोन ध्रुव' कादंबऱ्याचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव पडला. आपल्या देशातील असंख्य लोक दरिद्री जीवन जगत असताना आपण केवळ स्वतःच्या सुखाचा विचार करणे योग्य नाही, असे त्याला वाटू लागले. समता आणि स्वातंत्र्य यासाठी लढा द्यायला हवा अशी भावना मनात निर्माण झाली.

१९३६ साली काँग्रेसचे फैजपूर अधिवेशन संपल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू पुण्यात आले असताना गणेशला त्यांचे व्याख्यान ऐकण्याचा योग आला होता. त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि कमालीचे भाषण ऐकून ते भारावून गेले. नंतर त्यांनी ना.ग.गोरे यांनी केलेल्या नेहरूंच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद वाचला. त्यांच्या तुरूंगातील जीवनाचे वर्णन वाचून ते मंत्रमुग्ध झाले. नंतर इ.स.१९३७ च्या प्रांतिक निवडणुकीच्या वेळी त्यांनी डॉ.राजेंद्र प्रसादांचे भाषण ऐकले. काँग्रेसला मत म्हणजे स्वातंत्र्याला मत हे त्यांचे विधान त्यांना फार आवडे. मे महिन्यात सुभाषचंद्र बोस पुण्याला आले असताना, गणेश त्यांच्या मिरवणुकीत स्वयंसेवक म्हणून सामील झाले. त्यांच्या भाषणाची मोहिनी मनावर पडली. त्यांना जवळून पाहणे हा देखील चित्त थरारक अनुभव होता.[१९]

**२.२.८ ग.प्र.प्रधान यांच्या मातोश्री :-**

ग.प्र. प्रधान म्हणतात, माझ्या आईचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे वर्णन थोडक्यात करणे शक्य नाही. त्यामुळे मी तिच्या स्वभावाच्या एकाच पैलूवर मुख्यतः लिहणार आहे.

त्यांच्या आईचे शिक्षण इ.४ थी पर्यंत झाले होते. त्या बुद्धिमान होत्या. त्यांना बहुधा उत्तम शिक्षिका लाभली असावी, असे प्रधान यांना वाटे. कारण त्यांच्या आईच्या मनात ज्ञानाबद्दल आवड होती. त्या काळच्या रीतीप्रमाणे त्यांच्या आईचे लग्न वयाच्या तेराव्या वर्षी झाले होते.[२०]

### २.२.९ ग.प्र.प्रधान यांचा विवाहः-

पुढे लग्न ठरण्यापूर्वी त्यांच्या आई एक मुलगी पहायला गेल्या. मुलगी इंटर सायन्स पास झाली होती. आई तिला म्हणाली, माझा मुलगा एम.ए.आहे, मला ग्रॅज्युएट सून हवी! तू लग्न झाल्यावर शिकशील का? ती मुलगी उत्तरली, हो, आनंदाने शिकेन. या उत्तरावर आईने तिला पास केले आणि त्याच मुलीशी म्हणजे मालूशी ग.प्र.प्रधान यांचे लग्न झाले. नंतर त्यांच्या आईंनी घर सांभाळून तिला बी.एस्सी. होण्यास संधी दिली. पुढे त्यांच्या पत्नीला आयुर्वेदाचा अभ्यास करून डॉक्टर व्हावे वाटले. पण ग.प्र.प्रधानांच्या मातोश्री त्यावेळेस वृद्ध झाल्या होत्या. हे कसे झेपणार असे प्रधान यांना वाटे . मात्र त्यांच्या पत्नीने आईजवळ तो विषय काढला व आई एकदम खुश झाल्या आणि म्हणाल्या, आपल्या घरात अद्याप कुणी डॉक्टर झाले नाही पण तू खुशाल हो. स्वयंपाकाला बाई ठेवायला लागेल, मी फक्त देखरेख करू शकेल. आईच्या पाठिंब्यामुळे त्यांच्या पत्नीने बी.ए.एम.एस.चा कोर्स पूर्ण केला. आई त्या वेळी थकत चालली होती. त्या अंथरूणावर असताना त्यांची सून डॉक्टर झाल्याचे कळले आणि दोन दिवसांनीच त्यांचे निधन झाले.[२१]

### २.२.१० घराची जबाबदारी :-

घराची जबाबदारी प्रधान यांच्यावर होती. कारण ते त्यांच्या आई-वडिलांना ते एकुलते एक म्हणून होते. त्यांना दुसरे बंधू नव्हते म्हणून नोकरी करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटले. इ.स. १९४५ मध्ये ते एम.ए. झाले होते. त्या वेळच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियमानुसार राजकीय पक्षाचा पदाधिकारी होणार नाही, सत्याग्रह करणार नाही, या अटी त्यांनी स्वीकारल्या होत्या. त्यामुळे इ.स.१९४५ ते १९६५ सक्रीय राजकारणापासून ग.प्र. प्रधान दूर राहिले.[२२]

### २.२.११ प्राध्यापकाची कारकीर्दः-

भाटे सरांच्या सांगण्याप्रमाणे प्रधान सरांनी भरपूर साहित्य अभ्यासले. मानसशास्त्र, तत्त्वज्ञान यांची पुस्तकेही वाचली. प्रा. भाटे प्रारंभिक त्यांची टिपणे तपासत असत. सात वर्षांनी त्यांना नोकरीत कायम केले होते. त्यामुळे संघटनात्मक कामाला वेळ देता आला नाही. तरी सेवा दलातील बौद्धिक विभागात काम करायचे असे ठरवून त्यांनी तशी तयारी सुरू केली. ज्यांनी देशासाठी बलिदान केले, अशा देशभक्तांच्या आणि क्रांतिकारकाच्या जीवनचरित्राचा

अभ्यास करून त्यांच्या कथा ते सेवा दलात सांगत असत. त्यासाठी प्रधान मास्तरांनी भरपूर वाचन केले. आणि आपली निवेदनशैली प्रभावी व्हावी म्हणून खास प्रयत्न केले. महाविद्यालयात त्यांना प्रा.ए.बी.शहा, दाभोळकर  श्रीनिवास दीक्षीत, अ.के.भागवत असे बुद्धिमान सहकारी लाभले, तर भाटे सरांनी ज्ञान उपासणेचे संस्कार केले.[२३]

प्रधानांच्या आयुष्यातील हा टप्पा म्हणजे १९४५ ते १९६५ हा वीस वर्षांचा आहे. प्राध्यापक म्हणून काम करताना राजकीय काम करता येणार नाही ही अट मान्य करून प्रधान मास्तरांनी वयाच्या ३३व्या वर्षी संपूर्ण लक्ष प्राध्यापकी पेशावर केंद्रित केले. परंतु त्या आधीच्या पाच वर्षात स्वातंत्र्य चळवळीतील गांधी, नेहरू व अन्य नेत्यांच्या कार्याचा समाजाशी विचारांचा व साने गुरूजींच्या व्यक्तिमत्त्वाचा विलक्षण प्रभाव पडलेला असल्याने राष्ट्र सेवा दलात बौद्धिक घेण्याचे म्हणजे सेवा दल सैनिकांना शिकविण्याचे काम करण्यास त्यांनी परवानगी मिळविली. वीस वर्षे कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून मोठा लौकिक मिळवला. प्रधानांना इंग्रजी ललितसाहित्याचे प्रचंड वाचन करायला मिळाले आणि त्या वेळी सेवा दल सैनिकांची बौद्धिक घेण्याच्या निमित्ताने राजकीय, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी वैचारिक वाचनही होत होते. या दोघांमुळे प्रधानांच्या भावनिक व वैचारिक जडणघडणीत उदार मतवाद व सम्यक दृष्टी यांचा अंतर्भाव झाला.[२४]

गणिताचे प्राध्यापक शहा प्रधानांचे चांगले मित्र होते. ते नेहमी त्यांना सांगत असत की, आपण आपआपले विषय शिकवतो. त्यासाठी आवश्यक ते वाचन करतो. पण एवढे पुरेसे नाही. आपल्याला इंटिग्रेटेड आऊटलूक असला पाहिजे आणि त्यासाठी आपण इतर विषयाचेही वाचन केले पाहिजे व इथेंटिक्स सायकॉलॉजी या विषयावर वाचन कर, इतकेच नाही तर इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी शास्त्रामधील पुस्तकांचे निवडक वाचन केले पाहिजे. प्रधानांनी त्यांचा सल्ला ऐकला त्यामुळे त्यांचा विचाराला नवीन दिशा मिळाली.

त्या वेळी नुकतीच पुणे युनिव्हर्सिटीने टिचर्स असोसिएशन सुरू केली होती. तिच्या तर्फे सर्व शिक्षकांसाठी काहीतरी शैक्षणिक कार्यक्रम घ्यावा असे ठरले.पुण्यातील प्राध्यापकांसाठी इंटिग्रेटेड लेक्चर सिरीज घ्यावयाचे निश्चित केले. पुण्यातील सर्व विषयांमधील प्राध्यापकांनी त्यांच्या खास विषयांवर तो विषय नसलेल्या प्राध्यापकांसाठी त्या विषयातील मूलभूत संकल्पनेची ओळख करून देण्यासाठी दोन किंवा तीन व्याख्याने दयायची असे ठरले. सिनिअर

प्राध्यापकांनी या कल्पनेचे स्वागत केले. एकूण ४५ व्याख्याने आयोजित केली आणि श्रोत्यांचा प्रतिसादही चांगला मिळाला. इतर अभ्यासक व बुद्धिमान विद्यार्थी ही व्याख्याने ऐकायला येत असत. ग.प्र. प्रधान व त्यांचे सात–आठ स्नेही सर्व व्याख्यानांना हजर होते. त्याचा प्रधानांना खूप फायदा झाला. प्रा.श्रीनिवास दीक्षीत, प्रा.मेघशाम रेगे, प्रा.दाभोळकर, प्रा.शहा यांच्याबरोबर झालेल्या वैचारिक चर्चांचा त्यांना फायदा झाला. त्यानंतर प्रधानांनी बारलिंगेकडून कार्ल मार्क्स, श्रीनिवास सरदेसाई, प्रा.चट्टोपाध्याय यांचे लेखन समजून घेतले. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, वामन मल्हार जोशी, डॉ.केतकर, दि.क.बेडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पुस्तके पुन्हा त्यांनी वाचली. त्यामुळे त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीत फरक पडला.[२५]

गणिताचे प्राध्यापक शहा यांच्या आग्रहामुळे १९५४ साली प्रधान पुणे विद्यापीठ सिनेटच्या निवडणुकीसाठी अध्यापक मतदार संघातून उभे राहिले आणि निवडून आले. नंतर १९५७ साली ते विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर निवडून आले. कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी महत्त्वाच्या विषयावर ते प्रा.शहा यांच्या चर्चा करत असत. त्या काळात रँग्लर परांजपे, प्रा.डी.डी.कर्वे, प्रा.धनंजय गाडगीळ, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार अशी मंडळी व्हाईस चॅन्सेलर होती. कार्यकारिणीत रयत शिक्षण संस्थेचे बॅरिस्टर पी.जी.पाटीलही होते. स्वातंत्र्य चळवळीपासून त्यांची आणि प्रधानांची मैत्री होती. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्रात ग्रामीण भागात महाविद्यालये निघू लागली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रधानांना विनंती केली की, बॅरिस्टर पी.जी.पाटील आणि तुम्ही ग्रामीण भागातील महाविद्यालयांना मदत केली पाहिजे. ग्रामीण भागातील महाविद्यालयांना प्राध्यापक मिळवून देणे, त्यांचे प्रश्न पुणे विद्यापीठात मांडणे वगैरे कामे प्रधानांनी मनापासून केली. त्यामुळे काही बुद्धिमान विद्यार्थ्यांना प्राध्यापक होण्याची संधी मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थांना आणि व्यक्तिंना प्रा.प्रधानांनी सतत सहाय्य केले. महाविद्यालयीन राजकारणात किंवा विद्यापीठीय राजकारणात ते कधीच गुंतून राहिले नाहीत. कमालीचा साधेपणा, सत्चरित्र आणि नितळ पारदर्शी व्यक्तिमत्त्व असणारा हा संवेदनशील माणूस होता. त्यामुळे विविध क्षेत्रातील लोकांशी त्यांचा स्नेह होता.[२६]

### २.२.१२ प्रधान सरांचे विद्यार्थी :–

१९४५ ते १९६५ या कालावधीमध्ये प्रधान सरांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये वीस वर्षे अव्याहतपणे ज्ञानदानाचे कार्य केले. इंग्रजीसारखा अवघड वाटणारा विषय सरांनी लिहायला शिकवला. त्यावेळी प्रधान सरांच्या पिरीयडला दुसऱ्या वर्गातील विद्यार्थीसुद्‌धा बसत असत. प्रधान सरांच्या अध्यापन शैलीमुळे त्यांच्या विषयाकडे अनेक विद्यार्थ्यांचा ओढा होता. त्या वीस वर्षांच्या काळात सरांचे अनेक विद्यार्थी अनेक वेगवेगळया क्षेत्रात कार्यरत होते. अशाच विद्यार्थ्यांमध्ये ग.प्र. प्रधान त्यांच्या अशा अनेक आवडत्या विद्यार्थ्यांप्रमाणेच अशोक रा क़ेळकर यांच्या नावाचा उल्लेख करतात. अशोक केळकर म्हणतात, आमचे ग.प्र. प्रधान शेवटपर्यंत जिज्ञासू आणि अभ्यासूच राहिले. एकाचवेळी विद्यार्थी आणि शिक्षक मग कार्यक्षेत्र, शिक्षण, राजकारण, पत्रकारिता, रूग्णमित्रता कोणतेही असो. वाढत्या बौद्धिक वयाच्या विद्यार्थ्यांशी मित्रवत आचरण केले. या धोरणामुळे आणि आम्हा दोघांच्या समान शीलत्वामुळे पुढे ते सहजगत्या स्नेही झाले. इतके की, माझ्या दोघा मित्रांनी मला लग्नाची छोटी पार्टी दिली तेव्हा साहजिकच त्यांनाही सामील करून घेतले. निरोप घेतेवेळी ते नववधूला हळूच म्हणतात, आमचा हा मित्र म्हणजे वाघ आहे बरं का! काही महिन्याने त्याची विवाहोत्तर संसारी शेळी कशी होते ते आम्ही बघूच. सरांची वर्षभराने गाठ पडल्यावर त्यांना खटयाळपणे म्हणते आता बघून घ्या हं! यावर सरांच्या या हास्यात बरीच आहेस की! वाघ वाघच राहिला याचे श्रेय तुलाच देऊन टाकतो. एवढे सगळे होऊन गेले. या घटनेवरून सहज लक्षात येते की, प्रधान सरांमधल्या नैतिक आदर्शवादी शिस्तीला दिलखुलास अजिबात वावडे नव्हते.[२७]

## २.३ ग.प्र.प्रधान यांना लाभलेला थोर व्यक्तिंचा सहवास :–

प्रधान सरघडले, त्याचे श्रेय त्या काळातील थोर व्यक्तिंना देतात. स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेण्यापूर्वी राष्ट्रसेवा दलाच्या कार्यासाठी जात होते. त्याठिकाणी साने गुरूजींच्या भाषणांचाही परिणाम त्यांच्या मनावर झालेला दिसतो. १९४२ साली येरवडा तुरूंगात साने गुरूजींबरोबर राहण्याचे भाग्य त्यांना लाभले होते. पुढे सुटका झाल्यावर पुण्याला उपचारासाठी असलेल्या महात्मा गांधीच्या निवासस्थानी स्वयंसेवक होण्याचा योग त्यांना आला. निवासावर २४ तास पोलिस पहारा. भूमिगत क्रांतिकारक अरूणा असफअली महात्माजींना भेटण्यास वेशांतर करून आल्या. त्यांना दगा फटका होऊ नये म्हणून मास्तरांनी

स्वतःला सज्ज ठेवले होते. त्यांनी मध्यमवयीन पारशी बाईचा वेष धारण केला होता. निसर्गोपचार केंद्रात तेच वृद्ध पारशी स्त्री पुरूष असल्यामुळे पोलिसांना संशय आला नाही. परंतु भेट संपवून त्यांनी त्या परत जाईपर्यंत प्रधानांच्या जीवात जीव नव्हता. त्यांचे मित्र दत्तोबा जगताप सावधगिरीचा उपाय म्हणून पिस्तुल घेऊन आले होते. पहाटेच्या रेल्वेने त्या मद्रासला गेल्या. त्या सुखरूप गेल्याचे महात्माजींना कळवून मगच प्रधान झोपले.[२८]

### २.३.१ एस.एम.जोशी यांचा सहवास :-

प्रधान सरहायस्कूलला असताना एस.एम.जोशी हे नाव त्यांनी वर्तमान पत्रात वाचले होते. १९३८ साली प्रधान कॉलेजात जाऊ लागले. त्या वेळी राष्ट्रीय वृत्तीच्या कॉलेज विद्यार्थ्यांची स्टुडंट्स युनियनच्या सभा ग.प्र.प्रधानांच्या आळीतच भरत होती. त्या सभेत एस.एम.जोशी यांना विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना ग.प्र.प्रधान यांनी प्रथम पाहिले व ऐकले. ते खूप आवेशाने बोलले आणि स्वातंत्र्य चळवळीत विद्यार्थ्यांनी आले पाहिजे हे सांगताना त्यांनी पुढील आशयाचे भाषण केले. १९२६ साली गोरे मी आणि खाडिलकर यांनी पुण्यात युथ लीगची स्थापना केली. आणि नंतर १९३० साली आम्ही युथ लीगच्या सर्व कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत हिरिरिने भाग घेतला. स्टुडंट्स युनियन हे युथ लीगचेच नवे रूप आहे. तुम्ही विद्यार्थ्यांनी आमच्या आगामी स्वातंत्र्यलढयात भाग घेण्यासाठी आतापासूनच तयारी केली पाहिजे. ते भाषण ऐकताना गणेश प्रधान खूप प्रभावित झाले. तेव्हा समाजवादी पक्षातर्फे विद्यार्थ्यांसाठी राजकीय अभ्यासवर्ग त्याला त्याच वेळी स्टडी सर्कल म्हणत, चालवला जात असे. त्या स्टडी सर्कलला प्रधानांना येण्याचे अरविंद टिपणीस यांनी आमंत्रण दिले. ग.प्र. प्रधान पुढे स्टडी सर्कलला गेले होते. त्या दिवशी ना.ग.गोरे यांचे भाषण होते. जयप्रकाश नारायण यांनी लिहिलेल्या 'व्हाय सोशॉलिझम' या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणातील विचार त्यांनी समजून सांगितले. ते ग.प्र.प्रधान यांना खूप नवीन वाटले. भाषणानंतर थोडा वेळ चर्चा झाली. स्टडी सर्कल संपल्यावर मधू लिमये यांनी गोरे आणि एस.एम.जोशी यांच्याबरोबर प्रधानांची ओळख करून दिली. एस.एम.जोशी त्यांना म्हणाले, तू आता नियमाने आमच्या स्टडी सर्कलला येत जा.[२९]

### २.३.२ नानासाहेब गोरे यांचा प्रधानांना लाभलेला सहवास :–

नानासाहेब गोरे यांची पहिली ओळख त्यांच्या लेखनातून. प्रधान त्या वेळी इंग्रजी सहावीत (आत्ताच्या दहावीत) होते. आणि पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आत्मचरित्राचा नानासाहेब गोरे यांनी केलेला अनुवाद वाचल्यावर प्रधान अतिशय प्रभावित झाले. जवाहरलालजींच्या त्या आत्मवचनामुळे त्यांना स्वातंत्र्य चळवळीबद्दल आकर्षण वाटू लागले. त्या वयात ते मूळ इंग्रजी आत्मचरित्र वाचू शकले नसते. परंतु नानासाहेबांनी केलेल्या रसपूर्ण अनुवादामुळे माझा पंडित नेहरूंच्या समर्पित जीवनाशी व उदात्त विचारांशी परिचय झाला. स्वातंत्र्य चळवळीबद्दल त्यांच्या मनात संस्कारक्षम वयात जी ओढ निर्माण झाली, ती नानासाहेब गोरे यांच्यामुळे. मी त्या वयातही साहित्य आवडीने वाचत असे आणि पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा तो अनुवाद साहित्य म्हणूनही सुंदर आाहे. हे प्रधानांना उत्कटपणे जाणवले.

पुढे १९३९ साली कॉलेजमध्ये प्रथम वर्षात असताना मी समाजवादी पक्षाच्या राजकीय अभ्यासवर्गाला जाऊ लागलो आणि तिथे प्रधानांची व नानासाहेब गोरे यांची भेट झाली. त्या वेळी प्रधानांना सांगितले. तुम्ही केलेल्या पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद मी दोन वर्षांपूर्वी वाचला होता आणि तो मला फार आवडला. तेव्हा नानासाहेबांनी प्रेमाने त्यांच्या पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, तू आता राजकीय वाचने भरपूर केली पाहिजे. मराठी आणि इंग्रजीतील ग्रंथ वाचले पाहिजेत. नानासाहेब यांच्या बोलण्यातील, लिखाणातील रेखीवपणा त्यांना आवडत असे.

पुढे १९४१ साली नानासाहेब आणि ग.प्र.प्रधान समाजवादी पक्षाच्या ऑफिसमधून संध्याकाळी घरी चालले असताना, एका सब इन्सपेक्टरने आणि दोन पोलिसांनी नानासाहेबांना व प्रधानांना थांबविले. नानासाहेबांनी काही दिवसापूर्वी गुलबर्गा येथे केलेल्या भाषणाबद्दल त्यांना अटक करण्याचे वारंट दाखवून तो इन्सपेक्टर म्हणाला, तुम्हाला आताच फरासखान्यात आले पाहिजे, मी एकदम गडबडून गेलो परंतु नानासाहेब शांतपणे मला म्हणाले, घरी जाऊन तू सुमतीबाईंना, सुभाला फरासखान्यात घेऊन ये. माझे कपडेही घेऊन ये. नंतर एस.एम.ला कळव. मी त्याप्रमाणे नानासाहेबांच्या पत्नी सुमतीबाई आणि त्यावेळी लहान असलेल्या सुभाला

टांग्यातून फरासखान्यात आणले. नानासाहेबांच्या धीर–गंभीर वृत्तीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला असे ग.प्र.प्रधान म्हणाले.[३०]

**२.३.३ ग्रंथांचा ग.प्र.प्रधान यांच्यावर पडलेला प्रभाव :–**

ग.प्र.प्रधान यांनी आपटे गुरूजी यांचे ‘स्वराज्य मार्गदर्शक लोकमान्य टिळक’ हे पुस्तक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे ‘माझी जन्मठेप’, ‘भारत में अंग्रेजी राज’, सेडिशन कमिटी रिपोर्ट या सरकारी अहवालात अरविंद घोष, बारिन्द्रकुमार घोष, खुदिराम बोस, उल्हासकर दत्त यांची तसेच माणिकतळा बॉम्ब केसची व बंगालमधील ‘युगांतर’ आणि ‘वंदे मातरम’ यात क्रांतिकारकांच्या संघटनेची संपूर्ण माहिती होती. ‘भारत मे अंग्रेजी राज’ यामध्येही संचींद्र संन्याल, काकोरी कटाचा खटला इत्यादींची माहिती होती.

या पुस्तकातून त्यांना वासुदेव बळवंत फडके, नाशिकची अभिनव भारत संघटना, इंग्लडमधील श्यामजी कृष्ण वर्मा, मॅडम कामा, स्वातंत्र्यवीर सावरकर, सेनापती बापट इत्यादींच्या कार्याची माहिती आहे. तसेच बंगालमधील यतीन मुखर्जी यांनी एम्.एन्.रॉय यांनी बटेव्हियातून शस्त्रे मिळविण्यासाठी कसे पाठवले. बाघा जतीन यांच्या बालासोर येथील गुप्त जागेला ब्रिटिश लष्कराने वेढा घातल्यानंतर ते त्यांच्याशी लढताना गतप्राण कसे झाले, ही रोमहर्षक कहाणी या पुस्तकातून ग.प्र.प्रधान यांनी वाचली होती.

गदर पार्टी, विष्णू गणेश पिंगळे, लाला हरदयाळ आदींची माहितीही त्यांनी पुस्तकातून वाचली. शौकत उस्मानी हा तरूण अफगाणिस्तानमार्गे रशियाला कसा पाहोचला. हे ‘देशत्यागाचा इतिहास’ या पुस्तकातून वाचावयास मिळाली होती. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांच्या हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीची माहिती तसेच लाहोर कटाचा खटला, जतीद्रनाथ दास याचे प्राणार्पण, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे फासावर जाणे आदींचे वृत्त देणारे पुस्तक ग.प्र.प्रधान यांनी वाचले. या सर्व पुस्तकांचा प्रभाव ग.प्र.प्रधान यांच्यावर पडलेला होता.[३१]

**२.३.४ मेहेरअलीच्या भाषणाचा प्रभाव :–**

ग.प्र.प्रधान हे मे महिन्यात पुण्यातील राष्ट्र सेवा दलाच्या शिबिरास हजर होते. या शिबिरात अनेक नवीन सहकारी त्यांना मिळाले होते. ते शिबिर संपल्यावर काही दिवसांनी पुण्यामध्ये समाजवादी कार्यकर्त्यांचे एक चार दिवसांचे शिबिर शिरूभाऊ लिमये यांनी घेतले

होते. या शिबिरास मेहेरअली  आले होते. त्यांनी केलेले भाषण ग.प्र.प्रधान यांच्या मनावर प्रभाव टाकून गेले. या शिबिरात भूमिगत चळवळीची आखणी करण्यात आली होती. साबोटेजिंगचे काम ज्यांच्यावर सोपवावयाचे त्यांचा मुख्य विभाग होता. या विभागाला नाव होते 'डी स्कॉड'. डी स्कॉड म्हणजे डिस्ट्रक्शन स्कॉड. या स्कॉडची माहिती ग.प्र.प्रधान व त्यांच्या सहकाऱ्यांना देण्यात आली. सरकार खिळखिळे करायचे असेल तर दळणवळण तोडले पाहिजे. यासाठी तारा तोडणे, पूल उखडणे आदी कार्यक्रम समजून सांगण्यात आले.दुसरे बुलेतिन स्क्कॉड. यामध्ये सायक्लोस्टाइलवर बुलेटिन्स काढणे, बुलेटिन्स गुप्तपणे वाटणे इत्यादी कामे होती. 'डी स्क्कॉड' ची माहिती ऐकून ग.प्र.प्रधान यांचे मन भारावून गेले.

ग.प्र.प्रधान यांनी मेहेरअली यांच्या भाषणावर खूप विचार केला. शेवटी निर्णय घेतला की आपली मर्यादा सांगून आपल्याला झेपेल ते करायचे  असे ग.प्र.प्रधान यांनी ठरविले. व त्यांनी शिरूभाऊ लिमये यांना सांगितले की, डी स्क्सॉडला काम करणे मला जमलेसे वाटत नाही. मी पकडलो गेलो आणि माझ्या तोंडून सहकाऱ्यांची नावे गेली तर मी चळवळीचा घात केल्यासारखे होईल. त्यापेक्षा बुलटिन्सचे काम मला द्या. शिरूभाऊ लिमये यांनी ग.प्र.प्रधान यांना सांगितले की, 'तू स्कॉलर विद्यार्थी आहेस. तू बुलेटिन्स लिही अन वाट. ते मात्र न भिता कर.' शिरूभाऊंनी ग.प्र.प्रधान यांची मर्यादा समजून घेतली. यामुळे ग.प्र.प्रधान यांच्या मनावरचा बोझा हलका झाला.

जून महिन्यात त्यांचा बी.ए.चा रिझल्ट लागला. ते पास झाले. तेव्हा त्यांच्या वडिलांना वाटत होते की, माझ्या मुलाने एम.ए.होऊन प्रोफेसर व्हावे. तेव्हा ते आपल्या वडिलांना म्हणाले की, 'आपल्याला स्वराज्य मिळण जास्त महत्त्वाचे वाटत नाही का? ' हे एकून त्यांचे वडील चपापले. आईही चिडली व म्हणाली, 'आपण गरीब माणसं. शिकलास तर आपलं घर चालेल. तुला काय करायचय स्वराज्याशी?' ग.प्र.प्रधान यांनी आई वडिलांशी वाद घातला नाही. तरीही आईला संशय आला, तेव्हा ती म्हणाली की, 'मामांचा बाबू (बी.टी.रणदिवे)इतका हुशार, सारखा तुरूंगात जातो. त्याला चार भाऊ आहेत. ती बडी माणसं,आपल्याला नाही ते झेपायचं.' पुढे ग.प्र.प्रधान  यांनी एम.ए.ला ॲडमिशन घेतले. परंतु जुलै महिन्यात एकही तास केला नाही. ते मित्रांच्याबरोबर स्वातंत्र्याविषयी खलबते करीत राहिले. 'डी स्क्कॉडमध्ये गेलेल्या वसंत बापट, वसंत नगरकर यांचा त्यांना हेवा वाटे. त्यांच्यासारखी हिंमत ग.प्र.प्रधान  यांच्यात नव्हती. तरीही

ते नियमाने सायक्लोस्टाईल चालवीत असत. करंट डुप्लिकेटरवरही एका पत्राच्या पन्नास प्रती निघत. या सामानाची जुळवाजुळव चालू होती.[३२]

**२.३.५ समाजवादी चळवळीचा प्रभाव :–**

प्रधान सरांनी १९३८ साली कॉलेजमध्ये विद्यार्थी असताना समाजवादी पक्षाबद्दल आकर्षण वाटू लागले आणि समाजवादी चळवळीत पुढे आयुष्यभर काम केले. या चळवळीचे शिल्पकार असलेल्या नेत्यांजवळ ते वावरत होते. या चळवळीतील झुंजार तसेच बुद्धिमान कार्यकर्त्यांसमवेत त्यांनी वेगवेगळया क्षेत्रात काम केले. ते चळवळीतील एक जाणते कार्यकर्ते होते. परंतु आपल्या मर्यादा स्पष्ट करतात. चळवळीला वळण देण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे नव्हते असे ते म्हणतात. जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया या दोन नेत्यांबद्दल सरांच्या मनात नितांत आदर होता. मात्र, त्यांनी समाजवादी चळवळीस योग्य दिशा दिली नाही असे त्यांना खेदाने म्हणावे लागते, असे ग.प्र. प्रधान म्हणतात. त्या नेत्यांचा त्याग, बुद्धिमत्ता, देशभक्ति आणि व्यक्तिमत्त्व असामान्य होते. परंतु त्यांनी घेतलेले निर्णय समाजवादी चळवळीस उपकारक ठरले नाहीत.[३३]

स्वातंत्र्य चळवळीतील कार्यामुळे या पक्षाला जी प्रसिध्दी मिळाली, त्यामुळे स्वतंत्र भारतात आपण काँग्रेसला पर्याय देणारा विरोधी पक्ष होऊ नये असे त्या पक्षाच्या नेत्यांना वाटले आणि त्यामुळे त्यांनी १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुरेशी संघटनात्मक तयारी न करता देशभर समाजवादी पक्षाचे उमेदवार उभे केले. निवडणुकीत काँग्रेस खालोखाल मते मिळाली, परंतु फार थोडे उमेदवार निवडून आले.[३४]

१९५३ च्या सुरूवातीस पंडित नेहरूंनी जयप्रकाश नारायण यांना मंत्रिमंडळात येण्यासाठी पाचारण केले. परंतु समाजवादी पक्षामध्ये डॉ.लोहिया यांचा पंडित नेहरूंच्या योजनेस कडवा विरोध होता. जयप्रकाश नारायण यांनी त्यांना अपेक्षित विकासाच्या कार्यक्रमाचा आराखडा नेहरूंना सादर केला आणि हा कार्यक्रम काँग्रेस स्वीकारत असेल तर समाजवादी पक्षाचा प्रतिनिधी मंत्रीमंडळात येईल. पंडित नेहरूंना जयप्रकाश नारायण हेच सहकारी म्हणून बिनशर्त यावयास हवे होते. या भूमिकेमुळे वाटाघाटी पूर्ण फिसकटल्या. काँग्रेसमधील एका मोठया गटाला समाजवादयांना दूर ठेवायचे होते. त्या गटाला वाटाघाटी संपल्यावर हायसे वाटले. निवडणुकीतील पराभवानंतर समाजवादी पक्षामध्ये विचारमंथन सुरू झाले. मुंबईचे

समाजवादी नेता अशोक मेहता यांनी अविकसित देशामध्ये सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी एकमत होणारे क्षेत्र शोधून परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे अशी भूमिका मांडली. त्यांचे इंग्रजी शब्द कम्पलशन ऑफ बॅकवर्ड इकॉनॉमी, असे सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्यातील एरियाज ऑफ ॲग्रिमेंट असे होते. अशोक मेहता यांच्या या भूमिकेवर राम मनोहर लोहिया यांनी कडाडून हल्ला केला.[३५]

समाजवादी पक्षाने भाषवार राज्य पुनर्रचनेस पाठिंबा दिला होता. त्यावेळी मुंबई महाराष्ट्राला मिळू नये असे षडयंत्र रचले गेले. तेव्हा एस.एम.जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेस पुढाकार घेऊन भाई डांगे, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील आदी नेत्यांसमवेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, यासाठी प्रखर जनआंदोलन केले. या आंदोलनामध्ये महाराष्ट्रातील प्रजासमाजवादी पक्ष आघाडीवर होता. त्यावेळी प्रजासमाजवादी पक्षाचे राष्ट्रीय पातळीवरील नेते व अध्यक्ष नरेंद्र देव यांनी एस.एम.जोशींना पाठिंबा दिला. दुर्दैवाने काही दिवसांनी आचार्य नरेंद्र देव यांचे निधन झाले. १९६० साली मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. त्यावेळी एस.एम.जोशी हे महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेते होते.[३६]

## २.४ ग.प्र.प्रधान –जीवनपट :–

- पूर्ण नावः– गणेश प्रभाकर प्रधान
- जन्म :– २६ ऑगस्ट १९२२, पुणे
- १९४२ – इंग्लिश घेऊन बी.ए.ऑनर्स
- १९४२ – चले जाव चळवळीत ११ महिने कारावास.
- १९४५– एम.ए.इंग्रजी व मराठी
- १९४५ ते १९६५– फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे इंग्रजीचे प्राध्यापक.
- १९५३ – पुणे विद्यापीठ प्राध्यापक संघाचे संस्थापक सचिव.
- १९५४ ते १९६६ – पुणे विद्यापीठ सिनेटचे सदस्य.
- १९५७ ते १९६५ – पुणे विद्यापीठ सिडींकेटचे सदस्य.

- १९६५ – राजकीय कार्य करण्यासाठी राजीनामा, समाजवादी पक्षात पूर्णवेळ काम.
- १९६६ – पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निवड.
- १९७२ – विधानपरिषदेवर पुन्हा निवड
- १९८४ ते १९९९ – अध्यक्ष, महात्मा गांधी लोकसेवा संघ.
- १९८० ते १९९९ – अध्यक्ष, महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर.
- १९८५ – सक्रीय राजकारणातून निवृत्ती.
- १९८५ ते १९९८ – साधना साप्ताहिकाचे मानद संपादक.
- १९९७ – पुणे महानगर पालिकेतून मानपत्र व सत्कार.
- १९९८ – पुणे विद्यापीठातून डी.लिट.पदवी.
- २००२ – महाराष्ट्र फाऊंडेशन साहित्य जीवन गौरव पुरस्कार.
- २००४ – राहते घर साधना टस्ट्रला देऊन कायम वास्तव्यासाठी साने गुरूजी रूग्णालय हडपसर येथे.
- २९ मे २०१० – साने गुरूजी रूग्णालयात निधन, देहदान व नेत्रदान.[३७]

## २.५ समारोप :–

सामान्य मध्यमवर्गात जन्मलेल्या ग.प्र.प्रधान यांनी आपल्या कामगिरीने समाजाच्या हृदयामध्ये वेगळे स्थान निर्माण केले. प्रधान सरांवर त्यांच्या आईवडिलांचे संस्कार झाले होते. बालवयात त्यांनी त्यांना वाचनाची गोडी लावली आणि त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. याच काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीने जोर धरला होता. पेपरमधील बातम्या वाचून सरांना आपणसुद्धा भारतमातेला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे, असे वाटे. याच काळात ते वास्तव्यालाही पुणे येथे होते. त्यांना त्यावेळी महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस यांची भाषणे ऐकण्याचा योग आला. आणि त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याची शपथ घेतली. साने गुरूजींचाही त्यांना सहवास लाभल्यामुळे त्यांचे जीवन बदलून गेले.

पुणे १९४२ च्या आंदोलनात ते पकडले गेले. आणि त्यांना एक वर्षांची शिक्षा झाली. शिक्षा भोगून आल्यानंतर वडिलांनी त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली. आणि प्रधान सरांनी त्यांच्या वडिलांना शब्द दिला. मी येथून पुढे घराची जबाबदारी घेईन. परंतु मला एम.ए. करायचे आहे. वडिलांनी परवानगी दिली. त्यांचे एम.ए.पूर्ण झाले. १९४५ साली फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी पत्करली. भाटे सरांनी त्यांना राजकारणात भाग घेता येणार नाही या अटीवर नोकरीमध्ये सात वर्षांनी पर्मनंट केले. याच काळात त्यांचे विपुल वाचन झाले. ग.प्र. प्रधान म्हणतात, मला जे करावेसे वाटले, ते मी केले. त्यात त्याग कसला? साधे राहण्यात आनंद उपभोगला. त्याला ते त्याग मानत नाहीत. ते कार्यकर्त्यांना म्हणतात, मला उगाच मोठेपणा देतात. मी एवढा मोठा नाही. खरेतर हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. पुढे १९५० साली त्यांचे आईच्या पसंतीच्या मुलीशी लग्न झाले. त्यांच्या पत्नीला त्यांनी लग्नानंतर शिकविले. पुढे त्यांच्या पत्नीचे बी.ए.एम.एस.झाले आणि त्या डॉक्टर म्हणून काम करू लागल्या. हे सर्व त्यांच्या आईदेखत झाले. त्यामुळे त्यांच्या आईला खूप समाधान वाटले. पुढे सरांनी राष्ट्र सेवादलाला बौद्धिक देण्याची परवानगी भाटे सरांकडून घेतली व ते सेवा दलातील सैनिकांना मार्गदर्शन करत असत. पुढे प्राध्यापक असताना सिनेटची निवडणूक जिंकली व ग्रामीण भागात कॉलेज काढण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटलांच्या सांगण्यावर प्रयत्न केले. १९६५ साली त्यांचे बालपणचे वर्गमित्र नाथ.पै.राजापूर मधून निवडून आले होते. त्यांनी प्रधान सरांना राजीनामा देऊन पूर्णवेळ राजकारणाचा सल्ला दिला. तो त्यांनी त्यांच्या पत्नीपुढे मांडला व पत्नीने नोकरी सोडण्यास सरांना होकार दिला आणि प्रधान सरांनी वीस वर्षांची नोकरी केल्यानंतर १९६५ साली प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन ते सक्रिय राजकारणात उतरले.

भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये ज्या ज्या चळवळी झाल्या, त्या पुणे जिल्हयाने नेटाने पार पाडल्या. मॅट्रिकला असताना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे प्रधानांनी ठरविले आणि ते पूर्ण केले. त्या काळात त्यांना साने गुरूजी, महात्मा गांधी, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे यांचा सहवास लाभला. भूमिगत असताना ते पकडले गेले व त्यांना १२ महिन्यांची शिक्षा झाली. तुरूंगातून सुटून आल्यानंतर वडिलांच्या सांगण्यावरून त्यांनी १९४५ साली कॉलेजमध्ये नोकरी धरली.

## संदर्भ /तळटिपा :-

१) पांढरे नीला, प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्‌मय, उन्मेष प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, ३० जून २०११, पृ.१७

२) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, प्र.आ.११ जून २००४, पृ.२२१

३) कित्ता, पृ.२२२

४) दैनिक लोकमत, अहमदनगर, दि.३० मे २०१०, पृ.११३

५) दैनिक लोकमत, अहमदनगर, दि.३० मे २०१०

६) प्रधान ग.प्र, माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ८ मार्च २००५, पृ.११

७) साधना साप्ताहिक, पुणे, शनिवार, दि.४ जून २०११, पृ.७

८) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.२०

९) प्रधान ग.प्र, उपरोक्त, पृ.२०, २१

१०) ताम्हाणे दत्ता यांचा लेख, दैनिक पुढारी, पुणे, दि.३० मे २०१०, पृ.४

११) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.२२५

१२) साधना साप्ताहिक, पुणे, शनिवार, दि.४ जून २०११, पृ.८

१३) दाभोळकर नरेंद्र (संपा.), साधना साप्ताहिक, वर्ष ६२, अंक ४३, ५ जून २०१०, पृ.३

१४) कित्ता, पृ.७, २०

१५) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.१८

१६) कित्ता, पृ.१८

१७) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.२२४

१८) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.१९

१९) कित्ता, पृ. २०

२०) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.२२८

२१) कित्ता, पृ.२३०

२२) कित्ता, पृ.२३२

२३) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.२५

२४) दाभोळकर नरेंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२५

२५) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.३९

२६) कित्ता, पृ.४०

२७) दाभोळकर नरेंद्र, साधना साप्ताहिक, ५ जून २०१०, उपरोक्त, पृ.२३

२८) कित्ता, पृ.८

२९) प्रधान ग.प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, डिसेंबर २००३, पृ.५४

३०) प्रधान ग.प्र., उपरोक्त, १२१

३१) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ११ जून २००४, पृ.१५

३२) पांढरे नीला, प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्मय, उन्मेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ३० जून २०११, पृ. २३

३३) प्रधान ग.प्र., उपरोक्त,पृ.७५

३४) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ११जून २००४, पृ.१७७

३५) प्रधान ग.प्र., भारतीय राजकारणातील दोन पैलू, साधना प्रकाशन, प्रथमावृत्ती, २ ऑक्टोबर २००८, पृ.११०

३६) कित्ता, पृ.१११

३७) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ११जून २००४, पृ.१२७

# प्रकरण तिसरे

# ग.प्र.प्रधान यांचे राजकीय कार्य

## ३.१ प्रस्तावना :-

भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. महराष्ट्रामध्ये ३५ जिल्हे आहेत. त्यामध्ये बहुतेक जिल्हयांना स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हयाचे योगदान मोठे आहे. पुणे जिल्हयात अनेक थोर स्वातंत्र्य सैनिक(क्रांतिकारक) होऊन गेले आहेत. पुणे जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी खूप मोठी आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात  पुण्यामध्ये अनेक चळवळी झाल्या. याच पुण्यामध्ये पेशवा थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले व कस्तुरबा गांधी असे अनेक थोर पुरूष होऊन गेले. त्यांच्याप्रमाणे लाभलेले ग.प्र.प्रधान हे एक होत. साने गुरूजींचा सहवास लाभल्यामुळे मॅट्रिकमध्ये असताना स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेण्याचा संकल्प केला आणि पुढे प्रत्यक्षात अमंलात आणला. त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. त्यावेळी त्यांना तुरूंगवासही भोगावा लागला होता.

स्वातंत्र्योत्तर काळात ग.प्र.प्रधान यांनी सन १९५३ मध्ये ते पुणे विद्यापीठ प्राध्यापक संघाचे संस्थापक सचिव होते. सन १९५४ ते १९६६ या काळात ते पुणे विद्यापीठ सिंडीकेटचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले. सन १९६५ मध्ये राजकीय कार्य करण्यासाठी महाविद्यालयाचा प्राध्यापक पदाचा राजीनामा देऊन समाजवादी पक्षात पूर्णवेळ काम करू लागले. सन १९६४ मध्ये त्यांची विधान परिषदेवर निवड झाली होती. सन १९८४ ते १९९९ मध्ये ते महात्मा गांधी लोकसेवा संघाचे अध्यक्ष होते. सन १९८० ते १९९९ या काळात ते महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर येथे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. सन १९६७, १९७० व १९७१ या तीन साली तीन वेळा महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेचे अध्यक्ष होते. सन १९८५ मध्ये त्यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली. तेव्हा या प्रकरणात ग.प्र.प्रधान यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय कार्य यांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## ३.२ ग.प्र.प्रधान यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य :-

### ३.२.१ ग.प्र.प्रधान यांच्या मनावर कादंबरीचा पडलेला प्रभाव :-

ग.प्र.प्रधान यांच्या मनावर स्वातंत्र्य चळवळीविषयीचे विचार अनेक कादंबऱ्यांच्या वाचनातून आले. यामध्ये डिकन्सच्या कादंबरीमुळे त्यांच्या मनात गरिबाबद्दल सहानुभूती निर्माण झाली. तसेच वि.स.खांडेकर यांच्या उल्का आणि दोन ध्रुव या कादंबऱ्यांचा त्यांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. आपल्या देशातील असंख्य लोक दरिद्री जीवन जगत असताना लोक केवळ स्वतःच्या सुखाचा विचार करीत जीवन जगत आहेत. तेव्हा हे बदलण्यासाठी त्यांच्या मनावर वि.स.खांडेकर यांच्या या कादंबरीचा जो प्रभाव पडला होता, त्यामुळे ते त्यांच्या घरातून बाहेर पडले. त्यावेळी त्यांना वाटत होते की, समता व स्वातंत्र्याच्या लढाईत सामील होण्याशिवाय जीवनाला अर्थच राहणार नाही, असे त्यांच्या मनाला वाटले. म्हणूनच ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले होते.[१]

### ३.२.२ पंडित नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव :-

फैजपूर येथे सन १९३६ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. हे अधिवेशन संपल्यावर पंडित नेहरू पुणे येथे आले. तेव्हा पंडित नेहरूंना पाहण्याविषयी ग.प्र.प्रधान यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले होते. पंडित नेहरू याने व्याख्यान पुणे येथील पुलाखालच्या मैदानात आयोजित केले होते. या व्याख्यानासाठी ग.प्र.प्रधान हे त्यांच्या जळगावच्या खादी वापरणाऱ्या व शिक्षक असणाऱ्या मामांच्या समवेत गेले होते. या व्याख्यानात पंडित नेहरू हिंदीतून भाषण देत होते. पंडित नेहरूंचे आकर्षक व्यक्तिमत्त्व व कळकळीचे भाषण यांमुळे ग.प्र.प्रधान हे फारच प्रभावित झाले. पंडित नेहरूंच्या भाषणाचा प्रभाव ग.प्र.प्रधान यांच्यावर एवढा पडला की, त्यांनी पुढे काही दिवसांनी नगरवाचन मंदिरातून पंडित नेहरूंचे आत्मचरित्र आणले होते. पंडित नेहरू यांच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद ना.ग.गोरे यांनी केलेला होता. ते आत्मचरित्र वाचताना ग.प्र.प्रधान यांना स्वातंत्र्य लढयाची ओळख झाली. विशेष म्हणजे या कादंबरीतील पंडित नेहरू यांच्या तुरूंगातील जीवनाचे वर्णन वाचताना ते मंत्रमुग्ध झाले. त्यावेळी त्यांना खांडेकरांच्या कादंबरीतील काहीशा स्वप्नाळू नायकांपेक्षा त्यांना संयुक्त प्रांतातील शेतकऱ्यांचा लढा चालविणारे पंडित नेहरू हे अधिक जवळचे वाटले. त्यातूनच ते स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले व त्यांनी सन १९४२ च्या चले जाव आंदोलनात सहभाग घेतला होता.

### ३.२.३ डॉ.राजेंद्र प्रसाद व ग.प्र.प्रधान :–

सन १९३७ मध्ये प्रांतिक निवडणुका पार पडल्या. त्यावेळी डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे भाषण ग.प्र.प्रधान यांनी ऐकले होते. त्या भाषणात डॉ.राजेंद्र प्रसाद म्हणाले होते की, 'काँग्रेस पक्षाला मत म्हणजे स्वातंत्र्य लढयाला मत हे विसरू नका. कारण काँग्रेसच स्वतंत्र्यासाठी लढेल.' डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे म्हणणे ग.प्र.प्रधान यांना फार आवडले होते. त्यावेळी ते मॅट्रिकच्या वर्गात होते. त्यांच्या वर्गातील बरेचशे विद्यार्थी लोकशाही स्वराज्य पक्षाचे नेते अण्णासाहेब भोपटकर यांच्या बाजूचे होते. त्या विद्यार्थ्यांना ग.प्र.प्रधान म्हणाले की, 'मला मत असते तर मी काँग्रेसचे उमेदवार बापूसाहेब गुप्ते यांना दिले असते. कारण काँग्रेस स्वातंत्र्यासाठी आजवर लढली आणि पुढेही लढेल. या झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार बापूसाहेब गुप्ते व लक्ष्मीबाई ठुसे प्रचंड बहुमताने निवडून आले. अशाप्रकारे डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या विचाराचा प्रभाव ग.प्र.प्रधान यांच्या मनावर झालेला होता. त्यातून त्यांची स्वातंत्र्याविषयी असलेली तळमळ दिसून येत होती.

### ३.२.४ सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांचा प्रभाव :–

ग.प्र.प्रधान हे मॅट्रिकची परीक्षा पास झाले होते. त्यावेळी मे महिन्यात सुभाषचंद्र बोस पुणे येथे आले होते. ते हरिपुरा येथे होणाऱ्या सन १९३९ च्या काँग्रेस अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. त्यावेळी पंडित नेहरूंच्याप्रमाणेच सुभाषचंद्र बोस यांच्याबद्दलही ग.प्र.प्रधान यांना आकर्षण वाटू लागले होते. सुभाषचंद्र बोस यांची पुणे शहरात जेथून मिरवणूक काढली जाणार आहे, असे जाहीर झाले होते, त्यावेळी जेथून मिरवणूक निघणार होती, त्याठिकाणी ग.प्र.प्रधान गेले आणि सुभाष बाबूंच्या उघडया मोटारीभोवती साखळी धरणाऱ्या स्वयंसेवकांत सामील झाले. त्या मिरवणुकीत प्रचंड उत्साह होता. ग.प्र.प्रधान यांना सुभाषबाबूंना जवळून पाहणे हा मोठा चित्तथरारक अनुभव होता. त्या दिवशी संध्याकाळी सुभाषबाबू यांचे भाषण झाले त्या भाषणास ग.प्र.प्रधान हजर होते. सुभाष बाबूंच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्या भाषणातील वक्तृत्त्वाचा ग.प्र.प्रधान यांच्यावर एवढा प्रभाव पडला होता की, ते तेव्हापासून सुभाषचंद्र बोस यांचे ते अनुयायी बनले होते.[२]

### ३.२.५ सोशालिस्ट स्टडी सर्कलमधील जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकाचा प्रभाव :–

ग.प्र.प्रधान हे मॅट्रिकची परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाले. पुढे ते महाविद्यालयात आर्ट साईडला महाविद्यालयीन शिक्षण घेऊ लागले त्यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राजकीयदृष्ट्या जागृती व्हावी, यादृष्टीने विद्यार्थ्यांची 'स्टुडंटस युनियन' नावाची संघटना स्थापन केली होती. या संघटनेच्या सभा ग.प्र.प्रधान राहत होते. त्याच गल्लीतच होत असत. त्या सभेस एक–दोन वेळा ग.प्र.प्रधान हजर राहिले होते. त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीविषयीचे आकर्षण यातूनही त्यांच्या मनात वाढलेले दिसून येते.

एल.आर.गोखले यांच्या बंगल्यात दर रविवारी दुपारी चार वाजता स्टडी सर्कल चालत असे. एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे यांचे बौद्धिक विचार प्रथमतः होत असत. या स्टडी सर्कलसाठी कॉलेजामधील माधव लिमये, विनायक ओक, विनायकराव कुलकर्णी, बंडू गोरे, आण्णा साने, गंगाधर ओगले आदीही काहीजण येत होते. ग.प्र.प्रधान व शिरूभाऊ लिमये यांची भेट तेथेच झाली.

जयप्रकाश नारायण यांच्या 'व्हाय सोशलिझम' या पुस्तकाचे नानासाहेब गोरे यांनी मराठीत भाषांतर केले होते. त्या पुस्तकाचे वाचन या स्टडी सर्कलमध्ये चालत असे. एखाद्या मुद्यांचे पुस्तकातील विवेचन संपल्यावर नानासाहेब किंवा एस.एम.जोशी त्यावर बोलत असत आणि त्यांचे मुद्देही चांगले होते. त्यावेळी जी चर्चा होत असे या चर्चेत ग.प्र.प्रधान सहभागी होत असत.

जयप्रकाश नारायण यांच्या पुस्तकात बाबू भगवानदास या भारतीय तत्त्वचिंतकांच्या अध्यात्मपर भूमिकेचे सविस्तर खंडन केले होते. त्यावर बोलताना भगवानदास गोरे म्हणाले की, 'हिंदुस्थानात आध्यात्मिक भूमिकेचा जो प्रचंड पगडा लोकांच्या मनावर आहे, त्यांना स्वातंत्र्यासारखा ऐहिक ध्येयासाठी लढायला लावणे सोपे नाही.' यावर माधव लिमये म्हणाले की, 'भगवानदासांची आध्यात्मिक भूमिका मलाही मान्य नाही.पण महात्मा गांधीजींच्याा विचारात अध्यात्म प्रवणता असूनही त्यांनी दक्षिण आफ्रिकेत अन्यायाविरूद्ध लढा दिला आणि १९२० आणि १९३०–३२ साली आपल्या स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्त्व केले, हे तुम्हाला मान्यच केले पाहिजे.' यावर गोरे म्हणाले, 'गांधीजींचे मोठेपण मी मान्य करतो. त्यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या चळवळीतच एस.एम.जोशी आणि मी सत्याग्रह करून तुरूंगात गेलो. परंतु गांधीजी हे

एक असामान्य अपवाद आहेत आणि गांधीजींचे मोठेपण मान्य केले तरी राजकारणात अध्यात्म किंवा धर्म आणू नयेत असेच माझे मत आहे. सन १९२० मध्ये गांधीजींनी असहकाराच्या चळवळीस खिलाफतीचा प्रश्न जोडला हे बरोबर झाले नाही. असे मला वाटते. पंडित जवाहरलाल नेहरू यांचेही मत त्या वेळीही होते.' एस.एम.जोशींनीही गोऱ्यांच्या म्हणण्यालाच पाठिंबा दिला. मधू शेवटी म्हणाला, 'मला हे मान्य आहे की अध्यात्म आणि राजकारण यांची सरमिसळ योग्य नाही.'

### ३.२.६ क्रांतिकारी पुस्तकांचा प्रभाव :–

ग.प्र.प्रधान यांनी क्रांतिकारकांच्या बद्दलची अनेक पुस्तके वाचली होती. त्यामध्ये आपटे गुरूजी यांचे 'स्वराज्य मार्गदर्शक लोकमान्य टिळक' , स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'माझी जन्मठेप', 'भारत में अंग्रेजी राज', यामध्ये संचींद्र संन्याल, काकोरी कटाच्या खटल्याची माहिती होती. क्रांतिकारी पुस्तकातून त्यांना वासुदेव बळवंत फडके, नाशिकची अभिनव भारत संघटना, इंग्लडमधील श्यामजी कृष्ण वर्मा, मॅडम कामा, स्वातंत्र्यवीर सावरकर, सेनापती बापट इत्यादींच्या कार्याची माहिती मिळाली. अमेरिकेत क्रांतीची तयारी करणारी गदर पार्टी, विष्णू गणेश पिंगळे, लाला हरदयाळ आदींची माहितीही त्यांनी पुस्तकातून वाचली. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांच्या हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीची माहिती तसेच लाहोर कटाचा खटला, जतीद्रनाथ दास याचे प्राणार्पण, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे फासावर जाणे आदींचे वृत्त देणारे पुस्तक ग.प्र.प्रधान यांनी वाचल्यानंतर तर त्यांची झोपच उडाली. या सर्व पुस्तकातून ग.प्र.प्रधान यांना स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित होण्यासाठी पार्श्वभूमी तयार झाली.

### ३.२.७ दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ग.प्र.प्रधान यांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाबाबतचा विचार :–

ग.प्र.प्रधान १८ वर्षाचे असताना त्यांच्या मनात सशस्त्र क्रांतीबद्दल आकर्षण वाटू लागले. याच वेळी त्यांच्या गटातील कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यलढयाची तयारी करण्यासाठी वेगवेगळया कार्यक्षेत्रात काम करायचे ठरविले. त्याप्रमाणे विनायकराव कुलकर्णी कोल्हापूरकडे गेले. गंगाधर ओगले हे नगर जिल्हयात साखर कामगारांच्यात काम करण्यासाठी गेले. मधू देवल यांनी कॉलेज सोडून देऊन ते साने गुरूजींच्या समवेत काम करण्यासाठी अमळनेरला गेले. या

सर्व योजनांसाठी ज्या बैठका होत होत्या. त्या बैठकीत होणारी चर्चा ग.प्र.प्रधान यांना बंडू गोरे सांगत होते. ग.प्र.प्रधान यांचे सहकारी स्वातंत्र्य चळवळीत काम करीत होते. परंतु ग.प्र.प्रधान हे अजूनही प्रत्यक्षपणे स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले नव्हते. मात्र त्यांच्या मनावर वरील राष्ट्रीय पुस्तके वाचून स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाचा विचार आलेला होता. ते प्रत्यक्ष अजूनही स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेले नव्हते. मात्र त्यांचे मन अस्वस्थ झाले होते. याचवेळी महात्मा गांधीजींची आत्मकथा त्यांच्या वाचण्यात आली. क्रांतिकारकांचा आत्मसमर्पणाचा मार्ग आणि गांधीजींचा अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग यातील श्रेष्ठ मार्ग कोणता, याबाबतीत ग.प्र.प्रधान यांच्या मनात जो गोंधळ उडाला होता. त्याविषयी बंडू गोरे यांनी हा गोंधळ दूर करण्याचा प्रयत्न केला होता. बंडू गोरे त्यांना म्हणाले की, 'प्रधान, तू रोमँटिक, स्वप्नाळू वृत्तीने स्वातंत्र्य लढयाकडे पाहतोस ते बरोबर नाही. लेनिन म्हणाला त्याप्रमाणे क्रांती हे शस्त्र आहे. क्रांतीला विचारांचे भक्कम अधिष्ठान असले पाहिजे, क्रांतीसाठी कार्यकर्त्यांची खंबीर संघटना असली पाहिजे आणि संघटित प्रयत्नातून व्यापक जनआंदोलन केले पाहिजे, म्हणजे आपली स्वराज्याच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. मूठभर देशभक्तांच्या हौतत्म्यातून स्वराज्य मिळणार नाही. आपल्याला मास मूव्हमेंटच केली पाहिजे. मी गांधीजींचे अहिंसेचे तत्त्वज्ञान स्वीकारलेले नाही. पण आपल्या देशातील सामान्य माणसांना, शेतकऱ्यांना व कामगारांना स्वातंत्र्य चळवळीत आणण्याचे गांधीजींचे सामर्थ्य असामान्य आहे. त्यांच्या प्रयत्नाना संघटनेची जोड मात्र दिली पाहिजे. आपल्यातला विनायक कुलकर्णी कोल्हापूरला गेला आहे. मधू देवल अंमळनेरला गेला आहे. यात रोमँटिक काही नाही. बहुजन समाजात काम करीत त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची आंकाक्षा जागृत करण्याच्या आपल्या गटाच्या प्रयत्नांची ही सुरूवात आहे. अशी खंबीर संघटना जर आपल्या समाजवादी पक्षाने देशभर उभी केली, तर स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व आपण करू शकू.'

अशाप्रकारे बंडू गोरे यांनी ग.प्र.प्रधान यांना जे सांगितले त्यामध्ये मुख्य सूत्र होते की, देशप्रेम या उत्कट भावनेची आवश्यकता आहेच, परंतु स्वातंत्र्यलढा विचारांवरच आधारलेला असला पाहिजे आणि तो सुरू करण्यापूर्वी विचार आणि कृती यांच्याबाबत सुस्पष्टता असलेल्या ध्येयवादी कार्यकर्त्यांची संघटना बांधली पाहिजे. अशा संघटनेत प्रत्येकाला त्याच्या प्रवृत्तीप्रमाणे काम दिले जाते. पुढे बंडू गोरे म्हणाले की, 'गंगाधर ओगले साखर कामगारांच्यात काम

करायला गेला. विनायक कुलकर्णी कोल्हापूरच्या प्रजापरिषदेत गेला. तुला आम्ही कदाचित शिक्षक होऊन विद्यार्थ्यांच्यामध्ये काम करायला सांगू. वेगवेगळया ठिकाणी असलेले कार्यकर्ते लढयाची तयारी करतील. आणि नंतरच मासमूव्हमेंट सुरू करता येईल. तू रोमँटिक भूमिकेतून बाहेर ये. जगातील स्वातंत्र्यलढयाचे, वेगवेगळया क्रांत्यांचे इतिहास वाच मी तुला लेनिनचे चरित्र वाचायला देईन. ते वाचल्यावर क्रांतीचे, स्वातंत्र्य लढयाचे शास्त्र असते, हे तुला समजेल.' नंतरही चार–पाच वेळा ग.प्र.प्रधान व बंडू गोरे एकत्र बसले. ग.प्र.प्रधान त्यांना प्रश्न विचारत असत तर बंडू गोरे त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत असत.

ग.प्र.प्रधान यांनी सन १९३९ च्या दरम्यान आगरकर यांनी केलेले लेखन वाचले. हिंदुस्थानात राजकीय आणि आर्थिक प्रश्नाइतकेच सामाजिक सुधारणेचा मार्गही अवघड होता. हे ग.प्र.प्रधान यांना माहिती होते. मात्र, स्वातंत्र्य लढयालाच आपण अग्रक्रम दिला पाहिजे, असे ग.प्र.प्रधान यांना वाटत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच आर्थिक आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे शक्य होईल. असेच ग.प्र.प्रधान यांच्या सर्व मित्राचे म्हणणे होते. पारतंत्र्यामुळे सर्व जीवन खुरटले होते. या शृंखला तोडल्यानंतरच अन्य समस्या सोडवणे शक्य होईल, असेच ग.प्र.प्रधान यांना मनोमन वाटत होते.[३]

सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. व्हाईसरॉयने हिंदुस्थान ब्रिटिशांच्या आघाडीमध्ये युद्धात सामील झाला असे जाहीर करून टाकले. त्याचा निषेध म्हणून देशातील सात राज्यातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. पुण्यात काँग्रेस हाऊसमध्ये काँग्रेस नेत्यांची एक बैठक झाली. तिला प्रधान स्वयंसेवक म्हणून उपस्थित होते. समाजवादी पक्षाची प्रांतिक बैठक लोकशक्तीच्या कार्यालयात झाली. तिला ना.ग.गोरे आणि एस.एम.जोशी यांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्र सेवादलाच्या स्थापनेपूर्वी जी चर्चा झाली होती. त्यामध्ये शिरूभाऊ लिमये यांनी ग.प्र.प्रधान यांना म्हटले होते की, 'तू बैठकीला हजर रहा आणि सविस्तर टिपणे घे', असा ग.प्र.प्रधान यांना आदेश दिला होता. त्या वेळी शाळा कॉलेजातून प्रत्यक्ष शिक्षणाचाच एक छोटा भाग म्हणून व्यायामाचा, खेळाचा तास असे. संध्याकाळी काहीजण स्काऊट ग्राऊंडवर जात काही खोखो, आटयापाटया खेळायला जात. परंतु अनेक पांढरपेशे विद्यार्थी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात असत. काँग्रेसचे सेवादल नसल्यामुळे काही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची मुलेही संघात

जाऊ लागली होती. त्यावेळी बंडू गोरे यांनी युद्धविरोधी भाषण केल्यामुळे त्यांना तुरूंगात टाकले होते.[४]

### ३.२.८ भूमिगत चळवळीत सहभागी होण्याविषयीचे ग.प्र.प्रधान यांचे विचार :–

शिरूभाऊ लिमये यांन जयप्रकाश नारायण यांना पत्र पाठवून भूमिगत चळवळीविषयीची कल्पना दिली होती. त्यामध्ये म्हटले होते की, हिटलरने युरोपातील जे देश जिंकले, त्यापैकी काही देशामध्ये तेथील स्वातंत्र्यवादी तरूणांनी भूमिगत चळवळ करून हिटलरची फॅसिस्ट राजवटही खिळखिळी करण्याचा प्रयत्न केला होता. हे करताना भूमिगत चळवळ चालवून त्यांनी पूल उडवणे, रेल्वेचे रूळ उखडणे, तारा तोडणे आदी साबोटेजिंगचा कार्यक्रम साहसाने चालवला होता. अशीच भूमिगत चळवळ आपल्याला आगामी स्वातंत्र्य लढयात करावी लागेल. साबोटेजिंगचा कार्यक्रम यशस्वी करून लष्कर व पोलीस यांच्या दळणवळणाचे मार्ग नष्ट करावे लागतील आणि सरकार खिळखिळे करावे लागेल, असे जयप्रकाश नारायण यांनी शिरूभाऊ लिमये यांना सुचविले होते.

हे पत्र वाचून दाखविल्यावर शिरूभाऊ लिमये यांना फार उत्साह वाटला. ते म्हणाले की, आपल्याला आत्तापासून  या चळवळीची तयारी करावी लागेल. काय करायचे ते मी ठरवले आहे. आणि लवकरच आपल्या सगळयांना कामाला लागावे लागेल. या कार्यक्रमाची सुरूवात म्हणून गुप्त पत्रके सायक्लोस्टाईल कसे व कोठे करावयाचे हे मी पुढच्या बैठकीत सांगेन असे म्हणाले.

स्वातंत्र्य संग्राम आता दाराशी येऊन ठेपला होता याची ग.प्र.प्रधान यांना जाणीव झाली होती. याचा परिणाम ग.प्र.प्रधान यांच्या अभ्यासावर झालेला नव्हता. याचे कारण त्यांना इंग्रजी साहित्याबद्दल विलक्षण आवड निर्माण झाली होती. प्रा.मनोहर भाटे यांच्यामुळे ‘लिटररी क्रिटिसिझम्’ या विषयातील संकल्पनांच्या संबंधी ते सांगतील तै सर्व पुस्तके ते वाचत होते. शिवाय त्यांच्या आईची अभ्यासाबाबतची कठोर शिस्त, जी प्राथमिक शाळेपासून ते पाळत आले होते. तिचे उल्लंघन करण्याची हिम्मत बी.ए.च्या वर्गातही त्यांना कधी झाली नाही. ग.प्र.प्रधान यांनी राजकीय हालचाली त्यांच्या आईपासून दडवून ठेवल्या असल्यामुळे वेळेवर घरी येऊन ते अभ्यास करत असत.

'हरिजन'चा अंक ज्या दिवशी येत असे. त्या दिवशी महात्मा गांधीजींचा अग्रलेख वाचला की मन क्षुब्ध होत असे. ग.प्र.प्रधान यांचे लक्ष अभ्यासात लागत नव्हते. परंतु अन्य दिवशी ते रात्री एक वाजेपर्यंत लिटररी हिस्ट्री, लिटररी क्रिटिसिझम् या विषयाची ते उत्तम तयारी करीत होते. ते बी.ए.च्या सेंकड टर्मला त्यांचे दुहेरी जीवन चालू होते. परीक्षा जवळ आली त्यावेळी चळवळ ही जवळ आली होती. परीक्षा आटोपून चळवळीत त्यांना सहभाग घ्यायचा होता. शेवटी एप्रिलमध्ये शेवटचा पेपर देऊन त्यांनी चळवळीत भाग घेण्यासाठी सुटकेचा निःश्वास टाकला.[५]

### ३.२.९ सन १९४२ च्या चले जाव आंदोलनातील सहभाग व ११ महिने कारावास :–

वर्धा येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. वर्किंग कमिटीने पास केलेला 'चले जाव' ठराव वर्तमानपत्रात पास झाला, त्यावेळी आता चळवळ जवळ आली. या जाणिवेने ग.प्र.प्रधान यांचे मन धुंद झाले. ६ ऑगस्टला ग.प्र.प्रधान हे मामांच्याकडे मुंबईस जातो असे सांगून घर सोडून आले. ते मुंबईला आल्यानंतर गवालियाँ टँक मैदानावर पोहोचले. त्यावेळी त्यांचे मित्र तेथे अगोदरच हजर होते.

७ व ८ ऑगस्ट हे अभूतपूर्व दिवस होते. ८ ऑगस्टला गांधीजींचे भाषण ऐकताना आपण किती भाग्यवान, असे त्यांना वाटले. गांधीजी शांतपणे बोलत होते. आणि हजारो श्रोते जिवाचा कान करून त्यांचे भाषण ऐकत होते. 'चले जाव ठराव' पास झाला आणि त्यावेळी प्रचंड घोषणा देण्यात आल्या. चळवळीत सुरूवातीला यदुनाथ थत्ते, ठाकूर आणि ग.प्र.प्रधान यांना एकत्र काम करायला सांगितले होते. एका आठवडयाने नाशिकचा देशमुख विद्यार्थी म्हणून विद्यार्थी कार्यकर्ते होते. त्यांना व ग.प्र.प्रधान यांना खडकीला जायला सांगितले होते. जुन्या खडकीत एका लहानशा खोलीत त्यांचे सायक्लोस्टाईल मशीन होते. पुढे ऑक्टोबरमध्ये त्यांचा सगळा गट पकडला गेला व ग.प्र.प्रधान यांना येरवडा जेलमध्ये टाकण्यात आले. तेथे आचार्य भागवत, आचार्य जावडेकर, सानेगुरूजी यांच्याबरोबर ग.प्र.प्रधान यांना राहावयास मिळाले होते. या सर्वाचा ग.प्र.प्रधान यांच्या मनावर खोल परिणाम झाला. याच काळात काकासाहेब गाडगीळ यांचे 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' हे पुस्तक वाचनात आल्याने भांडवलशाही व्यवस्था बदलण्याचा विचार रूजला.[६]

### ३.२.१० येरवडा तुरूंगातील शिक्षण :–

येरवडा तुरूंगात असताना ग.प्र.प्रधान यंची आचार्य भागवत व आचार्य जावडेकर यांची भेट झाली. त्यांनी तुरूंगातच त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना ज्ञानदान केले. तेथेच 'टोवर्डस दी अंडरस्टँडिंग ऑफ मार्क्स', 'व्हॉट मार्क्स रिअली मेंट' आणि 'मॉस्को डायलॅग्ज' अशी तीन पुस्तके वाचली व त्यावर आचार्य जावडेकर यांनी भाष्य केले होते. या पुस्तकातून पाश्चात्य तत्त्वज्ञानाची ओळख झाली. तसेच आचार्य भागवत यांनी दिलेल्या व्याख्यानातून त्यांना भारतीय तत्त्वज्ञानातील षड्‌दर्शने, महत्त्वाची उपनिषदे व नंतर बुद्ध, महावीर, ख्रिस्त, महमंद पैंगबर यांच्या तत्त्वज्ञानाची माहिती मिळाली. काकासाहेब गाडगीळ यांच्या ग्यानबाचे अर्थशास्त्र या पुस्तकातून गरिबांच्यावर अन्याय करणारी भांडवलशाही व्यवस्था बदलली पाहिजे हे समजले. ८ ऑगस्टच्या 'चले जाव' ठरावात उद्याचे स्वराज्य कोणासाठी आहे, याबद्दल सांगताना ग.प्र.प्रधान म्हणतात की, हे उद्याचे स्वराज्य श्रमजीवींच्यासाठी असेल. तर आचार्य जावडेकर म्हणतात की, उद्याच्या स्वराज्यामध्ये अस्पृश्यता नष्ट होईल. महात्मा गांधींनी पूणे कराराच्यावेळी काँग्रेस अस्पृश्यतेचे निर्मूलन करील, असे आश्वासन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिले होते. मग आपण त्यासाठी काहीच केले नाही. आपल्या स्वातंत्र्य चळवळीत आपण अस्पृश्य बांधवांचा विश्वास संपादन केला नाही. पारतंत्र्य असले तरी अस्पृश्यता नष्ट करायला आपल्याला ब्रिटिशानी बंदी केली नव्हती. आपण जर अस्पृश्यता घालवण्यासाठी काम केले असते तर आपल्याबरोबर चळवळीत आपले अस्पृश्य बांधव नक्कीच आले असते आणि आंबेडकरही त्या चळवळीचे नेतृत्व करायला पुढे आले असते. तेव्हा आंबेडकर आणि त्यांचे बांधव स्वातंत्र्य चळवळीपासून दूर राहण्यास आपण जबाबदार आहोत, असे आचार्य भागवत यांनी ग.प्र.प्रधान यांना समजावून सांगितले. आचार्य भागवत यांच्यामुळे ग.प्र.प्रधान यांना दलितांच्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले. व आपले विचार किती अपरिपक्व आहेत याची जाणीव झाली.

येरवडा तुरूंगात असताना साने गुरूजींच्याबरोबर एका बराकीत काही महिने राहण्याचे भाग्य ग.प्र.प्रधान यांना मिळाले. साने गुरूजी यांनी ग.प्र.प्रधान यांच्या सांगण्यावरून त्यांना बंगाली भाषा शिकविली. अशाप्रकारे येरवडा तुरूंगात असताना ग.प्र.प्रधान यांना बरेच काही शिकता आले होते.

### ३.२.११ येरवडा तुरूंगातून सुटका :–

ग.प्र.प्रधान तुरूंगात असताना त्यांच्या मनात जी खंत होती ती म्हणजे, आपण लवकर पकडलो गेल्याने भूमिगत चळवळीत साहसी कृत्ये करणाऱ्या आपल्या मित्रापेक्षा आपण कमी पडलो. त्याचवेळी एक घटना घडली ती म्हणजे, येरवडा तुरूंगातून एक दिवस संध्याकाळी छन्नुसींग, विभुरते, किसन वीर, बलदेव प्रसाद आणि पांडू सरहे जेलच्या भिंतीवरून पलीकडे उडया टाकून पळाले. रोज संध्याकाळी राजबंद्यांची संख्या मोजली जात होती. त्यामध्ये पाचजण कमी भरल्यामुळे जेलमधील अधिकारी आणि पोलीस यांची धावपळ सुरू झाली आणि नंतर ग.प्र.प्रधान यांना बराकीत कोंडून भयसूचक घंटा वाजवण्यात आली. त्या दिवशीच्या लाठीमारात एका सार्जंटने काकासाहेबांच्या डोक्यावर बेटनचा प्रहार केला. काकासाहेबांचे डोके फुटून रक्त वाहू लागले. तरीही त्यांनी बाकीच्या सर्वांना शांत राहण्यास सांगितले. त्यामुळे पुढचा अनर्थ टळला.

पुढे १९४३ साली जेव्हा महात्मा गांधीजीनी आगाखान पॅलेसमधे २१ दिवसाचे उपोषण सुरू केले, तेव्हा येरवडा जेलमधील सर्व राजबंदी कैदी क्षुब्ध झाले. बारा–तेरा दिवसानंतर जेव्हा गांधीजींची प्रकृती खालावू लागली. तेव्हा सर्वाच्या मनाची तडफड सुरू झाली. गांधीजींचा मृत्यू समीप आला आहे. असे सर्वाना वाटू लागले. तेव्हा महात्मा गांधीजी उपोषणाच्या अग्निदिव्यातून वाचले, तेव्हा येरवडा जेलमधील सर्व राजबंदी कैद्यानी सुटकेचा निःश्वास टाकला. पुढे गांधीजींची सुटका झाली. त्यानंतर सन १९४४ मध्ये ग.प्र.प्रधान यांची सुटका झाली.[७]

### ३.२.१२ गांधीजींचे स्वयसेवक म्हणून काम :–

ग.प्र.प्रधान यांची सन १९४४ मध्ये तब्बल ११ महिन्यांनी सुटका झाली. त्यावेळी महात्मा गांधीजी पुणे येथे डॉ.दिनशा मेहता यांया निसर्गोपचार केंद्रात विश्रांती व उपचार घेत होते. तेथे ग.प्र.प्रधान गेले. त्यावेळी त्यांना तेथे स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ते दिवसभर गांधीजींच्याजवळ असत. त्यावेळी त्यांना गांधीजींचा निकटचा सहवास लाभला. गांधीजींची कार्यपद्धती जवळून पाहायला मिळाली पहाटे पाच वाजता होणाऱ्या प्रातःप्रार्थनेच्या वेळी गांधीजी, प्यारेलालजी, डॉ.सुशीला नायर असे चार–पाच जण त्या प्रार्थनेसाठी असत. त्यावेळी अभंग म्हणण्यासाठी रोज कोनाला तरी आणण्याची जबाबदारी

ग.प्र.प्रधान यांच्यावर होती.

गांधीजींच्या तेथील मुक्कामात भूमिगत चळवळीच्या नेत्या अरूणा असफअली त्यांना भेटायला येणार होत्या. ही भेट गुप्तपणे पार पाडण्यासाठी जबाबदारी ग.प्र.प्रधान यांच्यावर सोपविली. निसर्गोपचार केंद्राभोवती चोवीस तास पोलीस पहारा असल्यामुळे हे काम सोपे नव्हते. ग.प्र.प्रधान यांचा एक साहसी मित्र दत्तोबा जगताप यांच्या मदतीने हे पार पाडण्याचा निर्णय ग.प्र.प्रधान यांनी घेतला. त्या निसगोपचार केंद्रात काही वृद्ध पार्शी स्त्री–पुरूष होते. अरूणाबाई मध्यमवयीन पार्शी बाईचा वेष घेऊन आल्या त्यामुळे पोलीसांना संशय आला नाही. पण भेट संपवून त्या परत जाईपर्यंत ग.प्र.प्रधान पूर्णपणे घाबरले होते. दत्तोबा जगताप यांना पोलिसांशी दोन हातकरायला मिळावेत असे वाटत होते. एवढेच नव्हे तर त्यांनी रिव्हॉल्वर सज्ज ठेवले होते, परंतु तसे काही घडलेच नाही. अरूणा असफअली भेट आटोपून परत गेल्या.नंतर पहाटे तीन वाजता रेल्वेगाडीने मद्रासकडे गेल्या. त्या सुखरूप गेल्याचे कळविण्याची जबाबदारी ग.प्र.प्रधान यांच्यावर होती. ती त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडली.[८]

### ३.२.१३ फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी :–

सन १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्यामुळे भूमिगत कार्य चालू असताना ग.प्र. प्रधान पकडले गेले. त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली होती. शिक्षा भोगून आल्यानंतर वडिलांनी त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली आणि घर चालविण्यासाठी नोकरी करणे आवश्यक आहे हे पटवून दिले.तेव्हा प्रधान मास्तरांनी सांगितले, ‘मला एम.ए.करावयाचे आहे आणि मी नंतर नोकरी करीन’.त्यावर वडिलांनी होकार दिला. पुढे १९४५ साली ते एम.ए.सुटले. याच दरम्यान फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरीसाठी अर्ज दिला. भाटे सरांनी प्रधानांना एक अट घातली. तुम्हांला सक्रीय राजकारण करता येणार नाही, त्याला प्रधानांनी होकार दिला व नोकरी स्वीकारली. नोकरीला असताना राष्ट्र सेवा दलामध्ये ते बौद्धिक घेण्यासाठी दर रविवारी जात असत. पुढे वीस वर्षे म्हणजे १९४५ ते १९६५ असे कॉलेजमध्ये नोकरी केली. वयाच्या ४३ व्या वर्षी त्यांनी प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला.[९]

अशाप्रकारे ग.प्र.प्रधान यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावास भोगावा लागला. देशभक्तीमुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला. परंतु वैयक्तिक प्रगतीपेक्षा कर्तव्याला त्यांनी महत्त्व दिले. पंडित जवाहलाल नेहरूंचे ग्रंथ त्यांना स्फूतिदायक

ठरले. आचार्य शंकरराव जावडेकर आणि साने गुरूजी यांचा सहवास त्यांना प्रेरक ठरला. बिनभिंतीच्या शाळेत व्यापक जीवनानुभव संपादित करीत राहून साने गुरूजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी ते एक ठरले. नानाप्रकारे त्यांनी समाज जागरण कार्यात सहभाग घेतला.

कारावासातून मुक्त झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून फर्ग्युसन महाविद्यालयात इंग्रजींचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत झाले. तेथे तब्बल वीस वर्षे एक नामवंत प्राध्यापक म्हणून विद्याजीवनात मानमान्यता मिळविलेली. शिक्षकत्व हा प्रधान मास्तरांनी कधीच व्यवसाय मानला नाही. अध्यापन हे त्यांनी व्रत मानले. आपली राजकीय मते त्यांनी अध्यापक म्हणून कधीच कुणावर लादली नाहीत. 'राजकारण' आणि 'विद्याजीवन' यांची सरमिसळ कधीच त्यांनी केली नाही. सद्सदविवेकाला स्मरून वागणारा एक अनाग्रही विचारवंत प्राध्यपक म्हणून प्रधान मास्तारांचा सर्वांना आदर व आधार वाटला. केवळ विषयशिक्षक म्हणून न राहता त्यांनी अध्यापन विषय शिकविलाच पण विद्यार्थ्यांना प्रेमही दिले. त्यांचे प्रश्न समजून घेतलेत. शक्य ती मदत करून सोडवलेही. त्यामुळे जीवनशिक्षक व समाजशिक्षक ठरले. त्यांचे विद्यार्थी आज अनेक मोठया पदांवर आहेत. त्यांना मास्तराविषयी आजही आदर व अभिमान वाटतो.

## ३.३ ग.प्र.प्रधान यांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील कार्याचा ऐतिहासिक आढावा :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग.प्र.प्रधान यांनी गोवामुक्ती लढा, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, तसेच आणीबाणीविरूद्धच्या लढयात सहभाग घेतला. प्रधान हे हाडाचे शिक्षक होते. त्यामुळे फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच जीवनविषयक तत्त्वज्ञानही त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. पुणे विद्यापीठाच्या सिनेटवर काम करताना ग्रामीण भागातील विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालये यांना त्यांनी भरघोस मदत केली. विधान परिषदेत शिक्षक मतदारसंघातून त्यांनी १९६६ ते १९८४ अशी सलग १८ वर्षे काम केले. त्यामध्ये ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिलांना संरक्षण, विविध सोयी-सवलती मिळाव्यात, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तळागाळातील कार्यकर्त्यांचा ते मोठा आधार होते. त्यांचे आमदार निवास हे वाडया-वस्त्यातून काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांचेच घर बनले होते. विधायक विरोधक हे सूत्र सांभाळत त्यांनी काम केले. त्यामुळेच रोजगार हमी योजनेसारख्या अनेक चांगल्या योजनांना त्यांनी पाठिंबा दिला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव

देण्याच्या विधेयकाला मोठा विरोध असतानाही प्रधान यांनी तो मांडून कार्यकर्त्यांना दिलेला शब्द पाळला. त्या लढयात त्यांनी ७ दिवस तुरूंगवासाची शिक्षाही भोगली.

सानेगुरूजींच्या विचाराचा प्रधान यांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यामुळेच 'साधना'च्या स्थापनेपासून त्यांचे आपुलकीचे नाते होते. त्यामुळेच चौथ्या वेळी पक्षाने सांगूनही त्यांनी निवडणुकीला उभे राहण्यास विरोध केला. पुढील आयुष्य 'साधना'साठी घालविण्याचा मनोदय व्यक्त केला. वसंट बापट यांच्या बरोबर १९८४ मध्ये त्यांनी 'साधना'च्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. साधना ट्रस्टच्या विश्वस्त सचिवपदाचा कारभारही त्यांनी सांभाळला.[१०]

**३.३.१ गोवामुक्ती लढा :–**

भारत स्वतंत्र होत असताना सन १९४६ मध्ये डॉ.मनोहर लोहिया गोव्यात गेले होते आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन गोव्यातील काही जणांनी तेथे स्वातंत्र्य चळवळ सरू केली होती. परंतु सरकारने त्या देशभक्त नेत्यांना हद्दपार करून दीर्घ मुदतीच्या शिक्षा दिल्या. अर्थात या जुलमामुळे गोव्याच्या जनतेच्या मनातील स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा स्फुलिंग विझला नाही.

गोव्यातील चळवळ थोडीफार चालू होतीच. भारत सरकारने हस्तक्षेप करून गोवा मुक्त करावा, असे अनेकांना वाटत होते. परंतु ते घडत नव्हते. म्हणून सन १९५४ मध्ये नानासाहेब गोरे यांनी गोव्यातील स्वातंत्र्य चळवळीस साहाय्य म्हणून भारतातून सत्याग्रहयांनी गोव्यात जावे, असे आवाहन करून स्वतः पहिल्या सत्याग्रह तुकडीचे नेतृत्व करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे सन १९५५ पासून सत्याग्रह सुरू झाला. नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये, मधु लिमये, मधु दंडवते आदींच्या नेतृत्त्वाखाली सत्याग्रही तुकडया आत गेल्या. त्याचवेळी हिरवेगुरूजीही आपली तुकडी घेऊन गोव्यामध्ये शिरले. तिच्यावर गोळीबार झाला. आणि हिरवेगुरूजी हुतात्मा झाले. अनेकांना अमानुष मारहाण झाली. तुकडीच्या नेत्यांना तुरूंगात टाकले. तेव्हा सत्याग्रहाला आणखी वेग आला आणि भारतातून सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली तुकडया जाऊ लागल्या. काही सत्याग्रही हुतात्मे झाले, तरी चळवळ चालू राहिली. ग.प्र.प्रधान यावेळी कॉलेजमध्ये नोकरी करत होते आणि घरची सर्व जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यामुळे त्यांना सत्याग्रह करणे शक्य नव्हते. मात्र, सन १९५५ मध्ये एप्रिल–मे महिन्यात गोवा सरहद्दीवर सत्याग्रहींना मदत करण्याचे काम करत होते. त्यावेळी त्यांना मनात खंत लागून राहिले होते.[११]

### ३.३.२ संयुक्त महाराष्ट्राच्या लढयातील सहभाग :–

इ.स.१९५५ मध्ये पोट्टी रामलु यांनी स्वतंत्र आंध्रप्रदेशाच्या निर्मितीसाठी उपोषण केले. त्यात त्यांचा शेवट होऊन आंध्रप्रदेशाची निर्मिती झाली. इ.स.१९५६ मध्ये विदर्भ, मराठवाडा, मुंबई राज्यास जोडण्यास आले. पण गुजराथ व महाराष्ट्राचे राज्य द्विभाषिक बनविण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर मोठा गंभीर बनला होता. 'आपल्यावर अन्याय होत आहे. इतर प्रांतापेक्षा वेगळी नीती महाराष्ट्राबाबत वापरली जात आहे'. अशी भावना सर्वत्र निर्माण झाली होती.[१२]

संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला. नोकरीच्या बंधनामुळे ग.प्र.प्रधान सत्याग्रह करू शकले नाहीत. पुण्यामध्ये लालजी कुलकर्णी सत्याग्रह संघटित करीत होते, त्यांना ग.प्र.प्रधान यांनी शक्य ती मदत केली. ग.प्र.प्रधान यांच्या पत्नीने सत्याग्रह करून दहा दिवस कारावास भोगला, तेव्हा ग.प्र.प्रधान यांना फार आनंद वाटला. प्रतापगडावर शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला होता. त्याचे अनावरण करण्यासाठी ७ नोव्हेंबर, १९५७ रोजी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू येणार होते. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचा लढा जोरात चालू होता. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची तीव्रता पटविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे पंडित नेहरूंसमोर निदर्शने करण्याचे ठरले. पश्चिम महाराष्ट्रातील निदर्शक महाडच्या बाजूने निघाले. सरकारने दोन्ही बाजूच्या निदर्शकांना प्रतापगडाच्या अलीकडे अडविण्याचे ठरविले. समिती निदर्शकांचा प्रचंड मोर्चा वाईला अडविण्यात आला. तर कोकणचा मोर्चा पोलादपूरला अडविण्यात आला. नोव्हेंबरच्या कडाक्याच्या थंडीत हजारो निदर्शक वाई शहरापासून पाचगणी घाटाच्या पायथ्यापर्यंत पसरले होते. शेकोटया पेटवल्या होत्या. निदर्शकांचे नेते आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, कॉ.डांगे, नाना पाटील, माधवराव बागल, केशवराव जेधे, शंकरराव मोरे आदि नेते रात्रभर रस्त्यावर छावणी टाकून मार्गदर्शन करीत होते. त्यामध्ये ग.प्र.प्रधान होते. पोवाडे, गाणी, नकला व भाषणे यांनी रात्रभर गजर चालू होता. काँग्रेसचे निदर्शकही ट्रकमधून प्रतापगडावर जात होते. दोघांचा संघर्ष होऊ नये म्हणून काँग्रेस निदर्शकांना पसरणीमधून बाहेर काढले जात होते. त्यावेळी काँग्रेसच्या निदर्शकांचे नेतृत्व किसन वीर करीत होते. वाईत पंडित नेहरू येण्याच्या आदल्या दिवशी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या समितीतर्फे प्रचंड जाहीर सभा झाली. पंतप्रधान पंडित नेहरू आणि त्यांच्या समवेत असलेले

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची मोटार त्या सर्व लोकांच्यामधून सावकाशपणे निघून गेली. त्यावेळी 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. अशी गगनभेदी घोषणा दहा हजार निदर्शकांनी केली. ग.प्र.प्रधान यांना हा एक अपूर्व अनुभव होता.[१३]

### ३.३.३ पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर निवड :–

सन १९५५ मध्ये प्रा.अ.भि.शहा यांच्या आग्रहामुळे ग.प्र.प्रधान यांनी पुणे विद्यापीठ सिनेटची निवडणूक प्राध्यापक मतदारसंघातून लढविली आणि यशही मिळविले. त्यांना हा अनुभव नवा होता. प्रा.शहा यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे ग.प्र.प्रधान हे विद्यापीठ सिनेटवर सन १९५८ मध्ये निवडून आले. त्यामुळे त्यांना शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली. रँग्लर परांजपे, प्रा.डी.जी.कर्वे, प्रा.धनंजयराव गाडगीळ, महामहोपाध्याय पोतदार, काकासाहेब गाडगीळ अशी थोर विद्वान माणसे त्या काळात चॅन्सेलर पदावर होती. त्यांच्यापासून ग.प्र.प्रधान यांना पुष्कळ गोष्टी शिकता आल्या. कार्यकारिणीमध्ये त्यावेळी रयत शिक्षण संस्थेचे प्रा.बॅ.पी.जी.पाटील होते. त्यांची व ग.प्र.प्रधान यांची मैत्री त्यामुळे आणखीनच दृढ झाली. सन १९५४–५५ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यास आले होते. तेव्हा त्यांची भेट ग.प्र.प्रधान यांनी घेतली. त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील त्यांना म्हणाले की, 'ग्रामीण भागात निघणाऱ्या कॉलेजांना तू सर्व मदत केली पाहिजेस.' तसेच कर्मवीर आण्णांनी ग.प्र.प्रधान यांचा मोठा सन्मान केला.[१४]

### ३.३.४ सन १९५७ च्या निवडणुकीत ग.प्र.प्रधान यांनी केलेले काम :–

मुंबई विधानसभेची निवडणूक सन १९५७ मध्ये जाहीर झाली. पुण्यातून शुक्रवार पेठ वार्डमधून एस.एम.जोशी व बाबूराव सणस यांच्यात लढत झाली. त्यावेळी ग.प्र.प्रधान यांनी एस.एम.जोशी यांच्यासाठी खूप मोठे काम केले. त्याचप्रमाणे लोकसभेच्या निवडणुकीत पुण्यात नानासाहेब गोरे व काकासाहेब गाडगीळ यांच्यात लढत झाली तेव्हा गोरे यांच्यासाठी निवडणूक एजंट म्हणून ग.प्र.प्रधान यांनी काम केले होते.[१५]

### ३.३.५ भारत पाकिस्तान युद्ध(१९६५) व ग.प्र.प्रधान :–

सन १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांचे युद्ध सुरू झाले. पाकिस्तानने प्रथम छांबअखनूर भागावर हल्ला केल्यावर त्याला प्रत्युत्तर देणे आवश्यक होते. त्यावेळी शिरूभाऊ लिमये ग.प्र.प्रधान यांना म्हणाले की, 'प्रधान, आपण युद्धभूमीवर जाऊ या.' त्यावेळी

ग.प्र.प्रधान या गोष्टीसाठी लगेचच तयार झाले. या युद्धभूमीवर जाण्यासाठी ग.प्र.प्रधान यांनी पुण्यातील 'सकाळ' दैनिकाचे प्रतिनिधित्व मिळविले तरी शरूभाऊ लिमये यांनी 'साधना' याचे प्रतिनिधित्व मिळविले. पत्रकारांना खास सवलती मिळतात, हे माहीत असल्यामुळे आम्ही ही सुविधा मिळविली. जम्मू येथे गेल्यावर हे दोघेजण भारतीय सेनेचे पब्लिक रिलेशन्स ऑफिसर मेजर पुरी यांना भेटले आणि वृत्तपत्र प्रतिनिधी म्हणून मिळालेली त्यांची अधिकृत पत्रे सादर केली.

मेजर पुरी यांनी त्यांना पत्रकारांच्या तुकडीत सामावून घेतले. रोज सकाळी ८.०० वाजता मेजर पुरी यांच्या कार्यालयात गेल्यानंतर सेनेच्या जीपमधून ते सहा पत्रकार आणि एक मार्गदर्शक युद्धभूमीकडे जात असत. संध्याकाळपर्यंत त्यांची भ्रमंती चालत असे. त्यांना हा एक रोमहर्षक अनुभव होता. भारतीय सेनेतील जवानांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पराक्रमाचे त्यांना दर्शन होत होते. मेजर भास्कर रॉय या परमवीर चक्र मिळविणाऱ्या अधिकाऱ्याबरोबर त्यांनी बातचीत केली. त्याचप्रमाणे छांबआखनूर भागातील पाक आक्रमणाचा तडाखा सोसणाऱ्या डोग्रा नागरिकांच्या धैर्याचा, जिद्दीचा आणि अपार सहनशीलतेचाही त्यांना प्रत्यय आला.भारतीय सेनेने पाकिस्तानचा जो भाग जिंकला होता, त्या सियालकोट जिल्हयात त्यांच्या एका मार्गदर्शनाने फिरावयास नेले. रावी नदीच्या तीरावर ते गेले आणि ऐलतीरावरील आपल्या सरहद्दीवरील भारतीय सेना आणि पैलतीरावरील पाकिस्तानी सेना एकमेकावर बंदुका रोखून उभ्या राहिलेल्या त्यांनी पाहिल्या. त्यांना आलेला सर्वात रोमांचकारी अनुभव म्हणजे त्यांनी दऱ्याखोऱ्या ओलांडीत हाजीपीर खिंडीत पोहचलो आणि तेथे विजयाने फडकणाऱ्या भारतीय राष्ट्रध्वजाचे त्यांना दर्शन झाले. युद्धभूमीवरून परत आल्यावर त्यांनी अनेक व्याख्याने देऊन आपले अनुभव सांगितले होते. एवढेच नव्हेतर या अनुभवावर आधारित 'हाजीपीर' नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले.[१६]

### ३.३.६ सक्रिय राजकारणात प्रवेश :–

विद्यार्थी दशेतील प्रधान सरांचे मित्र बॅरिस्टर नाथ पै. १९६२ च्या निवडणुकीत राजापूर मतदार संघातून पार्लमेंटवर निवडून गेले होते. ते पुण्याला आले असताना प्रधानांना म्हणाले, 'आता तू नोकरी सोडून पूर्णवेळ पक्षाचे काम करायला हवं'.

त्यावेळी प्रधान सरांची पत्नी बी.ए.एम.एस च्या शेवटच्या वर्षाला होत्या. त्यांनी पत्नीला विचारले, 'मी नोकरी सोडली तर डॉक्टर झाल्यावर तू प्रपंच चालवशील का'? तेव्हा त्या म्हणाल्या, 'मला लग्नानंतर पुन्हा मनासारखं शिकायला मिळालं. मी डॉक्टर झाल्यावर संसाराची जबाबदारी घेईन, तुम्ही तुमच्या मनासारखं राजकारण करा'.[१७]

### ३.३.७ समाजवादी पक्षातील फूट :-

प्रधान यांनी पूर्णवेळ राजकीय काम करायचे ठरवले. आणि दुर्दैवाने त्याच वेळी समाजवादी पक्ष दुभंगला. त्याची प्रजासमाजवादी पक्ष आणि संयुक्त समाजवादी पक्ष अशी दोन शकले झाली. हे बनारसच्या अधिवेशनात घडले. धोरणाविषयीच्या मतभेदातून हे घडले होते. प्रधानांचे जवळचे मित्र नाथ पै, मधु दंडवते, दत्ता ताम्हाणे यांचे आणि प्रधानांचे स्वभाव जुळणारे होते. तेव्हा त्यांनी या सर्वाबरोबर प्रजासमाजवादी पक्षात जाण्याचा निर्णय घेतला. भाई वैद्य मात्र अलग झाले.

### ३.३.८ पदवीधर मतदार संघाची निवडणूक :-

१९६६ मध्ये विधानपरिषदेची पदवीधर मतदारसंघाची निवडणुक जाहीर झाली, तेव्हा प्रधानांचे ज्येष्ठ स्नेही, ज्यांनी स्वातंत्र्य चळवळीत कारावास भोगला होता. असे दत्तू काका साठे यांच्याकडे आणि नानासाहेब गोरे निवडणुकीत आपल्याला पाठिंबा देतील का? याची चाचपणी करायला त्यांना घेऊन नानासाहेबांकडे गेले. तेव्हा गोरे यांनी हा निर्णय पक्षात घेतला जाईल असे सांगून त्यांची बोळवण केली.

नंतर ते प्रधानांना म्हणाले, कालचं महाराष्ट्र कार्यकारिणीच्या बैठकीत आम्ही निर्णय घेतला आहे आणि तुला उभे करण्याचे ठरले आहे. हे ऐकून प्रधान चकीत झाले. नानासाहेब हसून म्हणाले, आम्ही तुमचे लग्न करायला निघालो आणि तुम्ही दुसऱ्याची पान-सुपारी वाटायला निघालात, हे चालणार नाही. तुला निवडणूक ही लढवावीच लागेल. वीस वर्षे तू कॉलेजात अध्यापन केले आहेस, तुझे विद्यार्थी तुला निश्चिंत पाठिंबा देतील. या मतदारसंघात पश्चिम महाराष्ट्रातील बारा आणि मराठवाडयातील पाच जिल्हे होते. प्रधान घरी आला तेव्हा दुसरे स्नेही लालजी कुलकर्णी येऊन बसले होते. त्यांना हा निर्णय दुपारीच समजला होता. आपण हिम्मतीने लढून निवडणूक जिंकायचीच! असा निर्धार त्यांनी केला. प्रधानांचे महाराष्ट्रभर पसरलेले विद्यार्थी, पुणे विद्यापीठात प्राध्यापक प्रतिनिधी म्हणून काम केल्यामुळे मित्र झालेले

प्राध्यापक अशी आणि प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते आदींच्या सहकार्याने ते पदवीधर मतदारसंघातून निवडून आले. मात्र निवडणुकीसाठी प्रॉव्हिडंट फंड संपला आणि पत्नीचे दोन दागिनेही मोडावे लागले.[१८]

### ३.३.९ विधानपरिषदेत प्रवेश :-

प्रधान मास्तरांनी सर्ववेळ राजकीय कार्यकर्ता म्हणून १९६५ ते १९८५ असे वीस वर्षे काम केले. यापैकी १९६६ ते १९८४ अशी अठरा वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेत ते आमदार होते.

स्वतंत्र भारताच्या घटना समितीने संसदीय लोकशाही ही राज्यपद्धती स्वीकारली याचा प्रधान सरांना फार आनंद वाटला. परंतु त्यावेळी आणि पुढे १९६५ साली त्यांनी नोकरी सोडून प्रजासमाजवादी पक्षाचे सर्ववेळ कार्यकर्ता झाले. तेव्हाही त्यांना निवडणूक लढवू वा निवडून येऊ, असे कधीही वाटले नव्हते. १९६६ साली विधानपरिषदेत पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली.[१९]

पदवीधर मतदार संघाची निवडणूक जिंकली. प्रधान सरांचे स्नेही दत्ता ताम्हाणे यांनी १९५७ ते १९६२ अशी पाच वर्षे विधानसभेचे सदस्य म्हणून वैशिष्टयपूर्ण काम केले होते. त्यावेळी ते प्रजासमाजवादी पक्षाचे प्रांतिक चिटणीस होते. त्यांनी प्रधानांना लागलीच मुंबईला बोलावून घेतले. त्यांच्याबरोबर प्रधानलसर विधानभवनात गेले. त्यांनी तेथेच विधानपरिषद कार्यपद्धतीच्या नियमांचे पुस्तक माझ्या हातात ठेवले आणि म्हणाले, प्रधान हे नीट वाच, मी त्यांना म्हणालो, मला तुमचं सतत मार्गदर्शन लागेल.ते म्हणाले, मी तुम्हांला काही गोष्टी सांगेनच. विधानसभेत आपले डॉ.मंडलिक आहेतच. विधान परिषदेत माधव लिमये आहेत. त्यांचा तुम्हांला दैनंदिन कामात सल्ला मिळेल. पण याहीपेक्षा पहिल्या अधिवेशनात सर्व कामकाज काळजीपूर्वक पाहिलेत, की काय करायचं ते तुम्हाला समजू लागेल.

प्रधान सरांचा विधानपरिषदेत शपथविधी झाला. आमदार म्हणून त्यांनी कामकाजास सुरूवात केली. ग.प्र. प्रधान अनपेक्षितपणे या क्षेत्रात आले. नंतर पुन्हा दोन वेळा १९७२ व १९७८ साली निवडून आले. आणि एकूण १८ वर्षे म्हणजे दीड तप त्यांना या कार्यक्षेत्रात काम करण्याची संधी लाभली.[२०]

### ३.३.१० ग.प्र.प्रधान यांच्या विधानपरिषदेत प्रवेशानंतर विविध विषयावर केलेले ठराव व विचार

### १) जिल्हा परिषदा, नगरपालिकांच्या इत्यादींच्या निवडणुकासंबंधात राज्य निवडणूक आयोग निर्माण करण्याच्या दृष्टीने कायदा तयार करण्याबाबतचा श्री.ग.प्र.प्रधान यांचा ठराव :-

ग.प्र.प्रधान या ठरावात म्हणाले होते की, महाराष्ट्र राज्याने विकेंद्रित लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका यांच्या निवडणुका सतत चालू राहणे अपरिहार्य आहे. या निवडणुका अधिक कार्यक्षमतेने आणि निर्मळपणे व्हाव्यात, सहेतूक अथवा अहेतूकपणे कायद्याच्या तरतुदींचा भंग होऊ नये, निर्वाचन अधिकारी व निवडणुकीतील कर्मचारी यांना पुरेशी माहिती व शिक्षण दिले जावे आणि मतदारसंघाच्या सीमा ठरवण्यापासून ते मत मोजणीपर्यंत शासनाच्या विविध पातळीवर कोठेही वशिलेबाजी अथवा भ्रष्टाचार होऊ शकणार नाही, अशी भावना जनतेमध्ये निर्माण व्हावी, यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या धर्तीवर राज्य निवडणूक आयोग निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने एखादा कायदा शक्य तो लवकर तयार करावा, अशी या सभागृहाची शिफारस आहे.[२१]

### २) कुटुंब नियोजनाचे धोरण व कार्यक्रम यासंबंधीचा प्रस्ताव :-

कुटुंब नियोजानाच्या कार्यक्रमावर सर्व पुरोगामी विचारांच्या लोकांचे एकमत असले तरी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जो प्रचार केला जातो, त्यासंबधी ग.प्र.प्रधान यांनी जे मत मांडले त्यात हा सर्व प्रचार शास्त्रीय दृष्टिकोनातून करावयास पाहजे आणि तो एका विशिष्ट पातळीवर असला पाहिजे. परंतु हा प्रचार करताना आवश्यक तो संयम पाळला जात नाही. अलीकडे या विषयाची जाहीररीतीने चर्चा केली जाते. त्यामुळे खेडयामध्ये ज्या तऱ्हेची पोस्टर्स लावली जातात किंवा वर्तमानपत्रात जे छापून येते, त्यामुळे स्त्रियांच्या भावना दुखावल्या जातात. या सर्व प्रचारात एक प्रकारची सद्‌भिरूची राखली गेली पाहिजे. त्या वर्तमानपत्रात लूप बसवून घेण्याच्या कामी सर्व स्त्रियांमध्ये मोठा उत्साह पसरला आहे, असे प्रसिद्ध करीत असताना जे एक छायाचित्र देण्यात आले होते. त्यात शाळकरी मुली उभ्या होत्या. हे आक्षेपार्ह आहे. या विषयाच्या बाबतीत आपल्या समाजाने नटी विचार करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी असे संकेत बदलले पाहिजेत. परंतु ज्या लोकांना बिभत्स विषयाखेरीज दुसऱ्या विषयावर बोलताच येत नाही, त्याच्या हातात आपण कोलीत देता उपयोगी नाही. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट

चांगले आहे. यात शंका नाही परंतु त्याला हानिकारक होईल, असा प्रचार होता कामा नये. तेव्हा याचा प्रचार संयमाने केला पाहिजे.[२२]

### ३)ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी बिलाबाबत ग.प्र.प्रधान यांनी मांडलेले विचार :–

सरकारने ॲग्रिकल्चरल बिल विधानपरिषदेत पास केले, त्यावेळी ग.प्र.प्रधान यांनी त्याबाबत जे विचार मांडलेले आहेत त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. ग.प्र.प्रधान म्हणतात की, आतापर्यंत विद्यांपीठावर जे आक्षेप घेण्यात येत असत, त्यामध्ये ज्ञान आणि कार्य यांची फारकत होते हा मोठा आक्षेप असे. परंतु कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचा मनोदय सरकारने व्यक्त केला आहे. त्यासाठी जे विधेयक विधानपरिषदेत मांडले आहे, त्यामध्ये लोकांच्या जीवनाचे प्रश्न आणि या क्षेत्रात दिले जाणारे ज्ञान यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आणि म्हणून या विधेयकाचे ग.प्र.प्रधान यांनी स्वागत केले आहे. परंतु या बिलातील तत्त्वासंबंधी काही मुद्याचा उहापोह ग.प्र.प्रधान यांनी घेतला होता. त्याची माहिती पुढीलप्रमाणे– या विधेयकाचा मसुदा तयार करण्यापूर्वी सरकारने जी एक मूलभूत विचार करण्यासाठी सल्लागार समिती नेमली होती व त्या समितीने ज्या गोष्टी मानल्या आहेत. हे विद्यापीठ स्वायत्त असेल तर सल्लागार समितीने म्हटले आहे. ते सत्तेपासून आणि शासनाच्या नियंत्रणापासून मुक्त असेल असेही सल्लागार समितीच्या अहवालात म्हटले आहे. या विषयाच्या तज्ज्ञांचे असे मत आहे की, विकसनशीळा राष्ट्रात अशी विद्यापीठे स्वायत्त राहतील. आणि शासनाच्या नियंत्रणापासून दूर राहतील या गोष्टीची काळजी घेणे अत्यावश्यक असते. ही विकसनशील राष्ट्रे आपल्यासमोर काही उद्दिष्टे ठेवतात. तेव्हा त्याला पूरक अशी शिक्षण पद्धती असली पाहिजे. त्याचप्रमाणे या उद्दिष्टांचे चिकित्सक दृष्टीने मूल्यमापन करणे हे सुद्धा आपले काम आहे. तेव्हा हे क्रिटिकल ॲपरेटस निर्माण व्हावे म्हणून विद्यापीठ स्वायत्त असले पाहिजे. परंतु या विधेयकाची जी मराठी प्रत आहे. त्यातील चार क्रमांकाच्या पानावर म्हटले आहे की, या अधिनियमान्वये आपल्या शक्तीचा वापर करताना व आपली कामे पार पाडताना विद्यापीठाच्या क्षेत्राधिकारात येणाऱ्या बाबीसंबधीच्या धोरणाबाबतच्या प्रश्नावर राज्य शासन वेळोवेळी देईल अशा निदेशाचे विद्यापीठ पालन करील. त्याचप्रमाणे पुढे म्हटले आहे की, एखादा प्रश्न धोरणविषयक आहे किंवा कसे यासंबंधी कोणतीही शंका किंवा विवाद असेल तर राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल. तेव्हा शासन अंतिम निर्णय देईल अशी तरतूद केल्यामुळे

विद्यापीठ हे राज्य शासनाची बटिक म्हणून वागेल. या विद्यापीठातून ज्ञान प्रसृत व्हावे, तेथे काही तरी संशोधन व्हावे आणि तेथे विद्वानांना काही तरी कार्य व्हावे अशी आपली इच्छा आहे. परंतु विद्यापीठ ही शासनाची बटीक झाल्यानंतर या आपल्या विषयावर अधिक होऊ शकणार नाहीत. या मुद्यासंबंधी कितीही विवेचन केले तरी ते अपुरे ठरेल. तेव्हा या विषयावर त्यांनी सांगितले की, सरकारची या बाबतीतील भूमिका ही आपण विश्वस्त आहोत अशी असली पाहिजे. ते म्हणाले की, इंग्रजीमध्ये म्हण आहे की, 'He who pays the piper calls the tune.' परंतु ही म्हण शिक्षण क्षेत्राला लागू करता उपयोगी नाही. यासाठी सरकारने जो पैसा गोळा केलेला असतो. तेव्हा तो पैसा ज्ञान क्षेत्राकडे सुपूर्द करावयाचा आणि त्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अधिकारी मंडळी जी असतील त्यांना तो खर्च करण्यासाठी पूर्ण स्वायत्तत्ता द्यावयाची व त्यांना जरूर लागेल तेथे साहाय्य मात्र करावयाचे, अशी शासनाची भूमिका असली पाहिजे. ही विश्वस्तांची भूमिका हे सरकार पार पाडील अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु ती पूर्ण झालेली नाही एवढेच त्यांनी या ठरावावर चर्चा करताना म्हटले होते.[२३]

**४) पुणे विभागातील जनतेचा न्यायालयीन कामकाजावरील बेसुमार खर्च वाचविण्यासाठी आणि त्यांना होत असलेला त्रास कमी करण्यासाठी पुणे विभागात उच्च न्यायालयाचे ब्रँच स्थापन करण्यासंबंधीचा श्री.ग.प्र.प्रधान यांचा ठराव :-**

ग.प्र.प्रधान यांनी मांडलेला ठराव पुढीलप्रमाणे होता. पुणे विभागातील जनतेचा न्यायालयीन कामकाजावरील बेसुमार खर्च वाचविण्याच्या व त्यांना होत असलेला त्रास कमी करण्याच्या दृष्टीने पुणे विभागात उद्‌भवणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत अधिकारक्षेत्र आणि अधिकार असणारे मुंबईच्या उच्च न्यायालयाचे एक कायम बेंच पुणे येथे स्थापन करण्यासंबंधात भारताच्या राष्ट्रपतींना विनंती करण्यात यावी, अशी या विधानपरिषदेची शासनाला शिफारस आहे.[२४]

**५) सब्सिडाईज्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स सेंटरचा विचार करण्यासाठी अभ्यास गट नेमण्याबाबत ग.प्र.प्रधान यांचे विचार :-**

ग.प्र.प्रधान यांनी याबाबत मांडलेले विचार, महाराष्ट्र शासनाने अमलांत आणलेल्या 'सबसिडाइज्ड मेडिकल प्ररूक्टिशनर्स सेंटर' योजनेचा बदलेलेल्या परिस्थितीच्या संदर्भात फेरविचार करण्यासाठी व या सेंटरवर नेमण्यात आलेल्या डॉक्टर्सचे कमाचे प्रमाण ठरवून त्या

मानाने त्यांना देण्यात येणारे मानधन (ऑनरॅनियम) यात योग्य तो बदल करण्याच्या दृष्टीने एक अभ्यासगट नेमण्यात यावा, अशी या सभागृहाची शासनाला शिफारस आहे.[२५]

**६) सन १९६९–७० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करतेवेळीचे ग.प्र.प्रधान यांचे विचार :–**

सन १९६९–७० च्या अर्थसंकल्पाकडे पाहत असताना राज्याची एकंदर परिस्थिती काय आहे, याची कल्पना केली तर निराशाजनक चित्र दिसून येते. या अर्थसंकल्पाच्या आशयांबंधी बोलण्यापूर्वी त्यांनी सांगितले की, काही अर्थशास्त्रज्ञांनी असे मत मांडले आहे. की, अर्थसंकल्प मांडण्यात येतो. त्यावरून राज्याच्या परिस्थितीची नेमकी कल्पना येते. लोकांच्यावर व कारभारावर किती खर्च केला जातो, यादृष्टीने त्यामध्ये इकॉनॉमिक क्लासिफिकेशन असले पाहिजे. एकूण जे आकडे दिले जाता आणि नॉन डेव्हलपमेंट किती आहे याचे चित्र त्यांना मिळाले पाहिजे. तशी मांडणी संकल्पाची केली नसेल तर दिशाभूल होण्याची शक्यता आहे. या राज्यात कॅपिटल फॉर्मस किती झाले आहे, कॅपिटल ट्रान्सफर्स किती झाल्या आहेत, याची कल्पना यावरून येऊ शकत नाही. चौथ्या पंचवार्षिक योजनेचे हे पहिले वर्ष असल्यामुळे स्वाभाविकपणे या वर्षीच्या अर्थसंकल्पात अनेकांच्या मनात अपेक्षा होत्या. चौथी योजना साडेनऊशे कोटी रूपयांची आहे. यामध्ये पहिल्या वर्षी ११४ कोटी रूपयांचा खर्च दाखविला आहे. या चर्चेच्या वेळी ग.प्र.प्रधान यांनी असे मत व्यक्त केले होते की, आपल्या देशात नियोजनाला मिळणारी ही केवळ शेवटचीच संधी आहे. यामध्ये आपण अपयशी ठरलो तर या देशाची आज जी पत कमी झाली आहे, ती आणखी कमी होण्याची शक्यता आहे. जे मोठे भांडवलदार आहेत त्यांची मगरमिठी या देशाच्या आर्थिक व्यवस्थेत आणखी घट्ट होणार आहे.[२६]

**७) दुकाने व संस्थाविषयक सुधारणा विधेयकाबाबत ग.प्र.प्रधान यांचे मत :–**

ग.प्र.प्रधान यांनी विधानपरिषदेत झालेल्या या विधेयकाचे स्वागत केले होते. या विधेयकाचा उद्देश व कारणांच्या निवेदनात असे सांगण्यात आले आहे की, या अधिनियमाच्या अमंलबजावणीचे काम स्थानिक प्राधिकरणाकडून शासनाने निर्णय घेतला आहे. हॉटेलमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या संदर्भात या मुलांना नियमांची कुठेच होत नाही. साधे माणुसकीचे अधिकार या हॉटेलात काम करणाऱ्या मुलांना मिळत नाहीत. अल्पवयीन व्यक्तीची व्याख्या १२ वर्षावरून

१५ वर्ष करण्यात आलेली आहे. ही गोष्ट निश्चितच चांगली आहे. हॉटेलमधील मुले ही १३-१४ वर्षांची असून, त्यांच्याकडून मोठया प्रमाणात काम करून घेतले जाते. त्यामुळे या विधेयकात ज्या तरतुदी दिलेल्या आहेत त्या तरतुदींची अमलबजावणी व्हावी. या तरतुदी केवळ कागदावर राहता कामा नयेत. या विधेयकाच्या खंड ११ मध्ये नाटयगृहातील कर्मचाऱ्यांचा कामाचा कालावधी आठवडयाचा ४८ तास ठेवण्यात आलेला आहे. खंड१२ मध्ये दूरध्वनी यंत्रचालक आणि स्वागतकार यासारख्या महिला कर्मचाऱ्यापैकी काहींच्या काम बंद करण्याच्या वेळा वाढविण्यात आल्या आहेत. या वेळा रात्री ७.०० वाजता ऐवजी रात्री ८.३० वाजेपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.[२७]

**८) नवा आकृतिबंध अमलात आल्यानंतर विद्यापीठाकडून एक्स्टर्नल पदवी घेण्याची सोय उपलब्ध नसण्यासंबंधी श्री.ग.प्र.प्रधान यांचा अशासकीय ठराव :-**

हा ठराव मांडताना ग.प्र.प्रधान म्हणतात की, महाराष्ट्रातील चार विद्यापीठातून कला व वाणिज्य शाखांमध्ये एक्स्टर्नल पदवी घेण्याची सोय उपलब्ध होती. ती १० अधिक २ अधिक ३ हा नवा आकृतिबंध अंमलात आल्यावर रद्द झाली. त्यामुळे मागास समाजातील व गरीब विद्यार्थ्यांचा आणि विशेषतः विद्यार्थिनींचा उच्च शिक्षण खाजगीरित्या घेण्याचा मार्गच बंद झाला आहे. या परिस्थितीत बदल करून दहावी इयत्ता पास झालेल्या आणि कला, वाणिज्य शाखात एक्स्टर्नल पदवी घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना पूर्ववत संधी उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता पुढील सदस्यांची एक समिती नेमण्यात यावी. या समितीने आपला अहवाल सहा महिन्यात शासनाला प्रस्तुत करावा, अशी विधानपरिषदेची शासनाला शिफारस आहे. या समितीत १) शिक्षण मंत्री(समिती प्रमुख), २) शिक्षण राज्यमंत्री, ३) श्री.राम मेघे(वि.प.स.), ४) श्री.ना.ज्ञा.पाटील(वि.प.स.), ५)श्री.दि.कि.देशमुख (वि.प.स.), ६)श्री.द.ब.सुळे (वि.प. स.) इत्यादींचा समावेश करण्यात आलेला होता. पुढे या ठरावावर या समितीने विचारविनिमय केला होता.[२८]

**९) विद्यापीठे (दुसरी सुधारणा) विधेयकावर ग.प्र.प्रधान यांची प्रतिक्रिया :-**

४ ऑगस्ट १९७७ रोजी विधानपरिषदेत जे विद्यापीठ विधेयक सादर करण्यात आले होते. त्यावर ग.प्र.प्रधान यांनी आपली प्रतिक्रिया संमिश्र प्रतिक्रिया मांडलेली होती. आपल्या राज्यामध्ये जी महाविद्यालये आहेत व त्या महाविद्यालयाच्या ज्या संस्था आहेत, त्यापैकी काही

संस्थात गैरप्रकार झाले. अध्यापकावर अन्याय झाले आहेत. अन्याय झाला असेल तर त्यांनी दाद कोणाकडे मागावयाची? म्हणून त्या विद्यापीठांनी ग्रिव्हेन्सेस कमिटया निर्माण केल्या होत्या. या ग्रिव्हेन्सस कमिटया अस्तित्वात आल्यानंतर त्यांनी त्या लोकांचे म्हणणे ऐकून घेऊन नंतर त्याबाबत निश्चित स्वरूपाचे निर्णय दिले. त्याचप्रमाणे त्या संस्थांच्या बाबतीत जे आक्षेप वगैरे असतील त्याबाबत चॅरिटी कमिशनरसारख्या ॲथॉरिटीजकडून चौकशी करण्यात आली. त्यांनी याबाबतीत काही आपल्या सूचनाही शासनाला केल्या. परंतु प्रत्यक्षात त्या संस्थाचालकांना विद्यापीठांनी दिलेले निर्णय कार्यवाहीत आणावयाला भाग पाडावे, अशी आपल्याजवळ नव्हती. ती यंत्रणा नसल्यामुळे विद्यापीठांनी घेतलेले निर्णय केवळ कागदावरच राहिले होते. शासनाने याबाबत जर कठोर भूमिका घेतली असती, तर ज्या महाविद्यालयाची प्रकरणे गाजली ती गाजली नसती. त्यात जे गैरप्रकार झाले ते झाले नसते. हे गैरप्रकार झाले म्हणून या संस्था ताब्यात घेण्याचा सरकारला जो हक्क आहे तो हक्क सरकारने जर व्यापला असता तर हे अन्याय दूर झाले असते.[२९]

**१०) महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षण मोफत करण्याची आवश्यकता याबद्दलचे ग.प्र.प्रधान यांचे विचार :–**

माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात आज ज्या सवलती देत आहोत आणि त्या सवलती राबविण्यासाठी जी एकूण यंत्रणा आहे तिचा विचार केला, तर त्याचे सर्वांसाठी येणारा एकूण खर्च आणि राज्यातील सर्व मुलांना मोफत माध्यमिक शिक्षण दिले तर शासनाला करावा लागणारा खर्च, याचा विचार केला, तर शासनाचा यावर होणारा खर्चहा कमीच होणार आहे, असे माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले. माध्यमिक शिक्षण मोफत जी सवलत आपण देतो त्यासाठी शासन ८ कोटी ८० लक्ष रूपये खर्च करते आणि ही सवलत राबविण्यासाठी जी शासकीय यंत्रणा आहे त्या यंत्रणेवर आणि शाळेतील दोन शिक्षक त्यासाठी लागतात शिवाय लिपिक लागतो. त्यावर एकूण तीन कोटी रूपये शासनाचे खर्च होतात. म्हणजे यासाठी एकूण ११ कोटी रुपये शासनाचे खर्च होतात. ज्यावेळी विद्यार्थ्यांना मोफत माध्यमिक शिक्षण देण्यासाठी शासनाला ११ कोटी रूपये खर्च येणार आहे. तेव्हा या आकडेवारीवरून असे दिसून येते की, विद्यार्थ्याला मोफत शिक्षण केले, तर यात शासनाचा तोटा होणार नाही. त्यामुळे राज्यातील माध्यमिक शिक्षण मोफत केले जावे.[३०]

**११) शिक्षणाचा दर्जा वाढावा व शिक्षणक्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी स्वायत्त मंडळ नेमण्याबाबत श्री.ग.प्र.प्रधान यांचा ठराव :–**

श्री.ग.प्र.प्रधान यांनी जो ठराव मांडला होता त्याचा आशय पुढीलप्रमाणे होता. शिक्षणाचा दर्जा वाढावा आणि शिक्षण क्षेत्रात सध्या चालू असलेल्या गैरप्रकारांना आळा बसावा यादृष्टीने प्राथमिक, माध्यमिक व उच्च अशा तिन्ही स्तरांसाठी कायद्याद्वारे स्वायत्त मंडळे स्थापन करून त्यांच्याकडे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन व विकास ही कामे सुपूर्द करण्याच्या दृष्टीने आवश्यक तो उपाययोजना करावी, अशी या सभागृहाची शासनाला विनंती आहे.[३१]

वरील विषयाशिवाय विधानपरिषदेत ग.प्र.प्रधान यांनी अंदाजपत्रकावर सर्वसाधारण चर्चा, खाजगी शाळांचे कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन विधेयक, निवृत्त सदस्यांना निरोप, १ नोव्हेंबर १९७७ पूर्वी प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाला आग्रह, खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा, पब्लिक लायब्ररियन बिल, अमेरिकन अंतराळवीरांचे चंद्रविजयाबद्दल अभिनंदन इत्यादी ठरावावर चर्चा करण्यासाठी सहभाग घेतला होता.

**३.३.११ एक अभ्यासू वक्ता :–**

अभ्यास केल्याखेरीज वा भाषणाची टिपणे तयार केल्याखेरीज प्रधान विधानपरिषदेत कधीच भाषण करत नसत. शिक्षण हा जरी त्यांच्या विशेष आवडीचा व अभ्यासाचा विषय असला तरी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील प्रश्नांवर प्रधान अभ्यासपूर्ण भाषणे देत, ती मी ऐकलेली आहेत असे दत्ता ताम्हाणे म्हणतात. त्यासाठी त्यांनी खूपच परिश्रम केलेले आहेत. विधानपरिषदेचे अधिवेशन संपले की लागलीच ते दौऱ्यावर निघत. अधिवेशनात कायकाय झाले ते जनतेपर्यंत विशेष आपल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविणे हा या दौऱ्याचा मुख्य हेतू असे. याच दौऱ्यांमध्ये ते आगामी अधिवेशनात मांडावयाच्या प्रश्नांची तयारी करीत. प्रश्नांची सांगोपांग माहिती असल्याखेरीज ते सहसा तोंड उघडीत नसत. अठरा वर्षांच्या काळात उभा महाराष्ट्र त्यांनी पायदळी घातला. विदर्भ, मराठवाडयापासून तळकोकणापर्यंत एकही जिल्हा असा नसेल की जेथे प्रधानसर गेलेले नाहीत. त्यांच्या मतदारसंघाच्या सतरा जिल्हयात तर ते प्रत्येक तालुक्यापर्यंत व गावोगावी जाऊन आलेले आहेत. आंदोलनातून मिळालेली माहिती ही पुढील अधिवेशनासाठी शिदोरी असे.[३२]

ग.प्र. प्रधान हे विधानपरिषदेत एक अभ्यासू आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून गाजले. त्यांनी महाराष्ट्रात सतत कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. शिक्षणाचे व शिक्षकांचे प्रश्न विधानपरिषदेत मांडले व सरकारचे लक्ष वेधले. १९६८ मध्ये ग्रंथालय परिषदेने त्यांना अध्यक्ष म्हणून सन्मानित केले.

संसदपटू व समाजवादी पक्षाचे जबाबदार खासदार एच.व्ही.कामत हेही काही कारणास्तव मुंबईला आले होते. ग.प्र. प्रधान त्यांना जाऊन भेटले. त्यांना मार्गदर्शन करताना कामत म्हणाले, विधिमंडळात काम करताना तू तीन शब्द लक्षात ठेव.To expose, To oppose and to dispose विरोधी पक्षांच्या आमदारांनी सरकारला एक्पोज केले पाहिजे. त्यांच्या भानगडी, चुका उघडकीला आणल्या पाहिजेत. नंतर त्यांनी सरकारच्या प्रतिगामी धोरणांना ऑपोज केले पाहिजे आणि हे करताना बाहेर जनआंदोलनामध्ये काम करत तुम्ही लोकांना आपल्या पक्षाची भूमिका समजून दिली पाहिजे. हे काम जर तुम्ही नेटाने आणि सातत्याने केले, तर सत्ताधारी पक्ष डिपोझ करू शकाल. निवडणुकीत त्यांना पराभूत करून सत्ता मिळवू शकाल. कामतांचा हा उपदेश ते कधीच विसरले नाहीत.

दत्ता ताम्हाणेंनी त्यांना सांगितले की, तुमचे भाषण अभ्यासपूर्ण व्हायला हवे. प्रा.प्रधानांनी पहिले दोन आठवडे कामाचे फक्त निरीक्षण केले. तिसऱ्या आठवडयात सीमा प्रश्नावरील चर्चेत त्यांनी प्रथम आपले विचार मांडले. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांत त्यावर अनुकूल अभिप्राय छापून आला तेव्हा ते खूष झाले.

पहिले अधिवेशन संपवून पुण्याला आल्यावर ते बापूसाहेब गुप्ते यांना जाऊन भेटले. गुप्ते हे १९३७ सालच्या मुंबई मंत्रिमंडळात मंत्री होते. घटना समितीचे सदस्यही होते. त्यांनी प्रधानांना संसदीय कार्याबद्दल बऱ्याच सूचना केल्या. प्रत्येक आमदाराने ज्युरी स्पूडनचा अभ्यास केला पाहिजे, असे सांगितले आणि त्या संबंधीचे पुस्तक देऊन एखादया चांगल्या वकिलाच्या मदतीने ते वाचायला सांगितले. तेव्हा ग.प्र. प्रधान हे सुप्रसिद्ध कायदेतज्ज्ञ आण्णासाहेब तारकुंडे यांना भेटले. तारकुंडे म्हणाले, तुम्हांला गुप्ते यांनी योग्य सल्ला दिला. Jurisprudence in the age of low तुम्ही आमदार लोक कायदे करता, ते जनहिताचे व्हावे म्हणून तुम्हांला Jurisprudence हा विषय समजायला हवा. त्यांनी जवळजवळ आठ

दिवस घालवून तो विषय प्रधानांना सांगितला. त्यामुळे कायदा आणि सामाजिक न्याय या संबंधी त्याची जाणीव प्रधानांना पक्की झाली.[३३]

### ३.३.१२ प्रत्यक्ष विधानपरिषदेत कामकाजास सुरूवात :–

सामान्य लोकांवर होणारा अन्याय लोकप्रतिनिधी या न्यायाने दूर करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यात सावकारांनी अनेक आदिवासींच्या जमिनी बळकावल्या होत्या. दत्ता ताम्हाणे आणि प्रधानसरांनी तेथे जाऊन त्या आदिवासींच्या जमिनीत नांगर घालायला सांगितले. त्या दोघांना अटक करण्यात आली आणि नंतर सोडून देण्यात आले. त्यावेळेस महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांनी त्या दोघांना आपल्या चेंबरमध्ये बोलावून घेतले. तेव्हा त्या दोघांनी बाळासाहेबांच्या लक्षात आणून दिले की, कायदयाप्रमाणे आदिवासींच्या जमिनी कोणालाही बळकावता येत नाहीत. त्यांनी या प्रश्नांची माहिती व पुरावे आणायला सांगितले. त्यासाठी विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक केली आणि ऐंशी टक्के आदिवासींच्या जमिनी त्यांना परत मिळाल्या. सत्याग्रहाचा वापर अशा वेगळया कारणासाठी झाला.[३४]

### ३.३.१३ आरोग्य सेविकेच्या खुनाचे प्रकरण :–

ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यात कडूस या गावी कमल वैद्य या आरोग्यसेविकेचा खून झाला. प्रधानांनी लक्षवेधी सूचनेद्वारे ते प्रकरण विधानपरिषदेत पुढे आणले. वृत्तपत्रातून या प्रकरणाला बरीच प्रसिद्धी दिली गेली. महिला मंडळाच्या काही कार्यकर्त्यांना घेऊन ग.प्र. प्रधान प्रत्यक्ष त्या गावी गेले. नंतर त्यांनी महिलांच्या शिष्टमंडळाची गृहराज्यमंत्री कल्याणराव पाटील यांच्याशी भेट घालून दिली. या गुन्हयाचा तपास करण्यासाठी खास अधिकारी नेमला. कालांतराने अंगळया नावाच्या आदिवासी गुन्हेगाराला पकडण्यात आले. त्याला जन्मठेपेची शिक्षाही झाली. पण प्रधानसरांचे तेवढयाने समाधान झाले नाही. ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना, ग्रामसेविकांना संरक्षण मिळावे, यासाठी योजना असावी आणि त्यासाठी कमिटी नेमावी असा अशासकीय ठराव त्यांनी मांडला. समिती नेमल्यानंतर तिच्यापुढे ठिकठिकाणच्या महिला मंडळांनी साक्ष दयावी म्हणून जातीने प्रयत्न केले. अशा महिला संघटनांच्या निवेदनामुळे शासकीय समितीने अहवाल तयार करून शासनाला सादर केला. लोकशाहीप्रक्रियेत महिला संघटनांना सहभागी करून घेण्याचे त्यांचे थोडे–फार प्रयत्न यशस्वी

झाले. ज्या महिलांना काम संपल्यावर तालुक्याच्या गावी परत जाणे शक्य नसेल, तेथे राहण्याची सोय करणे, तालुका गावी शासकीय महिलांसाठी निवासव्यवस्था करणे, काही ठिकाणी त्यांना पोलीस संरक्षण देणे अशा समितीच्या शिफारशींची काही प्रमाणात अंमलबजावणी झाली.

विरोधी पक्षात शे.का.प., समाजवादी, कम्युनिस्ट, रिपब्लिकन, जनसंघ अशा अनेक पक्षांचे सदस्य होते. त्यांच्या राजकीय भूमिका स्वतंत्र होत्या. पण तरीही ते एकमेकांच्या सहकार्याने काम करत असत. अपक्ष सदस्यांनाही आपल्याबरोबर घेत असत. शिक्षक प्रतिनिधी आणि पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेले आमदार शिक्षणविषयक प्रश्नांवर एकजुटीने काम करता आल्यामुळे प्रधानसरांना शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडता आले.

स्वातंत्र्य संग्रामात काम केलेले, तुरूंगात मैत्री झालेले अनेकजण विधानपरिषदेत होते. समाजवादी सदस्य म्हणून प्रधानांनी काँग्रेसवर सतत टीका केली असली तरी, त्यांच्यामध्ये कटुता आली नाही. काँग्रेसमधील काकासाहेब गाडगीळ, बापूसाहेब गुप्ते या नेत्यांचा त्यांच्यावर लोभ होता. यशवंतराव चव्हाण, वसंतराव पाटील यांच्याशीही त्यांची मैत्री होती. बाळासाहेब भारदे, नरूभाई लिमये, वि.स.पागे या त्यांच्यापेक्षा वडिलधाऱ्या लोकांशीही स्नेह होता. भाजपाचे उत्तमराव पाटील आणि रामभाऊ म्हाळंगी, शिवसेनेचे मनोहर जोशी आणि प्रमोद नवलकर, शे.का.प. चे उध्दवराव पाटील व कृष्णराव धुळप यांच्याबरोबर समाजवादी आमदारांच्या चर्चा व बैठकी होत असत.[३५]

### ३.३.१४ धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न :–

प्रधानसरांनी विधान परिषदेची दुसरे पर्व म्हणजे १९७२ ची पुन्हा निवडणूक जिंकली. आता त्यांना काम करण्यात कोणतीच अडचण नव्हती. कारण त्यांच्या अंगी असलेल्या अनेक गुणांचा त्यांना या काळात फायदा झाला. त्यांनी समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली. ते फक्त स्वतः प्रश्न घेत नसत, तर मित्रांनी कार्यकर्त्यांनी आणलेले प्रश्नही विधानपरिषदेत मांडत असत.

राजकीय जीवनातील प्रत्यक्ष चळवळ करणारे राजकीय पक्ष आणि अन्य क्रियाशील कार्यकर्ते हे लोकशाही लोकहितार्थ राबविण्यासाठी महत्त्वाचे कार्य करत असतात. आणि लोकप्रतिनिधी विधीमंडळात त्यांचे प्रतिनिधित्व करत असतात. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी

कायदा व्हावा असा आग्रह प्रथम दत्ता देशमुख यांनी धरला. त्यांचे म्हणणे विधिमंडळात प्रधानसरांनी आणि विरोधी पक्षांनी मांडले. पुढे मुख्यमंत्र्यांच्याबरोबरीच्या वाटाघाटीत दत्ता देशमुखच त्यांचे नेते असत. त्यांच्या कामामुळे आणि त्या प्रश्नाच्या अभ्यासामुळे ते आमदार नसले तरी या प्रश्नाबाबत प्रधानसरांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले होते. नंतर काही वर्षांनी डॉ.बाबा आढाव हे या प्रश्नासंबंधीची चळवळ करीत होते. त्याचप्रमाणे देवदासींचा प्रश्न त्यांनी ज्या रीतीने समाजापुढे आणला, त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करूनच कोणता दृष्टिकोण मांडायचा ते ग.प्र. प्रधान ठरवत असत. प्रधान मास्तरांना असे वाटत होते की दत्ता देशमुख, बाबा आढाव, मेधा पाटकर यांच्यासारख्या कार्यकर्त्यांबरोबर निकटचे संबंध ठेवण्यामुळे विधिमंडळातील लोकप्रतिनिधींच्या कामाला निश्चित दिशा येऊन ते काम चळवळीस पोषक ठरेल.[३६]

**३.३.१५ आणीबाणी :-**

एप्रिल १९७५ मध्ये पुण्यात हडपसरला समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांचे शिबिर झाले. ठाकूर, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, मधू लिमये, मधू दंडवते वगैरे नेते त्यासाठी आले होते. ग.प्र. प्रधान तर होतेच. शिबिरात तीन दिवस विविध विषयांवर चर्चा झाली आणि जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

याच दरम्यान १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर केली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, चरणसिंग, मोरारजीभाई देसाई, मधू मिलये, मोहन धारिया अशा अनेक नेत्यांना अटक झाली. भाई वैद्य आणि आमदार रामभाऊ म्हाळंगी यांना २५ जूनला अटक झाली. प्रा.प्रधान यांनी २६ तारखेला सत्याग्रह केला. आणि शिक्षा भोगली. ते सत्याग्रह आंदोलन संघटित करण्यासाठी महाराष्ट्रभर फिरले. २ ऑक्टोबरला प्रा.प्रधान शिरूभाऊ लिमये, आण्णा जोशी, बाबा आढाव वगैरेंना अटक झाली आणि येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. त्यावेळी भाई वैद्य, सदानंद वर्दे, शिरूभाऊ हे त्यांचे मित्र तिथेच होते. आता त्यांना कारावास नवीन नव्हता. त्यांना स्वतंत्र खोली मिळाली होती, त्यामुळे भरपूर लेखन-वाचन करता आले. तुरूंगात असताना त्यांनी भगवतगीता, ज्ञानेश्वरी व गीतारहस्य हे ग्रंथ मुद्दाम तौलनिकदृष्टया वाचले. भारतीय आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. भारतीय तत्त्वज्ञानापैकी गुरूदेव रानडे, तर पाश्चात्य तत्वज्ञानापैकी बर्ट्रांड रसेल हे त्यांना जास्त आवडले.[३७]

### ३.३.१६ तुरूंगात असतानाचे लेखनः–

'साता उत्तराची कहानी' या पुस्तकाचे लेखन कारावासाच्या काळात त्यांनी केले. त्यांच्या पिढीतील सात वेगवेगळया राजकीय पक्षांमध्ये आयुष्यभर काम करणाऱ्या मित्रांच्या जीवनाचे चित्रण त्यात केलेले आहे. १९३९ ते १९७५ या कालखंडातील राजकारण त्यात थाटले आहे. ते पुस्तक प्रसिद्ध झाले ८० साली. ७७ साली प्रधान कारावासातून मुक्त झाले. नंतर जनता पक्षाची स्थापना झाली. तेव्हा त्यांनी आपल्या पुस्तकात रेखाटलेला कालखंड वाढवून ७९ पर्यंतचा भाग त्यात घेतला आणि जयप्रकाशांच्या निधनाने त्याचा शेवट केला. २ ऑक्टोबर ८० रोजी मौज प्रकाशनातर्फे नानासाहेब गोरे यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन झाले.

### ३.३.१७ विधिमंडळातील विरोधी पक्षनेत्या भूमिकेतील कार्य :–

१९६६ ते १९८४ या कालखंडात प्रधान सरविधानपरिषदेचे आमदार होते. त्यापैकी १९७८ ते १९८० हा पावणेदोन वर्षांचा जनता पक्ष, आणि इंदिरा काँग्रेसमधून बाहेर पडलेले आमदार यांचे आघाडीचे सरकार आलेला काळ वगळता प्रधान सरविरोधी पक्षातील आमदार होते. या काळात काँग्रेस पक्षाला भरघोस बहुमत मिळाले होते. आणि विरोधकांमध्ये मुख्यतः शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पक्ष आणि जनसंघ यांचे सदस्य होते. या सर्व पक्षांची स्वतंत्र राजकीय भूमिका होती. काही प्रश्नांबाबत त्यांच्यामध्ये तीव्र मतभेद होते. असे असले तरी आम्ही विरोधी पक्ष एकमेकांच्या सहकार्याने काम करत असू. ते करणे आवश्यक होते. नाहीतर सत्ताधारी काँग्रेसला होणारा विरोध नाममात्र उरला असता. विधानपरिषदेत काही अपक्ष सदस्यही होते. परंतु ग.प्र. प्रधान त्यांना सतत त्यांच्या बरोबर ठेवत होते. विधान परिषदेत जे शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेले होते, ते कोणत्याही राजकीय पक्षात सामील होत नसत. मात्र, ते विरोधी पक्षात बसत. सर्व शिक्षक प्रतिनिधी आणि पदवीधर मतदार संघातून निवडून आलेले प्रधान सरांसारखे आमदार यांनी शिक्षणविषयक प्रश्नांवर सभागृहात नेहमी एकजुटीने काम केले. या त्यांच्या एकजुटीमुळे शिक्षकांचे प्रश्न ते प्रभावीपणे मांडू शकले. या एकजुटीचे मोठे श्रेय त्यांचे स्नेही नागपूरमधील आमदार बाळासाहेब सहस्त्रबुद्धे आणि पुण्यातील शिक्षक आमदार शंकरराव ओगले यांना दयावे लागेल.

विधानसभा आणि विधानपरिषद यामधील सर्व विरोधी पक्षातील सर्व आमदार एकत्र बसून चर्चा करत असत. आणि शासनावर कोणत्या रीतीने चाल करायची याची व्यूहआखणी

करत असत. कोणतेही विधेयक सभागृहात मांडले जाणार असले की, रामभाऊ म्हाळंगी, नवनीत शहा, दत्ता ताम्हाणे एकत्र बसून त्या विधेयकावर चर्चा करीत. ही त्यांची अनौपचारिक चर्चा ऐकणेही त्यांना उद्बोधक वाटत होते. विधेयकातील कोणत्या तरतुदी अन्यायकारक आहेत, कोणत्या दुरूस्त्या सुचविल्या पाहिजेत यासंबंधी त्यांचा वाद–विवाद चाले. कायदयाचा जो मसुदा तयार केलेला असे, त्यांतील दोषावर नेमके बोट ठेवणे हे आमदारांचे महत्त्वाचे काम असते. परंतु त्यावेळी ही हे काम काही अपवाद वगळता कोणी फारसे गांभीर्याने करत नसे.[३८]

### ३.३.१८ विरोधी पक्षनेतेः–

प्रधान सरांचा विधानपरिषदेतील कालखंड हा १९६६ ते १९८४ होता. त्यापैकी १९७८ ते १९८० अशी पावणेदोन वर्षे आघाडीचे सरकार होते. हा काळ वगळता, काँग्रेसची सत्ता होती. ग.प्र. प्रधान विरोधी पक्षातील आमदारच होते. १९८० ते १९८२ अशी दोन वर्षे ते विरोधी पक्ष नेते होते. त्या काळात त्यांचा संबंध अखिल भारतीय पातळीवरील नेत्यांशी आला. जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर हे त्यांचे मित्र झाले होते. त्यांना भाई डांगे यांचे साहित्यातील विचार ऐकायला संधी मिळाली. विरोधी पक्ष नेता असताना विरोधी पक्ष एकजूट रहावा असे प्रयत्न त्यांनी केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यांचे मुंबईतील निवासस्थान म्हणजे विरोधी पक्षाचे कार्यालय झाले.[३९]

### ३.३.१९ धरणग्रस्त व शिक्षकांचे प्रश्न सोडविणेसाठी प्रयत्न :–

अंमळनेर तालुक्यातील नेर नदीवर धरणग्रस्तांचे पुनर्वसन किंवा माध्यमिक शिक्षकांच्या निवृत्ती वेतन योजनेतील निवारण या बाबतीत त्यांना यश मिळाले. तर माध्यमिक शिक्षकांच्या सेवेत दोन वर्षे खंड पडले असले तरी त्यांना निवृत्ती वेतन मिळावे, या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न अयशस्वी झाले. त्या वेळी स्त्री–कर्मचाऱ्यांना बाळंतपणाची रजा मिळत नसे. त्यामुळे त्यांना सहा महिने किंवा वर्षभर घरी रहावे लागे. शाळा त्यांना पुन्हा सेवेत घेत असे, पण सेवेत खंड पडत असे. स्त्री कर्मचाऱ्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न प्रधान सरांनी केला. त्यासाठी ते शिक्षण मंत्र्यांनाही भेटले. पण शासनावर आर्थिक बोजा पडेल असे कारण सांगून त्यांची मागणी अमान्य करण्यात आली. आपले सरकार असतानाही असे घडावे याचे प्रधान सरांना दुःख झाले.

### ३.३.२० ग्रंथालय सेवकांच्या वेतनश्रेणीसाठी प्रयत्न :-

ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी मिळावी म्हणून त्यांनी केलेली धडपडही सफल झाली नाही. त्यामुळे अनेक चांगल्या ग्रंथपालांना तो व्यवसाय सोडावा लागला. त्यांना आपण न्याय मिळवून देऊ शकलो नाही, याचीही खंत त्यांना सतत वाटत असे. आपल्या देशात गरिबांची दुःखे कोणी ऐकूनही घेत नाही, मग त्यांना मदत करणे दूरच राहिले हा अनुभव असल्याने ते सर्वांची गाऱ्हाणी ऐकून घेत आणि त्यांना शक्य तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करत असत.[४०]

### ३.३.२१ दलितासाठी केलेले कार्य :-

प्रधान सरांच्या आमदरकीच्या काळातील कसोटीची वेळ म्हणजे मराठवाडा विद्यापीठ नामांतराची. पुलोद सरकारच्या काळात मराठवाडा विद्यापीठाचे नामांतरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे करावे, हा ठराव एकमताने मंजूर झाला होता पण नंतर मराठवाडयात दंगली उसळल्यामुळे त्याला स्थगिती मिळाली. काही दिवसांनी पुन्हा मागणी पुढे आली. मोर्चे, सत्याग्रह इत्यादी चळवळी झाल्या. खुद्द प्रा.प्रधानांनी औरंगाबादच्या सत्याग्रहात भाग घेऊन सात दिवसांची शिक्षा भोगली. यावेळी दलित चळवळीतील काही कार्यकर्त्यांशी त्यांची मैत्री झाली. त्यांच्या आग्रहामुळे १९८३ मध्ये प्रधानांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामकरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करावे असे अशासकीय विधेयक मांडले. त्यावेळी रामदास आठवले, अरूण कांबळे हे सत्याग्रह करून ठाणेच्या तुरूंगात गेलेले होते. त्यांची भेट घेऊन प्रधानांनी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, विधेयक फेटाळले जाईल आणि त्याचा तोटा होईल. शरद पवार आणि रा.सु.गवई यांच्याशी प्रधानांची चर्चा झाली होती. त्या दोघांनाही विधेयक परत घ्या असे सुचविले होते. पण प्रधान म्हणाले, नामांतराच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी मला विधेयक मागे न घेण्याचा आदेश दिला होता. विधेयकावर मतदान व्हावं आणि काय तो निर्णय लावावा असा प्रधान सरांचा आग्रह होता. त्यांनी दलित चळवळीतील कार्यकर्त्यांना दिलेला शब्द पाळला. पवार आणि रा.सु.गवई यांनी प्रधानांना दोष दिला. वृत्तपत्रात उलटसुलट टीका झाली. पण प्रधानांनी त्याची पर्वा केली नाही. [४१]

### ३.३.२२ लोकप्रतिनिधींबाबत ग.प्र. प्रधान यांचे विचार :–

लोकप्रतिनिधी हा समाजाने नेमलेला विश्वस्त असतो. याची जितीजागती प्रचिती प्रधान सरांनी आपल्या विचार–आचारातून दिली. एकदा आमदार झाला म्हणून त्यासाठी हयातभर त्याला गलेलठ्ठ पक्षार देण्याला त्यांनी विरोध केला. इतरांच्या प्रमाणे वय वर्ष ५८ नंतर ही पेन्शन दयावी, अशी भूमिका त्यांनी विधिमंडळात मांडली. स्वाभाविक या मांडणीसाठी विरोध आणि उपहास दोन्ही त्यांच्या वाटयाला आले नाही तर नवलचं. लोकशाही समाजवादाची एक तत्त्वनिष्ठ भूमिका घेऊन सरांनी आपले राजकीय जीवन व्यतित केले. मात्र, त्या बरोबरच ही प्रगल्भताही बाळगली की, अनैतिक समाजात एखादया व्यक्तीच्या नैतिकतेलाही मर्यादा आहे. स्वाभाविकच एक अंतर्व्यूह तयार होता. सरांच्या मते त्यांची स्थिती महाभारतातील विदुराप्रमाणे होती. द्रौपदीचे वस्त्रहरण होताना भीष्माप्रमाणे डोळयांवर कातडी ओढून बसला नाही, परंतु दुःशासनाचे हातही विसरू शकला नाही. मला हे सहन होत नाही म्हणून दृष्कृत्यांचा निषेध करून तो निघून गेला. सरांच्या या भूमिकेला दोन्ही बाजूंनी आक्षेप आलेला आहे. तरूण नक्षलवाद्यांना हा विदुराचा दुबळेपणा वाटे. निदान एका कौरवाला मारून नंतर स्वतः मरण्याची तयारी ठेवणे हे त्यांच्या मते योग्य उत्तर होते. दुसरीकडे सर्वोदयी लोकांना संसदीय पद्धती हीच भ्रष्टाचाराची गंगोत्री वाटे. त्यामुळे प्रस्थापितांना मान्यता मिळते. मलमपट्टीसारखा कल्याणकारी उपाय होतो. मात्र लोकांची प्रतिकारशक्तीच दुबळी होते. या ऐवजी महात्मा गांधींच्या विचाराप्रमाणे राज्यव्यवस्था यासाठी विधायक काम करणे त्यांना योग्य वाटे.[४२]

### ३.३.२३ विधानपरिषदेतून निवृत्ती :–

१९८४ साली प्रधान सरांची आमदारकीची तिसरी टर्म संपणार होती. त्यांना पुन्हा निवडणूक लढविण्याची इच्छा नव्हती. म्हणून त्यांनी टर्म संपण्याच्या अगोदर महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष राजाराम बापू पाटील यांना पत्र लिहून कळवले की, ‘मी आता पुन्हा विधानपरिषदेची निवडणूक लढविणार नाही.’ पाटील यांना ती गोष्ट मान्य नव्हती. ते प्रधान सरांना म्हणाले, ‘पक्षाने आदेश दिला तर तुम्हांला उभे रहावेच लागेल’. ग.प्र. प्रधान म्हणाले, ‘तसे झाले तर मी पक्षाचा राजीनामा देईन’.

राजाराम बापू यांनी सुचविले की, आपण नानासाहेब गोरे यांना भेटायला जाऊ व ते देतील तो निर्णय मान्य करू. प्रधानांनी ते मान्य केले. काही दिवसांनी ते दोघे नानासाहेबांकडे

भेटायला गेले. राजाराम बापू नानासाहेबांना म्हणाले, प्रधान उभे राहिले नाही तर पक्षाची विधानपरिषदेतील जागा जाईल. प्रधानांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, मी अठरा वर्षे आमदार होतो. त्या पैकी दोन वर्षे विरोधी पक्ष नेता म्हणून काम केले. आता साठी उलटल्यावर पुन्हा हे काम करण्यात मला रस नाही. दुसरे म्हणजे माझ्या जीवनावर साने गुरूजींचे मोठे संस्कार आहेत. मी त्यांच्या समवेत १९४२ च्या चळवळीत तुरूंगवास भोगला आहे. त्यांच्या 'साधना' साप्ताहिकासाठी पाच–सात वर्षे तरी विनामूल्य काम करण्याची माझी इच्छा आहे. नानासाहेब गोरे यांना प्रधानांचे म्हणणे पटले. ते राजाराम बापूंना म्हणाले, लोकांना खुर्चीचा मोह सुटत नाही म्हणून आपण त्यांच्यावर टीका करतो. इथे प्रधान स्वतःहून खुर्ची सोडू इच्छितात. आपण त्यांना तसे करू दिले पाहिजे. त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण करण्याची संधी त्यांना मिळायला हवी.[४३]

**नरेंद्र दाभोळकर(संपादक, साधना साप्ताहिक)–** विधान परिषदेवर ग.प्र. प्रधान तीन वेळा निवडून आले. चौथ्यांदा त्यांना तिकीट देण्यात आले. पण त्यांनी ते नाकारले व साधनेच्या कामात वेळ दिला. तब्बल १२ वर्षे त्यांनी संपादकपदाची धुरा सांभाळली. वयाच्या ७५ व्या वर्षापर्यंत त्यांनी अत्यंत समर्थपणे ही जबाबदारी पार पाडणारे माणूस म्हणून ते खूपच मोठे होते.[४४]

**प्रा.सुभाष वारे(अध्यक्ष राष्ट्र सेवा दल)–** राजकारणातील साधेपणा व पारदर्शकता ग.प्र.प्रधान यांच्यात होती. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेले आणि भविष्यातील स्वतंत्र भारत धोरणाच्या दिशेने वाटचाल व्हावी, यासाठी आग्रह धरणारे ग.प्र. प्रधान हे व्यक्तिमत्त्व ही त्यांच्या त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून दिसून येते.स्वातंत्र्य या ग्रंथातून त्यांनी लोकशाही समाजवादाचे महत्त्व व गरज अधोरेखित केली.[४५]

### ३.३.२४ ग.प्र. प्रधान यांचे समाजवादी सहकारी :–

घरातील संस्कारांमुळे प्रधान मास्तरांना बालवयापासून वाचनाची गोडी होती. लहान वयात ते चांगल्या लेखकांची पुस्तके वाचत. त्या वेळची तरूण पिढी स्वातंत्र्य चळवळीच्या बातम्यांनी अस्वस्थ होई. आपणही भारतमातेसाठी काहीतरी केले पाहिजे, असे त्या काळी काही तरूणांना वाटे. यामध्येच ग.प्र.प्रधानांचे अनेक सहकारी होते. त्यातील त्यांचे काही

राजकीय गुरू होते तर काही वर्गमित्र, प्राध्यापक मित्र होते. त्यांचे विचार एकमेकांशी पटत होते. म्हणजे त्यांच्या जडणघडणीत त्यांची सुद्धा महत्त्वाची भूमिका आहे.

राजकीय चळवळीत आणि सामाजिक कार्यात एक व्यक्ती वाटचाल करू शकत नाही. प्रधान सरम्हणतात, माझ्यासारखा नेतृत्वाचा गुण नसलेला कार्यकर्ता समविचारी आणि समवयस्क मित्रांच्या समवेतच काम करू शकतो. या त्यांच्या वाक्यात खूप मोठा अर्थ दडलेला आहे. यावरून त्यांच्या अंगी नम्रता हा सर्वात मोठा गुण आढळून येतो. ते अनेकवेळा आपल्या मर्यादा स्पष्ट शब्दांत सांगतात. हे खरोखर त्यांच्या मनाच्या मोठेपणाचे लक्षण होते.स्वातंत्र्य चळावळीत आणि समाजवादी राम तुपे आदींसारखे समवयस्क मित्र बरोबर असल्यामुळेच त्यांना मनासारखे काम करता आले. त्यांच्या या मित्रांबद्दल थोडक्यात त्यांच्याच शब्दांत येथे स्पष्ट करणे मला गरजेचे वाटते. म्हणून त्यांना अनेक मित्र होते. मग ते सत्ताधारी असतील किंवा विरोधी पक्षातील असतील. परंतु या ठिकाणी निवडक समाजवादी मित्रांची थोडक्यात माहिती देत आहे.

**एन.डी.पाटील(शेकाप नेते)**– सर्व स्तरात आदरणीय असणारे ग.प्र. प्रधान हे समाजवादी चळवळीतील मोहरा होता.[४६]

**भाई वैद्य(समाजवादी वैद्य)** – समाजवादी विचार विश्वात ग.प्र.प्रधान यांच्याकडून काय शिकावे तर राजकारणात राहून कसे निरपेक्षपणे काम करावे, याचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून घालून दिला. ते केवळ विचारवंतच नव्हते तर कार्मयोगही होते. राजकारण व समाजकारणात त्यांचा मोठा प्रभाव होता.[४७]

### ३.३.२४.१ शिरूभाऊ लिमये :–

शिरूभाऊ लिमये हे प्रधान सरांपेक्षा बारा–तेरा वर्षांपेक्षा मोठे परंतु त्यांच्या मनमोकळया स्वभावामुळे सुरूवातीपासूनच ग.प्र. प्रधान त्यांच्याशी मित्र म्हणून वागत होते. १९३८ साली समाजवादी गटात त्यांच्याशी ओळख झाली होती. त्यावेळी त्यांची शनिवार पेठेत चंद्रचुड वाडयात एक खोली होती. या खोलीवर तसेच प्रभात रोडला कचरे पाटलांच्या विहिरीपलीकडे असलेल्या पडळीवरही प्रधान जात असत. या ठिकाणी त्यांचे अनेक मित्रही जमत असत. प्रधान सरम्हणतात, मी शिरूभाऊंमुळे क्रांतिकारकांच्या जीवनावरील पुस्तके वाचली. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांच्या सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीची हकिकत वाचताना त्या थोर

क्रांतिकारक देशभक्तांच्या हौतात्म्याचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. मला माझे सुरक्षित, काहीसे सुखातिथ जीवन शुद्र, त्याज्य वाटू लागले. शिरूभाऊंच्या बरोबर भटकण्यात, गप्पा मारण्यात एक आगळा आनंद प्रधानांना मिळत होता. शिरूभाऊंचा स्वभाव खोडकर आणि थट्टेखोर होता. त्यामुळे त्यांच्या सहवासाने ग.प्र. प्रधान यांची भावविश्वता कमी होण्यास मदत झाली. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात शिरूभाऊंनीच महाराष्ट्रात सुरूवातीस भूमिगत चळवळीची उभारणी केली होती. कॅपिटॉल बॉम्ब खटल्यात शिरूभाऊ अंडर ट्रायल असताना सरकारने त्यांना दुष्टपणे येरवडा तुरूंगातील फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांच्या वार्डमध्ये ठेवले होते.

१९६५ साली भारत–पाक युद्धाच्या वेळी शिरूभाऊ आणि ग.प्र. प्रधान काश्मीरमध्ये थेट हाजी पीर खिंडीपर्यंत गेले होते. त्याचप्रमाणे १९७१ साली बांग्लादेश मुक्तिसंग्रामाच्या वेळीही शिरूभाऊंचा सहवास प्रधानांना लाभला होता. त्यावेळी मुक्ती वाहिनीतील तरूण क्रांतिकारकांना भेटताना शिरूभाऊंच्या उत्साहाला जे उधाण आले होते, त्याबद्दल ग.प्र.प्रधान म्हणतात, कधीही विसरता येऊ शकणार नाहीत.[४८]

### ३.३.२४.२ अनुताई लिमये :–

१९४२ साली अनुताई लिमये पुण्यामध्ये बी.टी.कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून काम करत होत्या. खादी वापरणाऱ्या ध्येयवादी वृत्तीच्या अनुताईंनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचा निर्णय घेतला, आणि त्यानंतर चळवळीत काम करताना त्या पकडल्या गेल्या. तुरूंगातून सुटल्यावर प्रधान सरांची ओळख झाली होती. अनुताईंनी राष्ट्रसेवा दलाचे काम करण्याचे ठरविले. त्यावेळी त्यांना स्त्री विभागाचे प्रमुख करण्याचे ठरले आणि त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली होती.पुण्यातील सेवादलातील तरूण कार्यकर्त्यांच्या वैचारिक शिक्षणाचे काम ग.प्र. प्रधान आणि अनुताई मिळून करत होते. त्यावेळी त्यांची अभ्यासू वृत्ती आणि रेखीव शिस्तबद्ध कार्यपद्धती यामुळे त्यांचे काम सुव्यवस्थितपणे चालू लागले होते. ग.प्र. प्रधान पुष्कळ वाचन करत असत परंतु अनुताईंसारखे टिप्पणे काढणे, कार्यकर्त्यांना टिप्पणे काढायला शिकवणे हे ग.प्र. प्रधान करत नव्हते. अनुताई प्रधानांना म्हणत, तुम्ही माहिती खूप देता पण ते पुरेसे नाही. मी बी.टी.कॉलेजात शिकवले आहे. विद्यार्थ्यांना स्वतः वाचण्याची टिप्पणे काढण्याची सवय लागली तर तो स्वतंत्रपणे विचार करू लागतो. मी म्हणालो, तुमचे म्हणणे बरोबर आहे पण मला हे जमेल असे वाटत नाही. तरूण कार्यकर्त्यांना विचाराच्या प्रवाहात नेण्यासाठी तो प्रवाह

जोरदार असला पाहिजे म्हणून प्रधान म्हणाले, मी पुस्तकांच्या आधारे बोलतो.अनुताई त्याच्या स्वभावमुळे सौम्यश्या हसल्या आणि म्हणाल्या, काही दिवसांनी तुम्हांला माझे म्हणणे पटेल. माझ्यात अनुताईंचा व्यवस्थितपणा कधी आला नाही परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्या नंतर म्हणाल्या, तुम्ही तुमच्या स्वभावाप्रमाणे वागणार. तुमच्या वाचनाचा झपाटा माझ्याकडे नाही.

अनुताईचे सुस्पष्ट विचार आणि सहकाऱ्यांना बरोबर घेऊन जाण्याचे त्यांचे कौशल्य यामुळे राष्ट्रसेवा दलात स्त्री कार्यकर्त्यांचा एक उत्तम गट तयार झाला. अनुताई पुणे महानगरपालिकेत शिक्षण मंडळाच्या प्रमुख होत्या. शिक्षण हा त्यांचा आवडीचा विषय होता. अनुताईंनी समाजवादी पक्षात काम केले होते. परंतु त्यांच्या राजकीय कामापेक्षा विधेयक कामांवर भर होता.[४९]

### ३.३.२४.३ दत्ता ताम्हाणे :–

प्रधान सरांचे अनेक समाजवादी साथी होते. त्यापैकी दत्ता ताम्हाणे हे एक होय. ते सरांपेक्षा वयाने मोठे होते. प्रधान सरांची आणि त्यांची पहिली ओळख १९४० च्या समाजवादी कार्यकर्त्यांच्या बैठकीत झाली. त्यांचा वेष हा खादीचे साधे कपडे असे. प्रथम दर्शनी सौम्य वाटणारे दत्ता त्या दिवशी जवळ आलेल्या स्वातंत्र्य चळवळीत ठाणे जिल्हयातील काही तालुक्यात त्यांनी प्रखर लढा कसा देता येईल, यावर पोटतिडकीने बोलले. १९४८ च्या संग्रामात दत्ता ताम्हाणे हे ठाणे जेलमध्ये होते. ते सतत दौरे करून निरनिराळया प्रश्नांवर संघर्ष करत. समाजवादी पक्षात कार्यकर्त्यांना कशी प्रेरणा देता येईल, हे प्रधान सरांनी जवळून पाहिले होते. दुःख काय असते? हे कळण्यासाठी दत्ता ताम्हाणे एकदा मुला–मुलींना म्हणाले, तुम्ही माझ्याबरोबर दीपावलीला आदिवासी भागात चला. मग तुम्हांला ते काय खातात, कसे राहतात हे कळेल. जेव्हा मुला–मुलींनी त्यांचे दुःख, दैन्य जवळून पाहिले, त्या वेळेस त्या मुला–मुलींचा पांढरपेशा अहंकार कमी झाला.

१९३२ साली दत्ता ताम्हाणे कॉलेज सोडून स्वातंत्र्य चळवळीत उतरले.स्वामी आनंद हे ज्येष्ठ गांधीवादी होते. त्यांच्याजवळ राहिल्यामुळे त्यांच्या कामात शिस्त आली होती. ते ठाणे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते. ते दोन वेळा आमदारही झाले. त्यांच्याजवळ एक पिशवी असे आणि त्यामध्ये त्यांचे दप्तर असे.

प्रधान सरांची आणि त्यांची मैत्री विधानपरिषदेत झाली होती. दत्ता ताम्हाणे हे सरांना विधानपरिषदेतील कामकाज कसे करावे, याबद्‌दल सुरूवातीस माहिती सांगत होते.

### ३.३.२४.४ बॅ.नाथ पै.:-

नाथ पै.बरोबर प्रधान सरांची १९४० साली मैत्री झाली. नाथ पै.हे बेळगावहून पुण्याला शिकण्यासाठी कॉलेजला आले होते. त्यावेळी ग.प्र. प्रधान त्या कॉलेजमध्ये डिबेटींग सेक्रेटरी होते. नाथ पै.मुळे कॉलेजला आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा जिंकता आली होती. नाथ पै.यांचे इंग्रजी, मराठी आणि संस्कृत या तीन भाषांवर प्रभुत्व पाहून ग.प्र. प्रधान चकित झाले होते. ते दोघे मित्र होते. त्यांचे मित्र जमल्यावर ते नाथ पै.यांना इंग्रजी भाषण करायला सांगत असत. एकदा त्यांनी नामदार गोखल्यांचे फेअर वेल टू फर्ग्युसन कॉलेज भाषण म्हणून दाखवले होते. त्यांची स्मरणशक्ती ही असामान्य होती.

१९४२ च्या आंदोलनात नाथ पै.हिंडलगा जेलमध्ये होते. पुढे त्यांनी इंग्लंडला जाऊन बॅरिस्टर ही पदवी घेतली. तेथून आल्यावर ते समाजवादी पक्षात काम करू लागले होते. गोवा मुक्तीच्या वेळी नाथ पै.इंटरनॅशनल युनियन ऑफ सोशॅलिस्ट युथ या संस्थेचे ते अध्यक्ष होते. गोवा मुक्तीसाठी त्यांचा आंतरराष्ट्रीय तुकडी नेण्याचा बेत होता परंतु त्यांना सरकारने तसे करू दिले नाही.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता. त्यावेळी ते ग.प्र.प्रधान यांना म्हटले, महाराष्ट्रातील अनेकांना मुंबई महाराष्ट्रात यावी, यासाठी जितक्या तीव्रतेने वाटते तसे बेळगावबद्‌दल वाटत नाही. नाथ पै.यांचे म्हणणे पुढे खरे ठरले. प्रधान सरदिल्लीला गेले तर नाथ पै.यांच्या घरी उतरत असत. एकदा ते प्रधान सरांच्या पत्नीला म्हणाले, आता सरांना सोशॅलिस्ट पार्टीला देऊन टाका. त्यावर त्यांची पत्नी म्हणाल्या त्यांनी हे पूर्वीच ठरवले आहे.

### ३.३.२४.५ मधू दंडवते :-

प्रधान सरांचे आणखी एक समाजवादी साथीदार म्हणजे मधू दंडवते होय. मुंबईतील एक भाषणामुळे प्रधान सरांची व मधू दंडवते यांची मैत्री झाली होती. गोवा मुक्ती संग्रामामध्ये त्यांनी भाग घेतला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली एक तुकडी गोव्याला निघाली होती. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री देसाई यांनी ही तुकडी निघाली त्यावेळी तिच्यावर बंदी घातली होती. त्यावर मधू दंडवते यांनी बेळगावातून पायी जाण्याचा निर्धार केला होता. त्यावेळी सेनेने केलेल्या

गोळीबारात ३ सत्याग्रही ठार झाले होते. भर पावसात सत्तर मैल चालून हे सत्याग्रही सावंतवाडीला पोहोचले होते.

दंडवते यांनी या सत्याग्रहात भाग घेण्यापूर्वी सिद्धार्थ कॉलेजमधील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला होता. परंतु पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तो स्वीकारला नाही. सिद्धार्थ कॉलेजला शिकविताना प्रा.दंडवते यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात राहण्याचा व विचार ऐकण्याचा योग आला होता.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांनी हिरिरिने भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीचे ते सचिव होते. त्यांची भाषणे चांगली होत असत. त्यांच्यावर समाजवादी पक्ष नेता म्हणून त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली होती. १९७० साली ते विधानपरिषदेतून निवडून गेले होते. पुढे ते जनता पक्षाच्या मंत्रिमंडळात रेल्वे मंत्री होते.

### ३.३.२४.६ लालजी कुलकर्णी :–

लालजी कुलकर्णी आणि प्रधान सरांची मैत्री राष्ट्रसेवा दलात जमली होती. त्यांच्या स्वभाव तसा फरक होता. लालजींच्या हा खंबीर स्वभावामुळे स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा फायदा झाला. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या वेळी भुमिगत बॉम्ब आणि अन्य साहित्य हवे होते. ते साहित्य लालजींनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने प्रचारक रा.ज.देशमुख यांच्याकडे नेऊन पोहचवले.

राष्ट्रसेवा दलात आणि समाजवादी पक्षात लालजी हे अनेक कार्यकर्त्यांचे पालक होते. कोणत्याही कार्यकर्त्यांची अडचण असली की, ते लालजींकडे जात. ते ती अडचण ऐकून घेत व लगेच त्या कार्यकर्त्यांची ती अडचण सोडवत. लालजींची भाषणशैली ही वेगळी होती. ते प्रदीर्घ भाषण करत नसे. परंतु त्यांच्या स्वभावाची काही वैशिष्टये होती. त्यांचे विचार स्पष्ट असत. भूमिका अविचल असे. ते म्हणत, केवळ विचार पुरेसा नाही. त्याला व्यावहारिक शहाणपणाची जोड असली पाहिजे, याचे त्यांना सतत भान असे. प्रजासमाजवादी पक्ष अतिशय अडचणीत असतानाही ते दोघे न डगमगता काम करीत राहिले, याचे सर्व श्रेय लालजींना आहे, असे प्रधान सरम्हणतात.

ग.प्र. प्रधान पदवीधर मतदारसंघात उभे असताना सतरा जिल्हयात प्रचार यंत्रणा व पदवीधरांचे नाव नोंदविण्याचे काम लालजी व त्यांचे सहकारी करीत असत. निवडणुकीत जनसंघाशी टक्कर देऊन यशस्वी झाले, याचे श्रेय लालजींना द्यावे लागेल, असे ग.प्र. प्रधान

म्हणतात. लालजींचे कपडे अगदी साधे असत. त्यांच्या जुन्या सायकलवरून ते प्रवास करत . ते लबाड माणसास बरोबर ओळखत आणि कठोरपणे त्याची खरडपट्टी काढत.

लालजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या ऑफिसची शोभाच गेली. कार्यकर्त्यांना त्यांच्यासारखे कोणी सांभाळू शकले नाही. प्रधान सरांना ते धाकटया भावाप्रमाणे वागवत असत. त्यांच्यासारखा सहकारी मिळाल्यामुळे प्रधान सरांची राजकीय वाटचाल सुकर झाली होती असे ग.प्र. प्रधान म्हणतात. त्यांच्या निधनामुळे समाजवादी पक्षाची फार मोठी हानी झाली होती.[५०]

### ३.३.२४.७ शंकरराव खरात :–

ग.प्र. प्रधान म्हणतात, समाजवादी पक्षात अनेक वर्षे काम केले परंतु समाजवादी चळवळी ही समाजवादी पक्षापेक्षा विशाल आणि व्यापक आहे. याचा त्यांना विसर पडलेला नाही. प्रधान समाजवादी असून पुरोगामी पक्षातील काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ते सहकारीच मानत होते. शंकरराव चव्हाण आणि ग.प्र. प्रधान समवयस्क असले तरी सरांचे त्यांच्या परिस्थितीमुळे उशिरा शिक्षण झाले. त्यांना वाचनाची खूप आवड होती. पुढे वकील झाल्यावर ते मंगळवार पेठेत राहू लागले. त्यावेळी ते रिपब्लिकन पक्षाचे काम करत होते.

शंकरराव खरात पुण्यात मंगळवार पेठेत राहत असल्यामुळेच प्रधान त्यांच्याकडे जात असत. खरात त्यांना म्हणाले, मी बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात काही दिवस राहिलो. त्यावर मी लेखन केले आहे. मी ते वाचतो, तुम्ही ते ऐका. खरातांना भारतामध्ये आर्थिक क्षमतेपेक्षा आधी सामाजिक समता आली पाहिजे, असे वाटे. त्यांनी कार्ल मार्क्स लिखाणाचेही वाचन केले होते. शंकरराव म्हणतात, शेकडो वर्ष चिरडले गेल्यामुळे आणि हे आपल्या कर्मातच आहे, असे हिंदू धर्माने मनावर ठसवल्यामुळे आम्ही महार आपण माणूस आहोत हे विसरलो होतो. त्याचे भान आम्हांला बाबासाहेब आंबेडकरांमुळेच आले. शंकरराव खरातांमुळे समतेच्या जाणिवांना एक नवे पर्व लाभले. अस्पृश्यता नष्ट होत नाही तोपर्यंत स्वातंत्र्याला अर्थ नाही हे गांधीचे वाक्य मी वाचले होते. मला या शब्दाचा वैचारिक आशय कळला होता. शंकररावांच्या लिखानामुळे प्रधान सरांना दलितांच्या वाटयाला आलेल्या हाल अपेष्टांची कल्पना आली. वि.स.खांडेकरांच्या कादंबरीतील दारिद्र्यापेक्षा ते कितीतरी अधिक भीषण होते.

### ३.३.२४.८ अनंतराव भालेरावः–

अनंतरावांची आणि प्रधान सरांची मैत्री जमली ती बाबासाहेब परांजपे यांच्यामुळे. हैद्राबाद मुक्तिसंग्राम चालू असताना अनंतराव आणि ग.प्र. प्रधान समाजवादी पक्षात एकत्र काम करत असल्यामुळे त्यांची व प्रधान सरांची वर्षातून एकदा तरी भेट होत असे.पुण्याला आल्यावर अनंतराव प्रधान सरांकडे राहत असत.त्यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झालेला होता. त्यांचे वडील सतत नोकरी सोडत असल्यामुळे त्यांचे लहानपणी खूप हाल झाले. त्यांचे वडील धार्मिक होते. पंढरीच्या वारीला नियमित जात असल्यामुळे अनंतरावांवर लहानपणापासूनच संतसाहित्याचा सुसंस्कार झाला होता. मांदियाळी हे त्यांचे अप्रतिम पुस्तक होते. अनंतरावांचे शिक्षण निजामांच्या राजवटीत झाल्यामुळे त्यांना उर्दू उत्तम येत असे.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात अनंतराव प्राणपणाने लढले. त्यावेळी त्यांनी बंदूकही हाती घेतली होती. नंतर मात्र त्यांनी लेखणी हातात घेतली आणि वाघमारे संपादक असलेल्या ‘मराठवाडा’ या साप्ताहिकाचे ते काम करू लागले. अनतंरावांच्या प्रभावी लेखनामुळे मराठवाडयातील अनेक राजकीय कार्यकर्त्यांना पुरोगामी वळण लागले.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामापेक्षा हैद्राबाद मुक्तीसंग्राम अधिक बिकट होता. या लढयातील अनेक रोमहर्षक प्रसंगांचे, भुमिगत क्रांतिकाराकांच्या शौर्याचे व सावकारांच्या अत्याचारांचे वास्तव वर्णन करणारे ‘पेटलेले दिवस’ हे पुस्तक अनंतरावांनी लिहिले. अनंतरावांच्या हैद्राबाद मुक्तीसंग्रामावरील ग्रंथामध्ये या लढयातील विविध प्रवाहांचे फार मार्मिक विवेचन आहे. प्रधान सर म्हणतात, अनंतरावांशी गप्पा मारत बसणे हा एक विलक्षण अनुभव असे. विविध क्षेत्रातील माणसे त्यांच्याकडे गप्पा मारण्यासाठी येत. अनंतराव शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकत आणि त्यांना रोखठोक सल्ला देत. अनंतराव मराठवाडयात अग्रलेख लिहित आणि कापड हा स्तंभ नियमाने चालवीत. स्वामी रामानंद तीर्थ हे अनंतरावांचे श्रद्धास्थान होते. राजकीय नेते म्हणून स्वामीजी किती मोठे होते. हे अनंतरावांनी वस्तुनिष्ठ रीतीने सांगितले आहे.

### ३.३.२४.९ रामभाऊ तुपे :–

समाजवादी चळवळ ग्रामीण भागात, बहुजन समाजात रूजली पाहिजे असे एस.एम.जोशी त्यांच्या सहकाऱ्यांना नेहमी सांगत होते. आण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी–शेतमजूर यांच्यामध्ये सहकारी संस्था उभ्या करण्याचे ठरवले होते.

रामभाऊ तुपेंची चळवळींवर निष्ठा होती व अपार कष्ट करण्याची तयारी होती हे प्रधान सरांनी जवळून पाहिले होते. ज्या तरूणांना त्यांची स्वतःची जमीन नाही, शेतमजूर म्हणून राबणाऱ्या तरूणांना या प्रयोगात सहभागी करून घेऊन त्यांना आप्पा माचदेव व रामभाऊ तुपे यांनी आत्मविश्वास दिला आणि पुढे हे तरूण आयुष्यात स्वकर्तृत्वाने शेती करू लागले होते. ग.प्र. प्रधान मांजरीला रामभाऊ तुपे यांच्याकडे जात असत. समाजवादाचा पाया उत्पादक श्रम आहे हे सरांना रामभाऊ तुपे यांच्यामुळे कळले होते.

शेतीचा व्यवसाय करणारे रामभाऊ तुपे यांनी पुणे जिल्हयात समाजवादी पक्षाचे काम उभे करण्यासाठी पुढाकार घेतला. हे काम करत करत रयत शिक्षण संस्थेचे हायस्कूल काढण्याचा आग्रह त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे धरला होता. कर्मवीर भाऊराव पाटलांची पुण्याई आणि जनसामान्यांकडून त्यांना मिळणारा पाठिंबा यामुळे साधना विद्यालय सुरू झाले. या संस्थेसाठी सर्वतोपरी मदत रामभाऊ तुपे यांनी केली.

साधना विद्यालयाचा विस्तीर्ण परिसर, तेथील बालवाडीपासून जुनिअर पर्यंत चालणारे वर्ग तेथे असलेल्या उत्तम शैक्षणिक आणि शारीरिक शिक्षणाच्या सुविधा, कुशल ध्येयवादी अध्यापक, अध्यापिका ज्या हडपसर मध्ये मुला–मुलींना शाळेत जाण्याची सुरूवात सरांनी पाहिली, तेथे साधना विद्यालयात येणारे विद्यार्थी असंख्य उत्साही, हुशार मैदानात आणि परीक्षेतही नेत्रदीपक यश मिळवणारे विद्यार्थी–विद्यार्थिनी हे सर्व पाहताना रामभाऊ तुपे यांच्या आयुष्यभराच्या तपश्चर्येची प्रधान सरांना सतत जाणीव होती. रामभाऊ तुपे एका भाषणात म्हणाले, कर्मवीर आण्णा आणि साने गुरूजी यांनी मला प्रेरणा दिली आणि समाजवादी पक्षात काम करताना समाजवादी समाज सुधारणेसाठी ग्रामीण भागात शैक्षणिक कार्य करावे हे मला उमजले. म्हणून मी रयत शिक्षण संस्थेच्या साधना विद्यालयाचे आयुष्यभर काम केले.[५१]

### ३.३.२५ कार्यकर्त्यांसाठी मुक्तद्वार :–

विधिमंडळातील कामाचे त्यांचे खरे कर्तृत्व दिसून आले ते १९८० ते १९८२ या दोन वर्षात. ते विरोधी पक्ष नेता असताना सरकारी बंगला आणि लाल दिव्याची गाडी त्यांच्या दिमतीला होती. मलबार हिलवरचा बंगला त्यांच्यासाठी होता. पण कार्यकर्त्यांना व भेटीस येणाऱ्या लोकांना सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी मंत्रालयासमोरील बैठा बंगला पसंत केला. त्या बंगल्यावरील एक दालन केवळ भेटीस येणाऱ्या किंवा मुंबईत कामानिमत्त येणाऱ्या

कार्यकर्त्यांसाठी अतिथिगृह म्हणून ठेवले होते. दररोज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे १५–२० कार्यकर्ते तेथे वस्तीला असत. त्यांचा सकाळचा चहा–नाष्टा प्रधानांकडे होई. या शिवाय मुंबईत येणारे पक्षाचे नेतेही अधूनमधून मुक्कामाला असत. एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये, अनुताई लिमये अशी कितीतरी नावे या संदर्भात सांगता येतील. या काळातील प्रधानांचा पत्रव्यवहारही फार मोठा होता. त्यांच्या अंदाजाप्रमाणे या दोन वर्षात त्यांनी किमान दोन हजार पत्रे लिहिली असावीत. सरकारने त्यांना नेरूरकर नावाचे स्वीय सहायक व निगम नावाचे लघुलेखकही दिले होते. प्रसंगी ते बारा–बारा तास काम करीत. पण त्यांनी कधी कुरकूर केली नाही. दौरे करीत असताना त्यांच्या संरक्षणासाठी सरकारने एक अंगरक्षकही देऊ केला होता पण प्रधान सरांनी त्यास नकार दिला. त्यांच्या लाल दिव्याच्या गाडीत ते स्वतः, त्यांचा मोटारचालक, त्यांचा लघुलेखक व ज्या भागात दौरा असेल, तेथील एखादा कार्यकर्ता असे.[५२]

**प्रकाश आंबेडकर–** अध्यक्ष भारिप महासंघ– कार्यकर्त्यानी कसे असावे आणि कशा प्रकारचे आयुष्य जगावे, याचा आदर्शच समाजासमोर ठेवला आहे. महान राजकारणी, विचारवंत म्हणजे ग.प्र.प्रधान सर होत.[५३]

## ३.४ समारोप : –

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेताना ग.प्र.प्रधान यांच्यावर महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, कर्मवीर भाऊराव पाटील, सानेगुरूजी, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, पं.जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबरच विविध विचारवंतांचा प्रभाव राहिला. त्यामुळेच त्यांनी सगळयाच विचारप्रवाहातील सद्‌गुण आत्मसात केले होते. कार्यकर्त्यांनी सगळया विचारप्रवाहांना समजून घेतले पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे पुढे राष्ट्रसेवा दलात कार्यकर्ते घडवितानाही त्यांनी विविध विचारांची ओळख कार्यकर्त्यांना घडवून दिली. त्यांनी सन १९४२ च्या लढयात तुरूंगवास सोसला. स्वातंत्र्यवीरांसाठी त्यांनी धाडसाने रसद पुरविली. ग.प्र.प्रधान यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावास भोगावा लागला. देशभक्तीमुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला. परंतु वैयक्तिक प्रगतीपेक्षा कर्तव्याला त्यांनी महत्त्व दिले. पंडित जवाहलाल नेहरूंचे ग्रंथ त्यांना स्फूर्तिदायक ठरले. आचार्य शंकरराव जावडेकर आणि साने गुरूजी यांचा सहवास त्यांना प्रेरक ठरला. बिनभिंतीच्या शाळेत व्यापक जीवनानुभव संपादित

करीत राहून साने गुरूजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी ते एक ठरले. नानाप्रकारे त्यांनी समाज जागरण कार्यात सहभाग घेतला. गांधीजींचे स्वयंसेवक होण्याची संधी त्यांना मिळाली.

कारावासातून मुक्त झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून फर्ग्युसन महाविद्यालयात इंग्रजींचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत झाले. तेथे तब्बल वीस वर्षे एक नामवंत प्राध्यापक म्हणून विद्याजीवनात मानमान्यता मिळविलेली. शिक्षकत्व हा प्रधान मास्तरांनी कधीच व्यवसाय मानला नाही. अध्यापन हे त्यांनी व्रत मानले. आपली राजकीय मते त्यांनी अध्यापक म्हणून कधीच कुणावर लादली नाहीत. 'राजकारण' आणि 'विद्याजीवन' यांची सरमिसळ कधीच त्यांनी केली नाही. सद्सदविवेकाला स्मरून वागणारा एक अनाग्रही विचारवंत प्राध्यापक म्हणून प्रधान मास्तरांचा सर्वांना आदर व आधार वाटला. केवळ विषयशिक्षक म्हणून न राहता त्यांनी अध्यापन विषय शिकविलाच; पण विद्यार्थ्यांना प्रेमही दिले. त्यांचे प्रश्न समजून घेतलेत. शक्य ती मदत करून सोडवलेही. त्यामुळे जीवनशिक्षक व समाजशिक्षक ठरले. त्यांचे विद्यार्थी आज अनेक मोठया पदांवर आहेत. त्यांना मास्तराविषयी आजही आदर व अभिमान वाटतो.

१९४५ ते १९६४ अशी प्राध्यापकाची नोकरी केली. १९६४ मध्ये विधानपरिषदच्या पदवीधर मतदारसंघात निवडणूक जिंकली आणि प्रधान सरांचे विधानपरिषदेत काम चालू झाले. सुरूवातीचा काही काळ गेल्यानंतर त्यांच्या मित्रांकडून विधानपरिषदेच्या कामकाजाची माहिती घेतली. त्यांनी कामकाज सुरू केले. कोणताही प्रश्न अभ्यास केल्याशिवाय विचारायचा नाही. यासाठी ते महाराष्ट्रभर फिरत. अधिवेशन संपल्यानंतर जनतेची गाऱ्हाणी, प्रश्न पाहण्यासाठी प्रत्यक्ष ते त्या स्थळाला भेट देत व त्याचा पूर्ण अभ्यास करून पुढील अधिवेशनात ते विचारीत असत. विधानपरिषदेच्या त्यांच्या अठरा वर्षांच्या काळामध्ये त्यांनी अनेक प्रश्न हाती घेतले व ते धसास लावले. मग ते आरोग्यसेविकाचा प्रश्न असो वा आदिवासींच्या जमिनीचा किंवा शिक्षकांच्या पगाराचा असो वा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचा, धरणग्रस्तांचा. सर्व प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. त्यातील बऱ्याच प्रश्नांना त्यांना यश आले. काहींना अपयशही आले. तरी त्यांनी न डगमगता आपले कार्य पुढे चालू ठेवले. पुढे १९८२ ते १९८४ अशी पावणेदोन वर्षे ते विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी काम केले. या काळात अनेक कार्यकर्ते त्यांना भेटण्यासाठी येत. त्या सर्वांना त्यांचे घर म्हणजे मुक्तद्वार होते. त्यांनी पदाचा उपयोग कधी स्वतःसाठी केलेला दिसत नाही.

१९८४ साली प्रधान सरांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरवले. त्यासाठी पक्षाला त्यांनी सांगितले, मला 'साधना' साप्ताहिकासाठी काही दिवस काम करावयाचे आहे. त्यांच्या वरिष्ठांनी त्यांची मागणी मान्य केली. ग.प्र. प्रधान ज्या सहकाऱ्यांच्या सहवासात वाढले, त्यांच्याबरोबर काम केले अशा समाजवादी सहकाऱ्यांमुळे मी घडलो, असे ग.प्र. प्रधान म्हणतात. शिरूभाऊ लिमये, अनुताई लिमये, दत्ता ताम्हाणे, बॅ.नाथ पै, मधु दंडवते, लालजी कुलकर्णी, शंकरराव खरात, अनंतराव भालेराव, रामभाऊ तुपे इत्यादीचा ते उल्लेख करतात. शेवटी समाजवादी चळवळीचे ते मूल्यमापन करतात. या मध्ये ते चळवळीच्या गुणदोषांची थोडक्यात माहिती सांगतात.

## संदर्भ /तळटिपा :-


१) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ११ जून २००४, पृ.१३

२) कित्ता, पृ.१३, १४

३) कित्ता, पृ.१५ ते १८

४) पांढरे नीला, प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्‌मय, उन्मेश प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, ३० जून २०११, पृ. १८

५) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.२१, २२

६) दै.लोकमत, अहमदनगर जिल्हा आवृत्ती, (पुरवणी) दि. ३० मे २०१०, पृ. ११

७) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, उपरोक्त, पृ.२७, २८

८) दै.लोकमत,दि.३० मे २०१०, पृ.११

९) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.४१

१०) दै.लोकमत, अहमदनगर, ३० मे, २०१०, पृ.४

११) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, उपरोक्त, पृ.३७, ३८

१२) लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च२००४, पृ.१३९

१३) दै.लोकमत, अहमदनगर, ३० मे, २०१०, पृ.११

१४) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.४१

१५) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.४२

१६) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.४२, ४३

१७) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.४१

१८) कित्ता, पृ.४२

१९) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.६७

२०) कित्ता, पृ.६८

२१) विधानपरिषद अहवाल- २३ जून १९६७, पृ.१९८ ते २००

२२) विधानपरिषद अहवाल-२४ जुलै १९६७, पृ.४९३

२३) विधान परिषद अहवाल, ९ जुलै १९६७, पृ.३९८ते ४००

२४) विधान परिषद अहवाल, ३० जून १९६७, पृ.३२८

२५) विधान परिषद अहवाल, १ ऑगस्ट १९६९, पृ.५७३

२६) विधानपरिषद अहवाल– सन १९६९– ७०, पृ.२१५ ते २१८

२७) विधानपरिषद अहवाल– ४ ऑगस्ट १९७०, पृ.२४/५२

२८) विधानपरिषद अहवाल– ५ ऑगस्ट १९७७, पृ. २५/६४

२९) विधानपरिषद अहवाल– १ ऑगस्ट १९७७, पृ. २७/२७

३०) विधान परिषद अहवाल– १८ जुलै १९७९, पृ.८/५०, ८/५९

३१) विधानपरिषद अहवाल–८ ऑगस्ट १९७९, पृ. ७०४, ७०५

३२) दै.पुढारी, पुणे, दि.३० मे २०१०, पृ.४

३३) दै.सकाळ, पुणे, ३० मे २०१०, पृ.६

३४) विधान परिषद अहवाल, २३ जून १९६७, पृ.३२२

३५) विधान परिषद अहवाल, २४ जुलै १९६७, पृ.३२६

३६) दै.सकाळ, पुणे, ३० मे २०१०, पृ.६

३७) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.७५

३८) दै.सकाळ, पुणे, ३० मे २०१०, पृ.७

३९) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.७८

४०) विधानपरिषद अहवाल–८ ऑगस्ट १९७८, पृ. ३०४,

४१) विधानपरिषद अहवाल–१९८३, पृ. ३०२

४२) विधानपरिषद अहवाल–८ ऑगस्ट १९७९, पृ. ७०५,

४३) दाभोळकर नरेंद्र, साधना साप्ताहिक, ५ जून २०१०, पृ.४

४४) दैनिक ‘लोकमत’, अहमदनगर, दि.३० मे २०१०, पृ.१

४५) दैनिक ‘सार्वमत’, अहमदनगर व पुणे, ३० मे २०१०, पृ.१

४६) दैनिक ‘गावकरी’, पुणे, ३० मे २०१०, पृ.१

४७) दैनिक ‘केसरी’, पुणे, ३० मे २०१०, पृ.१

४८) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.५१

४९) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.१५८

५०) कित्ता, पृ.१५९ ते १६६

५१) कित्ता, पृ.१६८ ते १७३

५२) दै.पुढारी, पुणे, दि.३० मे २०१०, पृ.४

५३) दैनिक ‘नवाकाळ’, पुणे, ३० मे २०१०,पृ.१

# प्रकरण चौथे

# ग.प्र.प्रधान यांचे 'साधना' साप्ताहिकाचे संपादकीय कार्य

## ४.१ प्रस्तावना :-

प्रधान सरांच्या कामाचे एकूण पाच ते सहा वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांनी त्या त्या वेळेस निर्णय घेऊन आपल्या स्वकर्तृत्वाने कामाचा ठसा उमटवला आहे. कारण त्यांच्या बालवयात घरी आणि शाळा, कॉलेज आणि मित्र यांच्याकडून तसे संस्कार झाले होते. साने गुरूजी, महात्मा गांधी, नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी यांसारख्या थोर पुरूषांचा सहवास त्यांना लाभला होता, त्यामुळे त्यांचे जीवन उजळून गेले.

प्रधान सरांच्या आयुष्यातील पहिला टप्पा आताच्या दहावीच्या वयात त्यांनी स्वातंत्र्याची शपथ घेतली. त्यामुळे त्यांना एक वर्षाची शिक्षा भोगावी लागली. या काळात त्यांना साने गुरूजींचा सहवास लाभला. नंतर १९४५ साली त्यांच्या वडिलांनी त्यांना कुटुंबाची जबाबदारी समजावून सांगितली. त्यामुळे प्रधान सरांनी नोकरी पत्करली. पुढे याच क्षेत्रात वीस वर्षे नोकरी केल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी पत्नीकडे देऊन राजीनामा दिला व सक्रिय राजकारणात उतरले. अठरा वर्षे विधानपरिषदेत काम केले. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, शिक्षक, ग्रंथालयीन कर्मचारी, धरणग्रस्त अशा कितीतरी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर त्यांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरवले आणि आपल्या आयुष्याचा पुढचा टप्पा हा साने गुरूजींनी सुरू केलेल्या 'साधना' साप्ताहिकासाठी देण्याचे ठरवले.

## ४.२ 'साधना' साप्ताहिकाचा पहिला अंक:-

साने गुरूजींनी स्वातंत्र्योत्तर काळात जी परिस्थिती निर्माण झाली होती यावर मात करण्यासाठी त्यांनी 'साधन' साप्ताहिक काढण्याचे ठरविले होते. हा निर्णय घेताना साने गुरूजी ग.प्र.प्रधान व त्यांच्या सहकाऱ्यांना म्हणाले होते की, 'महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर माझ्या मनाला विफलता आली होती. परंतु मी तसाच राहिलो तर ती महात्मा गांधीजीशी प्रतारणा होईल. माझी ताकद कमी आहे. पण माझ्या लेखणीत जी शक्ती आहे, ती पणाला लावून साने गुरूजी 'साधना'सुरू करणार आहेत. १५ ऑगस्ट १९४८ रोजी साने गुरूजींनी 'साधना'चा पहिला अंक प्रसिद्ध केला. त्या अंकातील साने गुरूजींच्या अग्रलेखाने ग.प्र.प्रधान यांच्या मनावर

विलक्षण परिणाम केला. आयुष्याला वळण देणारे असे साने गुरूजींचे ते अविस्मरणीय शब्द होते.[1]

## ४.३ ग.प्र.प्रधान व 'साधना' साप्ताहिकातील कार्य :–

साने गुरूजींची साधना हा यदुनाथ थत्ते, बापूसाहेब बापट, सदानंद वर्दे आणि प्रधान सरांना जोडणारा आयुष्यभर एकत्र ठेवणारा बळकट दुवा 'साधना'. यदुनाथ थत्तेंनी साधनासाठी सर्वस्व दिले होते. वसंत बापट, सदानंद वर्दे यांनी 'साधना' साप्ताहिक आणि 'साधना' ट्रस्टचे काम केले. 'साधना'मुळे ग.प्र. प्रधान लेखक झाले. 'साधना' प्रकाशनाने त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित केली.[२]

'साधना' साप्ताहिकावर प्रधान सरांनी अपत्यवत प्रेम केले. कारण 'साधना' ही त्यांचा आदर्श असलेल्या साने गुरूजींची निर्मिती होती. त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. १५ ऑगस्ट १९४५ रोजी 'साधना'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला होता. यदुनाथ थत्ते यावेळी धुळे, अंमळनेर भागात राष्ट्रसेवा दल प्रमुख म्हणून काम करत होते. ते साने गुरूजींबरोबर मुंबईला गेले आणि साधनासाठी कार्य करू लागले.[३]

ग.प्र. प्रधान साधनाचे प्रतिनिधी म्हणून काश्मीर व बंगाल देशात गेले होते. त्यांच्या तेथील अनुभवावर आधारित 'हाजी पीर' आणि 'सोनार बांगला' ही पुस्तके त्यांनी लिहिली. ती साधनानेच प्रसिद्ध केली. यदुनाथ थत्तेंच्या दृष्टीने 'साधना' केवळ साप्ताहिक नव्हते, तर ती एक चळवळ होती. साने गुरूजींच्या त्या धडपडणाऱ्या मुलाने त्यांचा वारसा उत्तम चालवला. आणीबाणीच्या काळात 'साधना'चे काही अंक आक्षेपार्ह म्हणून जप्त केले असताना यदुनाथ थत्ते यांनी हायकोर्टात केस लावली आणि तिचा निकाल साधनाच्या बाजूने लागला.

१९८४ मध्ये आमदारकीतून मुक्त झाल्यानंतर प्रधान सरआणि वसंत बापट यांनी संपादक आणि सहसंपादक म्हणून 'साधना'ची जबाबदारी स्वीकारली. एस.एम.जोशी आणि ना.ग.गारे हे वृद्ध झाल्यामुळे सदानंद गोरे कार्यकारी विश्वस्त झाले तर प्रा.प्रधान विश्वस्त सचिव झाले. १९८५ साली वसंतराव बापट, ना.ग.गारे आणि एस.एम.जोशी यांना म्हणाले, प्रधान आणि मी बरोबरीने काम केले. त्याला 'साधना'चा संपादक करा.

नानासाहेबांनी प्रधानांना बोलावून सांगितले 'साधना' हे कोणत्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र नाही, ते स्वायत्त आहे. 'साधना'च्या संपादकाचं स्थान स्वतंत्र आहे. तू संपादक असताना जनता दलाच्या भूमिकेवर टीका केलीस, तर तू जनता दलातील पदाधिकारी असल्याने पक्ष तुला जाब विचारेल. आम्हांला हे मान्य नाही. तुला 'साधना'चा संपादक व्हायचं असेल तर तुला पक्षाचा पदाधिकारी राहता येणार नाही.तू विचार करून काय ते ठरव'. प्रधानांनी जनता दलाच्या कार्यकारिणीचा राजीनामा दिला. आणि नंतरच बापटांच्या बरोबर संपादक पद स्वीकारले. एस.एम.जोशी आणि ना.ग.गोरे हे त्यांचे गुरू पत्रकारितेतील नीतिमूल्य जपणारे होते.

प्रधान सरांना विद्यार्थीदशेपासून पत्रकारितेचा अनुभव होता. ते प्राध्यापक असताना १९६२ साली एस.एम.जोशी यांनी काही काळ कोठारीकडून 'पूना डेली न्यूज' हे वृत्तपत्र चालवायला घेतले होते. त्यावेळी ग.प्र. प्रधान त्यांना मदत करत असत. एस.एम.दौऱ्यावर गेले की ते अग्रलेखही लिहित असत.एस.एम.जोशींनी त्यांना सांगितले की, मी पुण्यात नसताना कोणत्या विषयावर अग्रलेख लिहायचा, त्याचे तुला पूर्ण स्वातंत्र्य आहे पण तुझ्या मनात येईल ते लिहायचे नाही. एस.एम.लिहितात असे वाटेल अशा मजकुराचा अग्रलेख लिहायचा. गेली वीस वर्षे तू माझ्याबरोबर आहेस. माझी विचार करण्याची रीती वेगळी आहे तुझी वेगळी आहे. तुझ्या भावना तीव्र असतात. ते अग्रलेखात येऊन चालणार नाहीत.[४]

प्रधानांच्या आयुष्यातील पाचवा टप्पा १९८४ ते १९९७ हा तेरा वर्षांचा काळ होता. या काळात ते वसंत बापटांबरोबर साधना साप्ताहिकाचे संपादक झाले. या तेरा वर्षांच्या काळात त्यांनी महाराष्ट्रात भटकंती केली. विपुल लेखन केले. साहित्य संस्कृतीच्या व सामाजिक संस्था, संघटनांबरोबर काम करीत राहिले. मग ते महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्षपद असो वा आण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन असो. याच काळात पुरोगामी विचारप्रवाहाच्या संस्था, संघटना कार्यकर्ते यांना शक्य तेवढे सहकार्य, मदत करण्याची भूमिका ते घेत राहिले. पुण्यातील सार्वजनिक कार्यक्रमातील अध्यक्षस्थान या काळात सर्वाधिक वेळा प्रधानांनीच भूषविले असावे. विविध क्षेत्रातील मित्रपरिवार त्यांच्याशी या काळात अधिक जोडला गेला.[५]

## ४.४ ग.प्र.प्रधान यांचे 'साधना'तील सहसंपादक असतानाचे लेखनकार्य :–

२६ जानेवारी १९८४ पासून वसंत बापट हे संपादक व ग.प्र.प्रधान हे सहसंपादक झाले. वसंत बापट हे श्रेष्ठ कवी आणि उत्तम गद्यलेखक होते. 'साधना'ला असा प्रतिभावान संपादक लाभल्यावर 'साधना'चे स्वरूप बदलणे स्वाभाविक होते. वसंत बापट यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुंदर आविष्कार 'तुमचे आमचे मैत्र जन्मांतरीचे' या त्यांच्या संपादकीयामध्ये झाला(५ एप्रिल १९८४). राष्ट्र सेवा दलाचे शिल्पकार भाऊसाहेब रानडे यांच्या निधनानंतर 'साधना'ची खास पुरवणी काढण्यात आली. त्यामधील वसंत बापट यांचा 'सेनापती भाऊसाहेब रानडे यांना अखेरचा प्रणाम' हे संपादकीय भावपूर्ण आहे. सानेगुरूजींच्या स्मृतिदिनला ११ जून १९८४ मध्ये 'दक्षिण ध्रुव प्रदेश विशेषांक' काढण्यात आला आणि यदुनाथ थत्ते यांनी या अंकामध्ये दक्षिण ध्रुव प्रदेशाच्या शोधाचे सम्यक दर्शन घडविले.[६]

१५ ऑगस्ट १९८४ रोजीचा स्वातंत्र्य दिन अंक हा 'महिला समस्या' अंक काढण्यात आला. या अंकातील शकुंतलाबाई परांजपे यांची मुलाखत फारच उद्‌बोधक आहे. साधनाच्या नेहमीच्या अंकामध्ये राजकारण, समाजकारण तसेच सामाजिक न्यायासाठी होणाऱ्या चळवळी यांना प्राधान्य असणार, हे प्रा. वसंत बापट यांना मान्य होते. मात्र, 'साधना'चा दिवाळी अंक ललित साहित्याचाच असेल, असा निर्णय त्यांनी घेतला. १९८४ सालच्या दिवाळी अंकापासून ही सुरूवात झाली. साहित्य क्षेत्रातील प्रा.वसंत बापट यांचे सर्व स्नेही कवी आणि ललित गद्य लेखक यांच्या लेखनाने 'साधना'चा दिवाळी अंक सजत असे.[७]

१ मे १९८५ चा 'महाराष्ट्र दिन अंक' ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. बापटांनी त्या अंकाला सीर्षक दिले होते. 'महाराष्ट्र राज्य : स्वप्न आणि वास्तव विशेषांक' या अंकातील एस.एम.जोशींचा 'संयुक्त महाराष्ट्र : स्वप्न आणि वास्तव' हा लेख नागपूरचे मा.गो.वैद्य यांनी लिहिलेल्या 'संयुक्त महाराष्ट्रातील विदर्भ' हा लेख आणि 'प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विकासाची नवी दिशा' हा डॉ.म.गो.बोकरे यांचा लेख हे फारच उद्‌बोधक आहेत.[८]

## ४.५ ग.प्र.प्रधान साधनाचे संपादक असतानाचे लेखनकार्य :–

सन १९८५ मध्ये ग.प्र.प्रधान हे 'साधना' साप्ताहिकाचे संपादक बनले. त्यावेळी नानासाहेब गोरे त्यांना म्हणाले होते की, 'सन १९८४ अखेरपर्यंत तू जनता पक्षाचा आमदार होतास, म्हणून तुला सहसंपादक राहण्यास सांगितले. कारण तू संपादक असताना जनता

पक्षावर टीका करणारा मजकूर 'साधना'त आला असता, तर पक्षाने तुला खुलासा विचारला असता. आता तू जनता पक्षाचा आमदार नाहीस, पदाधिकारी नाहीस, तुझ्या लेखनावर आता कोणाचे बंधन नाही. 'साधना'ही कोणत्याही पक्षाला बांधील असता कामा नये, हे पथ्य आम्ही समाजवादी पक्षाच्या वेळीही पाळले. बापट आणि तू परस्परपूरक संपादक झाले पाहिजे.' या नानासाहेब गोरे यांच्या बोलण्यावरून ग.प्र.प्रधान यांच्या लक्षात आले की, ते निर्णय घेताना किती बारीक विचार करतात.

ग.प्र.प्रधान यांनी 'साधना'साप्ताहिकात १० ऑक्टोबर १९८५ रोजी पहिला अग्रलेख लिहिला. तो म्हणजे 'भारतीय समाजवादी चळवळीचे दोन शिल्पकार' हा होय. त्यात त्यांनी जयप्रकाश नारायण आणि डॉ.लोहिया या दोन नेत्यांनी भारतातील समाजवादी चळवळीस जे योगदान केले, त्याचे विवेचन केले. सन १९८५ चा 'साधना' अंक प्रा.बापट यांनी घेतलेल्या अपार कष्टांमुळे सर्वांगसुंदर झाला होता.[९]

सन १९४२ च्या चळवळीतील ग.प्र.प्रधान यांचे सहकारी मा.श्री गोखले हे खादी बोर्डामध्ये अनेक वर्षे अधिकारी म्हणून काम करीत होते. त्यांचा मुलगा आय.ए.एस. झाल्यावर त्याची नागालँडमध्ये कमिशनर म्हणून नेमणूक झाली. श्री.गोखले हे निवृत्त झाल्यावर नागालँडमध्ये गेले. तेथे त्यांनी खादीचा प्रसार केला आणि अनेक विधायक कामे केली. ते १० वर्षाहून अधिक काळ काम करीत होते. त्यांनी 'साधना'त त्यांचे अनुभव कथन करावे असे प्रा.बापटांनी आणि ग.प्र.प्रधान यांनी सुचविले. त्यांनी ते मान्य केले आणि 'ईशान्य भारतातील नागा प्रमेय' या विषयावर २६ जानेवारी १९८६ ते ३ एप्रिल १९८६ या काळात दहा लेख लिहिले. या लेखाचे वाचकांनी मनःपूर्वक स्वागत केले.[१०]

त्यानंतर १ मे दिनाच्या शतसंवत्सरीनिमित्त 'साधना'चा मे दिन खास अंक प्रसिद्ध झाला. या सुमारास मिझोराममधील बंडखोर नेते लाल डेंगा हे भारताच्या मुख्य प्रवाहात सामील होणार, अशी वार्ता आली. तेव्हा वसंत बापट ग.प्र.प्रधान यांना म्हणाले की, 'तू ईशान्येच्या राज्यांचा दौरा करून मिझोराममध्ये लाल डेंगा प्रगट होणार आहे त्या दिवशी तेथे जा.' ग.प्र.प्रधान यांनाही सुवर्णसंधीच वाटली. स्वातंत्र्यसैनिक म्हणून त्यांना रेल्वेने भारतभर कोठेही एका मित्रासमवेत प्रवास करता येत होता. म्हणून ग.प्र.प्रधान हे डॉ.कुमार सप्तर्षींना बरोबर निघाले. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर व मिझोराम या चारही राज्यांत ग.प्र.प्रधान गेले.

भारताच्या सरहद्दीवर मणिपूरपासून ४५ कि.मी.वर असलेल्या मोअिरांग येथे सुभाषबाबू आझाद हिंद सेनेसह पाहोचले होते. तेथे त्यांचे स्मारक आणि वस्तुसंग्रहालय आहे. मणिपूरचे त्यावेळचे मुख्यमंत्री रिशांग केशांग हे पूर्वी समाजवादी पक्षात असल्यामुळे ग.प्र.प्रधान यांचे मित्र होते. त्यांनी ग.प्र.प्रधान यांची मोईरांगला जाण्याची व्यवस्था केली. प्रवासाच्या शेवटी ग.प्र.प्रधान हे सिल्चरमार्गे मिझोरामला गेले. मिझोरामचा काही भाग ब्रम्हदेशात आहे. मिझोरामची राजधानी ऑयझॉल येथे ग.प्र.प्रधान व त्यांचे सहकारी पाहोचले. ग.प्र.प्रधान हे पूर्वी महाराष्ट्रात आमदार असल्याने शासकीय विश्रामगृहातच उतरले. त्यांच्या शेजारच्या खोलीत आत्मार्पण करणारे चार तरूण बंडखोर होते. दुसऱ्या दिवशी लाल डेंगा हे बंडाची भूमिका सोडून भारतात आले. त्या समारंभास ग.प्र.प्रधान हजर होते. त्यांनी येताना एक दिवस त्रिपुरात मुक्काम केला. अरूणाचल प्रदेश वगळता ईशान्येकडील सहा राज्यामध्ये ग.प्र.प्रधान हे मनसोक्त फिरले. दौऱ्यात सर्व टिपणे केली आणि परत आल्यावर १५ ऑगस्ट १९८६ च्या स्वातंत्र्य दिन खास अंकामध्ये 'ईशान्येकडील वारे' हा सविस्तर लेख लिहिला. प्रा.बापट यांना फार समाधान वाटले.[११]

राष्ट्र सेवा दल कलापथकात वसंत बापट, आवाबेन, सुधा वर्दे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली आणि पुढे चित्रपटसृष्टीत कलावंत म्हणून मान्यता पावलेली स्मिता पाटील हिचे अकाली निधन झाले. तिच्यावर वसंत बापट यांनी लिहिलेला 'स्मिता – एक मनस्वी जिद्दीची अस्मिता' हा लेख अविस्मरणीय होता.

२६ जानेवारी १९८७ चा खास अंक ग.प्र.प्रधान यांनी विलासराव साळुंखे यांच्या मदतीने 'महाराष्ट्रातील दुष्काळ आणि पाण्याचे न्याय्य वाटप' यावर काढला.[१२] ११ जून १९८७ रोजीचा खास अंक वसंत बापट यांनी साने गुरूजींच्या लिहिलेल्या 'अक्षर शिल्पांचा शिल्पकार' हा अग्रलेखबहारीचा होता.[१३]

सन १९८७ च्या दिवाळी अंकाचे वैशिष्टये म्हणजे कालिदासाच्या 'मेघदूता'चा प्रा.बापट यांनी केलेला 'मेघह्रदय' हा अनुवाद. याच अंकात कवयित्री इंदिरा संत यांची 'मालन गाथा' प्रसिद्ध झाली. या दिवाळी अंकाच एक विभाग श्रेष्ठ चित्रकार 'सुभाष अवचट' यांच्या चित्रकलेचे विविध दर्शन हा होता. प्रा.बापट हे स्वतः संगीत, चित्रकला यांचे अभिजात रसिक असल्यामुळे सुभाष अवचट यांच्यावरील ही पुरवणी 'साधना' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली.[१४]

१ मे १९८८ च्या 'साधना'च्या महिला समस्या विशेषांकाचेही सर्व वाचकांनी स्वागत केले. ३ सप्टेबर १९८८ च्या अंकामध्ये 'सरदार सरोवर : विकास नव्हे विनाश' या अग्रलेखामध्ये ग.प्र.प्रधान यांनी मेधा पाटकर यांच्या भूमिकेचे जोरदार समर्थन केले.[१५]

'साधना' या साप्ताहिकात ग.प्र.प्रधान यांचे उल्लेख मोठया प्रमाणावर आहेत. तसेच प्रधान सरांचे लेखही आहेत. एवढेच नव्हे तर 'महाराष्ट्राची मानचिन्हे' या पुस्तकामध्ये लोकमान्य टिळकांच्यावर अप्रतिम लेख लिहिला होता. अर्थात सरांचेच टिळकांवरचे एक पुस्तकही प्रसिद्ध केले आहे. यातील लेखांमध्ये लोकमान्य टिळकांचे त्यांनी केलेले वर्णन इतके अचूक ठरते की टिळकांचे व्यक्तिमत्त्व किती विविधांगी होते हे अगदी थोडया शब्दांत प्रधान सरांनी मांडले होते. महात्मा गांधीजींनी लोकमान्य टिळकांच्याविषयी केलेल्या विधानाचे स्मरण प्रधान सरांनी आपल्या लेखात करून दिले होते. आपल्या जीवनात टिळकांची देशभक्ती, त्यांचा त्याग, साधेपणा आणि निर्भयता याचे अनुकरण करणे म्हणजे चिरकाल टिकून राहणारे त्यांचे स्मारक उभारणे होय असे गांधीजी म्हणाले होते. प्रधान सरांनी हे वाक्य लक्षात ठेवूनच कदाचित गांधीवादी समाजवादाचा आपल्या जीवनातही अंगीकार केला असावा. साधी राहणी हे तर त्यांचे वैशिष्टय होते. परंतु आपल्या विचारांचा प्रतिपादनामध्ये निर्भयपणाचा किंवा धीरोदत्तपणाचा त्यांनी केलेला वापर म्हणजेच गांधीजींचे त्यांनी केलेले अनुकरण ठरते. प्रधानसरांनी शेवटपर्यंत समाजवादाची मूल्ये जपण्याचा प्रयत्न केला. समाजातल्या शेवटच्या माणसाला केंद्रबिंदू मानून शक्य तेवढे प्रयत्न आणि उपक्रम केले. समाजवादी कार्यकर्त्यांच्या शृंखलेतला अतिशय साधेपणाने वावरणारा आणि स्वदेशी संबंध राखणारा एक महत्त्वाचा दुवा निखळला आहे, असे स्पष्ट होते.[१६]

प्रा.बापट यांच्यामुळे कुसुमाग्रज हे 'साधना'त नेहमी लिहित. १७ मार्च १९८९ च्या अंकामध्ये कुसुमाग्रज यांनी लिहिलेल्या, 'माझ्या कवितेच्या उजेडात माझे मी पण मला सापडले' हा लेख अत्यंत वैशिष्टयपूर्ण आहे. चित्रकार ओके हे एक प्रतिभावान कलावंत होते. त्यांचे निधन झाल्यावर नानासाहेब गोरे आणि वसंत बापट यांनी ओके यांच्यावर लिहिलेल्या लेखातून त्यांच्या कलेचे आणि व्यक्तिमत्त्वाचेही दर्शन होते.[१७]

२७ मे रोजी ग.प्र.प्रधान यांनी पंडित नेहरू जन्मशताब्दी अंक काढला. तो वाचकांना फार आवडला. नंतर काही महिन्यांनी त्यांनी सरदार पटेल यांच्यावर खास अंक काढला.[१८]

ऑक्टोबर १९८९ च्या दिवाळी अंकासाठी बापटांनी नेहमीप्रमाणेच उत्तमोत्तम साहित्य मिळविले.[१९] दा.गो.देशपांडे आणि विद्याधर म्हैसकर यांचे त्यातील लेख फारच सुंदर आहेत. १९९० च्या मार्च आणि एप्रिलमध्ये नानासाहेब गोरे यांनी लिहिलेले 'ताओ ते चिंग' हे चार लेख अत्यंत उद्बोधक आहेत.[२०]

११ जून १९९० चा अंक आम्ही 'बालिक विशेषांक' म्हणून काढला. १५ ऑगस्ट १९९० च्या खास अंकातील वसंत बापट यांचा 'बालकवींच्या अंतरंगातला श्रावण' हा लेख मनोज्ञ आहे. १४ एप्रिल १९९१ रोजी साधनाचा जो अंक निघाला तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक काढला होता. त्याचे सर्व पुरोगामी कार्यकत्यांनी मनःपूर्वक स्वागत केले.[२१]

या काळात 'अरूणश्री' या टोपण नावाने लिहिणाऱ्या तरूण लेखकाने, 'विदेशी गुलबकावली' असे विदेशी साहित्यावर आधारित बहारीचे लेख लिहिले. त्यांची लेखनशैली आगळी होती. १५ ऑगस्ट १९९२ च्या ऑगस्ट क्रांती–सुवर्ण महोत्सव विशेषांक महत्त्वाचा आहे. डॉ.उषा मेहता, मृणालिनी देसाई या स्वातंत्र्य लढयातील झुंजार महिलांच्या आठवणी सांगणारे लेख हे या अंकाचे वैशिष्टय होते.[२२]

सन १९९२ मधील कुमार गंधर्वाच्यावरील खास अंक आणि त्या अंकातील वसंत बापट यांचे संपादकीय नितांत सुंदर आहे. वसंत बापट यांच्या प्रतिभेला वारंवार नवे धुमारे फुटत. त्यांचे 'विसाजीपंतांची बखर' हे प्रचलित राजकारणाचे विडंबनात्मक चित्रण करणारे खास बखरीच्या शैलीतील लेख फार बहारीचे होते. वाचकांना बापटांचा विनोद अतिशय आवडला.[२३] १५ ऑगस्ट १९९२ च्या अंकात ऑगस्ट क्रांतीचा सुवर्ण महोत्सव आता देशभर साजरा होत आहे. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या स्त्रीपुरूषांना संग्रामाची हकीगत विस्ताराने सांगायलाच हवी, या दृष्टीने या संग्रामातील अखेरच्या पर्वाची, म्हणजेच १९४२ च्या आंदोलनाची पार्श्वभूमी या अंकात सविस्तर सांगितली आहे. यामध्ये स्वातंत्र्य संग्रामाच्या महाभारतातील अखेरचे पर्व म्हणजेच 'चले जाव' आंदोलन होय. या चळवळीचे रणसिंग जरी ८ ऑगस्ट १९४२ रोजी फुंकले गेले तरी दुसऱ्या महायुद्धाच्या सुरूवातीपासूनच साम्राज्यसत्ता आणि भारतीय जनता यांच्यामध्ये संघर्षाची ठिणगी पडली. ३ सप्टेंबर १९३९ रोजी दुसरे महायद्ध सुरू झाले. एका बाजूस जर्मनी आणि इटली ही हुकूमशाही राष्ट्रे होती. भारताच्या नेत्यानी हुकुमशाही जगाला

विनाशाकडे नेणारी विचारसरणी आहे म्हणून भारत हुकूमशाहीविरोधी उभा राहील अशी भूमिका सतत घेतली होती. असे असल्यामुळे भारताची सहानुभूती लोकशाहीवादी शक्तींच्या बाजूस होती. परंतु ब्रिटिनसारख्या साम्राज्यवादी राष्ट्रास आपण लोकशाहीवादी आहोत असे साांगण्याचा नैतिक अधिकार नाही, हे भारताच्या नेत्यांनी आणि विशेषतः महात्मा गांधीनी स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यवादी भारत आमच्या बाजूने युद्धात सामील झाला आहे. असे जाहीर केल्यावर काँग्रेसने 'भारताचा पाठिंबा इंग्लंडला सक्तीने मिळविता येणार नाही.' अशी भूमिका जाहीरपणे घेणाऱ्या जयप्रकाश नारायण व आणखी काही पुढाऱ्यांना तुरूंगात डांबले. पुढे १९४० मध्ये महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार काँग्रेसने वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे हे होते आणि दुसरे सत्याग्रही पंडित नेहरू हे होते. ही पुढील देशव्यापी लढयाची पूर्वतयारी होती.

पुढे १९४१ साली प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या दबावामुळे इंग्लडतर्फे सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ भारतीय नेत्यांशी बोलणी करण्याकरिता आले. महायुद्ध संपल्यानंतर भारताला ब्रिटिश साम्राज्यातंर्गत स्वायत्तता दिली जाईल, असे या शिष्टमंडळाने सांगितले. परंतु 'भारतास आताच स्वातंत्र्य हवे' अशी भूमिका गांधीजींनी व काँग्रेसने घेतली. 'स्वतंत्र भारतातील जनताच स्वतःचे रक्षण करील, पारतंत्र्यात असताना भारतीय जनता ब्रिटनला पाठिंबा देऊ शकणार नाही', ही गांधीजींची भूमिका होती.

सन १९४२ च्या 'चले जाव' चळवळीची पार्श्वभूमी वरीलप्रमाणे नमूद केली आहे. तसेच चले जाव ठराव आणि जनतेचा उठाव, याचेही सविस्तर वर्णन या अंकात केले आहे. ही चळवळ सुरू करण्यापूर्वीच काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्याचीही माहिती दिलेली आहे. या चळवळीतूनच पुढे भूमिगत चळवळ सुरू झाली. सातारा जिल्हयात प्रतिसरकारची स्थापना झाली. तिचे नेतृत्व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी कशाप्रकारे केले आहे, याचीही सविस्तर माहिती दिलेली आहे. जयप्रकाश नारायण यांचे तुरूंगातून पलायन, भूमिगत चळवळीमधील नवे चैतन्य, महात्मा गांधीजींनी केलेले उपोषण, तुरूंगातून गांधीजींची झालेली मुक्तता या सर्व घटनांचे सविस्तर वर्णन या अंकात दिलेले आहे.[२४]

२२ ऑगस्ट १९९२ पासून त्यांनी 'अनामिकाची अंभगवाणी' हे नवे सदर सुरू केले. हे प्रासंगिक काव्यही अत्यंत रसाळ होते.[२५] १ एप्रिलच्या सामाजिक सुसंवाद अंकामध्ये प्रमिला दंडवते यांचा 'पराभूत शहाबानो' हा लेख हृदयस्पर्शी होता.[२६]

१५ जून १९९३ चा नानासाहेब गोरे स्मृती अंक वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९९३ मध्ये मराठवाडयात झालेल्या भूकंपाची माहिती देणारे आणि मदत कार्याची माहिती देणारे लेख सतत प्रसिद्ध केले.[२७]

१ मे १९९३ पासून वसंत बापट आणि ग.प्र.प्रधान यांना मदत करण्यास 'जनवाणी'च्या माजी संपादक कुमुद करकरे या सहसंपादक म्हणून काम करू लागल्या.[२८] १४ जुलैच्या लेखात 'लोकसंख्या विस्फोट : एक राष्ट्रीय संकट' हा अग्रलेख अत्यंत पोटतिडकीने लिहिलेला आहे.[२९] १५ ऑगस्ट १९९४ च्या खास अंकातील 'स्वातंत्र्यदिन : समारंभ नव्हे व्रतपालन' हा वसंत बापटांनी लिहिलेला अग्रलेख अत्यंत उद्‌बोधक आहे.[३०]

२६ नोव्हेंबरच्या 'साधना'तील 'शेषन मारी सोटा सांभाळ कासोटा' आणि २१ जानेवारी १९९५ च्या 'साधना'तील 'पुंड पाळेगारांनी लोकशाहीला लावलेला सुरूंग' या वसंत बापटांनी लिहिलेल्या अग्रलेखातील उपरोधिक आशय अत्यंत मर्मभेदक आहे.[३१]

'भाजपाचे बहिरंग आणि अंतरंग' हा १८ नोव्हेंबर १९९५ च्या 'साधना'तील अग्रलेख अत्यंत सडेतोड आहे.[३२] ४ मे १९९६ च्या अंकातील 'महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने' हे संपादकीयही मोठे मार्मिक आहे.[३३] २२ जून १९९६ च्या 'साधना'मधील स्ंपादकीयात रशियातील अस्थिर परिस्थितीचे सुक्ष्म विश्लेषण आहे. अग्रलेख 'होल्गातीराचा डुगडुगबाजा' हे शीर्षकही अभिनव आहे.[३४]

१७ ऑगस्ट १९९६ च्या खास अंकातील 'सुवर्ण महोत्सवी वर्षात मूक क्रांतीकडे 'या संपादकीयातून भारताच्या भविष्यासंबंधी व्यक्त केलेल्या अपेक्षातून 'साधना'चा वैशिष्टयपूर्ण पुरोगामी दृष्टिकोन प्रत्ययास येतो.[३५] १ फेब्रुवारी १९९७ च्या अंकातील 'राष्ट्रपित्यास अनावृत्त पत्र' या संपादकीयातून वर्तमान स्थितीबद्दलचा उद्वेग व्यक्त करताना महात्मा गांधीजींच्या विचारांच्या आधारेच वाटचाल करावयास हवी, ही भूमिका मांडलेली आहे.[३६]

सन १९८४ ते १९९७ या काळात ग.प्र.प्रधान यांनी साधनाचे मानद संपादक म्हणून काम करताना 'साधना' साप्ताहिक सर्वार्थाने संपन्न झाले. साने गुरूजीनी अखेरच्या पत्रामध्ये

रावसाहेब पटवर्धन किंवा वसंत बापट यांनी 'साधना'ची जबाबदारी घ्यावी असे लिहिले होते. वसंत बापट यांनी 'साधना'तून विपुल लेखन केले. वसंत बापट यांच्याबरोबर काम करताना ग.प्र.प्रधान यांना अत्यंत सुखद व चैतन्यदायी अनुभव आला होता. अशाप्रकारे ग.प्र.प्रधान हे 'साधना'चे मानक संपादक असतानाही वसंत बापट यांनी त्यांना सहकार्य केल्याचे दिसून येते.

## ४.६ एस.एम.जोशी यांची शाबासकी :–

एस.एम.जोशी यांनी प्रधान सरांना लेखणीच्या बाबतीत काही मर्यादा स्पष्ट करून सांगितल्या होत्या. त्या प्रधान सरांनी तंतोतंत पाळल्या. ग.प्र. प्रधान त्यांच्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करीत असत. एकदा एस.एम.ना त्यांच्या मित्राचे अग्रलेखाची स्तुती करणारे पत्र आले. त्याने लिहिले होते, हा अग्रलेख तुम्हीच लिहू शकता, आणि खरे म्हणजे त्या दिवशी एस.एम.पुण्यात नव्हते. तो अग्रलेख प्रधानांनी लिहिला होता. एस.एम.प्रधानांच्या पाठीवर थाप मारून म्हणाले, प्रधान तू पास झालास.माझ्या मनातील प्रक्रिया त्यात बरोबर उमटली. प्राध्यापक असताना केलेल्या वाचनाचा फायदा त्यांना मिळाला.[३७]

'साधना'मध्ये संपादक म्हणून ग.प्र. प्रधान आणि वसंतराव अग्रलेख लिहिण्यापूर्वी आणि अन्य मजकुरासंबंधी नियमाने चर्चा करीत असे. ग.प्र. प्रधान म्हणतात, आमच्यात मतभेद झाला वा एखादया प्रश्नावर काय भूमिका घ्यायची, यासंबंधी आमच्या दोघांच्याही मनात संभ्रम असला तर एस.एम.किंवा गोरे यांच्याकडे आम्ही जात असू. वसंतराव बापट हे जरी कवी होते, आणि ग.प्र. प्रधान समाजवादी पक्षामध्ये अनेक वर्षे कार्य करीत असले तरी वसंतरावांची राजकीय जाण अत्यंत प्रगल्भ होती, हे प्रधान सरांना चर्चेत सतत आढळून येई. राजकीय प्रश्नांवर ग.प्र. प्रधान अधिक लिहित असत आणि सांस्कृतिक विषयांवर वसंतराव अधिक लिहित असत. परंतु एकमेकांशी चर्चा करूनच आम्ही बहुतेक सर्व अग्रलेख लिहिले. साधनाचे बाहय रूप कसे असावे, या बाबतीत मात्र ग.प्र. प्रधान बापटांचे मतच प्रमाण मानत होते.[३८]

## ४.७ 'साधना'तील अडचणींवर मात :–

प्रधान सरांनी साधनाचे संपादक पद स्वीकारले तेव्हा अनेक आर्थिक अडचणी होत्या. कामगारांचे पगार, ग्रॅच्युईटी थकलेली होती. पण परिस्थिती अचानक सुधारली. त्यावेळी साधना प्रेस व कार्यालय निवलकरांच्या वाडयात होते. त्यांनी नवी इमारत बांधायचे ठरवले आणि त्यासाठी साधनाचा भाग विकत घेतला. त्या रकमेतून कामगारांचा थकलेला पगार व ग्रॅच्युईटी

देता आली. कर्जाचा  बोजा उतरला. निवलकरांनी शनिवार पेठेतील जागाही ताब्यात घेतली आणि भाडेकरू म्हणून साधनाला दोन मजले बांधून मिळाले. तिथे साधना प्रेस, साधना प्रकाशन सुरू झाले. साने गुरूजींबद्दलच्या आदर्शामुळेच आणि प्रेमामुळेच अनेकांनी सहाय्य केले आणि साधना अडचणींवर मात करू शकली.[३९]

## ४.८ 'साधना' साप्ताहिकाला आलेल्या अडचीी :-

साधनाचा आठवडयात अंक तयार होत असे. त्या दिवशी काम संपल्यावर डॉ.देशपांडे, वसंतराव बापट आणि ग.प्र. प्रधान बाहेर फिरण्यासाठी जात असत आणि भरपूर जेवणाचा आस्वाद घेत असत. 'साधना'मध्ये लिहित असताना किंवा काम करत असताना सरांना एकसारखा चहा लागत असे. सर 'साधना'तल्या कर्मचाऱ्यांवर चिडले की, राग कमी होण्यासाठी चहा पीत होते आणि लेख लिहून झाला म्हणूनही चहा पित असत.[४०]

प्रधान सरांचे लेखन संध्येप्रमाणे सातत्याने सुरू होते. 'साधना' संस्थेबरोबर त्यांचा संबंध आला. साधनाची वैचारिक बैठक अधिक मजबूत करण्याचे काम प्रधान आणि वसंत बापट यांनी केले. ते साधनाचे अखेरपर्यंत विश्वस्त होते. ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर मला आता विश्वस्त पदावरून मुक्त करा असा त्यांचा आग्रह होता.[४१]

## ४.९ साधनातील कामानिमित्त ईशान्य दौरा :-

मिझोराममधील बंडखोर नेते लाल डेंगा हे मुख्य प्रवाहात सामील होणार अशी वार्ता आली, तेव्हा वसंत बापट प्रधान सरांना म्हणाले, तू ईशान्येच्या राज्यांचा दौरा कर. मिझोराममध्ये लाल डेंगा प्रकट होणार आहे. त्यादिवशी तेथे जा. प्रधान सरांना ही सुवर्णसंधीच वाटली होती. ते स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे त्यांना रेल्वेने भारतभर कोठेही एका मित्रासमवेत प्रवास करता येत होता. ग.प्र.प्रधान डॉ.कुमार सप्तर्षींना बरोबर घेऊन गेले होते. या वेळी ग.प्र. प्रधान आसाम, मेघालय, नागालँड, मणीपूर, मिझोराम या चारही राज्यांत ते गेले होते. भारताच्या सरहद्दीवर मणिपूरपासून ४५ कि.मी.वर असलेल्या मोझीरांग येथे सुभाषबाबू आझाद हिंद सेनेसह पोहोचले होते. तेथे त्यांचे स्मारक व वस्तुसंग्रहालय आहे. मणिपूर येथे त्यावेळचे मुख्यमंत्री थिशांग केशांग हे पूर्वी समाजवादी पक्षात असल्यामुळे प्रधान सरांचे मित्र होते. प्रधान सरांची त्यांनी मोझीरांगला जाण्याची व्यवस्था केली होती. ते ज्या ठिकाणी शासकीय

विश्रामगृहात राहिले होते, त्याच ठिकाणी आत्मसमर्पण करणारे चार तरूण बंडखोर होते. ते दुसऱ्या दिवशी लाल डेंगा ही बंडाची भूमिका सोडून भारतात आले. त्या समारंभास ग.प्र. प्रधान हजर होते.[४२]

प्रधान सरांची 'साधना'मध्ये तेरा वर्षांची साधना झाल्यानंतर १९९८ अखेर ते संपादक पद सोडून ती जबाबदारी डॉ.नरेंद्र दाभोळकरांकडे सोपवली. २००२ साली वसंतराव बापट वारले. सदानंद वर्देही साधनाचे कार्यकारी विश्वस्त होते. दिवाळी अंकाला ते मोठया प्रमाणात जाहिराती मिळवून आणत होते. साधना हे पुरोगामी चळवळीचे मुखपत्र झाले पाहिजे ही साने गुरूजींची महत्त्वाकांक्षा या सर्व संपादकांनी पूर्ण करण्याचे प्रयत्न केले. दाभोळकरांनीही तो वारसा पुढे चालवला आहे. याचे प्रधान सरांना समाधान वाटत होते.[४३]

## ४.१० स्वतः चे राहते घर साधना ट्रस्टला देणगी :-

प्रधान सरांनी आपले आयुष्य आणि देह चंदनाप्रमाणे देशासाठी व समाजकार्यासाठी झिजवला. त्यांना निष्काम कर्मयोगी म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यांना निष्काम कर्मयोगी यासाठी म्हणावेसे वाटते की, त्यांनी कर्म केले परंतु फळाची अपेक्षा कधीच धरली नाही. ते समाजासाठी अहोरात्र कष्ट करत राहिले.

१९९९ साली त्यांनी व त्यांच्या पत्नीने इच्छापत्र करून आपल्या पश्चात आपले घर 'साधना' ट्रस्टला देण्याची व्यवस्था केली. १६ जुलै २००३ रोजी मालविकाबाईंचे निधन झाले. त्यानंतर प्रधान सरांनी एक खोली स्वतःकडे ठेवली व बाकी घर साधना ट्रस्टला देऊन टाकले. त्यामुळे 'साधना' प्रकाशनाच्या पुस्तकांची सोय झाली. संपादकाची निवास व्यवस्थाही झाली. त्यांची बरीच पुस्तके साधना प्रकाशनाने काढलेली असून त्याची रॉयल्टी साधनालाच मिळते. त्याचे रूपांतर कर्मचारी कल्याण निधीत केले. त्यांनी लिहिलेली पुस्तके त्यांना मित्र-मंडळींना पाठवणे आवडत असे. त्यासाठी ते 'साधना'कडून विकत घेत असत. नंतर प्रधान सरांनी प्रापंचिक आसक्ती सोडण्याचीच भूमिका घेतली. २००२ साली पुण्यात महाराष्ट्र फौंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला, त्यावेळी त्यांनी जाहीर केले, यापुढे मी कोणत्याही समारंभात भाषण करणार नाही आणि कोणताही पुरस्कार स्वीकारणार नाही.[४४]

**अण्णा हजारे-** प्रधान मास्तरांनी संबंध आयुष्य समाजासाठी अर्पण केले. स्वतःजवळ काहीही ठेवले नाही. घरही साधनाच्या कार्यालयास अर्पण केले, असा माणूस होणे नाही.[४५]

'साधना' साप्ताहिकाचा हीरक महोत्सवासाठी पैसा गोळा करायला ते स्वतः बाहेर पडले होते. सदानंद वर्दे, आप्पासाहेब सारे पाटील, ग.प्र. प्रधान आणि नरेंद्र दाभोळकर पुणे महानगरपालिकेचे त्यावेळचे आयुक्त श्री.नितीन करीर यांना भेटायला गेले. त्यांच्याकडून दहा लाखांची देणगी मिळावी अशी अपेक्षा होती. त्यासाठी स्थायी समिती अध्यक्ष, महापौर अशा चार–सहा जणांना तरी भेटावे लागणार होते. आयुक्त श्री.करीर जेथे बसले होते त्या खोलीत आले. त्यांनी प्रधान सरांना वाकून नमस्कार केला आणि त्यांना म्हणाले, तुम्ही कोणाकडे जाऊ नका. मी दहा लाख रूपये देतो. गेल्या दीड वर्षांत मी स्थायी समितीला माझं म्हणून कसलंही काम सांगितल नाही. हे मी माझं काम म्हणून करून घेईन आणि खरोखरंच त्यांनी ते केलं. सहयाद्री बंगल्यावर त्या वेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना भेटण्यासाठी गेले असतानाही असाच अनुभव आला. त्यांनी त्वरित लेखी आदेश दिले आणि पूर्तता केली.

## ४.११ 'साधना' साप्ताहिकाचा हीरक महोत्सवी कार्यक्रम :–

साने गुरूजींनी १९४५ साली सुरू केलेल्या साधना साप्ताहिकाचा हीरक महोत्सव कार्यक्रम साजरा करण्याचा योग प्रधान सरांना आला होता. त्यासाठी ते वाढत्या वयातही निधी गोळा करण्यासाठी फिरले. या कार्यक्रमासाठी तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना बोलावले होते. राष्ट्रपतींनी प्रसार माध्यमाचे कार्यक्रम न घेण्याचे संकेत आहेत. परंतु राष्ट्रपतींनी साधनाचा अपवाद केला. ग.प्र. प्रधान आणि मोहन धारिया यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी कार्यक्रम स्वीकारला. समारंभाचे वेळी त्यांच्या स्वतंत्र मार्गाने त्या व्यासपीठाकडे निघाल्या होत्या. वाटेत ग.प्र. प्रधान उभे होते. हात जोडून ते म्हणाले, 'प्रतिभाताई तुम्ही आलात, मी भरून पावलो'. प्रतिभाताई त्यांचा हात हातात घेऊन म्हणाल्या, 'प्रधान तुम्ही बोलवलत आणि मी आले नाही असं कसं होईल' ?

कार्यक्रम संपल्यानंतर व्यासपीठानुसार लष्करी शिस्तीनुसार राष्ट्रपतींचे प्रयाण होते. प्रतिभाताईंनी तो पायंडा मोडला. व्यासपीठावर थांबून प्रधान सरांशी गप्पा मारल्या आणि त्यांचा हात आपल्या हातात घेऊन तो एकत्रपणे उंचावत वृतपत्रांना छान छायाचित्र देऊ केले.[४६]

## ४.१२ 'साधना'मधील त्यांचे सहकारी :-

प्रधान सरांचे अनेक वेगवेगळया क्षेत्रात मित्र होते. मग ते शैक्षणिक क्षेत्रात असो वा राजकारणात. विरोधी पक्षात असो वा सत्ताधाऱ्यांमध्ये. त्यांच्या पक्षातील असो वा अन्य पक्षातील. त्याचप्रमाणे त्यांचे 'साधना' साप्ताहिकामध्ये काही निवडक सहकारी होते. त्यांच्या मित्रांपैकी काही तर चळवळींमधील होते. त्या सर्वांबरोबर सरांचे संबंध जिव्हाळयाचे होते.

### ४.१२.१ यदुनाथ थत्ते :-

यदुनाथ थत्ते मूळचे नाशिकचे होते. यदुनाथ यांचे गुरु आपटे गुरूजी यांच्यामुळे साने गुरूजी नाशिकला जात आणि त्यामुळे यदुनाथांना साने गुरूजींची भाषणे ऐकण्याचा योग येई. मॅट्रिकची परीक्षा झाल्यानंतर ते पुण्यात शिक्षण घेण्यासाठी आले होते. स.प.कॉलेजचे ते सायन्स शाखेचे विद्यार्थी होते. प्रधान सरांची व त्यांची १९४१ साली राष्ट्रसेवा दलात ओळख झाली होती. आणि या ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीत झाले होते. १९४२च्या आंदोलनात त्यांना शिक्षा झाली होती. नाशिक येथील तुरूंगातून सुटल्यावर यदुनाथ पुन्हा पुण्याला शिकण्यासाठी आले होते.

यदुनाथ व ग.प्र. प्रधान मित्र असल्यामुळे 'साधना' कार्यालयात ते सतत जात असत. त्यावेळी यदुनाथांनी प्रेस कामगार, नवे कार्यकर्ते, होतकरू लेखक यांचे कुटुंबच तयार केले होते.

१९७५ साली आणीबाणी जाहीर झाल्यानंतर राजकीय कार्यकर्त्यांना तुरूंगात स्थानबद्ध करण्यात आले. त्यावेळी 'साधना'ने लोकशाहीचा पुरस्कार करण्यासाठी आणीबाणीला विरोध करावा असे यदुनाथांचे मत होते. परंतु अच्युतराव पटवर्धनांच्या सल्ल्यावरून 'साधना' हा हाराकिरी न करता कौशल्याने लोकशाहीस पाठिंबा दयावा असे ठरले होते. यदुनाथ थत्ते आणि नाना डेंगळे यांनी हे काम अत्यंत निर्भयपणे केले. यदुनाथ 'साधना'बाबत म्हणतात, 'साधना' हे साप्ताहिक नाही, ती एक चळवळ आहे.[४७]

### ४.१२.२ वसंतराव बापट :-

वसंत बापट हे एस.पी. कॉलेजचे एक हुशार विद्यार्थी होते. त्यांची व प्रधान सरांची ओळख राष्ट्रसेवा दलात झाली. नाना डेंगळे, वसंत बापट, यदुनाथ थत्ते, वासू देशपांडे आणि

ग.प्र. प्रधान यांचे एक मित्रांचे सर्कल होते. १९४८ साली आंदोलनात वसंत बापट यांनी चांगले काम केले. ते गुप्तपणे स्वतंत्र भारताचा रेडिओ चालवत होते.

पुढे वसंत बापट पकडले गेले. शिरूभाऊ, एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे आदींच्या बरोबर ते महाराष्ट्र कटाच्या खटल्यातील एक आरोपी होते. मात्र, खटला फक्त कॅपीटॉल बॉम्ब केसचा चालला. एस.एम., नानासाहेब यांच्याबरोबर वसंतरावांना १९४५ अखेरपर्यंत तुरूंगवास भोगावा लागला. पुढे शिक्षण पूर्ण करून धारवाडच्या कॉलेजमध्ये ते लेक्चरर झाले. एका वर्षांनी ते वांद्रा कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. साधनाशी वसंतरावांचा पहिल्या अंकापासून संबंध होता. साने गुरूजींच्या निधनानंतर वसंतांनी साधनाने लेखन केले. त्यांचे प्रवास वर्णनपर लेखनही साधनाच्या वाचकांना फार आवडले. रावसाहेब पटवर्धनांनी राजीनामा दिल्यावर वसंतराव काही काळ संपादक मंडळात होते. एस.एम.जोशी आणि नानासाहेब गोरे यांच्याशी वसंताचे फार जिव्हाळयाचे संबंध होते. वसंतराव १९८४ साली साधनाचे एक वर्ष संपादक होते.

### ४.१२.३ सदानंद वर्दे :–

सदानंद वर्दे हे एक हुशार आणि धडाडीचे विद्यार्थी होते. त्यांनी १९४२ सालच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. चळवळीत फार काम केल्याबद्दल त्यांना पकडून आर्थर रोड तुरूंगात टाकले होते. आणि नंतर त्यांनी पुन्हा कॉलेज सुरू केले होते. ते मुंबईतील राष्ट्रसेवा दलात काम करत होते. त्यावेळी बंडू गोरे चळवळीतील तरूणांना वैचारिक मार्गदर्शन करत होते.

वर्दे हे अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी होते. आणि त्यांनी बी.ए. फर्स्ट क्लास मिळवला होता. प्रधान सरांची आणि वर्देंची भेट राष्ट्रसेवा दलाच्या औंध येथील शिबिरात झाली. मात्र, त्यांची ही मैत्री रोहा येथील भरलेल्या राष्ट्रसेवा दलाच्या अभ्यासवर्गामध्ये झाली. त्यांनी एम.ए.ला फर्स्टक्लास मिळवला होता. आणि त्यावेळी वांद्रा येथील नुकत्याच निघालेल्या नॅशनल कॉलेजमध्ये ते अर्थशास्त्र विषयाचे लेक्चरर झाले होते.

१९८४ पासून वर्दे, बापट आणि ग.प्र. प्रधान 'साधना' साप्ताहिकात एकत्र काम करीत होते. १९८५ साली ते साधनाचे कार्यकारी विश्वस्त झाले होते. 'साधना'ला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी मदत करत होते. या काळात सदानंद वर्दे, वसंत

बापट, सारे पाटील, किशोर पवार यांनी दिवाळी अंकाला मोठया प्रमाणात जाहिराती मिळवून साधनाला भक्कम आर्थिक बळ दिले.[४८]

## ४.१३ समारोप :–

प्रधान सरांच्या कारकीर्दीतील चौथा टप्पा म्हणजे 'साधना' साप्ताहिकाचे संपादकीय कार्य हा होय. साने गुरूजींनी सुरू केलेल्या या साप्ताहिकासाठी प्रधान सरांनी आपल्या आयुष्यातील काही वर्षे साधनासाठी देण्याचे ठरविले होते. ते ज्यावेळी संपादक पदावर आले, त्यावेळी 'साधना' आर्थिक अडचणीतून जात होती. परंतु ग.प्र. प्रधान आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी यातून वाट काढली. 'साधना'च्या लेखन कार्यासाठी त्यांना भारतातील अनेक प्रांतात जाण्याचा योग आला. यामध्ये काश्मीर, पूर्वेकडील बांग्लादेश, ईशान्येकडील बहुतांश राज्ये इत्यादी ठिकाणी जाऊन प्रधान सरांनी 'साधना'साठी लेख व माहिती गोळा केली.

प्रधान सरांना विद्यार्थी दशेपासूनच पत्रकारितेची माहिती होती. एस.एम.जोशी यांनी त्यांना साधनाचे संपादक होण्यापूर्वीच जी चौकट ठरवून दिली होती, त्या चौकटीमध्ये राहून सरांनी आपले लेखन केले. ग.प्र. प्रधान 'साधना' साप्ताहिकाचे सहसंपादक व संपादक असताना प्रत्येक अंकामध्ये जळजळीत अग्रलेख देऊन त्यांनी 'साधना' साप्ताहिकाचे महत्त्व वाढविले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील १९४२ चे 'चले जाव' आंदोलन यावर त्यांनी ऑगस्ट १९९२ च्या अंकात सविस्तर माहिती देऊन सर्वांचे लक्ष या साप्ताहिकाकडे आकर्षित केले होते. त्यांनी संपादक असताना सरकारच्या चांगल्या धोरणाचे कौतुक केले, तर राजकारणामध्ये असणाऱ्या अपप्रवृत्तीवर टीका केली.

प्रधान सरांची साधना मध्ये तेरा वर्षांची साधना झाल्यानंतर १९९८ अखेर ते संपादक पद सोडून ती जबाबदारी डॉ.नरेंद्र दाभोळकरांकडे सोपवली. 'साधना'मध्ये संपादक म्हणून ग.प्र. प्रधान आणि वसंतराव अग्रलेख लिहिण्यापूर्वी आणि अन्य मजकुरासंबंधी नियमाने चर्चा करीत असे. ग.प्र. प्रधान म्हणतात, आमच्यात मतभेद झाला वा एखादया प्रश्नावर काय भूमिका घ्यायची, यासंबंधी आमच्या दोघांच्याही मनात संभ्रम असला तर एस.एम.किंवा गोरे यांच्याकडे आम्ही जात असू. वसंतराव बापट हे जरी कवी होते, आणि ग.प्र. प्रधान समाजवादी पक्षामध्ये अनेक वर्षे कार्य करीत असले तरी वसंतरावांची राजकीय जाण अत्यंत प्रगल्भ होती, हे प्रधान

सरांना चर्चेत सतत आढळून येई. राजकीय प्रश्नांवर ग.प्र. प्रधान अधिक लिहित असत आणि सांस्कृतिक विषयांवर वसंतराव अधिक लिहित असत. परंतु एकमेकांशी चर्चा करूनच आम्ही बहुतेक सर्व अग्रलेख लिहिले.

'साधना' साप्ताहिकाचे त्यांचे सहकारी म्हणजे यदुनाथ थत्ते, वसंत बापट, सदानंद वर्दे इत्यादी होत. हे त्यांचे सर्व सहकारी विद्यार्थी दशेपासून ते राष्ट्रसेवा दलात किंवा सन १९४२ च्या आंदोलनात एकत्र आलेले होते. प्रधान सरांनी 'साधना' साप्ताहिकाचे संपादक पदही सोडले होते. तसेच त्यांचे वय झाले होते. तरीही हीरक महोत्सवासाठी निधी गोळा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त असो वा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे ते स्वतः गेले व निधी संकलित केला. याच कार्यक्रमाला राष्ट्रपतींना बोलावले होते. यानंतरचे आयुष्य सरांनी वाचन, मनन व चिंतनात घालवले. शेवटी आपले राहते घर 'साधना' ट्रस्टला देऊन हडपसर येथील साने गुरूजी रूग्णालयात वास्तव्यास गेले.

'साधना' साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील सर्व प्रश्नावर प्रकाश टाकून लोकांत जनजागृती केली.समाजामधील घटक शेतकरी, शेतमजूर, भूमिहिन व कष्टकरी यावर लेखन करून त्यांचे कल्याण व्हावे. यादृष्टीने सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

## संदर्भ /तळटिपा :-


१) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन,पुणे, ११ जून २००४, पृ.३२

२) प्रधान ग.प्र., माझी वाटचाल, साधना प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, ११ जून २००४, पृ.१८१

३) पांढरे नीला, प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्मय, उन्मेष प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, ३० जून २०११, पृ.५२

४) कित्ता, पृ. ५३

५) दाभोळकर नरेंद्र(संपा.) साधना साप्ताहिक पुणे, दि. ४ जून २०११, पृ. ८

६) बापट वसंत(संपा.), साधना साप्ताहिक, ११ जून १९८४, पृ.४

७) बापट वसंत(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९८४, पृ.४

८) प्रधान ग.प्र., 'साधनाची संपादक परंपरा, निवडक साधना ग्रंथसंच- खंड ८, पृ.३९, ४०

९) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १० ऑक्टोबर १९८५, पृ.२

१०) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २६ जानेवारी १९८६ ते ३ एप्रिल १९८६, पृ.३

११) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९८६, पृ.१

१२) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २६ जानेवारी १९८७, पृ.३

१३) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, ११ जून १९८७, पृ.२

१४) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, (दिवाळी अंक), ऑक्टोबर, १९८७, पृ.६

१५) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १ मे १९८८, पृ.३

१६) दैनिक नवाकाळ, मुंबई, ३० मे २०१०, पृ.४

१७) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १७ मार्च १९८९, पृ.७

१८) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २७ मे १९८९, पृ.२

१९) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, ऑक्टोबर १९८९, पृ.२

२०) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, मार्च, एप्रिल १९९०, पृ.४

२१) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९०, पृ.६

२२) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९२, पृ.५

२३) कित्ता, पृ.६

२४) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९२, पृ.४ ते ६

२५) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २२ ऑगस्ट १९९२, पृ.५

२६) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १ एप्रिल १९९२, पृ.५

२७) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ जून १९९३, पृ.३

२८) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १ मे १९९३, पृ.३

२९) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १४ जुलै १९९३, पृ.३

३०) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९४, पृ.६

३१) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २६ नोव्हेंबर व २१ जानेवारी १९९५, पृ.३ व ५

३२) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १८ नोव्हेंबर १९९५, पृ.१

३३) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, ४ मे १९९६, पृ.१

३४) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, २२ जून १९९६, पृ.२

३५) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १ मे १९९३, पृ.३

३६) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १ फेब्रुवारी १९९७, पृ.३

३७) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.१३

३८) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.१९०

३९) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.५४

४०) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.१९१

४१) दाभोळकर नरेंद्र(संपा.) साधना साप्ताहिक पुणे, दि.५ जून २०१०, पृ. ६

४२) दाभोळकर नरेंद्र(संपा.) निवडक साधना ग्रंथसंच, साधना प्रकाशन, खंड ८, पृ.४१

४३) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.५४

४४) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.५५

४५) दैनिक ‘सकाळ’, पुणे. ३० मे २०१०, पृ.१

४६) कित्ता, पृ.५६

४७) प्रधान ग.प्र., उपरोक्त, पृ.११७

४८) कित्ता, पृ.१९० ते १९३

## प्रकरण पाचवे

# ग.प्र.प्रधान यांचे साहित्यक्षेत्रातील कार्य

### ५.१ प्रस्तावना :–

प्रधान मास्तरांच्या आयुष्यातील एकूण पाच टप्पे पाहिले तर, हा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा टप्पा होता. ते फक्त स्वातंत्र्य सैनिक, शिक्षक, राजकारणी नव्हते तर उत्तम लेखकही होते. त्यांच्या लेखनाची सुरूवात तशी आणीबाणीत असताना झाली, त्यानंतर 'साधना' साप्ताहिकाचे संपादक होण्यापूर्वी झाली असली, तरी त्यांनी 'साधना' साप्ताहिकाचे संपादक पद सोडल्यानंतर वाचन, मनन व चिंतन यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी त्यांच्या लेखनीचे वैशिष्टये, मर्यादा या स्पष्ट केल्या होत्या. त्यांचे मराठी व इंग्रजी असे विपुल लेखन आहे. त्यांची मराठी व इंग्रजी अशी एकूण ४० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या लेखनाबद्दल प्रत्येकाला प्रेम आणि आदर वाटावे असे आहे. त्यांच्या स्वभावातील व व्यक्तिमत्त्वातील काही पैलूंचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनामध्ये पडलेले दिसते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रसन्न, स्पष्ट आणि परखड होते, तशीच त्यांची लेखनशैली होती. त्यांच्या लेखनामध्ये ते म्हणतात, मला जे वाटले, जे मी अनुभवले ते मी लिहिले.

### ५.२ प्रधान सरांच्या लेखणीचे वैशिष्टय :–

लेखन हेच प्रधान सरांनी क्षेत्र ठरवले असते आणि त्यात त्यांनी वेळ दिला असता तर त्यांचे शेकडो ग्रंथ प्रकाशित झाले असते. परंतु त्यांनी आपल्या जीवनात वेगवेगळया टप्प्यांवर वेगवेगळे कार्य केले. त्यांनी ज्या क्षेत्रात काम केले, त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. लेखन हेच त्यांचे औषध आणि टॉनिकही! त्यांच्या लेखनानेच त्यांना त्यांच्या अखेरच्या टप्प्यात साथ दिली होती. एकाकीपणाच्या अंधाराचे जाळे दूर केले असे त्यांच्या लेखनावरूनच वाटते. त्यांचा खरा पिंड लेखकाचा होता. साने गुरूजींच्या ध्येयवादाचा लेखक या भूमिकेची व्यक्तिजीवनातील महान गरज व थोरवी प्रधान सरांनी अधोरेखित केली असे वाटते.[१]

सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे सात्त्विक प्रज्ञादर्शन व प्रतिभादर्शन असे त्यांचे वाङ्मय असल्याने ते अधिक श्रीमंत झाले आहे, असा निष्कर्ष रा.ग.जाधव काढतात. ५ जून २०१०

च्या 'साधना' अंकात 'कृतार्थसाधक' या पहिल्याच लेखात नरेंद्र दाभोळकरांनी प्रधान सरांच्या जिवित कार्याचा आढावा घेतला आहे. त्यात त्यांच्या काही आठवणी सांगताना ते म्हणतात, आंबेडकरांवरील पुस्तक लिहून झाल्यावर नंतर त्यांनी मुद्दामहून बोलावले. पुस्तकातील धर्मविषयक भाग दोनदा वाचून दाखवला. नंतर ते म्हणाले, खूप समाधान वाटले. टॉलस्टॉय लिहिला नंतर गांधी आणि आता आंबेडकर. ग.प्र. प्रधान म्हणतात, खरे तर माझ्यापेक्षा अनेकजण लेखनशैलीत आकलनात चांगले आहेत पण माझ्याकडून हे झाले. कारण माझा पिंड कार्यकर्त्याचा आहे. टॉलस्टॉय पुस्तकाचे इंग्रजी व विशेषतः रशियन भाषेत भाषांतर झाले. याचे त्यांना विशेष समाधान होते.[२]

## ५.३ लेखनाचा श्रीगणेशा :-

प्रधान सरांनी त्यांच्या लेखनाची सुरूवात केली ती सन १९५४ साली. लोकमान्य टिळकांचे इंग्रजी चरित्र लिहावयाचे ठरवले. बाळ भागवतांची त्यावेळी सांगलीमध्ये बदली झाली होती, त्यावेळी ते प्रधान सरांना दर महिन्याला भेटत असत. त्याचप्रमाणे आचार्य जावडेकरांच्या मार्गदर्शनासाठी जात होते. बरेच वाचन झाल्यावर त्यावर टिप्पणी काढून चर्चा केल्यावर दोघांनीही टिळकांच्या चरित्राचे वेगवेगळे कालखंड निवडून त्यावर लिहिण्यास सुरूवात केली होती. ग.प्र. प्रधान भावनेच्या भरात लिहित होते, परंतु भागवत चिकित्सकपणे लिहित होते. ते दोघे त्यांनी लिहिलेला मजकूर तपासून, त्यावर चर्चा करून त्यामध्ये सुधारणा करत होते.

१९५५ साली त्यांचे टिळकांवरील लेखन पूर्ण झाले होते. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने टिळकांच्या इंग्रजी चरित्रास दहा हजारांचे बक्षीस जाहीर केले होते. पुस्तक सादर केल्यानंतर वर्षाने त्याचा निकाल लागला. शि.ल.करंदीकर, त्र्यं.वि.पर्वते आणि भागवत व ग.प्र. प्रधान यांनी लिहिलेल्या तीन टिळक चरित्रामध्ये बक्षीस विभागून देण्यात आले.[३]

## ५.४ प्रधान सरांच्या आयुष्यातील सहावा टप्पा :-

प्रधान सरांनी त्यांच्या आयुष्यामध्ये वेगवेगळया काळामध्ये क्षेत्रात काम केलेले दिसून येते. जसे स्वातंत्र्यसैनिक, प्राध्यापक, समाजवादी पक्षाचे सदस्य, विधानपरिषदेचे आमदार, विरोधी पक्षनेते, 'साधना'चे संपादक आणि त्यांच्या आयुष्याचा शेवटचा टप्पा म्हणजे लेखकाचा. त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेतील एकूण ४० पुस्तके लिहिली. त्यांच्या काही पुस्तकांच्या विविध भाषेत आवृत्या निघाल्या. यावरून त्यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य समजते.

'साधना'चे संपादक पद सोडल्यानंतर १९९८ ते २००८ हा दहा वर्षांचा कालखंड प्रधानांच्या आयुष्यातील सहावा आणि शेवटचा टप्पा होता. या काळात त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमातून निवृत्ती घेतली होती. पुरस्कार स्वीकारणे थांबवले. प्रवास थांबवला होता. आयुष्याची निरवा–निरव सुरू केली होती. त्यांना अपत्य नसल्याने व २००३ मध्ये त्यांच्या पत्नीचे निधन झाल्यावर एकेकाळी ते विश्वस्त असलेल्या हडपसरच्या साने गुरूजी रूग्णालयात वास्तव्यासाठी होते. यामागचा उद्देश एकच, आपला त्रास कोणालाही होऊ नये. हा विचार त्यांच्या हडपसर येथील राहण्यामागे होता. त्याचप्रमाणे आयुष्याच्या संध्याकाळी निवांतपणा मिळवून गत आयुष्यात जे वाचायचे आणि लिहायचे राहून गेले होते, ते पूर्ण करून जीवनयात्रा आनंदाने संपविण्यास तयार व्हावे, ही जाणीवही त्यामागे होती. हडपसरला वास्तव्यासाठी गेल्यावर त्यांनी संतसाहित्याचे पुन्हा वाचन केले. त्यामध्ये संत तुकाराम, संत एकनाथ हे प्रमुख संत होते. त्यावेळी ग.प्र. प्रधान म्हणाले, तुकारामाइतके कठोर मला होता येत नाही. एकनाथ हा प्रापंचिकांचा संत आहे, तो मला जवळचा वाटतो. याच काळात त्यांनी डॉ.आंबेडकरही पुन्हा नव्याने वाचायला घेतले. तेथील सहा वर्षांच्या काळात त्यांनी आठा उत्तराची कहाणी, टॉलस्टॉयशी पत्रसंवाद, डॉ.आंबेडकर त्यांच्याच शब्दांत आचार्य जावडेकर, लेखणीचे ललित, लोकशाही आणि समाजवादी इत्यादी आठ पुस्तके त्यांनी लिहिली.[४]

प्रधान सरांच्या लेखनामध्ये अनेक गुण आढळून येतात. त्यांनी अनेक थोर व्यक्तींचे आत्मचरित्र लिहिले. लो.टिळक, जवाहरलाल नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण, एस.एम.जोशी, ना.ग.गोरे या थोर महामानवांविषयी चिकित्सक चरित्रात्मक व व्यक्तिचित्रणात्मक लेखन केले आहे. आगरकर, म.फुले यांच्यावरील संपादनेही केली आहेत. राम गणेश गडकरी, साने गुरूजी यांच्यावरही त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. 'भाकरी आणि स्वातंत्र्य' (१९७७), 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत'(२००४) चौथी आवृत्ती, 'लोकशाही आणि समाजवाद', 'आव्हांनाशी संघर्ष', 'भारतीय राजकारणाचे दोन पैलू' यांसारख्या लेखनातून प्रधान सरांची राजकीय दृष्टी, व्यासंग व मर्मभेदक भाष्यक्षमता या गुणांचा प्रत्यय येतो. राजकारणातील व्यक्तींनी व राजकीय विचारवंतांनी या त्यांच्या लेखनाची दखल घेणे इष्ट ठरेल.[५]

'सोनार बांगला'(१९७२) 'हाजीपीर'(१९६९) यासारखी राजकीय महान घटकांची पार्श्वभूमी असलेली प्रवासवर्णने, मला उमजलेले यासारखे ललितलेखन महत्त्वाचेच आहे.

प्रधान सरांच्या दोन पुस्तकांचा उल्लेख केला पाहिजे. ही दोन्ही पुस्तके त्यांनी वानप्रस्थाश्रमात लिहिली आहेत. त्यापैकी लेखणीचे ललित (२००९) मध्ये त्यांनी त्यांच्या आवडत्या शेक्सपिअरच्या सात नाटकांवरील रसग्रहणे लिहिली असून स्वतंत्र व अनुवादित अशा सात कथाही सादर केल्या आहेत. शेक्सपिअर व इंग्रजीतील रोमँटीक कवि-लेखक म्हणजे प्रधान सरांच्या पिढीचे मानसशास्त्रीय, फिक्सेशन म्हणता येईल. दुसरे पुस्तक म्हणजे टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद (२००६) महात्मा गांधीजी मार्गे ग.प्र. प्रधान टॉलस्टॉयच्या मुक्कामी पोहोचतात. कळत-नकळत या लेखनात गांधी-टॉलस्टॉय यांच्यातील भावबंधाचे नाटय कधी स्पष्टपणे तर कधी सूचकपणे प्रकट झाले आहे.

प्रा.रा.ग.जाधव म्हणतात, "सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे सात्त्विक प्रज्ञाप्रदर्शन व प्रतिभादर्शन असेच प्रधान सरांच्या एकूण वाङ्मयनिर्मितीचे वर्णन करता येईल. वाङ्मय गुण व चारित्र्यगुण या दोन्हीपैंकी चारित्र्यगुणांनी प्रधान सरांचे वाङ्मय अधिक श्रीमंत झाले होते. या सर्जनाचा वसा व वारसा हा प्रश्न आपण उदयाच्या साहित्य निर्मात्यांवर सोपवू."[६]

ग.प्र. प्रधान जसे पट्टीचे वक्ते होते तसेच ते एक मान्यवर चरित्र लेखकही होते. १९५८ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जन्मशताब्दीच्या निमित्ताने टिळक चरित्राचे लेखन त्यांनी केले. १९६९ मध्ये महात्मा गांधीच्या जन्मशताब्दीवेळी गांधी चरित्र लिहिले. १९६० मध्ये साहित्य अकादमीसाठी लेखनसंग्रहांचे संपादन त्यांनी केले. १९९२ मध्ये राम गणेश गडकरी यांच्यावर त्यांनी ग्रंथ लिहिला. १९९५ मध्ये त्यांचे साने गुरूजी चरित्र प्रकाशित झाले हे त्यांचे सर्व लेखन संदर्भग्रंथ म्हणून मान्यता पावले.

१९६५ साली भारत पाक युद्धाच्या वेळी प्रत्यक्ष युद्ध क्षेत्राची सफर करून प्रधान मास्तरांनी हाजीपीर हे पुस्तक लिहिले. तसेच १९७१ साली बांगला देशात भेट देऊन 'सोनार बांगला' हे पुस्तक लिहिले. त्यांची प्रवासवर्णनेही मराठी साहित्यात गाजली आहेत. १९८६ साली त्यांची 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' शब्दबद्ध केले त्यांच्या सिध्दहस्त लेखनीतून उतरलेला हा स्वातंत्र्य आंदोलनाचा प्रभावी दस्तावेज ग्रंथ अनेक भाषांतून अनुवादित झाला

आहे. प्रौढसाक्षर, नवसाक्षर, ग्रामीण विद्यार्थी असे विविध वाचक समोर ठेवूनही त्यांनी पुस्तके तयार केली. 'समाजप्रबोधन पत्रिका', 'जनवाणी', 'लोकमित्र', 'साधना' इत्यादी नियतका-लिकामधून व साप्ताहिकामधून वेळोवेळी त्यांनी केलेले लेखन अनेकांना मार्गदर्शक ठरले.[७]

प्रधान सरांच्या साहित्याइतकेच त्यांचे व्यक्तिमत्त्वही सुसंस्कृत व सोज्वळ होते. ज्याच्यासमोर आदराने व प्रेमाने नमावे व ज्यांचे आशीर्वाद लाभावेत. अशा फार थोडया व्यक्ति आपल्या सार्वत्रिक जीवनात आज उरल्या आहेत, अशा मोजक्या व्यक्तींमध्ये प्रधान सरगणले जातात.

## ५.५ ग.प्र.प्रधान यांचे विविध विषयांवरील लेखन :-

गोपाळ गणेश आगरकर निवडक लेखसंग्रह : गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १८५६ साली जुलै महिन्यात सातारा जिल्हयात कऱ्हाडजवळ टेंभू या गावी झाला होता. त्यांची घरची अतिशय गरिबी होती. कऱ्हाडला ते आजोळी आले, तेथेच त्यांच्या शिक्षणाला सुरूवात झाली. कृष्णा नदीत भरपूर पोहावे, समवयस्क मुलांबरोबर खेळावे आणि मिळेल ते वाचावे असा त्यांचा जीवनक्रम होता. तेथे इंग्रजी इयत्ता ३ री पास झाल्यावर पुढे शिक्षणाचे काय, असा प्रश्न त्यांना वय वर्षे १२ असताना पडला होता.

पुढे त्यांचा नातेवाईकांकडे वऱ्हाडात अकोल्याला जाण्याची संधी मिळाली व तेथेच त्यांच्या शिक्षणाची सोय झाली आणि मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सुरळीत झाले. विष्णू मोरेश्वर महाजनी या विद्वान व जातिवंत शिक्षकांच्या हाताखाली शिकण्याची सुसंधी त्यांना मिळाली होती. महाजनी हे गाढे विद्वान व मराठीतील एक मान्यवर लेखक होते. त्यांच्या हाताखाली शिकताना गोपाळ यांची बुद्धिमत्ता विकसित झाली. १८७५ साली ते मॅट्रिक पास झाले आणि कॉलेजमध्ये जाण्याची उत्कट इच्छा व प्रतिकूल आर्थिक परिस्थिती यांच्यात द्वंद्वं सुरू झाले परंतु अखेर इच्छाशक्तीने परिस्थितीवर मात केली. शिक्षकांच्या मदतीने ते पुण्याला आले व त्यांनी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथेही त्यांना परिस्थितीशी सामना करावा लागला. कॉलेजमध्ये त्यांनी लिहिलेल्या निबंधाला ५० रू.चे पारितोषिक मिळाले होते.[८]

### ५.५.१ राजकीय लेखन :-

आपल्या समाजात आवश्यक त्या सुधारणा झाल्याशिवाय राजकीय चळवळीला सामर्थ्य येणार नाही, असे आगरकरांचे मत होते. पारतंत्र्यामुळे हिंदुस्थानची कशी अवनती झाली आहे

याचे वर्णन त्यांनी अनेक लिखांणामधून केले आहे. आगरकर, टिळकांप्रमाणे कट्टर स्वातंत्र्यवादी होते. त्यांनी समाजसुधारणाविषयी जितके लेख लिहिले आहेत, त्या मानाने राजकीय लेखांची संख्या कमी असली तरी जहाल राजकीय भूमिका त्यांच्या लेखामधून प्रत्ययाला येते. आचार्य जावडेकरांनी आगरकरांना Redical Reberal जहाल मतवादी म्हटले आहे.[९]

### ५.५.२ आर्थिक लेखन :–

आगरकरांनी सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार केला. आपल्या समाजाच्या आर्थिक जीवनात संपन्नता यावी, असे त्यांना वाटत असे. इंग्रजी राजवटीमुळे भारताचे आर्थिक शोषण होत आहे, हा दादाभाई नौरोजी यांनी मांडलेला विचार आगरकरांच्या लेखनात आढळतो. लोकांना आर्थिक दारिद्र्याच्या दुष्परिणामांची जाणीव करून दयावी आणि व्यापाराच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण बनले पाहिजे, ही शिकवण त्यांच्या मनावर ठसवावी. भारताच्या दुर्दशेचे वर्णन करून सरकारला त्यांच्या स्वार्थी व लोभी धोरणाविरूद्ध कडक इशारा दयावा, या हेतूने त्यांनी आर्थिक धोरणासंबंधीचे लेख लिहिले आहेत.[१०]

आगरकरांनी जन्माधिष्टित जातिव्यवस्था व धर्मव्यवस्था यामुळे व्यक्तिविकास कसा खुंटला आहे, हे आपल्या लेखांमधून दिग्दर्शित केले व जोपर्यंत यात बदल होत नाही, तोपर्यंत समाजाला सुख लागणार नाही, असे शिक्षण सांगितले.

म.जोतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची स्थापना १८७८ मध्ये झाली होती; परंतु आगरकर यांच्या लेखनामुळे सुधारणांचे तात्त्विक अधिष्ठान स्पष्ट होऊन समाजाला भावी सुधारणांची दिशा समजली. आगरकरांच्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनात अनेक अशा घटना घडल्या आहेत, की त्यांचे जीवन म्हणजे भारताच्या एकोणिसाव्या शतकाचा सामाजिक इतिहास ठरावा. आगरकर यांचा य.दि.फडके यांच्या ग्रंथातून हा इतिहास प्रथमच उपलब्ध झाला आहे. १७ जून १८८५ रोजी वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.[११]

### ५.५.३ लोकमान्य टिळक :–

लो.टिळक हे ग.प्र.प्रधान यांचे श्रद्धास्थान होते. त्यांच्यासंबंधी विपुल लेखन त्यांनी इंग्रजी आणि मराठीत केले आहे. त्यांचे पहिले पुस्तक टिळकांसंबंधीच होते. भारताचे सुपुत्र लो.टिळक हे पुस्तक पुण्याच्या शिवप्रतिष्ठानतर्फे १ मे २००४ रोजी प्रसिद्ध झाले त्याच

प्रकाशनातर्फे 'लोकमान्यांची राजकीय दूरदृष्टी' आणि 'ज्ञानाचे उपासक लोकमान्य' या दोन नाटिकांचे पुस्तक २००८ मध्ये प्रसिद्ध झाले.[१२]

२३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे लो.टिळकांचा जन्म झाला. त्यांचे पाळण्यातील नाव केशव होते. बाळ हे त्यांचे टोपणनाव होते. त्यांच्या लहानपणी त्यांचे मातृछत्र हरपले होते. वडीलसुद्धा ते १६ वर्षांचे असताना वारले. काका–काकूंनी त्यांचे संगोपन केले. उच्च शिक्षणासाठी ते पुण्यात डेक्कन कॉलेजमध्ये आले. उत्कृष्ट संस्कृत पाठांतर व गणितावरील प्रभुत्व यामुळे ते हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जात होते. १८७६ साली ते गणित विषय घेऊन प्रथम वर्गात बी.ए. उत्तीर्ण झाले.

**जहाल पत्रकार टिळक :–**

लोकांच्या मनात स्वातंत्र्यप्रेम आणि पारतंत्र्याविषयी द्वेष निर्माण करण्याच्या हेतूने जी.चिपळूणकर, टिळक आणि आगरकर एकत्र आले होते. त्यांनी लोकशिक्षणाचे प्रभावी साधन म्हणून वर्तमानपत्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिक आणि ४ जानेवारीला 'केसरी' हे मराठी वृतपत्र सुरू केले. 'मराठा'चे संपादक टिळक तर, 'केसरी'चे आगरकर होते. केसरीच्या पहिल्या वर्षातील अंकांतील लेखांपैकी इतिहास, अर्थशास्त्र व सामाजिक विषयावरील लेख आगरकर लिहित. तर धर्मशास्त्र व कायदा यावरील लेख टिळकांनी लिहिले होते. 'केसरी'मधील ब्रिटिश सरकारवर टीका करणारे लेख आहेत.[१३]

**झुंजार टिळक :–**

लोकमान्य टिळकांची देशभक्ती, त्यांची झुंजार वृत्ती, प्रखर बुद्धिमत्ता, निष्कलंक चारित्र्य व असिम स्वार्थत्याग, यामुळे सर्व भारतीय जनतेने त्यांचे नेतृत्व मान्य केले. १८९८ पर्यंत त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यतः महाराष्ट्र होते. परंतु नंतर त्यांनी ते व्यापक केले. साधनांना अनेकता हे सूत्र स्वराज्याचे ध्येय साध्य करण्यासाठी स्वीकारले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती.

लोकमान्यांनी दूरदर्शीपणे स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण असा कार्यक्रम देशापुढे ठेवला हा कार्यक्रम म्हणजे स्वराज्याची चतुःसूत्री होती. कलकत्याच्या अधिवेशनात तिला प्रथम मान्यता मिळाली. भारतीय राजकारणाचे पितामह दादाभाई नौरोजी यांनी आपल्या

भाषणात स्पष्ट सांगितले, की आम्हांला सेल्फ गर्व्हमेंट स्वराज्य हवे आहे. काँग्रेसच्या व्यासपीठावरून स्वराज्य हा शब्द प्रथम त्यांनीच उच्चारला.

**व्यासंगी विद्वान लेखक टिळक :–**

राजकारणाच्या धगधगत्या वातावरणातही टिळकांची ज्ञानसाधना कोमेजली नाही. त्यांचे वाचन व लेखन संशोधन सातत्याने चालू होते. १८९२ साली त्यांनी वेद काळाचा निर्णय या विषयावर ओरायन हे पुस्तक लिहिले. या ग्रंथामुळेच जगातील विद्वानांनी टिळकांसारख्या संस्कृत पंडिताला व संशोधकाला जादा काळ तुरूंगात डांबून ठेवू नय, अशी विनंती ब्रिटिश सरकारला केली होती.

१८९९ साली भोगलेल्या तुरूंगवासात त्यांनी जर्मन पंडित मॅक्सम्युलर याने संपादित केलेली ऋग्वेदाची प्रत मिळाली. त्यातील एक ऋचेच्या आधारे त्यांनी आर्यांचे मूळ वसतिस्थान या विषयावरील संशोधन सुरू केले. आणि त्यांचे वास्तव्य उत्तर धृव असावे अनुमान काढणारा आर्टिक होम इन द वेदाज हा ग्रंथ लिहिला.[१४]

**५.५.४ महात्मा गांधी :–**

स्वातंत्र्यसैनिक असलेल्या ग.प्र.प्रधानांच्या विचारांवर महात्मा गांधी यांच्या जीवनाचा आणि विचारांचा फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे गांधीजींचे स्तोत्र लिहून त्यांनी आपला आदरभाव व्यक्त केला होता. तसेच भारताच्या स्वातंत्र्यलढयाचा इतिहास इंग्रजी व मराठी भाषेत लिहिण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

१९६९ साली महात्मा गांधींची जन्मशताब्दी होती. एस.एस.सी. बोर्डाचे ज्येष्ठ सदस्य आणि राजापूर हायस्कूलचे मुख्याध्यापक देशपांडे सर यांनी असा प्रस्ताव मांडला की, एस.एस.सी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी पेपरसाठी महात्मा गांधींचे चरित्र टॉपिक रीडींगसाठी असावे, पण असे पुस्तक उपलब्ध नव्हते. देशपांडे सर यांनी प्रा.प्रधान आणिं प्रा.भागवत यांनी टिळक जन्मशताब्दीच्या  वेळी लिहिलेले टिळकांचे छोटे चाटिंग अभ्यासले होते. त्यांनी प्रधान सरांना विनंती केली की, त्यांनी व प्रा.भागवत हयांनी गांधीजींच्या जीवनावर तशा प्रकारचे पुस्तक लिहावे. त्या विनंतीस मान देऊन प्रा.प्रधानांनी व भागवतांनी ८० पानांचे छोटे चरित्र सोप्या इंग्रजीत लिहिले.[१५]

प्रा.प्रधानांनी पुस्तकाचा प्रारंभ दांडी यात्रेने केला आहे. ६१ वर्षांच्या मोहनदास करमचंद गांधी या अहिंसक सैन्याच्या सेनापतीच्या नेतृत्वाखाली ७८ स्वातंत्र्यवीर सैनिकांची तुकडी अहमदाबादच्या साबरमती नदीच्या काठावरून प्रवासासाठी निघाली. १२ मार्चला ही पदयात्रा २४० मैलांची वाटचाल पूर्ण करून ५ एप्रिल १९३० रोजी दांडीला पोहोचली त्याचा वृत्तांत या पुस्तकात आहे.

महात्मा गांधीजी बॅरिस्टर पदवी घेऊन आल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात दक्षिण आफ्रिकेमध्ये केली. १८९६ मध्ये काही काळासाठी ते भारतात आले असताना त्यांनी भारताचे खरे स्वरूप जाणून घ्यायचे ठरवले. सर्वात प्रथम त्यांनी त्यांच्या पोशाखाचा त्याग केला. धोतर सदरा व पांढरी टोपी असा पोषाख स्वीकारला.

१ ऑगस्ट १९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्यानंतर गांधीजींनी स्वातत्र्य संग्रामाची सूत्रे खांदयावर घेतली.

१९२१ साली ब्रिटिश सरकारने गांधीजींच्यावर खटला भरला. तो सिडिशनचा म्हणजे देशद्रोहाचा. त्यावेळेला न्यायाधीश म्हणाले, मला तुमच्यावरचा खटला पाहिल्यावर १९०८ च्या टिळकांवरच्या खटल्याची आठवण आली. तेव्हा गांधी एकदम उभे राहिले आणि म्हणाले, लोकमान्यांबरोबर माझे नाव घेऊन आपण माझा मोठा गौरव केलात.[१६]

### ५.५.५ गांधी–गोखले–टिळक :–

ब्रिटिश साम्राज्याकडून हिंदुस्थानसाठी अधिकाधिक राजकीय अधिकार मिळावेत स्वराज्याच्या दिशेने वाटचाल करणे हेच टिळक, गोखले, गांधी या तीनही थोर नेत्यांचे अंतिम उद्दिष्ट होते, असे मत मांडत असताना त्या तिघांच्या शिक्षणविषयक, समाजकारण व अर्थकारण विषयक भूमिकांमध्ये कोणते साम्य व कोणता फरक होते आणि ज्यांनी देशाचे नेतृत्व करताना भारतीयांना कसे घडविले याची विस्ताराने चर्चा केली आहे. प्रधानांच्या मते हे तीनही नेते म्हणजे तीन विचारप्रवाह आहेत. त्यांचे कार्य परस्परपूरक आहेत आणि हा त्रिवेणी संगम आहे.[१७]

अशाप्रकारे प्रधान सरांनी महात्मा गांधीजींच्या शिक्षण व्यवसाय द. आफ्रिकेतील कामानिमित्त गेले असता त्याठिकाणी त्यांना अडचणींचा सामना करावा लागला व त्यातून त्यांनी काढलेला मार्ग भारतात आल्यानंतर तेथील प्रश्न समजून घेण्यासाठी प्रथम लोकांमध्ये फिरून

त्यांचे प्रश्न समजावून घेतले. त्यांनी सत्याग्रह तंत्राचा वापर करून आपल्या कार्याची सुरूवात केली व त्यांना यश आले. हे करत असताना इंग्रज सरकारने त्यांना ६ वर्षांची शिक्षा ठोठावली.

### ५.५.६ महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम.जोशी :-

ग.प्र.प्रधान यांच्या या पुस्तकात पुढील माहिती मिळते. सन १९३० मध्ये गांधीजींनी स्वातंत्र्यलढा सुरू केला. महाराष्ट्रात शंकरराव देव यांचे नेतृत्व होते. विलेपार्ले येथे सत्याग्रह आश्रम सुरू झाला. एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, खाडीलकर तेथील सत्याग्रह शिबिरात दाखल झाले. १० मे १९३० रोजी जाहीर सभेतील जहाल भाषणाबद्दल त्यांना अटक होऊन ६ महिन्यांची शिक्षा झाली व त्यांना ठाणे जेलमध्ये पाठविण्यात आले. तुरूंगामध्ये एस.एम. यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा अभ्यास केला. रॉय त्यावेळी तुरूंगात होते. १९३६ च्या काँग्रेसच्या फैजपूर अधिवेशनाच्या वेळी सेवादलाच्या प्रचार समितीचे हे चिटणीस होते. एस.एम.जोशी व ना.ग.गोरे नियमित स्वरूपात समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांचा अभ्यास वर्ग घेत असत.[१८]

१९४१ साली राष्ट्रसेवा दलाची स्थापना झाली आणि एस.एम.जोशी दलप्रमुख झाले त्यावेळी त्यांनी जे भाषण केले. त्याचाही प्रधान सरांच्या मनावर मोठा परिणाम झाला. स्वातंत्र्यलढयात समर्पक अशा वृत्तीने सामील झाले पाहिजे हा संस्कार तरूणांच्या मनावर करावा, त्यांना स्वातंत्र्यासाठी त्याग करण्याची प्रेरणा दयावी, याकरिता आम्ही राष्ट्रीय सेवादल सुरू करत आहोत. आपला शत्रू ब्रिटिश सरकार आहे. एस.एम.जोशी कधी नकारात्मक भूमिका घेत नसत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रसेवा दलातील कार्यकर्त्यांशी बोलताना एस.एम.जोशी म्हणाले, स्वराज्य होण्याकरिता स्वातंत्र्याला समतेची जोड दिली पाहिजे. शोषणकर्ता श्रीमंतांचा वर्ग आणि गरिबांचा शोषित वर्ग यांच्या संघर्षात आपण सतत शोषितांच्या बाजूने राहून त्यांना न्याय दिला पाहिजे.[१९]

स्वातंत्र्य मिळण्यासाठी फक्त सत्याग्रह पुरेसा नाही, तर त्याच्या जोडीला भूमिगत चळवळ चालवावी लागेल, असे जयप्रकाश नारायणांचे मत होते. राष्ट्रसेवा दलाच्या महाराष्ट्रातील निवडक कार्यकर्त्यांच्या शिबिराच्या समारोपासाठी युसूफ मेहर अली पुण्यात आले होते.

एस.एम.जोशी यांनी भूमिगत कार्य प्रथम जळगाव, सोलापूर येथे केले. नंतर दाढी वाढवली, शेरवानी पायजमा, कॅप असा पोशाख करून व काळा गॉगल लावून ते बोहरी

मुसलमानासारखे दिसू लागले. इमाम अली असे होऊन नाव घेवून त्यांचे भूमिगत कार्य सुरू झाले.

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत अपयश आले, परंतु पुढे पुण्यात विधानसभेची पोटनिवडणूक जिंकली. विधानसभेत अनेक प्रश्न विचारून ते सरकारला धारेवर धरत होते. ते सतत दौरे करत असल्यामुळे त्यांना ग्रामीण जनतेचे प्रश्न माहीत असत.[२०]

१९६५ मध्ये समाजवादी पक्षात फूट पडली आणि एस.एम.जोशी हे संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष बनले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी अनेक व्याख्याने दिली होती. एस.एम.जोशी यांनी ग.प्र.प्रधान यांना विधानपरिषदेत काम करताना अभ्यास करावा लागतो, असे सांगितले होते. १९८० साली ग.प्र. प्रधान विरोधी पक्षनेता झाल्यामुळे एस.एम.जोशी यांना आनंद झाला. कॅन्सरच्या आजाराने एस.एम.जोशी यांची प्रकृती खराब होती. एप्रिल १९८९ रोजी त्यांचा मृत्यू झाला. कॅन्सरसारख्या आजाराने एस.एम.जोशी यांना पछाडले असतानाच ताराबाईंचे निधन झाले. एस.एम.जोशी यांच्या जीवनात फार मोठी पोकळी निर्माण झाली. आजारात कॅन्सरशी झुंज देत असतानाच १ एप्रिल १९८९ रोजी एस.एम.जोशी यांचे निधन झाले.[२१]

### ५.५.७ महाराष्ट्राचे शिल्पकार ना.ग.गोरे :-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्राचे शिल्पकार या ग्रंथनिर्मितीसाठी प्रा.ग.प्र.प्रधान यांनी ना.ग.गोरे यांचे जीवनचरित्र लिहिले. ९५ पृष्ठांचे पुस्तक हे १ मे २००९ रोजी ना.ग.गोरे यांच्या जन्मशताब्दी वर्षी प्रसिद्ध झाले. ना.ग.गोरे हे श्रेष्ठ स्वातंत्र्यसेनानी, तत्त्वचिंतक, समाजवादी चळवळीचे प्रणेते आणि परिवर्तनवादी लेखक होते. त्यांचे राजकीय विचार पुरोगामी, सामाजिक दृष्टी आणि वैचारिक व ललितलेखन यांचे संस्कार त्या पिढीवर झाले होते. प्रा.ग.प्र. प्रधान विद्यार्थी दशेपासून त्यांच्या सहवासात होते. त्यामुळे त्यांनी लिहिलेली चरित्र आकाराने लहान असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू व्यक्त करते.

**विद्याभ्यास आणि स्वातंत्र्यलढयातील कारावास :-**

ग.प्र.प्रधान यांचे एस.एम.जोशी, र.के.खाडीलकर, गोपीनाथ तळवळकर, तारकुंडे हे वर्गमित्र होते. एस.एम.जोशी व ग.प्र.प्रधान हे दोघेही राजकीय आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या विचारांनी भारावलेले होते.[२२]

ग.प्र.प्रधान व नानासाहेब गोरे यांची भेट समाजवादी पक्षाच्या राजकीय अभ्यास वर्गात झाली. ना.ग.गोरे यांनी केलेले पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद ग.प्र. प्रधानांनी वाचला होता आणि तो त्यांना फार आवडला होता. १९४१ साली नानासाहेब गोरे आणि ग.प्र.प्रधान हे समाजवादी पक्षाच्या ऑफिसमधून संध्याकाळी घरी जात असताना एका सबइन्सपेक्टरने आणि दोन पोलिसांनी त्या दोघांना  थांबविले. नानासाहेबांना काही दिवसांपूर्वी गुलबर्गा येथे केलेल्या भाषणाबद्दल अटक वॉरंट दाखवून त्यांना पोलिस स्टेशनला घेऊन गेले. १९४२ च्या आंदोलनासाठी ते गुलबर्गा मुक्कामी होते. पुढे तुरूंगातून सुटल्यानंतर मुंबईला गेले तेथे साने गुरूजी व एस.एम.जोशी यांना ते भेटले. गुलबर्गाच्या तुरूंगातून सुटताच भूमिगत झाले होते. पुढे ते मूषक महालात साने गुरूजी, एस.एम.जोशी यांच्याबरोबर पकडले गेले. महाराष्ट्रात समाजवादी पक्षाने जनवाणी हे साप्ताहिक सुरू केले होते आणि नानासाहेब गोरे जनवाणीचे सुवाहक झाले होते. आयुषमान पटवर्धन आणि जयप्रकाश नारायण यांच्या इंग्रजी लेखाचे भाषांतर करण्याचे काम ग.प्रधान व ना.ग.गोरे यांच्यावर होते.[२३]

गांधीजींनी ज्यावेळी वैयक्तिक सत्याग्रह मोहीम सुरू केली तेव्हा नानासाहेब गोरे यांची निवड सत्याग्रही म्हणून झाली होती. १९४६ मध्ये डॉ.लोहिया यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या गोव्यातील स्वातंत्र्यसंग्राम १९५४ मध्ये पुन्हा सुरू झाला त्या संग्रामाला मदत करण्यासाठी नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये, मधू लिमये, जगन्नाथ जोशी आदींनी सत्याग्रह केला आणि त्यांना दहाबारा वर्षे अशा शिक्षा झाल्यानंतर तुरूंगात ठेवण्यात आले. नानासाहेब १९५७ च्या निवडणुकीत पुण्यातून लोकसभेसाठी संयुक्त महाराष्ट्र समिती तर्फे उभे होते. चुरशीच्या निवडणुकीत ते निवडून आले.

नानासाहेब गोरे साने गुरूजींनी सुरू केलेल्या 'साधना' साप्ताहिकाचे संपादक होते. त्यांनी धकाधकीच्या राजकीय जीवनातही उत्कृष्ट ललितलेखन केले.  गुलबर्गाच्या तुरूंगातील अनुभवांवर 'कारागृहाच्या भिंती' हे त्यांचे पहिले पुस्तक होय. नानासाहेबांना मराठीतील एक

शैलीदार लेखक म्हणून मान्यता मिळाली. नानासाहेब गोरे यांच्या भाषणातून आणि लेखांतून समतेचा विचार हिरिरिने मांडीत असत.[२४]

अशाप्रकारे नानासाहेब गोरे यांच्या कार्याची सुरूवात स्वातंत्र्यलढयामध्ये झाली. शिक्षा, समाजवादी पक्षाची स्थापना व समाजवादाविषयक लेखन स्वातंत्र्यलढयात भाषणांमुळे अटक व शिक्षा, संपादक आणि गोव्याच्या सत्याग्रहात सहभाग राजकीय कार्य आणि स्त्री मुक्तीचे समर्थक, साधना साप्ताहिकाचे संपादक पुरोगामी विचारवंत त्याचप्रमाणे साहित्यातील कार्य खूप मोठे आहे. त्यांचा मृत्यू १९९३ साली झाला.

### ५.५.८ आचार्य जावडेकर :–

प्रा.प्रधान यांनी प्रा.जावडेकरांवर इंग्रजीत चरित्रात्मक पुस्तक लिहिले. हे पुस्तक जनता ट्रस्ट मुंबई यांनी प्रसिद्ध केले. ग.प्र. प्रधान त्यांना गुरू मानत. शंकरचा जन्म मलकापूर येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील कोल्हापूर संस्थानात नोकरी करत होते. त्यांना वाचनाची आवड होती. त्यांनी त्यांच्या मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण केली. कोल्हापूरला शालेय शिक्षण घेतल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते मुंबईला आले. राज्यशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन त्यांनी १९१८ मध्ये पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी विवाह केला. विवाहानंतर एम.ए.करण्यासाठी पुन्हा मुंबईस गेले. याच काळात गांधीजींनी विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेज सोडून चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देऊन जावडेकरांनी एम.ए.ची फी भरली असताना सुद्धा एम.ए.चा नाद सोडला व ते चळवळीत उतरले.[२५]

पुण्याच्या टिळक विद्यापीठात राज्यशास्त्र शिकविण्यासाठी टिळकांनी त्यांना आमंत्रित केले. तेथे आचार्य भागवत तत्त्वज्ञान शिकवत असत. ते ही गांधीजींच्या असहकार चळवळीत सामील झाले. जावडेकरांना पत्रकारितेत रस होता. त्यांनी ‘लोकशिक्षण’ मासिकाचे संपादक जांभेकर यांच्याशी मैत्री केली. त्यावेळी स्वतःला लोकमान्य टिळकांचे वारसदार म्हणणारे न.चि.केळकर गांधीजींच्या काही विषयांवर टिका करत होते. जावडेकरांनी ‘लोकशिक्षण’मधून टिळक आणि गांधीजीं यांच्यावर अभ्यासपूर्ण लेख लिहिला आणि गांधीजी टिळकांच्याच मार्गाने पुढे जात आहेत, असा विचार मांडला. जावडेकर आणि भागवत यांनी महाराष्ट्रातील सत्याग्रह मोहिमेत सहभागी होण्याचे ठरवून रत्नागिरी जिल्हयातील शिरोडा येथे मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. जावडेकरांना रत्नागिरीच्या तुरूंगात सहा महिने कारावासात राहावे लागले. ते तुरूंगात

असतानाच इस्लामपूरला त्यांची कन्या मृत्यू पावली. जानेवारी १९३२ मध्ये त्यांना पुन्हा अटक झाली आणि त्यांची रवानगी नाशिक तुरूंगात झाली. तुरूंगातील एकांतवासाचा फायदा घेऊन त्यांनी मार्क्सचा अभ्यास केला नंतर येरवडा तुरूंगात 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' अभ्यासला. गांधी व मार्क्स यांचा विचारांचा तौलनिक अभ्यास केला.[२६]

आचार्य जावडेकर यांची लेखनशैली सर्वसाधारणपणे गंभीर, संयमी, आणि वैचारिक आदान-प्रदानास पोषक अशा स्वरूपाची होती. मात्र, त्यांच्या तरूणपणातील वृत्तपत्रीय लिखाणात त्यांच्या लेखनीला राजकीय विरोधाची विशेष धार चढलेली दिसते. लो.टिळक व असंतोषात्मक देशभक्तीची मीमांसा असा गांधीवादी देशभक्तांवर टिका करणारा एक लेख केसरीकर याने प्रसिद्ध केला. या लेखाला प्रत्युत्तर म्हणून जावडेकर यांनी असंतोषात्मक टिळक भक्तीची मीमांसा असा लेख १९३९ मध्ये 'लोकशिक्षण' मासिकात प्रसिद्ध केला. या लेखामध्ये त्यांनी केसरी संप्रदायावर टिकेची झोड उठवलेली दिसते.[२७]

१९३८ सालानंतर त्यांना अस्थम्याचा त्रास होऊ लागला म्हणून ते इस्लामपूरला गेले. त्यांनी तेथे लिहिलेली गांधीवाद आणि लोकशाही ही दोन पुस्तके य.गो.जोशी यांनी वादविवेचन माला म्हणून प्रसिद्ध केली. शंकरराव देवांनी पुस्तक प्रकाशनासाठी सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ही संस्था काढली. त्यासाठी 'आधुनिक भारत' हा ग्रंथ जावडेकरांनी लिहिला. ६०० पृष्ठांचा हा अभ्यासपूर्ण ग्रंथ १९३८ साली प्रसिद्ध झाला त्याची त्यावेळी फार स्तुती झाली. महाराष्ट्रातील राजकीय चळवळीचा इतिहास सांगणारा हा ग्रंथ सेवादलातील स्वातंत्र्य सैनिकांचे टेक्स्ट बुक ठरला.[२८]

प्रधान सरांनी लिहिलेल्या या पुस्तकांत जावडेकरांचा जन्म, बालपण, शिक्षण, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग त्याचप्रमाणे त्यांनी केलेले अध्यापन असे सविस्तर सांगितले आहे. त्यांना पत्रकारितेची आवड होती. पुढे ते सत्याग्रहात सामील झाले आणि त्यांना शिक्षा झाली. पुन्हा ते पत्रकारितेकडे वळाले. त्यांचे ग्रंथलेखन उत्तम होते. त्यांचे रचनात्मक कार्य सुद्धा चांगले होते. त्यांच्या 'आधुनिक भारत' या पहिल्या ग्रंथाची पहिली आवृत्ती १९३८ मध्ये प्रसिद्ध झाली. सहावी आवृत्ती फेब्रुवारी २००५ मध्ये निघाली.

### ५.५.९ पंडित जवाहरलाल नेहरू :-

भारताचे पहिले पंतप्रधान यांचे सुमारे ४० पानांचे छोटे चरित्र ग.प्र.प्रधान यांनी लिहिले असून शिव पब्लिकेशन, पुणे यांनी २००५ मध्ये प्रसिद्ध केले आहे. नेहरू कुटुंब मूळचे काश्मीरचे त्यांच्या पूर्वजांनी दिल्लीत घर बांधले. १८५७ च्या सुमाराला ते कुटुंब आग्रा येथे आले. नंतर जवाहरलालांचे वडील वकिली करण्यासाठी अलाहाबादला आले. हा इतिहास ते सांगतात. जवाहरलाल यांचे प्राथमिक शिक्षण शिक्षक ठेवून घरीच झाले. १९०५ मध्ये नेहरू कुटुंब काही काळ इंग्लंडला गेले .जवाहरलालांचे नाव येथील पब्लिक स्कूल मध्ये घालून त्यांचे आईवडील अलाहाबादला परतले केंब्रीज विद्यापीठात शास्त्र शाखेचे शिक्षण पूर्ण करून कायदयाचा अभ्यास करून १९१२ साली बॅरिस्टर होऊन जवाहरलाल परत आले. इंग्लंडमध्ये असताना त्यांनी विविध विषयातील ग्रंथांचा अभ्यास केला. इतिहास, राज्यशास्त्र यांच्या वाचनामुळे ते भारतीय स्वातत्र्य चळवळीबद्दल विचार करू लागले.[२९]

जवाहरलाल वकिली सोडून स्वातंत्र्यलढयात सामील झाले. २१ साली मोतीलाल व जवाहरलाल या पितापुत्रांना अटक झाली. ६ महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली. चौरीचौरा येथील घटनेमुळे गांधीजींना ६ वर्षांची शिक्षा झाली. जवाहरलालांनाही १९ महिन्यांची शिक्षा झाली.

गांधीजी व डॉ. आंबेडकर 'पुणे करार' झाला तेव्हा जवाहरलाल तुरूंगातच होते. ३० ऑगस्ट १९३३ रोजी त्यांची सुटका झाली खरी पण जानेवारी १९३४ मध्ये पुन्हा अटक होऊन अलिपूर तुरूंगात त्यांना ठेवण्यात आले. कमला नेहरूंच्या आजारपणामुळे आधी नेहरूंना तर त्यांची बिनशर्त मुक्तता झाली. जवाहरलाल युरोपला गेल्यानंतर भारतात परत येऊन जवाहरलालांनी पन्हा राजकीय कार्यांना प्रारंभ केला.

१९३६ साली काँग्रेस अधिवेशन ग्रामीण भागात जळगाव जिल्हयात फैजपूर येथे झाले. त्याच्या अध्यक्षपदी जवाहरलाल नेहरू होते. काँग्रेसने १९३७ सालच्या आगामी निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. निवडणूक जिंकणे हा स्वातंत्र्यलढयाचाच एक भाग आहे हे जनतेला सांगण्यासाठी पंडितजींनी देशभर दौरा केला. देशाच्या एकात्मतेसाठी आपण धर्म, जात हे भेद विसरून आपण एकजुटीने लढले पाहिजे, असे ते सतत सांगत असत. या निवडणुकीनंतर बिहार, आसाम, ओरिसा, मुंबई इ.सात प्रांतामध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे सत्तारूढ झाली.

१९४२ च्या आंदोलनामध्ये पं.नेहरू, वल्लभभाई पटेल यांना नगरच्या तुरूंगात स्थानबद्ध केले. १९४५ साली त्यांची सुटका झाल्यानंतर सांगितले, १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात जसे घडले त्याची सर्व जबाबदारी मी घेतो, मला स्वाभिमानी व लढाऊ भारतीय जनतेचा अभिमान वाटतो. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून १४ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवला. आपल्या देशबांधवांना उद्देशून त्यांनी अविस्मरणीय भाषण केले. ते म्हणाले, मध्यरात्रीच्या या प्रहरी सर्वजण झोपले असताना भारत जागृतपणे स्वातंत्र्याच्या नवजीवनात प्रवेश करत आहे. या पवित्र क्षणी आपण अशी शपथ घेऊ की, आपण भारताची आयुष्यभर अक्षय सेवा करत राहू, ही भारतीय जनतेची सेवा असेल. ही मानवतेची सेवा असेल.

वैज्ञानिक प्रगती करण्यासाठी गोरगरिबांचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या खंडप्राय देशाला दीर्घ कालावधी लागेल असे पंडितजींना वाटत होते.[३०] पंडित नेहरू घटना समितीचे सदस्य होते. त्यांनी नियोजन मंडळ निर्माण केले. पहिली पंचवार्षिक योजना आखली. जगातील बडया राष्ट्रांच्या सत्ता संघर्षातून अलिप्त राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला. नेहरूंचे एक स्वप्न होते, भारताची सुजलाम, भूमी सुफलम व्हावी, प्रधान परखडपणे सांगतात की, अंतर्गत राजकारणातील काही निर्णय चुकीचे होते. वरीलप्रमाणे पंडित नेहरूंच्या कार्याचा लेखाजोखा या पुस्तकात प्रधान सरांनी मांडला आहे.

**५.५.१० जयप्रकाश नारायण :–**

जयप्रकाश नारायण यांचा जन्म गंगा आणि शरयू या दोन नदयांच्या संगमामधील बेटासारख्या एका प्रदेशात किताबदिआरा या गावी १९०२ च्या ११ ऑक्टोंबरला विजयदशमीच्या शुभदिवशी झाला होता. त्यांचे वडील हरसूदयाल सिंचणखात्यात शासकीय नोकरीत होते. आई फुलराणी ही ममताळू आणि ईश्वरपरायण वृत्तीची होती. जयप्रकाश यांनी अमेरिकेतील ओहिओ विद्यापीठाचे एम.ए.ही पदवी संपादन केली आणि पी.एच.डी साठी नावही नोंदवले. परंतु त्याच्या मातोश्री आजारी असल्यामुळे ते भारतात परतले. शिष्टमंडळाबरोबर फिरत असताना १९३२ साली जयप्रकाश नारायण यांना मद्रास येथे अटक झाली. त्यांच्या अटकेनंतर फ्रील जर्नलने काँग्रेस ब्रेन ॲरेस्टेड काँग्रेसचे बौद्धिक नेतृत्व करणाऱ्या नेत्यास अटक

असा मथळा देऊन जयप्रकाशजींच्या अटकेची बातमी ठसठशीतपणे छापली. जयप्रकाशजींना पकडल्यानंतर मुंबईस आणण्यात आले, त्यांच्यावर खटला लावून त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली आणि त्यांना नाशिक येथील तुरूंगात पाठविण्यात आले. यावेळी प्रभादेवी यांना सत्याग्रहाबद्दल २ वर्षे झालेली शिक्षा त्या भोगत होत्या.[३१]

जयप्रकाशजींच्या बरोबर नाशिकच्या तुरूंगात अच्युतराव पटवर्धन, युसूफ मेहरअली, मिनू मसानी, अशोक मेहता, ना.ग.गोरे आदि कार्यकर्ते होते. त्यांच्यापैकी मेहेरअली यांनी मार्क्सचे काही ग्रंथ वाचले होते. जयप्रकाशजींनी त्यांच्यावरील काही पुस्तके मागविली. या तरूणांच्या मार्क्सच्या विचारांची चर्चा होऊ लागली. नाशिकच्या तुरूंगात जयप्रकाशांच्या बरोबर मेहेरअली, मसानी, ना.ग.गोरे, अशोक मेहता यांची कडाक्याची चर्चा चाले. महात्मा गांधीबद्दल या सर्वांच्या मनामध्ये आदर होता, प्रेमही होते. परंतु स्वातंत्र्य चळवळीला अधिक गती येण्यासाठी गांधीजींचे एकमेव नेतृत्व पुरे पडणारे नाही असे तरूण मंडळींना वाटत होते.[३२]

१९३४ मध्ये पाटणा येथे काँग्रेस कमेटीचे अधिवेशन होणार होते. जयप्रकाश नारायण यांनी समाजवादी कार्यकर्त्यांची परिषद बोलावली. या परिषदेत काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि पक्षाच्या पूर्वतयारीसाठी एक समिती स्थापन करण्यात आली. जयप्रकाश नारायण हे या कालखंडात मार्क्सवादी विचारांनी प्रभावित झाले होते. आणि तो दृष्टिकोण त्यांनी 'व्हाय सोशॉलिझम' मध्ये प्रभावितपणे मांडला. जयप्रकाशजींनी अध्यात्मक भूमिकेचे खंडण करत पूर्णपणे भौतिकवादी भूमिका या पुस्तकात मांडली आहे. समाजवादी पक्षाने १९५० सालच्या निवडणुकीत उभे केले परंतु जयप्रकाश आणि डॉ.लोहिया यांनी निवडणुकीत उभे न राहण्याचा निर्णय घेतला होता. जयप्रकाश नारायण यांना आकर्षण झाले होते. भूदान चळवळीसाठी ते बिहारमध्ये ते पायी फिरले होते. सप्टेंबर १९६१ मध्ये लंडनच्या आंतरराष्ट्रीय निःशस्त्रीकरण परिषदेला खास निमंत्रित म्हणून हजर होते.

१९७५ च्या आणिबाणीमध्ये जयप्रकाशजींना अटक झाली होती. त्यांनी आपल्याला बिहार येथे ठेवण्याची विनंती केली होती. परंतु ती सरकारी पक्षाने फेटाळली होती. जयप्रकाश यांच्यावर अत्याचाराचा कट रचलेला आरोप होता. १९४७ सालच्या रेल्वे हा संप हा जयप्रकाश व त्यांचे सहकारी यांचा देशाची आर्थिक व्यवस्था उखडण्याचा डाव होता. जयप्रकाश यांनी

पोलिसांना आणि लष्करांना बंड करण्याची चेतावनी दिली इत्यादी आरोप त्यांच्यावर केले होते.[३३]

जयप्रकाश नारायण यांच्या दीर्घकाळ काम केलेल्या ग.प्र.प्रधान यांनी जयप्रकाशजींची जीवनकथा सांगताना त्यांच्या विचारांची वाटचाल स्पष्टपणे रेखाटली आहे. जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण प्रेरणादायी संदेश तरूण कार्यकर्त्यांना सांगावा, हे या पुस्तकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. प्रधान सरांनी १६० पृष्ठांच्या या पुस्तकाची विभागणी १० प्रकरणात केली आहे. यामध्ये स्वातत्र्यसंग्रामाचे अंतिम पर्व आणि आणीबाणी लोकशाहीवरील अरिष्ट इत्यादींचा समावेश या पुस्तकात आहे.

**५.५.११ डॉ.बाबासाहेब आंबेडकर :–**

आदरणीय ग.प्र.प्रधान यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याच शब्दांत हे पुस्तक सुगावा प्रकाशनामार्फत प्रकाशित केले. गांधी आणि आंबेडकर यांचे विचार, कार्यपद्धती त्यांचे वैचारिक मतभेद यावर प्रधान सरांनी तळमळीने लिहिले आहे. समाजवादी आणि आंबेडकरवादी यांनी दोघांना समजून घ्यावे, अशी प्रधान सरांची इच्छा दिसते. दोन्ही बाजूने गैरसमज दूर व्हावेत असे प्रधान सरांनी लेखन केले आहे.

हे पुस्तक लिहिण्याची पद्धत फार अफलातून आहे. प्रत्यक्ष न घेतलेल्या काल्पनिक मुलाखतीवर हे पुस्तक आधारले आहे. तरी मुलाखत वास्तवात आहे असे वाटते. प्रधान सरांनी पुस्तकाची अशी रचना केली आहे की, एकदा वाचायला सुरूवात केल्यावर पुढे वाचतच रहावेसे वाटते. या पुस्तकात पहिल्या प्रकरणात आंबेडकरांना त्यांच्या आडनावासंदर्भात व शिक्षण तसेच संस्कार, अस्पृश्यतेसंबंधी आलेले अनुभव विचारले आहेत. दुसऱ्या मुलाखतीमध्ये त्यांना त्यांच्या शिक्षणाबद्दल व त्यांच्या घरच्या परिस्थितीबद्दल विचारले आहे. त्यावेळी आंबेडकर म्हणतात, मी लंडनला जाण्यापूर्वी सिडहॅम कॉलेजमध्ये नोकरी करत असे, तेव्हा पुढील विद्याभ्यास पूर्ण करण्यासाठी मला पैसे साठविणे आवश्यक होते. त्यावेळी माझी पत्नी रमाबाई हिला फार काटकसरीने संसार करावा लागला.

तिसऱ्या मुलाखतीमध्ये डॉ.आंबेडकर यांनी वैचारिक प्रवासात आपल्याला पारतंत्र्याची चटके कसे सोसावे लागले हे सविस्तर आहे. ते लंडनला एम.एस्सीचा अभ्यास करताना प्रत्येक विद्यार्थ्यांना एखादया विषयावर निबंध सादर करावे लागत. आंबेडकरांनी हिंदुस्थानातील

लोकशाही सरकारच्या जबाबदाऱ्या हा निबंध वाचला. त्यामुळे तेथे विद्यार्थी व प्राध्यापकामध्ये मोठे वादळ उठले होते. हॅरॉल्ड लॉस्की, यांनी त्यांच्या निबंधावर असा आक्षेप घेतला की, माझी विचारसरणी अस्सल क्रांतिकारक प्रचारकाला शोभेल अशी आहे. त्यांचा हा आक्षेप मला माझा गौरव वाटला. [३४]

**५.५.१२ मुलाखत चौथी :–**

या मुलाखतीमध्ये आंबेडकरांनी सायमन कमिशनने अस्पृश्यांच्या मागणीचा विचार सहानुभतिपूर्वक केला नाही, असे म्हटले आहे. त्यामुळे त्यांनी सायमन रिपोर्टवर टिका केली. अस्पृश्यांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी पहिली राजकीय परिषद नागपूरला घेतली. मी ब्रिटिशांचा मित्र नव्हतो, सरकारने अस्पृश्यांना अधिक अधिकार दयावेत, अशीच मागणी आंबेडकर करत होते. मात्र, डॉ.आंबेडकर म्हणतात, गांधीप्रमाणे असहकाराची चळवळ मी करत नव्हतो. कारण राजकीय अधिकार मिळविण्यासाठी आपण सनदशीर मार्गानेच प्रयत्न केले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. [३५]

पाचव्या मुलाखतीमध्ये डॉ.आंबेडकर चवदार तळयाच्या सत्याग्रहाबद्दल सांगतात. ते म्हणतात ती घटना आपल्या जीवनातील एक महत्त्वाची घटना होती. चवदार तळयाचा सत्याग्रह आणि गांधींचा सत्याग्रह यातील फरक ते सांगताना म्हटले, गांधीजींचा सत्याग्रह हा ब्रिटिशांचा कायदा मोडणारा होता. तर चवदार तळयाचा सत्याग्रह हा हिंदूंच्या रूढीग्रस्त वागणुकीविरूद्ध होता. सहाव्या मुलाखतीमध्ये आंबेडकर पहिल्या आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेसंदर्भात सांगतात, ते म्हणतात मी त्यावेळी अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदारसंघ असावेत, असे म्हटले होते. मात्र, लोकसंख्येच्या प्रमाणात अस्पृश्यांना कायदेमंडळात जागा असल्या पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली होती.

सातव्या मुलाखतीमध्ये पुणे करारासंबंधी डॉ.आंबेडकरांनी सविस्तर सांगितले आहे. आठव्या मुलाखतीमध्ये त्यांनी धर्मांतराची घोषणा आणि जातीयव्यवस्थेबाबतची तात्त्विक भूमिका याविषयी सांगितले आहे. नवव्या मुलाखतीमध्ये जाती संस्थेचे निर्मूलन यासंबंधी सांगितले आहे. दहाव्या मुलाखतीमध्ये स्वतंत्र मजूर पक्षाबद्दल आणि पाकिस्तानबाबतचे विचार मांडणारा ग्रंथ यासंबंधित सांगितले आहे. अकराव्या मुलाखतीमध्ये घटना समितीचे कार्य विशद केले आहे. बाराव्या मुलाखतीमध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार यासंबंधी माहिती दिली आहे.

### ५.५.१३ 'स्वातत्र्यसंग्रामाचे महाभारत':–

प्रधान सरांच्या अनेक पुस्तकांपैकी स्'वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत' हे पुस्तक वाचकांना खूप आवडले. ११जून २००४ सालापर्यंत या पुस्तकाच्या एकूण ४ आवृत्या झाल्या आहेत. इतर स्वातंत्र्यसंग्रामासंबंधी पुस्तके वाचण्यापेक्षा हे एक पुस्तक जरी वाचले तरी स्वातंत्र्यलढा समजतो.

बुंदेलखंडातील एका छोटया संस्थाच्या राणीच्या 'मेरी झाँशी नही दूंगी' या शब्दातून ब्रिटिश साम्राज्याच्या सर्वभक्षक आक्रमणाविरूद्ध लढण्याचा निर्धार व्यक्त झाला. या शब्दातून उसळलेल्या ठिणगीने झाशी संस्थानच्या प्रजेच्या आणि सैन्याच्या मनातील देशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. लक्ष्मीबाईंना तरूणपणीच वैधव्य आले होते. राज्याला वारसा असावा म्हणून त्यांनी एका मुलाला दत्तक घेतले होते.[३६]

स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत या पुस्तकात ग.प्र.प्रधान यांनी पुस्तकाची सुरूवात झाशीच्या राणीच्या प्रसंगाने केली आहे. तर दुसऱ्या प्रकरणात त्यांनी 'सशस्त्र बंडाचे प्रयत्न' यामध्ये त्यांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या आत्मचरित्रातील उतारा याठिकाणी दिला आहे. तो वाचून त्या काळचे क्रांतीच्या विचारांनी आणि स्वातंत्र्याप्रमाणे भारावलेली तरूण पिढी निश्चितच पुढे आल्याशिवाय राहत नसतील.

पुणे जिल्हयातील व सातारा जिल्हयातील डोंगराळ भागातील रामोशी ही जमात आहे. हा समाज स्वतःला रामवंशी(रामाचे वंशज) असे समजतात. दणकट बांध्याचे व कणखर लढाऊ वृत्तीचे हे रामोशी साहसी तसेच निष्ठावान असतात. वासुदेव बळवंतांनी या समाजातील तरूणांना संघटित करण्यास सुरूवात केली होती. नंतर त्यांनी काही सहकाऱ्यांच्या मदतीने नाशिक व खानदेश या जिल्हयात पुढे वऱ्हाडातील काही भागात राहणाऱ्या भिल्ल, कोळी, आणि धनगर समाजाशीही संबंध जोडले. संघटनेचे हे प्राथमिक काम सुरू केल्यावर वासुदेव बळवंत सशस्त्र बंडाच्या योजनेचा विचार करू लागले.[३७]

तिसऱ्या प्रकरणात काँग्रेसची स्थापना व स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी मांडली आहे. त्याचबरोबर थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज, राजकीय जागृतीची चौफेर लाट इत्यादींचा सविस्तर उल्लेख आहे. चौथ्या प्रकरणात त्यांनी 'तणाव व वादळ' असे नाव दिले असून लोकमान्य टिळकांना अटक आणि शिक्षा

याविषयी माहिती दिली आहे. पाचव्या प्रकरणात त्यांनी लाल–बाल–पाल यांच्या कार्याविषयी माहिती देऊन नेमस्त आणि जहाल याविषयी ही लिहिले आहे.

सहाव्या प्रकरणात भारतातील आणि परदेशातील क्रांतिकारकांविषयी सांगितले आहे. सातव्या प्रकरणात त्यांनी अमेरिकेतील क्रांतिकारकांविषयी सांगितले आहे. सातव्या प्रकरणात काँग्रेसमधील फूट व ऐक्य स्पष्ट केले आहे. आठव्या प्रकरणात गांधीपर्व सांगून असहकार चळवळीची माहिती दिली आहे. नवव्या भागास 'क्रांतिकारकांचा मेरूमणी–भगतसिंग' असे नाव दिले असून त्यामध्ये चंद्रशेखर, काकोरी कट, हिंदुस्थान सोशॉलिस्ट रिपब्लिकल असोसिएशन ची स्थापना याविषयी माहिती दिली आहे. दहाव्या प्रकरणात दांडी यात्रा व कायदेभंगाची चळवळ याविषयी सांगितले आहे. अकराव्या भागात 'नवीन प्रवाह' यामध्ये राष्ट्रवादास समाजवादी चळवळीची जोड याविषयी माहिती दिली आहे. बाराव्या प्रकरणात 'चले जाव' आंदोलनाविषयी माहिती दिली आहे. तेराव्यामध्ये सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेनेचे कार्य विषद केले आहे. चौदाव्यामध्ये स्वातत्र्याची 'सुफळ सांगता' म्हणजे १० मे १८५७ ला सुरू झालेल्या संग्रामाची १५ ऑगस्ट १९४७ रोजी सुफल सांगता झाली. भारत या संग्रामात विजयी झाला असे सविस्तर दिले आहे.

परिशिष्टामध्ये हैद्राबादच्या स्वातंत्र्यलढा याविषयी सांगितले आहे. गोवा मुक्ती संग्राम परिशिष्ट २ मध्ये आहे. परिशिष्ट ३ मध्ये उपयुक्त संदर्भग्रंथ दिले असून त्यामध्ये निवडक मूल्यक सूची डॉ.म.प.पेठे असे आहे. पाचमध्ये चित्रमाला पुस्तकातील शेवटची १६ पुस्तके दिली आहेत.

**५.५.१४ साता उत्तराची कहानी :–**

प्रा.ग.प्र.प्रधान यांनी या त्यांच्या पुस्तकात १९३८ ते १९८० या कालखंडात झालेल्या चळवळीच्या वेळी वेगवेगळया पक्षांनी वेगवेगळया भूमिका घेतल्या. त्या त्या पक्षाचा प्रतिनिधी म्हणून ज्या ज्या कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्र ग.प्र.प्रधान यांनी रेखाटलेली आहेत. ते त्यांच्या पक्षाची तात्त्विक भूमिका मांडतात. ही भूमिका त्या कार्यकर्त्यांद्वारा मांडताना प्रधान सरांकडून त्या पक्षाच्या भूमिकेचे स्पष्टीकरण बरोबर झाले आहे की नाही, ते पाहण्यासाठी ते त्या त्या पक्षामध्ये त्यांच्या मित्रांकडून तो भाग तपासून घेतला. बाळासाहेब देवरस आणि ग.प्र. प्रधान तुरूंगात एकत्र असताना प्रधान सरांनी संघाची भूमिका स्पष्ट करणारा जो मजकूर लिहिला होता

तो तपासला आणि 'यात सत्याचा विपर्यास नाही' असे सांगितले. वेगवेगळ्या पक्षांच्या भूमिका संबंधी इतर पक्षांतील कार्यकर्ते जे टिका करत, ती प्रधान सरांनी त्यांच्या आकलनाप्रमाणे मांडली. भाबा पाटील त्यांना म्हणाले, तुमच्या पुस्तकात वेगवेगळे प्रश्न चर्चिले आहेत आणि प्रत्येक प्रश्नाला सात जणांनी आपापली उत्तरे दिली आहेत. तुमच्या पुस्तकाला 'साता उत्तराची कहानी' असे शीर्षक दया. प्रधान सरांनी ते स्वीकारले.[३८]

समाजवादी, साम्यवादी, रॉयवादी, आंबेडकरवादी, गांधीवादी, पत्रीसरकारवादी, हिंदुत्ववादी या सात विचारधारांच्या मार्गाने प्रामाणिकपणे वाटचाल करणाऱ्या सात ध्येयवादी मित्रांचे वैचारिक मंथन ही मध्यवर्ती कल्पना हे पुस्तक आहे. भिन्न भिन्न व परस्पर विरोधी राजकीय विचारप्रणाली ग.प्र. प्रधान यथार्थपणे समजून देतात. विनोद शिरसाठ 'ललित' च्या ३० जुलै २०१० च्या अंकात म्हणतात, आपल्या उदयाच्या पिढयांना आपल्या राजकीय जाणिवा प्रगल्भ करावयाच्या असतील तर 'साता उत्तराची कहाणी' इतका विश्वसनीय, इतका माहितीपूर्ण व इतका सम्यक दृष्टिकोण देणारा दुसरा ग्रंथ मराठीत नाही. त्यांचे हे पुस्तक काळाच्या कसोटीवर टिकून राहील असा विश्वास शिरसाठांना वाटतो.[३९]

ग.प्र. प्रधान पहिले पत्र खानोलकरांना यांना उद्देशून लिहितात, ते म्हणतात 'मी चळवळीत पडल्यामुळे माझे आईवडील सुखी आहेत. मी लवकर सुटावा म्हणून आई रोज कसब्यातील गणपतीला जाते आणि १०८ प्रदक्षिणा घालते. आईचे डोळे अगोदरच अधू आणि दोन वर्षांपूर्वीच तिला संधिवात झाला होता. गणपतीला जाताना ती ठेचाळत असेल, थंडीत फरशीवरून प्रदक्षिणा घालताना तिचे गुडघे सुजत असतील, हे मनात आले की जीव कासावीस होतो. आई मला नेहमी म्हणायची, तू लहानपणी कधी माझ्यापासून दूर झाला नाहीस पण आता तुला घराची ओढ वाटत नाही. आईचे म्हणणे खरेच आहे.[४०]

तिसऱ्या प्रकरणामध्ये स्टडी सर्कल हा एक प्रधान सरांसाठी अपूर्व होता. हया स्टडी सर्कलमुळे विचारांचे नवीन क्षितिज गवसले. हया स्टडी सर्कलमुळे ग.प्र. प्रधान ओढले गेले ते त्यांचे मित्र बंडू गोरे यांच्यामुळेच. एक दिवस ते त्यांच्या मित्राकडे गेले, त्यावेळेस ते एक जाडा ग्रंथ वाचत होते. ते प्रधानांना पाहून वाचायचे थांबून त्यांच्या नेहमीच्या उत्साहाने म्हणाले, खानोलकर लेनिन किती मोठा होता आणि एका वाक्यात त्याची जबर इच्छाशक्ती कधी व्यक्त झाली हे पहायचे असेल तर हे ऐक. लेनिन म्हणतो, "Many Have Described The

Society our Task Is to Change It' तुला साहित्याचे मोठे आकर्षण वाटते पण साहित्यिक लोक जीवनात केवळ वर्णन करतात.[४१]

'साता उत्तराची कहाणी' या पुस्तकात प्रधान सरांनी एकूण ३६ प्रकरणे केली आहेत. ४९५ पानांचे हे पुस्तक असून सुमारे चार दशकातील घडामोडीचा म्हणजे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा कालखंडावर यात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ही राजकीय बखर असल्यामुळे याच्यामध्ये राजकारणाला सर्वात जास्त महत्त्वाचे स्थान आहे.

### ५.५.१५ 'आठा उत्तराची कहाणी' :–

प्रधान सरांनी स्वातत्र्यसंग्रामाचा इतिहास मराठी व इंग्रजीत लिहिला. नंतर त्यांनी 'साता उत्तराची कहाणी' या पुस्तकात १९४० ते १९८० या कालखंडातील राजकीय जीवनाचे चित्रण केले. नंतर १९८० नंतरच्या भारताच्या राजकीय जीवनातील परिस्थितीचे चित्रण करावे, असे त्यांना वाटू लागले आणि 'आठा उत्तराची कहाणी' पुस्तकात त्यांनी १९८० ते २००७ या काळातील राजकीय जीवनाचे चित्र रेखाटले. या पुस्तकात एकूण १४ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात पार्श्वभूमी सांगणारा प्रदीप आणि निरंजन या दोन पत्रकार मित्रांचा पत्रव्यवहार आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या एका कार्यकर्त्यांची मुलाखत घेतली आहे.ही मुलाखत घेण्याआधी कार्यकर्त्यांना कॉ.बॅनर्जी म्हणाले, तुम्ही आमच्या पक्षातील कॉ.ज्योती बसूंसारख्या ज्येष्ठ नेत्याची मुलाखत घ्यायला हवी. त्यावर पत्रकार त्यांना म्हणाले, मला शिकविणाऱ्या एका ज्येष्ठ विचारवंत पत्रकारांनी सांगितले की राजकीय पक्षाचे नेते त्यांच्या पक्षाच्या निर्णयाचे समर्थन करतील, परंतु हे निर्णय घेत असताना पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांची मनोभूमिका समजणे अधिक महत्त्वाचे आहे आणि म्हणून मी आपली मुलाखत घेऊ इच्छितो. आपण मनमोकळेपणाने मला स्पष्ट करून सांगावे, अशी माझी विनंती आहे.[४२]

तिसऱ्या प्रकरणामध्ये केरळमध्ये समाजवादी नेते यांची पुणे येथे घेतलेली मुलाखत आहे. त्याचे नाव विश्वनाथ असे होते. त्यांनी ऐंशी साली जनता पक्ष फुटल्यानंतरची हकीकत या प्रकरणात आहे. चौथ्या प्रकरणामध्ये भारतीय जनता पार्टीचे श्रीधर भागवत हे नागपूरला आले होते. त्यांची प्रदीप यांनी घेतलेली मुलाखत आहे. यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या कार्याचा आढावा, बाबरी मस्जिद प्रकरण, लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद

महाजन यांच्या कार्याचे मूल्यमापन, भाजपाने घेतलेली हिंदुत्ववादी भूमिका याविषयी माहिती आहे. पाचव्या प्रकरणामध्ये काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते काका पाटील यांनी काँग्रेसच्या ध्येय धोरणाबद्दल, पंडित नेहरूबद्दलचे त्यांचे मत, आणीबाणीतील इंदिरा गांधींचे निर्णय, जनता पक्षाचे मूल्यमापन इ.गोष्टींवर त्यांच्याशी चर्चा केली आहे. सहाव्या प्रकरणात विदर्भातील सर्वोदयाचे ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतराव बोबटकर हे माझ्या परिचयाचे होते. त्यांच्याकडे असे कळले की, महाराष्ट्रातील सर्वोदयाच्या कार्यकर्त्यांचे वर्धा येथे संमेलन असून तेथे उत्तर प्रदेशातील प्रेमभाई हे कार्यकर्ते येणार होते. याच प्रकरणात पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जमिनीचे समान वाटप झाले पाहिजे, हा विचार पंडित नेहरूंनी त्यांच्या भाषणात मांडला होता. याचा उल्लेख या प्रकरणात केला आहे.

सातव्या प्रकरणात उत्तर प्रदेशातील सामाजिक अंतरंगाची ओळख करून दिली आहे. तसेच काशिराम यांचे अशी जनमान साथ त्यांची उभी केलेली प्रतिमा याविषयी सांगितले आहे. आठव्या प्रकरणामध्ये सनदभाईंच्या प्रदीप, महात्मा गांधीविषयी विचारतात यावर सनदभाई म्हणाले, प्रेमभाई गेल्यानंतर डॉ.रागिणीताई आणि आम्ही काही जणांनी महात्मा गांधी मिशनचे काम चालू ठेवले. त्याला दहा वर्षे होऊन गेली. आमच्याकडे सुरूवातीपासून आलेल्या कार्यकर्त्यांपैकी दोघेजण वगळता बाकीचे सर्वजण मिशनचे काम निष्ठापूर्वक करतात. ओरिसातील चार जिल्हे, बंगालमधील मिदनापूर, मणिपूरमधील इम्फाळ आणि उत्तर प्रदेशातील जौनपूर, प्रतापगड जिल्हयामध्ये आमचे काम चांगले चालले आहे.[४३]

प्रकरण चार ते नऊमध्ये कम्युनिस्ट पक्षाची विचारधारा आहे. प्रकरण पाच ते दहा समाजवादी कार्यकर्ते विश्वनाथ यांची मुलाखत निरंजन यांनी पुणे येथे घेतली आहे. ऐंशी साली जनता पक्षाची फूट या प्रकरणामध्ये विश्वनाथ यांना आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, यांच्याबद्दलचा आदर ना.ग.गोरे, एस.एम.जोशी, मधू दंडवते यांच्या कार्याचा संदर्भ आलेला आहे.[४४] प्रकरण अकराव्यामध्ये मुस्लिम महिलांच्या प्रश्नाविषयी माहिती आहे. यामध्ये अमेरिकेहून आलेल्या डॉ.जहिरा खान, पाकिस्तानमधून आलेल्या डॉ.कुलसुम शेख आणि कोल्हापूरच्या डॉ.आयेषा पटेल यांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम मुलींनी सिनेमा पाहिला म्हणून सनातनी मुस्लिम युवकांनी केलेली मारहाण प्रकरण याचा उल्लेख आहे.

बाराव्या प्रकरणात दलित कार्यकर्ते या नावाने आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर कर्मवीर भाऊराव गायकवाड, बॅरिस्टर कांबळे, बॅ.खोब्रागडे, शंकरराव खरात, रा.सू.गवई, दादासाहेब रूपवते यांनी रिपब्लिकन पक्षातर्फे कार्य केले या प्रकरणात त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती आहे. तेरावे प्रकरण 'नक्षलवादी कार्यकर्ते ' या नावाने आहे. चौदाव्या प्रकरणात समाजवादी नेते विश्वनाथ पुणे येथे आले असताना निरंजन यांना जाऊन भेटले.

### ५.५.१६ माझी वाटचाल :–

प्रधान सरांनी आयुष्यभर केलेली कामगिरी त्यांना आलेला अनुभव हा त्यांनी 'माझी वाटचाल' हे आत्मकथन २००४ साली प्रसिद्ध केले. "Pursui Of Ideals" हे त्यांचे इंग्रजी रूपांतर २००५ मध्ये झाले ते साधना प्रकाशनाने प्रकाशित केले आहे.

या त्यांच्या आत्मकथनामध्ये एकूण नऊ प्रकरणे आहेत. प्रथम प्रकरण म्हणजे वाटचालीतील उमटलेले तसेच या प्रकरणात त्यांनी त्यांचे जन्म, शिक्षण, वाचनाची आवड याविषयी थोडक्यात सांगितले आहे. पुढे त्यांनी सोशॉलिस्ट स्टडी सर्कल जयप्रकाशांच्या पुस्तकांची चर्चा, शिरूभाऊ लिमये यांनी 'जम्मत' नावाची खोली घेतली होती. त्याठिकाणी प्रधानांचे मित्र एकत्र येत. दुसऱ्या प्रकरणामध्ये त्यांनी १९६६ साली विधानपरिषदेची निवडणूक लढविली व जिंकली. त्यानंतर सलग तीन वेळा म्हणजे १८ वर्षे ते विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख आढळतो.

एकदा प्रधान सरांच्या मित्राने विचारले, तुझी विधानपरिषदेत झालेली चांगली भाषणे कोणती होती हे एकदा मला सांगा, त्यावर मी म्हणालो, मी केलेल्या भाषणांपेक्षा मी ऐकलेल्या चांगल्या भाषणाबद्दल तुला सांगेन विधानपरिषदेतील सर्व कामकाज मराठीतून चालते.[४५]

तिसऱ्या प्रकरणात प्रधान सरांनी म.गांधी, नामदार गोखले, व लो.टिळक या भारतीय स्वातत्र्यलढयातील तीन महान नेत्यांविषयी लिहिले आहे. त्यांनी बालवयात या तिन्ही नेत्यांची आत्मचरित्रे वाचली होती. चौथ्या प्रकरणात प्रधान सरांनी त्यांच्या जीवनाचे शिल्पकार यांच्या विषयी म्हणजेच एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे, आचार्य जावडेकर, साने गुरूजी व भाऊसाहेब खांडेकर यांच्याविषयी आपल्या भावना व्यक्त करणारे लिखान केले आहे. पाचव्या प्रकरणामध्ये प्रधान सरांनी 'माझे समाजवादी साथी' यामध्ये त्यांनी शिरूभाऊ लिमये, अनुताई लिमये, दत्ता

ताम्हाणे, बॅ.नाथ पै., मधू दंडवते लालजी कुलकर्णी, शंकरराव खरात, आनंदराव भालेराव यांच्याविषयी लिहिले आहे. त्याचबरोबर समाजवादी चळवळीविषयी सुद्धा या प्रकरणात थोडक्यात लिहिले आहे. सहाव्या प्रकरणात साने गुरूजींनी सुरू केलेल्या 'साधना' साप्ताहिकाचे संपादक असतानाचे कार्य व त्यांचे 'साधना' साप्ताहिकातील साथी याविषयी म्हणजे यदुनाथ थत्ते, वसंत बापट, सदानंद वर्दे या आपल्या साथीदारांविषयी थोडक्यात लिहिले आहे.

सातव्या प्रकरणात त्यांनी अगदी पुण्यामध्ये मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी आपल्या लेखनास सुरूवात केली. टिळकांचे चरित्र कसे लिहिले, या विषयी ते सांगतात. आठव्या प्रकरणामध्ये ते त्यांच्या कौटुंबिक जीवनाविषयी सांगतात, त्यामध्ये त्यांच्या वडिलांचे व आईचे स्वभाव, त्यांनी केलेले संस्कार याविषयी त्यांनी सांगितले आहे. तर नववे प्रकरण हे उपसंहार असे आहे.

**५.५.१७ टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद :-**

या पुस्तकामध्ये प्रधान सरांनी १९व्या शतकातील जगविख्यात लेखक आणि थोर ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व लिओ टॉलस्टॉय यांना केलेल्या पत्रव्यवहाराविषयी लिहिले आहे. त्यांचे जीवन आणि त्यांचे लेखन यांचा गांधीजींवर आणि जगातील अनेकांवर प्रभाव पडला. प्रा.प्रधान हे इंग्रजी साहित्याचे विद्यार्थी आणि प्राध्यापक. त्यांना विद्यार्थी दशेतच वाचनाची आवड होती. त्यांनी 'ॲना कॅरिनीना', वॉर ॲण्ड पीस', आणि 'रिसरिक्शन' या टॉलस्टॉयच्या कादंबऱ्या वाचल्या. नंतर कॉलेजात अध्यापन करताना टॉलस्टॉयचे समग्र साहित्य वाचले. आल्मेर मोड यांनी लिहिलेले टॉलस्टॉयचे चरित्र ही वाचले.[४६]

ग.प्र. प्रधान टॉलस्टॉय यांना पत्र लिहिताना,

आदरणीय लिओ टॉलस्टॉय

सादर प्रणाम,

आपणाची माझी पहिली भेट आपल्या 'रिकलेक्शन्स' या लहानश्या पुस्तकातून झाली. १९४० मध्ये प्रधान बी.ए.च्या वर्गात विद्यार्थी होते. आणि इंग्रजी साहित्य हा त्यांचा अभ्यासाचा खास विषय होता. 'कॉरॅक्स' वाचनापूर्वी आपल्या जीवनाशी ओळख करून देणाऱ्या 'रिकलेक्शन्स' आणि आत्मकथनपर कादंबरी याकडे ते वळले. लिओ टॉलस्टॉय यांनी त्यांच्या

बालपणीच्या आठवणी यामध्ये सांगितल्या आहेत. त्यांनी आपल्या आईसंबंधी लिहिले आहे की, आपण दीड वर्षाचे असताना तिचे निधन झाले. आणि घरात तिचा फोटोही नव्हता.[४७]

या पुस्तकांमध्ये सरांनी एकूण १६ प्रकरणे दिली आहेत. दुसऱ्या प्रकरणामध्ये मानवी जीवनाचे चैतन्यपूर्ण दर्शन आहे. तर तिसऱ्या प्रकरणात युद्धाला सामोरे जाताना आहे. चौथ्या प्रकरणात स्वप्नवत शाळा आणि नवे प्रयोग असे आहे. यामध्ये शिक्षणातील अभिनव प्रयोग याविषयी माहिती आहे. पाचव्या प्रकरणामध्ये मृत्यूचे भीषण स्वरूप, याविषयी म्हणजे टॉलस्टॉय यांनी प्रत्यक्ष जीवनात पाहिलेल्या मृत्यूचे वर्णन केले आहे. सहाव्या प्रकरणात अमर कलाकृती 'ॲना कॅरिनीना' या कादंबरीविषयी लिहिले आहे. या कादंबरीचे वर्णन करताना प्रधान सर म्हणतात, ही कादंबरी आपण पुन्हा पुन्हा वाचताना आपण स्वतःलाच हरवून बसतो.

सातव्या प्रकरणामध्ये टॉलस्टॉय यांच्या वॉर ॲण्ड पीस मध्ये त्यांनी १८७५ ते १९१२ या काळात नेपोलियनने रशियावर स्वारी केली होती. या कालखंडाच्या अभ्यास करण्यासाठी टॉलस्टॉय मास्को या ग्रंथालयामध्ये अनेक पुस्तके आणि हस्तलिखिते वाचतात. प्रत्यक्ष युद्ध झाले त्याठिकाणी जाऊन आपल्या लेखनात त्याचे यथार्थ वर्णन करतात. यामध्ये दुष्काळाचे वर्णन व रशियन सैन्याची माघार याविषयी लिहिले आहे. प्रकरण आठमध्ये 'डिसेंबरीस्ट' न लिहिलेली कादंबरी यामध्ये १८७० ते १८८० या दशकात रशियाची जी परिस्थिती होती, यामुळे लेखक अत्यंत अस्वस्थ होते. एका बाजूला असंख्य लोक दारिद्र्यात होरपळून निघत होते. आणि दुसरीकडे मूठभर श्रीमंत लोक ख्यालीखुशालीने जगत होते याचे वर्णन आहे.

नवव्या प्रकरणामध्ये ख्रिस्तांच्या शिकवणुकीचे विवेचन करताना त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, जगात परमेश्वराचे राज्य व्हावे म्हणजे जगात शांतता नांदावी आणि त्यासाठी माणसांनी एकमेकांवर प्रेम करावे. आपल्यावर अन्याय झाला तरी हिंसेने प्रत्युत्तर देऊ नये. दहाव्या प्रकरणात प्रधान सरांनी गांधीजी व टॉलस्टॉय यांच्या विचारांची तुलना केली आहे. अकराव्या प्रकरणामध्ये प्रधान सरांनी टॉलस्टॉयचे मन शहरात कधीच रमले नाही. त्यांना गावातील शेतकऱ्यांबद्दल विलक्षण आवड होती. टॉलस्टॉयचा रेल्वे, नाव, घोडा अशा वाहनांच्या प्रवासाचे वर्णन येथे केले आहे.

बाराव्या प्रकरणामध्ये संघर्ष धर्मव्यधी, टॉलस्टॉयने चर्च दलिततेवर टिका केली आहे. त्याचप्रमाणे समाजातील हालअपेष्टांवर उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी कळकळीचे पत्र पाठवून

इशारा दिला आहे. तेराव्या प्रकरणात प्रधान सरांनी त्यांच्या कथा आणि कादंबरी यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात, कादंबऱ्या सुशिक्षित वाचकांना आवडतील अशा आहेत. त्यांचे स्वरूप लोकसाहित्यासारखे आहे. त्याची शैली साधी आहे. चौदाव्या प्रकरणात टॉलस्टॉय आणि त्यांचे समकालीन तुर्जेनेव्ह, दोस्तोव्हस्की आणि चेकॉव्ह या जागतिक साहित्यातील मापदंड मानले गेलेले लेखक याविषयी लिहिले आहे. पंधरावे प्रकरण म्हणजे 'कादंबरीचा नैतिक प्रभाव' यामध्ये रिक्रशन या कादंबरीचा ध्येयवादी तरूणांवर कसा नैतिक प्रभाव कसा पडला याचा अनुभव दिला आहे. सोळाव्या प्रकरणाचे नाव कळावे, लोभ असावा असे आहे. यामध्ये त्यांचा विवाह पत्नी, त्यांची मुले यांविषयी लिहिले आहे. यामध्ये परिशिष्ट नं.१ मध्ये गांधीजी आणि टॉलस्टॉय यांचे परलोकांतील संवाद आहे तर परिशिष्ट दोनमध्ये रशियन क्रांतिचे टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानात आढळणारे प्रतिबिंब असे आहे.

### ५.५.१८ लेखणीचे ललित :-

राजकीय आणि सामाजिक विषयातील ताणेबाणे परखडपणे उकलून दाखवणारी प्रधानांची लेखणी मानवी मनाची गुंतागुंत हळुवारपणे उलगडून दाखवायला लागते. त्यातून साकार होते 'लेखणीचे ललित' या ललित पुस्तकात त्यांच्या आवडत्या शेक्सपिअरच्या सात नाटकांची रसग्रहणे लिहिली असून स्वतंत्र व अनुवादित अशा सात कथाही रेखाटल्या आहेत.[४८]

## ५.६ राजकीय महाघटनांची पार्श्वभूमी असलेली प्रवासवर्णने :-

### १) हाजीपीर :-

१९६५ साली भारत पाकिस्तान युद्ध सुरू झाले. प्रथम पाकिस्तानने काश्मीरमधील छाब अखनूर भागावर हल्ला केला. मग भारताने प्रत्युत्तर दिले. त्यावेळी शिरूभाऊ लिमये प्रधानांना म्हणाले की, आपण युद्धभूमीवर जाऊ. या पत्रकारांना सवलती मिळतात म्हणून शिरूभाऊंनी 'साधना'चे प्रतिनिधित्व घेतले, तर प्रधान सरांनी 'सकाळ'चे घेतले. जम्मूला गेल्यावर भारतीय सेनेचे रिलेशन्स ऑफिसर मेजर पुरी यांच्याकडे त्यांनी अधिकृत पत्रे सादर केली. रोज सकाळी मेजर पुरी यांच्या ऑफिसमध्ये जायचे आणि सेनेच्या जवान सहा पत्रकारांना एका मार्गदर्शकासह युद्धभूमीवर जाऊन संध्याकाळपर्यंत भ्रमंती करायची असा त्यांचा नित्यक्रम होता.[४९]

### २) कांजरकोट :–

आमदार झाल्यानंतर १९६८ साली प्रधान सरांनी कच्छ सत्याग्रहात भाग घेतला. त्यांनी एका तुकडीचे नेतृत्व केले. कच्छच्या सरहद्दीबाबत सरकारने पडखाऊ धोरण स्वीकारले आणि 'कांजरकोट' हे ठिकाण पाकिस्तानला देण्याचा करार केला होता. त्याविरूद्ध सत्याग्रह करण्याचा निर्णय तीन विरोधी घेतला. यामध्ये प्रजासमाजवादी पक्ष, सोशॉलिस्ट पार्टी आणि जनसंघ हे तीन पक्ष त्यात होते. २१ एप्रिल १९६८पासून प्रधान भूजला पोचले.[५०]

### ३) सोनार बांगला :–

१९७१ साली बांग्लादेश निर्मितीच्या वेळी प्रा.प्रधान, शिरूभाऊ लिमये, दत्ता जगताप, देवदत्त दाभोळकर हे बांग्लादेशात गेले. प्रधान सर साधनाचे प्रतिनिधी म्हणून त्या युद्धभूमीवर गेले होते. तिथे ते मुक्तिवाहिनीतील क्रांतिकारी तरूणांना भेटले. महात्मा गांधींचा नौखालीतील आश्रम पहिला. थेट चितगावपर्यंत गेले. परत आल्यावर त्यांनी तेथील अनुभवांचे वर्णन करणारे आणि बांग्लादेश निर्मितीची हकिकत सांगणारे 'सोनार बांगला' हे छोटे पुस्तक लिहिले. बांग्लादेशातून परत येताना ग.प्र. प्रधान कलकत्त्याला आपल्या क्षितीमोहन मुखर्जी नावाच्या मित्राच्या घरी आठ दिवस राहिले. तेथेच त्यांनी हे पुस्तक लिहिले.

### ४) मला उमजलेले :–

प्रा.ग.प्र.प्रधान सरांनी विपुल सामाजिक, सांस्कृतिक कार्यासोबत प्रचंड लेखनही केले आहे. त्यांचे प्रापंचिक लेखन महाराष्ट्र शारदेच्या दरबारात सदैव चिरतरूण राहील अशा क्षमतेचे आणि जाणिवांचे आहे. प्रधान सरांनी अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या प्रस्तावनांचा संग्रह आहे. या संग्रहातील प्रधान सरांच्या प्रस्तावना बाबतचे स्वरूप लक्षात घेता गोपाळ गणेश आगरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी अशा विचारवंताच्या वैचारिक कर्तृत्वासह जी.ए.कुलकर्णी आणि लोकनाटयासारख्या अगदी भिन्न भिन्न विषयावरील ग्रंथावर प्रकाशझोत टाकण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांच्या लेखनीने केल्याचे दिसते.

### ५) भारतीय राजकारणाचे दोन पैलू :–

१७ मे २००८ ला लोकशाही समाजवादी विचारांच्या आधारे काम करणाऱ्या सोशॅलिस्ट फ्रंट आणि अन्य संस्था वा संघटना यांच्या कार्यकर्त्यांची पुण्यात एस.एम.जोशी सोशॅलिस्ट

फाऊंडेशनच्या सभागृहात बैठक झाली. या बैठकीत अन्य ज्येष्ठ कार्यकर्त्यांसमवेत ग.प्र. प्रधान एक श्रोता म्हणून हजर होते. बैठकीतील भाषण व चर्चा ऐकून त्यांना फार समाधानी वाटले. या कार्यकर्त्यांना आणि अन्यही लोकशाही समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरेल, असे पुस्तक लिहायचे असे त्यांनी ठरविले.

या पुस्तकात दोन भाग आहेत पहिला भाग भारतीय लोकशाहीची वाटचाल १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ जुलै २००८ असा आहे. दुसरा लोकशाही आणि समाजवादी चळवळ काल, आज व उदया असा आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागामध्ये समाजातील चळवळ काल आणि आज हा भाग प्रधान सरांनी लिहिला आहे. त्यानंतरचा समाजवादी चळवळ उदया हा भाग ग.प्र. प्रधान यांचे मित्र प्रा.सुभाष वारे यांच्या मदतीने लिहिला. या लेखनाचे श्रेय ग.प्र. प्रधान त्यांनाच देतात. ते त्याबद्दल त्यांचे आभार मानतात. या पुस्तकाचे संपादक 'साधना' साप्ताहिकाचे युवा संपादक प्रधान सरांचे तरूण मित्र साधना संपादकाचे विद्यमान संपादक श्री.विनोद शिरसाठ यांनी केले आहे.[५१]

### ६) पुरोगामी भारत :-

या पुस्तकामध्ये प्रधान सरांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेऊन आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वातंत्र्य चळवळीला दिशा देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला. या थोर नेत्याविषयी थोडक्यात लिहिले आहे. यामध्ये एकूण नऊ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळकांच्या मनातील समर प्रसंग असे नाव आहे. या प्रकरणामध्ये लोकमान्य टिळकांचे भव्य आणि उदात्त जीवन महाराष्ट्राला सुपरिचित आहे. भारतीयांना 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच!' हा चैतन्यदायी मंत्र देणारे लोकमान्य देशबांधवांचा स्वाभिमान जागृत व्हावा, त्यांच्या मनावर निर्भयतेचा व देशभक्तीचा संस्कार व्हावा, यासाठी प्रदीर्घ कारावास भोगणारे, बंदिशाळेला प्रसाद मानणारे टिळक, गीतारहस्य लिहून कर्मयोगाचा संदेश देणारे लोकमान्य हे सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्फूर्तिस्थान होते व आहे.[५२]

प्रकरण दोनमध्ये दुसरे सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचेविषयी माहिती दिली आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये महात्मा गांधी आणिं मानवेंद्रनाथ रॉय या दोन नेत्यांचे व्यक्तिमत्त्व भिन्न भिन्न असले तरी भारतीय जनतेसमवेत काम करताना या दोघांनी काही बाबतीत सारखे विचार

मांडल्यामुळे त्या दोघांची तुलना न करता त्यांच्या विचारविश्वाचा एकत्र अभ्यास करणे उद्बोधक ठरावे ते करण्याचा अल्प प्रयत्न केला आहे.[५३]

'आधुनिक भारताचे शिल्पकार' यामध्ये पं.जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याची माहिती या प्रकरणात आहे. यामध्ये स्वराज्याचा ठराव १९३७च्या निवडणुकीतील त्यांचा झंझावाती दौरा याविषयी माहिती दिली असून अलिप्ततावादी धोरण भारताच्या हिताचे कसे आहे हे सांगितले आहे. सहाव्या प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती दिली आहे. यामध्ये महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये झालेल्या पुणे करारासंबंधी माहिती दिली आहे. तसेच १९३५ ची धर्मांतराची घोषणा केली कारण ६ वर्षे सत्याग्रह करून सुद्धा अस्पृश्य मानलेल्या हिंदूमध्ये यत्किंचितही मतपरिवर्तन झाले नाही, या धर्मात राहून कधी न्याय मिळणार नाही, असे आंबेडकरांची खात्री पटली, याविषयी सविस्तर लिहिले आहे.

सातव्या प्रकरणामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचा उल्लेख आहे. या प्रकरणात त्यांचे अस्पृश्यांसाठीचे कार्य, सामाजिक एकात्मतेची भूमिका, शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे विश्लेषण इत्यादी विषयी माहिती आहे.

आठव्या प्रकरणामध्ये जयप्रकाश नारायण यांच्या कार्याविषयी माहिती आहे. यामध्ये विनोबांची भूदान पदयात्रा, प्रजासमाजवादी पक्षातील फूट, राजकारणातून निवृत्ती व त्यांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. नवव्या प्रकरणात 'भारतीय कम्युनिस्टांची वाटचाल' या प्रकरणात भारतीय कम्युनिस्ट चळवळीतील त्यागी आणि बुद्धिमान नेते कॉ.मोहितसेन यांचे जन्म, बालपण, शिक्षण, जडणघडण इत्यादी दिले आहे. 'न्यू एज' मासिकातील पक्षाची भूमिका आणि पक्षातील फूट तसेच राष्ट्रीय समस्यांचे मूलग्राही विश्लेषण याविषयी लिहिले आहे.

**७) भाकरी आणि स्वातंत्र्य :-**

हे पुस्तकही याच काळात लिहिले गेले. या विषयावरील अनेक लेखकांच्या पुस्तकांच्या आधारे त्यांनी आधी सात-आठ व्याख्याने दिली आणि नंतर पुस्तक लिहिले. २६ जानेवारी १९७७ ला प्रधान सरांची तुरूंगातून मुक्तता झाली. नंतर जनता पक्षाची स्थापना झाली. समाजवादी पक्ष बरखास्त होऊन जनता पक्षात विलीन झाला. देशात लोकशाहीची पुनर्स्थापना झाली. पण जनतेच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. जनता पक्षात सतत मतभेद होत राहिले आणि

शेवटी मंत्रिमंडळ कोसळून पक्ष फुटला. जयप्रकाशांनी भूदान आंदोलनाला जीवदान देण्याचा निर्णय घेतला. जयप्रकाशांचा आजार बळावला आणि त्यांचे निधन झाले.[५४]

**८) ग.प्र प्रधान यांचे निधन :-**

२६ ऑगस्ट १९२२ रोजी प्रधान सरांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण इंदापूर, पारनेर आणि शेवटी पुण्यामध्ये पूर्ण झाले. बालवयात वाचनाच्या आवडीमुळे आणि घरच्या वाचनसंस्कारामुळे प्रधानांना वाचनाची आवड निर्माण झाली होती. या आवडीतूनच स्वातत्र्य चळवळीत भाग घेण्याचे त्यांनी ठरवले. पुढे भाग घेऊन कार्य करत असताना पकडले गेले व अकरा महिने येरवडा जेलमध्ये त्यांना शिक्षा भोगावी लागली. सुटून आल्यानंतर त्यांच्या वडिलांनी घर चालविण्यासाठी नोकरी करण्यास सांगितले. पुढे एम.ए.झाल्यानंतर १९४५मध्ये कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी त्यांनी स्वीकारली, ती करत असताना राष्ट्र सेवादलाच्या कार्यामध्ये बौद्धिके घेण्याचे काम चालू होते.

१९६४ साली प्राध्यापक पदाचा राजीनामा त्यांनी दिला. १९६४ मध्ये विधान परिषद पदवीधर मतदारसंघामध्ये ते निवडून गेले. १९६४ ते १९८४ हा त्यांचा विधान परिषदेतील कार्यकाल आहे. आमदारकी संपल्यानंतर त्यांनी १३ वर्षे साधना साप्ताहिकासाठी राखून ठेवले. याच काळात त्यांचे विपुल वाचन व लेखन झाले. पुढे साप्ताहिकाच्या संपादक पदाचा राजीनामा त्यांनी दिला. राहते घर साधना ट्रस्टला बक्षीस देऊन पुढे साने गुरूजी हॉस्पिटल हडपसर येथे कायमचे वास्तव्यास गेले आणि वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांचे १९ मे २०१० रोजी तेथेच निधन झाले.

**प्रा.रा.ग.जाधव(ज्येष्ठ साहित्यिक)** – ग.प्र.प्रधान हे राज्याच्या सार्वजनिक जीवनातील तत्त्वनिष्ठ, मूल्यनिष्ठ चारित्र्याचे एक व्यक्मित्त्व होते. ते अव्वल दर्जाच समाजवादी होते.[५५]

## ५.७ साधना साप्ताहिकामधून त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजली :-

**कृतार्थसाधक :-**

भगवी वस्त्रे न घालता संन्यासी बनण्याचा अट्टहास मास्तरांनी बाळगला होता तो त्यांनी यशस्वीपणे पुरा केला. अध्यात्माचा एक पारंपारिक अर्थ आहे. आत्म्याचे अस्तित्व न मानणाऱ्या मास्तरांचे त्या आध्यात्माशी अर्थातच काही देणेघेणे नव्हते. मास्तरांचे अध्यात्म, त्याला अध्यात्म म्हणायचे असेल तर वेगळे होते. लौकिक सुखापलिकडचे जीवनाचे एक श्रेयस आहे

आणि त्या सुखांच्यापेक्षा ते अनंतपटींनी मोलाचे आहे याची मनोमनी जाण मास्तरांना झाली होती. या जीनवदृष्टीमुळे जीवनात संयम, सदाचार, साधेपणा, अपरिग्रह येतो. तो त्यांना प्राप्त झाला होता. करूणेने मानवसन्मुख कृती घडते. जीवनात साक्षात शूचिता व पावित्र्य प्रगटते. हे त्यांच्या रूपाने महाराष्ट्राने पाहिले. साने गुरूजींच्या मानसपुत्राने त्यांच्यापासून घेतलेल्या आस्तिक्य बुद्धीतून जीवनाचा हा अर्थ लावला होता. या जाणिवेतून मुक्तिपथावरील या कृतार्थ साधकाचा प्रवास झाला.[५६]

–डॉ. नरेंद्र दाभोळकर.

**साधुमुखे समाधान :–**

रानडेप्रणित उदारमतवाद, टिळकप्रणित राष्ट्रवाद, आगरकरप्रणित विवेकवाद, डॉ.आंबेडकरप्रणित समतावाद आणि महात्मा गांधीप्रणित व साने गुरूजीप्रणित मानवतावाद यांचे मनमोहक मिश्रण प्राध्यापक प्रधानांमध्ये होते. आयुष्याच्या शेवटच्या पर्वात गांधी–विचारांचा त्यांच्यावर मोठाच प्रभाव पडल्याचे त्यांच्या बोलण्या–वागण्यातून जाणवत राहिले. 'बा–बापू' पुरस्कार मिळणे हा त्यांच्या लेखी सर्वोच्च पुरस्कार होता. तो मिळाल्यानंतर प्राध्यापक प्रधानांनी पुरस्कार घेणे स्वेच्छेने बंद केले. यापूर्वी काही वर्षे त्यांनी सार्वजनिक जीवनातून निवृतीही घेतली होती. 'प्रत्येक राजकीय नेत्याचा अंत हा निवडणुकीतील त्याच्या पराभवात असतो.' असे एक इंग्रजी वचन आहे. पण सौजन्यशील, संवेदनाक्षम, सज्ञन आणि सत्प्रवृत्त प्राध्यापक प्रधानांनी ती वेळच आपल्यावर देऊ दिली नाही. एकेक करून दरवाजे बंद करतच ते राहिले. त्यामुळे त्यांचा पराभव शकला नाही. त्यातही त्यांचे असाधारणत्व दिसले.

–अरूण टिकेकर.

**निरालस, सालस आणि प्रांजळ :–**

ते स्वतःला समाजवादी कार्यकर्ता म्हणत, कधीही नेता म्हटले नाही. लोकांत ते सहज मिसळत असत. पुण्यात समारंभांना तोटा नसल्यामुळे प्रधानांवर मुख्य वक्ते वा अध्यक्ष म्हणून आमंत्रणाचा मारा होत होता. मला वाटते, तात्यासाहेब केळकर आणि दत्तोपंत पोतदार यांच्याकडून या बाबतीत प्रधानांच्या नंबर लागत असावा.

अशा या प्रधानांबरोबर राजकारण, समाजकारण आणि ग्रंथकारण यासंबंधी मोकळेपणाने तासन्तास बोलण्यात आनंद होता. अशा व्यक्तिंचे व्यक्तीत्व झळझळीत नसते आणि सर्वांना दिपवून टाकील, असेही त्यांचे कर्तृत्व नसते; पण ते मानसिक आधार देणारे असते.

कुसुमाग्रजांच्या शब्दांत सांगायचे तर–

नवलाख तळपती दीप विजेचे येथ
उतरती तारकादळे जणू जगरात
परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा
त्या माजघरातील मंद दिव्याची वात[५७]

– गोविंद तळवळकर.

**सात्विक प्रज्ञादर्शन व प्रतिभा दर्शन :–**

आत्मकथेने सरांच्या वानप्रस्थाश्रमाची गरज म्हणून निर्माण झाली. मूर्तिमंत प्रांजळपणा, मूर्तिमंत ऋजुता, मूर्तिमंत सुसंस्कृत सात्विकता म्हणजे ही आत्मकथने. सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे सात्विक प्रज्ञादर्शन व प्रतिभादर्शन असेच प्रधान सरांच्या एकूण वाङ्‌मयनिर्मितीचे वर्णन करता येईल. वाड्.मय अधिक श्रीमंत झालेले आहे. या सर्जनाचा वसा व वारसा हा प्रश्न आपण उद्याच्या साहित्यनिर्मात्यांवर सोपवू.[५८]

**कृतार्थसाधक :–**

ज्ञानयोग त्यांचा खास योग आहे. ज्ञान घेणे यात त्यांना आनंद मिळे आणि आपण मिळवलेले ज्ञान दुसऱ्यांना देण्यातही त्यांना अधिक आनंद मिळे. 'जे जे आपणासी ठावे, ते सर्वांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकल जन' या वाक्याप्रमाणे त्यांचे काम सातत्याने सुरू असे. ते जसे प्रभावी वक्ते होते तसेच किंबहुना अधिक प्रभावी लेखक होते. संचय करणे हे प्रधान सरांच्या कधीही मनात आले नाही. जसे ज्ञान दयावे तसेच आपल्या ताकदीप्रमाणे गरजू मित्रांना व संस्थांना अर्थसहाय्य देता येईल ते द्यावे, या पद्धतीने त्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले आहे.

–मोहन धारिया.

**भावनांचा अथांग सागर :–**

मास्तरांचे विशाल मन भावनाशील होते. एस.एम.काहीशा हळुवार थट्टेने म्हणत, 'अरे तो भावनाप्रधान आहे.' मास्तरांच्या जीवनात अपार व्यासंग होता, सखोल चिंतनशीलता होती,

परंतु मन भावनेने ओतप्रोत आकंठ भरलेले होते. त्यामुळेच जमलेल्या सर्वांनाच वाटत होते की, आपल्या अगदी ह्रदयाजवळचा माणूस गेला आहे. प्रधान सरसर्वांच्या ह्रदयात चिरंतन राहतील असा मला विश्वास आहे.

– भाई वैद्य.

**डोंगराएवढा आदर्श :–**

डोंगराएवढे काम सरकरून गेलेत आणि तेवढाच डोंगराएवढा आदर्श आपल्यापुढे ठेवून गेलेत. आपण एवढेच करू या, लोकशाही समाजवादी समाजरचना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्या प्रवृत्तीला भावेल अशा क्षेत्रात सतत कार्यरत राहण्याचा, त्या कामाप्रती आपले उत्तरदायित्व आणि पारदर्शी व्यवहार जोपासण्याचा आणि वैयक्तिक जीवनात स्वतःला जमेल तितके मास्तरांसारखे साधे, नितळ पारदर्शी, विचारांच्या बाबत स्पष्ट आणि समता या मूल्यांबाबत आग्रही बनविण्याचा संकल्प–निर्धार करूया. त्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू या. यापेक्षा अधिक चांगली आदरांजली मास्तरांना कुठलीच असणार नाही.[५९]

–सुभाष वारे.

**राजकारण व समाजकारणातील सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व लोपले :–**

ग.प्र.प्रधान राजकारणातील सभ्यता आणि साधेपणाचा जवळचा असणारा संयमी, मृदू स्वभावाचा महान नेता होता. शेवटपर्यंत त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. लोकप्रतिनिधी या नात्याने समाजातील प्रश्न त्यांनी आग्रहीपणे मांडले. त्यांच्या निधनाने समाजशिक्षकाची भूमिका बजावणारे व्यक्तिमत्त्व आपल्यातून नाहीसे झाले आहे.

–विलासराव देशमुख.

मा.मुख्यमंत्री

'सरांचे जीवन कार्यकर्त्यांनांच नव्हे, तर सर्वसामान्यांसाठी दीपस्तंभासारखे होते. त्यांच्यामुळेच आम्हांला समाजासाठी दोन पावले पुढे टाकण्याची उर्जा मिळाली आणि कार्यकर्ते जोडले गेले.'

– अण्णा हजारे.

ग.प्र. प्रधान हाडाचे समाजशिक्षक होते. त्यांनी आयुष्यभर केवळ समाजाची चिंता केली व त्यासाठी कार्यरत राहिले. हे एक तपस्वी जीवन जगले.

– प्रकाश जावडेकर.

एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, अच्युतराव पटवर्धन यांच्या तालमीत तयार झालेले ग.प्र. प्रधान एक अष्टपैलू व जनमाणसांत आदरयुक्त प्रतिमा असणारे नेते होते. विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी केलेली कामगिरी जनतेच्या कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांच्या साखळीतून शेवटचा दुवा निखळला आहे.

– अजित पवार.

सार्वजनिक जीवनात शुद्ध बुद्धीने प्रामाणिक एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रधान गुरूजी. राजकारण, लेखन, अध्यापन या तीनही क्षेत्रामध्ये त्या त्या क्षेत्राच्या मानदंडाप्रमाणे यशस्वी होते. दुसऱ्याबद्दलचा अपार जिव्हाळा हे त्यांचे शक्तिस्थान होते.

- कुमार सप्तर्षी

प्रधान सरांचे महाराष्ट्रातील राजकीय सामाजिक शैक्षणिक व साहित्यिक चळवळ समृद्ध करण्यासाठी सक्रीय योगदान फार मोलाचे आहे. आयुष्यभर त्यांनी परिवर्तनवादी व समाजवादी मूल्ये जपली. त्यांच्या निधनाने परिवर्तनवादी चळवळीची फार मोठी हानी झाली.[६०]

– रामदास आठवले.

## ५.८ समारोप :–

प्रधान सरांच्या आयुष्यातील हा शेवटचा टप्पा होता. या टप्प्यांमध्ये त्यांचे विपुल वाचन व लेखन झाले. त्यांनी आपल्या लेखणीची वैशिष्टये व मर्यादा सुरूवातीला सांगितल्या होत्या. त्यांचे मराठी व इंग्रजी असे विपुल लेखन आहे. त्यांच्या स्वभावातील व व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलूंचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनामध्ये पडलेले दिसते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रसन्न, स्पष्ट आणि परखड होते, तशीच त्यांचे लेखनशैली होती. प्रधान सरांनी लेखन हे क्षेत्र ठरवले असते तर आणि त्यांनी वेळ दिला असता, तर आज त्यांचे शेकडो ग्रंथ प्रकाशित झाले असते. लेखन हेच त्यांचे औषध आणि टॉनिक होते, असे त्यांच्या लेखनावरून वाटते. त्यांचा खरा पिंड लेखकाचा होता.

सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे सात्त्विक प्रज्ञादर्शन व प्रतिभादर्शन असे त्यांच्या वाङ्मय निर्मितीचे वर्णन करता येते. त्यांनी व्यक्तिपूजा नव्हे पण व्यक्तिविषयक श्रद्धेतून व्यक्ती विषयात्मक लेखन केले. त्यांनी आपल्या लेखनाची सुरूवात लोकमान्य टिळकांचे चरित्रापासून केली. त्यांनी पुढे आगरकर लेखन संग्रह, भारताचे सुपुत्र लोकमान्य टिळक, लोकमान्यांची राजकीय दूरदृष्टी आणि ज्ञानाचे उपासक लोकमान्य, महात्मा गांधी, सत्याग्रही गांधीजी, महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम.जोशी, महाराष्ट्राचे शिल्पकार ना.ग.गोरे, आचार्य जावडेकर, पं.जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याच शब्दात इत्यादी थोर नेत्यांची आत्मचरित्रे लिहिली आहेत.

या शिवाय आणखी बरीच पुस्तके आहेत. यामध्ये ‘स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत’ हे पुस्तक १९८५ साली ग.प्र. प्रधान यांनी लिहिले. ते सुमारे ५०० पृष्ठांचे होते. ‘साता उत्तराची कहाणी’ हे एक पुस्तक त्यांनी लिहिले आहे. यामध्ये सात वेगवेगळया राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणाची माहिती आहे. २००३ नंतर म्हणजे त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी ‘आठा उत्तराची कहाणी’ हे पुस्तक लिहिले. यामध्ये त्यात १९८० ते २००७ या काळातील राजकीय जीवनाचे चित्र रेखाटले आहे. यामध्ये त्यांनी कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

प्रा.प्रधान यांचे ‘माझी वाटचाल’ हे आत्मकथन २००४ साली प्रसिद्ध झाले. तर Pursuit Of Ideals हे त्याचे इंग्रजी रूपांतर २००४ मध्ये प्रसिद्ध झाले. यामध्ये त्यांचे संपूर्ण जीवनाचा लेखाजोखा दिला आहे. यामध्ये बालपण, शिक्षण, वाचनाची आवड, स्वातत्र्य संग्रामातील सहभाग, प्राध्यापकाची नोकरी, राजकारणात सहभाग, विधानपरिषदेत काम, ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादक निवृत्त काळामधील लेखन हे सर्व यामध्ये आहे.

वरील पुस्तकांशिवाय प्रधान सरांची आणखी काही पुस्तके आहेत. त्यामध्ये टॉलस्टॉय यांच्याशी परिसंवाद हे पुस्तक आहे. त्यांनी लहानवयात म्हणजे विद्यार्थीदशेत टॉलस्टॉयची पुस्तके वाचली होती. त्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनाचा व साहित्याचा परिचय तरूण वाचकांना करून देण्याची इच्छा अनेक वर्ष त्यांच्या मनात होती. याशिवाय ‘लेखणीचे ललित’ हे त्यांचे पुस्तक आहे. त्यामध्ये त्यांनी शेक्सपिअर च्या सात नाटकांचे रसग्रहण लिहिले असून स्वातत्र्य आणि अनुवादित अशा सात कथाही रेखाटल्या आहेत.

त्याचप्रमाणे त्यांची राजकीय महाघटनांची पार्श्वभूमी असलेली प्रवासवर्णने म्हणजे 'हाजीपीर'. हे भारत पाकिस्तानमध्ये युद्ध झाले होते, त्यामध्ये भारतीय सेनेतील जवानांच्या पराक्रमाचे रोमहर्षक दर्शन त्यांना झाले त्याचे वर्णन या ग्रंथात आहे. 'कांजरकोट' प्रधानसर आमदार झाल्यानंतर १९६८ साली त्यांनी कच्छ सत्याग्रहात भाग घेतला . कांजरकोट हे ठिकाण पाकिस्तानला देण्याचा करार केला होते. त्याविरोधी तीन राजकीय पक्षांनी आंदोलन केले होते. त्या आंदोलनाचे वर्णन या पुस्तकांत आहे. 'सोनार बांगला' १९७१ मध्ये बांगलादेश निर्मितीच्या वेळी प्रा.ग.प्र. प्रधान आणि त्यांचे सहकारी तेथे गेले होते. ते साधनाचे प्रतिनिधी म्हणून युद्धभूमीवर गेले होते. तेथील मुक्तिवाहिनीतील क्रांतिकारी तरूणांना ते भेटले होते. महात्मा गांधींच्या नौखलीतील आश्रमाला भेट दिली. चितगावपर्यंत गेले. त्याचे वर्णन या पुस्तकात आहे.

वरील पुस्तकाखेरीज मला उमजलेले, भारतीय राजकारणाचे दोन पैलू–लोकशाही आणि समाजवाद, पुरोगामी भारत अशी आणखी तीन पुस्तके त्यांची प्रसिद्ध आहेत. वरीलप्रमाणे प्रधानसरांचे साहित्य क्षेत्रातील भरीव असे योगदान आहे.

## संदर्भ /तळटिपा :–

१) पांढरे नीला , प्रा.ग.प्र.प्रधान, व्यक्ती आणिं वाड्.मय, उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ३० जून २०११, पृ. क्र.६५.

२) दाभोळकर नरेंद्र(संपा.), साप्ताहिक साधना, पुणे, दि.५ जून २०१०, पृ. क्र.५

३) प्रधान ग.प्र. , माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ११ जून २००४, पृ. क्र.२०७.

४) दाभोळकर नरेंद्र(संपा.), साप्ताहिक साधना, पुणे, दि.४ जून २०११, पृ. क्र.९६.

५) दाभोळकर नरेंद्र(संपा.), साप्ताहिक साधना, पुणे, दि.५ जून २०१०, पृ. क्र.१५.

६) कित्ता, पृ. क्र.१५

७) दैनिक सार्वमत, अहमदनगर, दि.३० मे २०१० पृ. क्र.२

८) प्रधान ग.प्र., गो.ग.आगरकर निवडक लेखसंग्रह, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १४ जुलै २००६, पृ. क्र.१०

९) पांढरे नीला, उपरोक्त, पृ. क्र.७९

१०) प्रधान ग.प्र., गो.ग.आगरकर निवडक लेखसंग्रह, उपरोक्त, पृ. क्र.१००

११) प्रधान ग.प्र., उपरोक्त पृ. क्र.१४३

१२) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.८८

१३) कित्ता, पृ. क्र.८८, ८९

१४) कित्ता, पृ. क्र. ९२ व ९७

१५) कित्ता, पृ. क्र.११०

१६) प्रधान ग.प्र., उपरोक्त पृ. क्र.१०६

१७) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.१२५

१८) प्रधान ग.प्र., महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम. जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, डिसेंबर २००३, पृ.२१

१९) कित्ता, पृ. क्र.३४

२०) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.१३३

२१) मंदाकिनी वासुदेव भट, क्रांतिकारकांच्या सावल्या, मनोरमा प्रकाशन प्रथम आवृत्ती दत्त

जयंती १६ डिसेंबर २०१३, पृ. क्र.८५

२२) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.१४४

२३) प्रधान ग.प्र. , उपरोक्त पृ. क्र.१२९

२४) कित्ता, पृ. क्र.१३२

२५) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.१५४

२६) कित्ता, पृष्ठ क्र.१५५

२७) देशपांडे राजेश्वरी, आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर, गंधर्व वेद प्रकाशन नोव्हेंबर २०१० पृ. क्र.४५

२८) पांढरे नीला , उपरोक्त पृ. क्र.१५६

२९) कित्ता, पृ. क्र.१६१

३०) कित्ता, पृ. क्र.१६४

३१) प्रधान ग.प्र., महान लोकनेता जयप्रकाश नारायण, साधना प्रकाशन प्रथम आवृत्ती ऑक्टोंबर २००१ पृ. क्र.१२

३२) कित्ता, पृष्ठ क्र.१३

३३) पांढरे नीला, उपरोक्त पृष्ठ क्र.१८३

३४) प्रधान ग.प्र., डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याच शब्दात, सुगावा प्रकाशन, प्रथम आवृत्ती १४ एप्रिल २००७ द्वि.आवृत्ती २६ जानेवारी २००९ पृ. क्र.१७

३५) कित्ता, पृ. क्र.२२ व ३०

३६) प्रधान ग.प्र., स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन पुणे चौथी आवृत्ती ११ जून २००४ पृ. क्र.१

३७) कित्ता पृ. क्र.२०

३८) प्रधान ग.प्र., उपरोक्त पृ. क्र.२१६

३९) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.२२०

४०) प्रधान ग.प्र., साता उत्तराची कहाणी, मौज प्रकाशन प्रथम आवृत्ती २ ऑक्टोंबर १९८१, दुसरी आवृत्ती १ मे १९८८, तिसरी आवृत्ती १ डिसेंबर २००६ पृ. क्र.४

४१) कित्ता पृ. क्र.३९

४२) प्रधान ग.प्र., आठा उत्तराची कहाणी, मौज प्रकाशन प्रथम आवृत्ती १० फेब्रुवारी २००९

४३) कित्ता, पृ. क्र.७७

४४) पांढरे नीला, उपरोक्त पृ. क्र.२५१

४५) प्रधान ग.प्र., उपरोक्त पृ. क्र.७६

४६) पांढरे नीला , उपरोक्त पृ. क्र.२७०

४७) प्रधान ग.प्र., टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद, साधना प्रकाशन प्रथम आवृत्ती २० नोव्हेंबर २००६ लिओ टॉलस्टॉय यांचा स्मृतीदिन, दुसरी आवृत्ती ५ सप्टेंबर २००८

४८) पांढरे नीला, उपरोक्त, पृ. क्र.२९८

४९) कित्ता, पृ. क्र.३२३

५०) कित्ता, पृ. क्र.३२७

५१) प्रधान ग.प्र., मला उमजलेले, प्रतिमा प्रकाशन, प्रथम आवृत्ती २६ ऑगस्ट २००१ पृ. क्र.१८८

५२) प्रधान ग.प्र., भारतीय राजकारणाचे दोन पैलू, लोकशाही आणि समाजवाद, साधना प्रकाशन, प्रथम आवृत्ती २ ऑक्टोंबर २००८ पृ. क्र. ५

५३) प्रधान ग.प्र., पुरोगामी भारत, सकाळ प्रकाशन, प्रथम आवृत्ती , २६ ऑगस्ट २००९ पृ. क्र.४

५४) पांढरे नीला, उपरोक्त, पृ.४८

५५) दैनिक ‘लोकसत्ता’, पुणे, ३० मे २०१०, पृ.१)

५६) दाभोळकर नरेंद्र उपरोक्त पृ. क्र.६

५७) कित्ता, पृ. क्र.१३ व १८

५८) कित्ता, पृ. क्र.१५

५९) कित्ता, पृ. क्र.१७ ते २०

६०) दैनिक लोकसत्ता पुणे, सं.पा.दि.३० मे २०१० पृ. क्र.५

# प्रकरण सहावे
# उपसंहार

स्थळ, काळ, व्यक्ती ही इतिहासाची त्रिसूत्री प्रमाणे आणि कार्लाईल या इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे, इतिहास म्हणजे थोर पुरूषाचे चरित्र व त्यांनी केलेली कामगिरी होय. या तत्त्वाला अनुसरून आणि इतिहासकार स.मा.गर्गे यांनी म्हटल्याप्रमाणे “अंधार दिसेल, तेथे बॅटरी मारा” या उक्तीप्रमाणे तसेच रा.श्री.मोरवंचीकर यांनी सांगितल्याप्रमाणे इतिहासाच्या अभ्यासाने राष्ट्रनिर्मितीसाठी ज्यांनी आपल्या प्राणाचा त्याग केला. त्यांच्या चरित्रातून भावी पिढीस प्रेरणा मिळते. महाराष्ट्र हे भारतीय इतर राज्यांप्रमाणे स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्रातील पुणे जिल्हयाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. पुणे जिल्हयाच्या जडणघडणीत अनेक थोर नेत्यांचे व कार्यकर्त्याचे मोठे योगदान लाभलेले होते. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. महराष्ट्रामध्ये ३५ जिल्हे आहेत. त्यामध्ये बहुतेक जिल्हयांना स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हयाचे योगदान मोठे आहे. पुणे जिल्हयात अनेक थोर स्वातंत्र्य सैनिक(क्रांतिकारक) होऊन गेले आहेत. पुणे जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी खूप मोठी आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना याच जिल्हयातून केली. शिवाजी महाराजांचे बालपण याच जिल्हयात गेले. पुढे पेशव्यांनी आपला राज्यकारभार याच पुण्यातून सुरू केला. त्यामुळे पुण्याला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात  पुण्यामध्ये अनेक चळवळी झाल्या. याच पुण्यामध्ये छ.शिवाजी महाराज, पेशवा थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, वासुदेव बळवंत फडके, गोपाळकृष्ण गोखले, गोपाळ गणेश आगरकर, एस.एम.जोशी, लोकमान्य टिळक, कस्तुरबा गांधी असे अनेक थोर पुरूष होऊन गेले. त्यांचप्रमाणे लाभलेले ग.प्र.प्रधान हे एक होत. साने गुरूजींचा सहवास लाभल्यामुळे मॅट्रिकमध्ये असताना स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेण्याचा संकल्प केला आणि पुढे प्रत्यक्षात अमंलात आणला.

भारतीय स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयाची कामगिरी मोलाची आहे. पुणे जिल्हयात आणि पुणे शहरामध्ये अनेक सुधारक, स्वातंत्र्य सैनिक, थोर व्यक्ती होऊन गेल्या आहेत. पुणे शहर आणि पुणे जिल्हा ऐतिहासिक व भौगोलिकदृष्टया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय इतिहास लेखनाबरोबरच स्थानिक पातळीवरील इतिहास आपण ज्याला प्रादेशिक इतिहास म्हणतो, की ज्याचा इतिहास लेखनशास्त्रात मोठया प्रमाणात वापर होताना दिसतो. स्थळ, काळ आणि व्यक्ती या इतिहासाच्या त्रिसूत्री आहेत. या त्रिसूत्रीप्रमाणे आणि कार्लाईल इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे इतिहास म्हणजे थोर पुरूषांची चरित्रे व त्यांनी केलेली कामगिरी होय. म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर, त्यांच्या जडघडनीत चांगला व वाईट परिणाम होत असतो. पुणे जिल्हयाची रचना निसर्गाने अशी केली आहे की, ज्याप्रमाणे म्हटले जाते. ‘पुणे तेथे काय उणे’ त्याप्रमाणे पुण्याची परिस्थिती पाहावयास मिळते. नैसर्गिक साधन संपत्तीने परिपूर्ण असा हा जिल्हा आहे. नद्या, धरणे, डोंगर, किल्ले , गिरी, दुर्ग, थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे, प्रेक्षणीय स्थळे, शैक्षणिक सोयी, उद्योग वाहतूक, व्यापार दळवणवळण, रस्त्यांचे जाळे, लोहमार्ग, विमान मार्ग या सर्व गोष्टी पुणे जिल्हयात आढळून येतात.

ज्याप्रमाणे भौगोलिकदृष्टया पुणे जिल्हयाचे महत्त्व खूप आहे. त्याचप्रमाणे ऐतिहासिक दृष्टयासुद्धा पुणे जिल्हयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण पुणे जिल्हयाचे ऐतिहासिकदृष्टया तीन कालखंड पडतात. यामध्ये प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक असे होत. या जिल्हयाला खूप ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म या जिल्हयातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. पुढे हिंदवी स्वराज्याची शपथ याच जिल्हयात घेतली गेली. त्यांचे बालपण याच जिल्हयात गेले.

पेशव्यांनी आपला राज्यकारभार याच जिल्हयातून म्हणजे पुण्यातून केला. त्यांनी या काळात अनेक मोठया वास्तू या जिल्हयात व पुणे शहरात बांधल्या. त्या इतिहासात ऐतिहासिक ठेवा म्हणून आज पाहावयास मिळतात. पेशवाईच्या कालखंडानंतर इंग्रज काळ आला आणि याच पुणे जिल्हयामध्ये इंग्रजाविरूद्ध अनेक उठाव झाले. या पुणे जिल्हयाने अनेक थोर पुरूष, महापुरूष, स्वातंत्र्य सैनिक, समाजसुधारक दिले आहेत. भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये या जिल्हयाचे योगदान खूप मोठे आहे. म्हणूनच राष्ट्रीय सभेच्या अनेक नेत्यांची पुणे जिल्हयाला भेटी दिल्या होत्या. भारताच्या स्वातंत्र्य लढयात ज्या–ज्या चळवळी झाल्या. त्या त्या चळवळी

पुणे जिल्हयामध्ये पार पाडल्या. पुणे जिल्हयामध्ये फक्त स्वातंत्र्य चळवळी झाल्या नाहीत तर समाज सुधारणेसाठी सुद्धा मोठया प्रमाणात प्रयत्न झालेले दिसतात. मग ते शिक्षणाचा प्रयत्न असो किंवा विधवा विवाह किंवा अस्पृश्यता निर्मूलन असेल, या सर्वामध्ये पुणे जिल्हयातील सुधारकांनी प्रयत्न केले आहेत. अशाप्रकरे पुणे जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य लढयातील सार्वजनिक सभेच्या स्थापनेपासून क्रांतिकारी चळवळ, सायमन कमिशन, स्वदेशी आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळीचे पहिले व दुसरे पर्व, वैयक्तिक सत्याग्रह, राष्ट्रसेवा दलाचे कार्य, छोडो भारत आंदोलन, भूमिगत चळवळी इत्यादीमध्ये भाग घेऊन स्वातंत्र्य चळवळीचे कार्य पुणे जिल्हयातील क्रांतिकारकांनी मोठया नेटाने पार पाडले.

त्यामधील एक म्हणजे ग.प्र.प्रधान(मास्तर)हे होय. समाजासाठी काहीतरी चांगले करण्याचा संकल्प मॅट्रिकला असताना अबोध वयात त्यांनी सोडला. साने गुरूजी त्यांना त्यांच्या मित्रासह नामदार गोपाळ गोखलेच्या स्मारकाजवळ घेऊन गेले. वेळ रात्रीची होती. फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर साने गुरूजींनी आवाहन केले, गोखल्यांनी येथेच देशसेवेची शपथ घेतली व जीवनभर पाळली. तुम्हीही आज शपथ घेतली व जीवनभर पाळली. तुम्हीही आज शपथ घ्या की, आपली मायभूमी स्वतंत्र होण्यासाठी तुम्ही सर्वस्व अर्पण कराल. प्रत्येकाने आपल्या मनाशी शपथ घ्या. मला खात्री आहे की, तुम्ही हे पाळाल. या पुढच्या स्वातंत्र्य लढयात आपण तुरूंगात भेटू. मास्तरांनी शपथ घेतली. सन १९४२ मध्ये येरवडा तुरूंगात साने गुरूजींच्या बरोबर राहण्याचा भाग्ययोगही त्यांना प्राप्त झाला. पुढे सुटका झाल्यावर पुण्याला उपचारासाठी असलेल्या महात्मा गांधीच्या निवासस्थानी स्वयंसेवक होण्याचा योग आला.

ग.प्र.प्रधान यांचे बोलणे व वागणे आणि विचार यात कमालीची सुसंगती होती. शिवाय त्यांनी स्वतःवर परिणाम करणाऱ्या घटकांबद्दल, ते जगले त्या कालखंडातील राजकीय–सामाजिक घडामोडीबद्दल आणि स्वतःच्या गुण–दोषाबद्दल किंवा सामर्थ्यस्थाने व कच्चे दुवे यांबद्दल अतिशय स्वच्छ व स्पष्ट शब्दांत आणि निःसंकोचपणे लिहिले आहे. त्यामुळे त्यांचे जीवन व कार्य समजावून घेता येणे तुलनेने सोपे आहे.

प्रधानांच्या आयुष्यातील पहिला टप्पा हा त्यांच्या वयाच्या १८ वर्षापर्यंतचा मानता येईल. त्यांचे आई वडील सरकारी नोकरीत असल्याने इंदापूर, सातारा, पारनेर व पुणे या ठिकाणी त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. त्या वेळच्या मध्यमवर्गीय घरात वाढल्याने

वाचनाने संस्कार होणे स्वाभाविक होते. प्रधानांच्या आईवडिलांना तर वाचनाची विशेष आवड होती. या कालखंडात तीन घटकांनी प्रधानांच्यावर दूरगामी परिणाम केला असे दिसते.

पहिला घटक म्हणजे वि.स.खांडेकरांच्या कादंबऱ्यांनी, विशेषतः 'दोन ध्रुव' व 'उल्का' या दोन कादंबऱ्यांनी कुमार वयातील प्रधानांना हलवून सोडले. पांढरपेशा जगण्याच्या बाहेर डोकावण्यास त्यांना भाग पाडले. त्या वेळच्या राजकीय, सामाजिक स्थितीचे भान येण्यास त्या दोन कादंबऱ्या प्रामुख्याने कारणीभूत ठरल्या. उदात्त ध्येयवाद, देशासाठी समाजासाठी झोकून देण्याची उर्मी, त्यागी प्रवृत्ती, साधी व सात्त्विक जीवनशैली या सर्वांचे बीज तेथे पडले.

दुसरा घटक म्हणजे महिपती या संतचरित्रकाराची पुस्तके. प्रधानांची आई धार्मिक प्रवृत्तीची होती, त्यामुळे आईला धार्मिक पुस्तके वाचून दाखवणे हे काम किशोरवयीन प्रधानांच्याकडे होते. अठराव्या शतकात महिपतीने भक्तविजय, संतविजय, पांडवप्रताप अशा काही पोथ्या किंवा संतचरित्रे लिहिली. जवळपास अडीचशे संतांची लहान चरित्रे लिहिणाऱ्या महिपतीची भाषा अत्यंत साधी, सोपी, रसाळ व उद्‌बोधक होती. सामान्यातील सामान्य माणसाच्या मनाचा ठाव घेणारी होती. महिपती हा काही संस्कृत पंडित नव्हता, त्यामुळे संस्कृतच्या प्रभावापासून त्याची भाषा मुक्त होती. महिपतीने लिहिलेली चरित्रे आईला वाचून दाखवण्याच्या निमित्ताने प्रधानांवर महिपतीच्या भाषेचा मोठाच प्रभाव पडलेला होता. तो प्रभाव इतका आहे की त्यानंतर खांडेकराच्या कादंबऱ्यांनी प्रधानांचे भावविश्व व विचारविश्व ढवळून काढले असले तरी खांडेकरांच्या भाषेचा किंचीतही परिणाम प्रधानांच्या भाषेवर झालेला दिसत नाही. एवढेच नव्हे तर प्रधानांनीच लिहून ठेवले आहे की, 'कथा, कादंबरी, कविता, नाटक, निबंध, वैचारिक लेखन हे सर्व वाचायला मला आवडत असले तरी चरित्र आत्मचरित्र वाचायला मला विशेष आवडतात.' प्रधानांनी जे लेखन केले त्यातही चरित्र आत्मचरित्रपर लेखनाचे प्रमाण जास्त आहे.

तिसरा घटक म्हणजे माध्यमिक शाळेत असताना वाय.जी.पटवर्धन नावाच्या शिक्षकामुळे प्रधानांना लागलेली इंग्रजी भाषेची गोडी. त्याचा परिणाम म्हणजे फार कमी वयात इंग्रजी कादंबऱ्या वाचायला प्रधानांनी सुरूवात केली. 'माझी वाटचाल' या पुस्तकात या संदर्भात एक आठवण सांगताना प्रधान म्हणतात, 'एकदा पटवर्धन सरांनी आमच्या वर्गावर सिनॉनिम्स म्हणजे 'समानार्थी शब्द' हा व्याकरणाचा पाठ शिकवला. पण नंतर पुस्तक बाजूला

ठेवून म्हणाले की, हे झाले परीक्षेच्या दृष्टीने, पण मुलांनो या जगात कोणतेही दोन शब्द समानार्थी नसतात. प्रत्येक शब्दाला वेगळी छटा असते. हे त्यांनी उदाहरणासहीत सांगितले होते. प्रधान सरांचे 'मला उमजलेले' हे पुस्तक प्रकाशित झाले त्यावेळच्या समारंभात ते म्हणतात की, 'मला समजलेले' असे नाव मी या पुस्तकाला जाणीवपूर्वक दिलेले नाही. कारण ती प्रक्रिया फार पुढची आहे. म्हणजे खांडेकर, महिपती व पटवर्धन या तिघांचा विलक्षण प्रभाव कुमार–किशोर अवस्थेतील प्रधानावर पडला होता. वयाच्या २३ व्या वर्षी इंग्रजीचे प्राध्यापक होण्यात वयाच्या १८ व्या वर्षी स्वातंत्र्यलढयात भाग घेण्यात आणि भावी काळात सुबोध शैलीतील लेखन करण्यात अनुक्रमे पटवर्धन, खांडेकर, महिपती या तिघांचे संस्कार कारणीभूत ठरले.

प्रधानांच्या आयुष्यातील दुसरा टप्पा म्हणजे वयाची १८ ते २३ हा पाच वर्षाचा काळ अठराव्या वर्षी फर्ग्युसन कॉलेजात प्रधान दाखल झाले. तेव्हा म्हणजे १९३९–४० च्या सुमारास दुसऱ्या महायुद्धाची धामधूम सुरू होती आणि भारतीय स्वातंत्र्य संग्राम एका महत्त्वाच्या वळणावर येऊन ठेपला होता. गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस अंतिम लढा उभारण्याच्या तयारीत होती आणि काँग्रेसमधील एक गट समाजवादी समाजरचना आणण्याच्या दिशेने विचार करीत होता. नेमके त्या काळात सोशॅलिस्टांच्या स्टडी सर्कलमध्ये तारूण्यात पदार्पण केलेले प्रधान दाखल झाले होते. त्यानंतर १९४२ ची 'चले जाव' चळवळ सुरू झाली. तेव्हा काँग्रेस सोशॅलिस्ट भूमिगत झाले. प्रधानही भूमिगत राहून काम करू लागले आणि पकडल्यानंतर तुरूंगात त्यांना साने गुरूजींचा सहवास लाभला. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी सुरू झाल्यावर, तुरूंगातून सुटका झालेले तरूण राजकीय कैदी कौटुंबिक आघाडीवर स्थिरस्थावर होण्याच्या प्रयत्न करू लागले. प्रधानांनीही तेचे केले. एम.ए.पूर्ण करून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते फर्ग्युसन कॉलेजात दाखल झाले.

प्रधानांच्या आयुष्यातील तिसरा टप्पा १९४५ ते ६५ हा २० वर्षाचा आहे. 'प्राध्यापक म्हणून काम करताना राजकीय काम करता येणार नाही' ही डेक्कन एज्युकेशन सोसायटीची अट मान्य करून प्रधानांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी म्हणजे १९४५ मध्ये संपूर्ण लक्ष प्राध्यापकी पेशावर केंद्रीत केले. पण त्याआधीच्या पाच वर्षात भारतीय स्वातंत्र्यलढयातील गांधी, नेहरू व अन्य नेत्यांच्या कार्याचा समाजवादी विचारांचा व साने गुरूजींच्या व्यक्तिमत्त्वाचा, विलक्षण

प्रभाव पडलेला असल्याने, राष्ट्र सेवा दलात बौद्धिक घेण्याचे म्हणजे सेवादल सैनिकांना शिकवण्याचे काम करण्यात त्यांनी परवानगी मिळविली. वीस वर्षे कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून मोठा लौकिक मिळवताना प्रधानांना इंग्रजी ललित साहित्याचे प्रचंड वाचन करायला मिळाले. आणि त्याच वेळी सेवादल सैनिकांची बौद्धिके घेण्याच्या निमित्ताने राजकीय-सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी वैचारिक वाचनही होत होते. या दोहोमुळे प्रधानांच्या भावनिक व वैचारिक जडणघडणीत उदारमतवाद, सम्यक दृष्टी यांचा अंतर्भाव झाला होता.

कुटुंबासाठी कॉलेजमध्ये नोकरी करण्याची गरज पडली. वीस वर्षे नोकरी झाल्यावर पूर्णवेळ राजकारण करण्याचा निर्णय प्रधान सरांनी घेतला, पण खरी कसोटी घेणारा निर्णय पुढेच होता.प्रधान सरांनी १९६५ साली नोकरीचा राजीनामा देऊन पक्षाचे काम सुरू केले. त्यांनी पूर्णपणे काम करायचे ठरवले आणि दुर्दैवाने त्याचवेळी समाजवादी पक्ष दुभंगला. प्रधानांचे जवळचे मित्र बॅ.नाथ, पै.मधु दंडवते, दत्ता ताम्हणे यांचे आणि प्रधानांचे स्वभाव जुळणारे होते.

प्रधान सरांनी प्राध्यापकी करताना आपले समाजवादाचे व्रत अधिक प्रखरपणे पाळले. पुणयसारख्या सांस्कृतिक आणि विद्येच्या नगरीमध्ये समाजवादाच्या अंगाने प्रबोधनाची परंपरा चालविणारे एक विद्याविभूषित व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जात होते. पुण्यातील समाजवादी चळवळ म्हटल्यानंतर क्रमाने जी नावे डोळयांसमोर यायची त्यामध्ये एस.एम.जोशी, नानासाहेब गोर आणि ग.प्र.प्रधान यांचा समावेश असे. एस.एम.जोशी व नानासाहेब गोरे यांनी समाजवादाच्या प्रचारासाठी प्रत्यक्ष दौरे केले. तर ग.प्र.प्रधानांनी या समाजवादी किल्ल्याच्या वैचारिक बुरूज सांभाळण्याचे कार्य केले.

प्रधान सर व फर्ग्युसन महाविद्यालयात इंग्लिशचे प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले. तेथे तब्बल वीस वर्षे एक नामवंत प्राध्यापक म्हणून विद्याजीवनात मानमान्यता मिळवली. पुणे विद्यापीठ विधीसभेचे सदस्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही निःस्पृह वृत्तीने दहा वर्षे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. पुणे विद्यापीठ अध्यापक संघटनेचे ते एक संस्थापक आणि आद्य सचिव होते.

सन १९६५ पर्यंत अध्यापन क्षेत्रात वीस वर्षे पूर्ण वेळ यशस्वी रितीने सेवाकार्य केल्यानंतर प्रधान मास्तरांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली आणि समाजवादी पक्षाचे पूर्णवेळ

कार्यकर्ते झाले. व्यापक जनसेवेच्या उद्देशानेच त्यांनी राजकारणात प्रवेश केला. या नव्या निवडलेल्या क्षेत्रास पूर्ण न्याय देता यावा आणि विद्या जीवनावर अन्याय होऊ नये म्हणून त्यांनी प्रतिष्ठित आणि संरक्षित प्राध्यापकीय पेशाचा त्याग केला.

शिक्षकत्व हा प्रधान मास्तरांनी कधीच व्यवसाय मानला नाही. अध्यापन हे त्यांनी व्रत मानले. आपली राजकीय मते त्यांनी अध्यापक म्हणून कधीच कुणावर लादली नाहीत. 'राजकारण' आणि 'विद्याजीवन' यांची सरमिसळ कधीच त्यांनी केली नाही. सद्‌विवेकाला स्मरून वागणारा एक अनाग्रही विचारवंत प्राध्यापक म्हणून मास्तरांचा सर्वांना आदर व आधार वाटला. केवळ विषयशिक्षक म्हणून राहता त्यांनी अध्यापन विषय शिकविलाच, पण विद्यार्थ्यांना प्रेमही दिले. त्यांचे प्रश्न समजून घेतलेत. शक्य ती मदत करून सोडवलेही होते. त्यामुळे जीवनशिक्षक व समाजशिक्षक ठरले. त्यांचे विद्यार्थी आज अनेक मोठया पदांवर आहेत. त्यांना मास्तरांविषयी आजही आदर व अभिमान वाटतो. त्यामुळे 'आचार्य देवो भव' ही उक्ती त्यांच्याबाबतीत यथार्थ ठरते.

अठरा वर्षे आमदारकीचे कार्य अत्यंत यशस्वीपणे सरांनी पूर्ण केले. पुन्हा ते चौथ्या वेळी उभे राहिले असते तर निश्चितपणे निवडून आले असते. परंतु सरांनी तसे न करता दुसऱ्यांना संधी दिली. पुढे राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी साधना साप्ताहिकाचे संपादक म्हणून काही काळ काम पाहिले. नंतर त्यांनी आपला वेळ पुस्तक लेखनात घालवला.

अशाप्रकारे उत्तम प्राध्यापक, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, आमदार, विरोधी पक्षनेते, साप्ताहिक संपादक, पुस्तकाचे लेखक या बिरूदावल्या मिळविणारे अनेक सापडतील, मास्तरांचे मात्र या पलिकडे काहीतरी होते.

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेताना ग.प्र.प्रधान यांच्यावर महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, कर्मवीर भाऊराव पाटील, सानेगुरूजी, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, पं.जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबरच विविध विचारवंतांचा प्रभाव राहिला. त्यामुळेच त्यांनी सगळयाच विचारप्रवाहातील सद्‌गुण आत्मसात केले होते. कार्यकर्त्यांनी सगळया विचारप्रवाहांना समजून घेतले पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे पुढे राष्ट्रसेवा दलात कार्यकर्ते घडवितानाही त्यांनी विविध विचारांची ओळख कार्यकर्त्यांना घडवून दिली. त्यांनी सन १९४२ च्या लढयात तुरूंगवास सोसला. स्वातंत्र्यवीरांसाठी त्यांनी धाडसाने रसद पुरविली. ग.प्र.प्रधान यांनी भारतीय

स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावास भोगावा लागला. देशभक्तीमुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला. परंतु वैयक्तिक प्रगतीपेक्षा कर्तव्याला त्यांनी महत्त्व दिले. पंडित जवाहलाल नेहरूंचे ग्रंथ त्यांना स्फूर्तिदायक ठरले. आचार्य शंकरराव जावडेकर आणि साने गुरूजी यांचा सहवास त्यांना प्रेरक ठरला. बिनभिंतीच्या शाळेत व्यापक जीवनानुभव संपादित करीत राहून साने गुरूजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी ते एक ठरले. नानाप्रकारे त्यांनी समाज जागरण कार्यात सहभाग घेतला. गांधीजींचे स्वयंसेवक होण्याची संधी त्यांना मिळाली.

कारावासातून मुक्त झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून फर्ग्युसन महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत झाले. तेथे तब्बल वीस वर्षे एक नामवंत प्राध्यापक म्हणून विद्याजीवनात मानमान्यता मिळविलेली. शिक्षकत्व हा प्रधान मास्तरांनी कधीच व्यवसाय मानला नाही. अध्यापन हे त्यांनी व्रत मानले. आपली राजकीय मते त्यांनी अध्यापक म्हणून कधीच कुणावर लादली नाहीत. 'राजकारण' आणि 'विद्याजीवन' यांची सरमिसळ कधीच त्यांनी केली नाही. सद्सदविवेकाला स्मरून वागणारा एक अनाग्रही विचारवंत प्राध्यपक म्हणून प्रधान मास्तारांचा सर्वांना आदर व आधार वाटला. केवळ विषयशिक्षक म्हणून न राहता त्यांनी अथ्यापन विषय शिकविलाच पण विद्यार्थ्यांना प्रेमही दिले. त्यांचे प्रश्न समजून घेतलेत. शक्य ती मदत करून सोडवलेही. त्यामुळे जीवनशिक्षक व समाजशिक्षक ठरले. त्यांचे विद्यार्थी आज अनेक मोठया पदांवर आहेत. त्यांना मास्तराविषयी आजही आदर व अभिमान वाटतो.

प्रधानांच्या आयुष्यातील चौथा टप्पा म्हणजे त्यांनी वीस वर्षांच्या प्राध्यापकीनंतर सक्रिय राजकारणात वयाच्या ४३ व्या वर्षी प्रवेश केला तो. खरे तर प्राध्यापकीच्या काळात त्यांनी जे विद्यार्थी घडवले. आणि शिक्षण क्षेत्रात नाव कमावले होते त्याच्याच आधारे ते राजकारणात येऊ शकले. प्राध्यापकीचा राजीनामा देऊन बाहेर पडल्यावर पुढच्याच वर्षी ते पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवडून गेले. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे २० वर्षाचे कार्य इतके अजोड होते की त्या बळावरच ते पुढची सलग १८ वर्षे आमदार राहिले आणि त्यातील शेवटची तीन वर्षे तर विधानपरिषेदतील विरोध पक्षनेतेही झाले. त्या १८ वर्षाच्या काळात समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते म्हणून काम करताना समाजवादी चळवळीत एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे हे त्यांचे राजकारणातील गुरू राहिले. उत्तम संसदपटू ही त्यावेळी समाजवाद्यांची खासियत होती. त्या काळात मधू लिमये, बॅ.नाथ पै, मधू दंडवते असे

अनेक समाजवादी संसद गाजवत होते. त्यामुळे त्यांचा आदर्श प्रधानापुढे विधानपरिषदेतील काम करताना होता. सन १९८२ मध्ये म्हणजे वयाच्या साठीनंतर मात्र प्रधानांनी राजकारणातून निवृत्त होऊन साधना साप्ताहिकासाठी काम करावयाचे ठरवले. राजकारणातील नव्यांना संधी द्यावी, हा विचार त्यामागे होता. तसेच विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेतेपद भूषविल्यानंतर आता थांबायला हवे, हा विवेकही राजकारणात आपण अधिक धडपड करून फार काही करू शकणार नाही, हे त्यांना कळले होते, तसेच लेखन –वाचनासाठी वेळ काढला पाहिजे ही गरजही त्यांना जाणवत होती.

१९४५ ते १९६४ अशी प्राध्यापकाची नोकरी केली. १९६४ मध्ये विधानपरिषदच्या पदवीधर मतदारसंघात निवडणूक जिंकली आणि प्रधान सरांचे विधानपरिषदेत काम चालू झाले. सुरूवातीचा काही काळ गेल्यानंतर त्यांच्या मित्रांकडून विधानपरिषदेच्या कामकाजाची माहिती घेतली. त्यांनी कामकाज सुरू केले. कोणताही प्रश्न अभ्यास केल्याशिवाय विचारायचा नाही. यासाठी ते महाराष्ट्रभर फिरत. अधिवेशन संपल्यानंतर जनतेच्या समस्या, प्रश्न पाहण्यासाठी प्रत्यक्ष ते त्या स्थळाला भेट देत व त्याचा पूर्ण अभ्यास करून पुढील अधिवेशनात ते विचारीत असत. विधान परिषदेच्या त्यांच्या अठरा वर्षांच्या काळामध्ये त्यांनी अनेक प्रश्न हाती घेतले व ते धसास लावले. मग ते आरोग्यसेविकाचा प्रश्न असो वा आदिवासींच्या जमिनीचा किंवा शिक्षकांच्या पगाराचा असो वा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचा, धरणग्रस्तंचा. सर्व प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. त्यातील बऱ्याच प्रश्नांना त्यांना यश आले. काहींना अपयशही आले. तरी त्यांनी न डगमगता आपले कार्य पुढे चालू ठेवले. पुढे १९८२ ते १९८४ अशी पावणेदोन वर्षे ते विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी काम केले. या काळात अनेक कार्यकर्ते त्यांना भेटण्यासाठी येत. त्या सर्वांना त्यांचे घर म्हणजे मुक्तद्वार होते. त्यांनी पदाचा उपयोग कधी स्वतःसाठी केलेला दिसत नाही.

प्रधानांच्या आयुष्यातील पाचवा टप्पा सन १९८४ ते १९९७ या तेरा वर्षांचा होता. या काळात ते वसंत बापटांच्या बरोबर साधना साप्ताहिकांचे संपादक झाले. या तेरा वर्षांच्या काळात त्यांनी महाराष्ट्रात भटकंती केली. विपुल लेखन केले. साहित्य संस्कृतीच्या व सामाजिक संस्था संघटनांच्या बरोबर काम करीत राहिले. मग ते महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्षपद असो व अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन असो. याच काळात पुरोगामी

विचारप्रवाहाच्या संस्था संघटना, कार्यकर्ते यांना शक्य तेवढे सहकार्य, मदत करण्याची भूमिका ते घेत राहिले. पुण्यातील सार्वजनिक कार्यक्रमातील 'अध्यक्षस्थान' हे या काळात सर्वाधिक वेळा प्रधानांनीच भूषविले असावे. विविध क्षेत्रातील मित्रपरिवार त्यांच्याशी या काळात अधिक जोडला गेला.

ग.प्र. प्रधान हे स्वतः प्राध्यापक असल्यामुळे या सगळयाच चळवळीला विचारांचे भक्कम अधिष्ठान असले पाहिजे आणि ते कार्यकर्त्यांच्यापर्यंत किंवा पुढच्या पिढीपर्यंत पोहचवायचे असेल तर त्यांची तत्त्वे आणि व्यवहार म्हणून योग्य मांडणी झाली पाहिजे, असा आग्रह ग.प्र. प्रधान धरत असत. त्यांचे कोणतेही लिखाण हे समाजवादाच्या मूळ सिद्धांताला व्यावहारिकतेची जोड देणारे होते. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन असेल किंवा 'साधना' सारख्या समाजवादाच्या मुखपत्रातून केलेली राजकारणाची मीमांसा असेल, एखाद्या व्यक्तिविषयीचे त्यांनी केलेले वर्णन असेल. या सर्वमध्ये निःस्वार्थी आणि निर्लेप लेखन होते. प्रधान सरांचे व्यक्तिमत्त्वच एका वेगळया धाटणीचे होते. खादी किंवा पांढरा कुर्ता पायजमा घालणारे डोळयांवर चष्मा आणि गळयामध्ये नेहमी पुस्तकांनी भरलेली शबनम हे चित्र ताबडतोब डोळयांसमोर येत असे. समाजवादी असूनही कधीही अनावश्यक त्यांच्या कपाळावर आठया दिसल्या नाहीत. अत्यंत खुल्या मनाने आणि खुल्या दिलाने समोरच्याशी ते गप्पा मारत असत. चर्चा कोणत्याही प्रकारची असली तरी बोलताना आपला स्वर वाढणार नाही आणि मांडलेला मुद्दाही सुटणार नाही. याचे पूर्ण भान सर ठेवत असत. खरे सांगायचे तर ते जातिवंत प्राध्यापक होते. आपल्याजवळ असलेली माहिती समोरच्यापर्यंत पोहचावी आणि पोहचविताना त्यात कोणाचे कसे हित आहे, हे अत्यंत तळमळीने सांगावे, स्वतःला कोणताही नव्या पैशाचा लाभ होत नसताना त्यांनी अशा प्रकारे समाजाचे जागरण तर केलेच शिवाय सामान्य माणसाला उपयुक्त ठरतील, असे अनेक उपक्रम राबवले. मतभेद असणे हे काही वाईट नाही. उलट मतभेदांचे निमित्त करून मैत्रीचा परीघ वाढवण्याचे कौशल्य पुण्यातील समाजवाद्यांपैकी ते फक्त प्रधान सरांनाच जमले, हेही तितकेच खरे आहे. आपल्या भूमिकेवर ठाम राहायचे. समोरच्याचे मत ऐकून घ्यायचे आणि जमेल त्या त्यावेळी आपल्या भूमिकेचे समर्थन करीत राहायचे. ही हातोटीसुद्धा प्रधान सरांना अवगत होती. बोलताना कुठेही आडपडदा ठेवायचा नाही. जे मनात असेल ते स्पष्टपणाने सांगून मोकळे व्हायचे. पण हा स्पष्टवक्तेपणा बाळगताना समोरचा

अनाठायी दुखावणार नाही, याची काळजी प्रधान सर घेत असत. म्हणूनच पुण्यातील सर्व प्रकारच्या वैचारिक चळवळीच्या व्यासपीठावर त्यांना आवर्जून बोलवले जात असे. कारण समाजवादी असूनही विचारांच्या विश्वामध्ये त्यांना जे व्यापकपणाचे पंख लाभले. त्यामुळे ते समाजतल्या सर्व स्तरापर्यंत मुक्तपणाने विहार करू शकले. सर्वांना हवासा वाटणारा हा सच्चा समाजवादी नेता होता.

सन १९६६ पासून सलग अठरा वर्षे त्यांनी पदवीधर मतदारसंघातून समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्र राज्य विधान परिषदेवर निवडून गेले. तिथे सत्तेचे राजकारण न करता लोकांच्या समस्यांना कशी वाचा फोडता येईल हेच त्यांनी पाहिले. एक अध्ययनशील आणि आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना लौकिक लाभला. त्यांचा सातत्याने तळागाळातील कार्यकर्ते समाजसेवकांशी स्नेहसंबंध राहिला. राज्यातील शिक्षकांचे आणि शिक्षणाचे प्रश्न राज्यकर्त्यांसमोर त्यांनी अभ्यासपूर्ण मांडले. याशिवाय जिल्हा परिषदा, नगपालिकांच्या इत्यादींच्या निवडणुकासंबंधात राज्य निवडणूक आयोग निर्माण करण्याच्या दृष्टीने कायदा तयार करण्याबाबतचा ग.प्र.प्रधान यांचा ठराव, कुटुंब नियोजनाचे धोरण व कार्यक्रम यासंबंधीचा प्रस्ताव, ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटी बिलाबाबत ग.प्र.प्रधान यांनी मांडलेले विचार, पुणे विभागातील जनतेचा न्यायालयीन कामकाजावरील बेसुमार खर्च वाचविण्यासाठी आणि त्यांना होत असलेला त्रास कमी करण्यासाठी पुणे विभागात उच्च न्यायालयाचे ब्रँच स्थापन करण्यासंबंधीचा ग.प्र.प्रधान यांचा ठराव, सब्सिडाईज्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स सेंटरचा विचार करण्यासाठी अभ्यास गट नेमण्याबाबत ग.प्र.प्रधान यांचे विचार , सन १९६९-७० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा करतेवेळीचे ग.प्र.प्रधान यांचे विचार, दुकाने व संस्थाविषयक सुधारणा विधेयकाबाबत ग.प्र.प्रधान यांचे मत, नवा आकृतिबंध अमंलात आल्यानंतर विद्यापीठाकडून एक्स्टर्नल पदवी घेण्याची सोय उपलब्ध नसण्यासंबंधी ग.प्र.प्रधान यांचा अशासकीय ठराव, विद्यापीठे (दुसरी सुधारणा) विधेयकावर ग.प्र.प्रधान यांची प्रतिक्रिया, महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शिक्षण मोफत करण्याची आवश्यकता याबद्दलचे ग.प्र.प्रधान यांचे विचार, शिक्षणाचा दर्जा वाढावा व शिक्षणक्षेत्रातील गैरप्रकारांना आळा बसावा, यासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी स्वायत्त मंडळ नेमण्याबाबत ग.प्र.प्रधान यांचा ठराव, विधानपरिषदेत ग.प्र.प्रधान यांनी अंदाजपत्रकावर सर्वसाधारण चर्चा, खाजगी शाळांचे कर्मचारी

(सेवेच्या शर्ती) विनियमन विधेयक, निवृत्त सदस्यांना निरोप, १ नोव्हेंबर १९७७ पूर्वी प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाला आग्रह, खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा, पब्लिक लायब्ररियन बिल, अमेरिकन अंतराळवीरांचे चंद्रविजयाबद्दल अभिनंदन इत्यादी ठरावावर चर्चा करण्यासाठी सहभाग घेतला होता.

१९८० ते १९८२ अशी दोन वर्षे त्यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणून जनतेची गाऱ्हाणी मांडली. उपेक्षित, दलित, मागसवर्गीयांचे प्रश्न सोडिविणयसाठी ते झगडले. एक कळकळीने कार्य करणारा कणखर लोकनायक असा नैतिक धाक त्यांचा त्यावेळी निर्माण झाला होता.

सन १९६८ मध्ये राज्य ग्रंथालय परिषदेने त्यांच्यासारख्या श्रेष्ठ वाचकाला अध्यक्षपद दिले. त्यांनी मग ग्रंथपाल आणि ग्रंथालयाचे प्रश्न अभ्यासून त्यांनी वाचा फोडली. सन १९७५ साली देशात आणीबाणी पुकारली गेली, तेव्हा त्यांच्यातील लोकशाहीप्रेमी लोकसेवक देशभक्त अस्वस्थ झाला. अन्याय आणि दमननीतीविरूद्ध ते लढले. अठरा महिन्यांचा कारावासही त्यांनी भोगला. त्यावेळीही ते सक्रिय राहिले. 'साता उत्तराची कहाणी' 'भाकरी आणि स्वातंत्र्य'सारखे वेचारिक लेखन केले.

सन १९८४ नंतर सक्रिय राजकारणातून ठरवून त्यांनी निवृत्ती स्वीकारली. नव्यांना वाव द्यावा, असे त्यांनी आपल्या उदाहरणाने दाखवून दिले. नंतर प्रधान मास्तरांनी पूज्य साने गुरूजींनी सुरू केलेल्या 'साधने'चे संपादन केले. चौदा वर्षे हे कार्य निष्ठापूर्वक करून आनंदाने ते बाजूला झाले.

ग.प्र. प्रधान हे जसे पट्टीच वक्ते होते तसेच एक मान्यवर साहित्यिकही होते. सन १९५८ मध्ये लोकमान्य टिळक जन्मशताब्दीच्या निमित्ताने टिळक चरित्राचे लेखन त्यांनी सहकार्याने केले. सन १९६९ महात्माजींच्या जन्मशताब्दीच्या वेळी गांधी चरित्र लिहिले. सन १९६० मध्ये साहित्य अकादमीसाठी लेख संग्रहाचे संपादन त्यांनी केले. सन १९९२ मध्ये राम गणेश गडकरी यांच्यावर त्यांनी ग्रंथ लिहिला. सन १९९५ मध्ये त्यांचे साने गुरूजी चरित्र प्रकाशित झाले. हे त्याचे सर्व लेखन संदर्भग्रंथ म्हणून मान्यता पावले.

सन १९६५ मध्ये भारत पाकिस्तान युद्धाच्यावेळी प्रत्यक्ष युद्ध क्षेत्राची सफर करून प्रधान मास्तरांनी 'हाजीपीर' हे पुस्तक लिहिले. तसेच १९७१ साली बांग्लादेशाला भेट देऊन

‘सोनार बंगला’ हे पुस्तक लिहिले. त्यांची प्रवास वर्णनेही मराठी साहित्यात गाजली आहेत. सन १९८६ मध्ये त्यांनी स्वातंत्र्य संग्रामाचे माहभारत’ शब्दबद्ध केले. त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेला हा स्वातंत्र्य आदोलनाचा प्रभावी दस्ताऐवज ठरणार ग्रंथ अनेक भाषांमधून अनुवादित झाला आहे. प्रौढसाक्षर, नवसाक्षर, ग्रामीण विद्यार्थी असे विविध वाचक समोर ठेवूनही त्यांनी काही पुस्तके तयार केली. समाज प्रबोधन पत्रिका, जनवाणी, लोकमित्र, साधना इत्यादी नियतकालिकांमधून वेळोवेळी त्यांनी कलेले लेखन अनेकांना मार्गदर्शन ठरले.

१९८४ साली प्रधान सरांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरवले. त्यासाठी पक्षाला त्यांनी सांगितले, मला ‘साधना’ साप्ताहिकासाठी काही दिवस काम करावयाचे आहे. त्यांच्या वरिष्ठांनी त्यांची मागणी मान्य केली. ग.प्र. प्रधान ज्या सहकाऱ्यांच्या सहवासात वाढले, त्यांच्याबरोबर काम केले, अशा समाजवादी सहकाऱ्यांमुळे मी घडलो, असे ग.प्र. प्रधान म्हणतात. शिरूभाऊ लिमये, अनुताई लिमये, दत्ता ताम्हाणे, बॅ.नाथ पै, मधु दंडवते, लालजी कुलकर्णी, शंकरराव खरात, अनंतराव भालेराव, रामभाऊ तुपे इत्यादीचा ते उल्लेख करतात. शेवटी समाजवादी चळवळीचे ते मूल्यमापन करतात. या मध्ये ते चळवळीच्या गुणदोषांची थोडक्यात माहिती सांगतात.

प्रधान सरांच्या कामाचे एकूण पाच ते सहा वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांनी त्या त्या वेळेस निर्णय घेऊन आपल्या स्वकर्तृत्वाने कामाचा ठसा उमटवला आहे. कारण त्यांच्या बालवयात घरी आणि शाळा, कॉलेज आणि मित्र यांच्याकडून तसे संस्कार झाले होते. साने गुरूजी, महात्मा गांधी, नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी यांसारख्या थोर पुरूषांचा सहवास त्यांना लाभला होता. त्यामुळे त्यांचे जीवन उजळून गेले.

प्रधान सरांच्या आयुष्यातील पहिला टप्पा आताच्या दहावीच्या वयात त्यांनी स्वातंत्र्याची शपथ घेतली. त्यामुळे त्यांना एक वर्षाची शिक्षा भोगावी लागली. या काळात त्यांना साने गुरूजींचा सहवास लाभला. नंतर १९४५ साली त्यांच्या वडिलांनी त्यांना कुटुंबाची जबाबदारी समजावून सांगितली. त्यामुळे प्रधान सरांनी नोकरी पत्करली. पुढे याच क्षेत्रात वीस वर्षे नोकरी केल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी पत्नीकडे देऊन राजीनामा दिला व सक्रिय राजकारणात उतरले. अठरा वर्षे विधानपरिषदेत काम केले. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, शिक्षक, ग्रंथालयीन कर्मचारी, धरणग्रस्त अशा कितीतरी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न

केले. त्यानंतर त्यांनी राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरवले आणि आपल्या आयुष्याचा पुढला टप्पा हा साने गुरूजींनी सुरू केलेल्या साधना साप्ताहिकासाठी देण्याचे ठरवले.

प्रधान सरांच्या कारकीर्दीतील चौथा टप्पा म्हणजे साधना साप्ताहिकाचे संपादकीय कार्य हा होय. साने गुरूजींनी सुरू केलेल्या या साप्ताहिकासाठी प्रधान सरांनी आपल्या आयुष्यातील काही वर्षे साधनासाठी देण्याचे ठरविले होते. ते ज्यावेळी संपादक पदावर आले, त्यावेळी साधना आर्थिक अडचणीतून जात होती. परंतु ग.प्र. प्रधान आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी यातून वाट काढली. साधनाच्या लेखन कार्यासाठी त्यांना भारतातील अनेक प्रांतात जाण्याचा योग आला. यामध्ये काश्मीर, पूर्वेकडील बांग्लादेश, ईशान्येकडील बहुतांश राज्ये इत्यादी ठिकाणी जाऊन प्रधान सरांनी साधनासाठी लेख व माहिती गोळा केली.

प्रधान सरांना विद्यार्थी दशेपासूनच पत्रकारितेची माहिती होती. एस.एम.जोशी यांनी त्यांना साधनाचे संपादक होणापूर्वीच जी चौकट ठरवून दिली होती. त्या चौकटीमध्ये राहून सरांनी आपले लेखन केले. ग.प्र. प्रधान ‘साधना’ साप्ताहिकाचे सहसंपादक व संपादक असताना प्रत्येक अंकामध्ये जळजळीत अग्रलेख देऊन त्यांनी साधना साप्ताहिकाचे महत्त्व वाढविले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील १९४२ चे ‘चले जाव आंदोलन’ यावर त्यांनी ऑगस्ट १९९२ च्या अंकात सविस्तर माहिती देऊन सर्वाचे लक्ष या साप्ताहिकाकडे आकर्षित केले होते. त्यांनी संपादक असताना सरकारच्या चांगल्या धोरणाचे कौतुक केले. तर राजकारणामध्ये असणाऱ्या अपप्रवृत्तीवर टिका केली.

प्रधान सरांची साधना मध्ये तेरा वर्षांची साधना झाल्यानंतर १९९८ अखेर ते संपादक पद सोडून ती जबाबदारी डॉ.नरेंद्र दाभोळकरांकडे सोपवली. ‘साधना’मध्ये संपादक म्हणून ग.प्र. प्रधान आणि वसंतराव अग्रलेख लिहिण्यापूर्वी आणि अन्य मजकुरासंबंधी नियमाने चर्चा करीत असे. ग.प्र. प्रधान म्हणतात, आमच्यात मतभेद झाला वा एखादया प्रश्नावर काय भूमिका घ्यायची, यासंबंधी आमच्या दोघांच्याही मनात संभ्रम असला तर एस.एम.किंवा गोरे यांच्याकडे आम्ही जात असू. वसंतराव बापट हे जरी कवी होते, आणि ग.प्र. प्रधान समाजवादी पक्षामध्ये अनेक वर्षे कार्य करीत असले तरी वसंतरावांची राजकीय जाण अत्यंत प्रगल्भ होती, हे प्रधान सरांना चर्चेत सतत आढळून येई. राजकीय प्रश्नांवर ग.प्र. प्रधान अधिक लिहित असत आणि

सांस्कृतिक विषयांवर वसंतराव अधिक लिहित असत. परंतु एकमेकांशी चर्चा करूनच आम्ही बहुतेक सर्व अग्रलेख लिहिले.

'साधना' साप्ताहिकाचे त्यांचे सहकारी म्हणजे यदुनाथ थत्ते, वसंत बापट, सदानंद वर्दे इत्यादी होत. हे त्यांचे सर्व सहकारी विद्यार्थी दशेपासून ते राष्ट्रसेवा दलात किंवा सन १९४२ च्या आंदोलनात एकत्र आलेले होते. प्रधान सरांनी 'साधना' साप्ताहिकाचे संपादकपदही सोडले होते. तसेच त्यांचे वय झाले होते. तरीही हीरक महोत्सवासाठी निधी गोळा करण्यासाठी महानगरपालिक आयुक्त असो वा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री. यांच्याकडे ते स्वतः गेले व निधी संकलित केला. याच कार्यक्रमाला राष्ट्रपतींना बोलावले होते. यानंतरचे आयुष्य सरांनी वाचन, मनन व चिंतनात घालवले. शेवटी आपले राहते घर 'साधना' ट्रस्टला देऊन हडपसर येथील साने गुरूजी रूग्णालयात वास्तव्यास गेले.

'साधना' साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील सर्व प्रश्नावर प्रकाश टाकून जनजागृती केली. समाजामधील घटक शेतकरी, शेतमजूर, भूमिहिन व कष्टकरी यावर लेखन करून त्यांचे कल्याण व्हावे, यादृष्टीने सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

प्रधान सरांच्या आयुष्यातील हा शेवटचा टप्पा होता. या टप्प्यांमध्ये त्यांचे विपुल वाचन व लेखन झाले. त्यांनी आपल्या लेखणीची वैशिष्टये व मर्यादा सुरूवातीला सांगितल्या होत्या. त्यांचे मराठी व इंग्रजी असे विपुल लेखन आहे. त्यांच्या स्वभावातील व व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलूंचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनामध्ये पडलेले दिसते. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रसन्न, स्पष्ट आणि परखड होते, तशीच त्यांचे लेखनशैली होती. प्रधान सरांनी लेखन हे क्षेत्र ठरवले असते तर आणि त्यांनी वेळ दिला असता तर आज त्यांचे शेकडो ग्रंथ प्रकाशित झाले असते. लेखन हेच त्यांचे औषध आणि टॉनिक होते असे त्यांच्या लेखनावरून वाटते. त्यांचा खरा पिंड लेखकाचा होता.

सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचे सात्त्विक प्रज्ञादर्शन व प्रतिभादर्शन असे त्यांच्या वाङ्मय निर्मितीचे वर्णन करता येते. त्यांनी व्यक्तिपूजा नव्हे पण व्यक्तिविषयक श्रद्धेतून व्यक्ती विषयात्मक लेखन केले. त्यांनी आपल्या लेखनाची सुरूवात लोकमान्य टिळकांचे चरित्रापासून केली. त्यांनी पुढे आगरकर लेखन संग्रह, भारताचे सुपुत्र लोकमान्य टिळक, लोकमान्यांची राजकीय दूरदृष्टी आणि ज्ञानाचे उपासक लोकमान्य, महात्मा गांधी, सत्याग्रही गांधीजी,

महाराष्ट्राचे शिल्पकार एस.एम.जोशी, महाराष्ट्राचे शिल्पकार ना.ग.गोरे, आचार्य जावडेकर, पं.जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याच शब्दात इत्यादी थोर नेत्यांची आत्मचरित्रे लिहिली आहेत.

या शिवाय आणखी बरीच पुस्तके आहेत. यामध्ये ‘स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत’ हे पुस्तक १९८५ साली ग.प्र. प्रधान यांनी लिहिले. ते सुमारे ५०० पृष्ठांचे होते. ‘साता उत्तराची कहाणी’ हे एक पुस्तक त्यांनी लिहिले आहे. यामध्ये सात वेगवेगळया राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणाची माहिती आहे. २००३ नंतर म्हणजे त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी ‘आठा उत्तराची कहाणी’ हे पुस्तक लिहिले. यामध्ये त्यात १९८० ते २००७ या काळातील राजकीय जीवनाचे चित्र रेखाटले आहे. यामध्ये त्यांनी कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

प्रा.प्रधान यांचे ‘माझी वाटचाल’ हे आत्मकथन २००४ साली प्रसिद्ध झाले. तर Pursuit Of Ideals हे त्याचे इंग्रजी रूपांतर २००४ मध्ये प्रसिद्ध झाले. यामध्ये त्यांचे संपूर्ण जीवनाचा लेखाजोखा दिला आहे. यामध्ये बालपण, शिक्षण, वाचनाची आवड, स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग, प्राध्यापकाची नोकरी, राजकारणात सहभाग, विधानपरिषदेत काम, साधना साप्ताहिकाचे संपादक निवृत्त काळामधील लेखन हे सर्व यामध्ये आहे.

वरील पुस्तकांशिवाय प्रधान सरांची आणखी काही पुस्तके आहेत. त्यामध्ये टॉलस्टॉय यांच्याशी परिसंवाद हे पुस्तक आहे. त्यांनी लहान वयात म्हणजे विद्यार्थीदशेत टॉलस्टॉयची पुस्तके वाचली होती. त्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनाचा व साहित्याचा परिचय तरूण वाचकांना करून देण्याची इच्छा अनेक वर्षे त्यांच्या मनात होती. याशिवाय ‘लेखणीचे ललित’ हे त्यांचे पुस्तक आहे. त्यामध्ये त्यांनी शेक्सपिअर च्या सात नाटकांचे रसग्रहण लिहिले असून स्वातत्र्य आणि अनुवादित अशा सात कथाही रेखाटल्या आहेत.

त्याचप्रमाणे त्यांची राजकीय महाघटनांची पार्श्वभूमी असलेली प्रवासवर्णने म्हणजे ‘हाजीपीर’. हे भारत–पाकिस्तानमध्ये युद्ध झाले होते, त्यामध्ये भारतीय सेनेतील जवानांच्या पराक्रमाचे रोमहर्षक दर्शन त्यांना झाले, त्याचे वर्णन या ग्रंथात आहे. ‘कांजरकोट’ प्रधान सर आमदार झाल्यानंतर १९६८ साली त्यांनी कच्छ सत्याग्रहात भाग घेतला . कांजरकोट हे ठिकाण पाकिस्तानला देण्याचा करार केला होती. त्याविरोधी तीन राजकीय पक्षांनी आंदोलन

केले होते. त्या आंदोलनाचे वर्णन या पुस्तकांत आहे. 'सोनार बांगला' १९७१ मध्ये बांगलादेश निर्मितीच्या वेळी प्रा.ग.प्र. प्रधान आणि त्यांचे सहकारी तेथे गेले होते. ते साधनाचे प्रतिनिधी म्हणून युद्धभूमीवर गेले होते. तेथील मुक्तिवाहिनीतील क्रांतिकारी तरूणांना ते भेटले होते. महात्मा गांधींच्या नौखलीतील आश्रमाला भेट दिली. चितगावपर्यंत गेले. त्याचे वर्णन या पुस्तकात आहे.

वरील पुस्तकाखेरीज मला उमजलेले, भारतीय राजकारणाचे दोन पैलू–लोकशाही आणि समाजवाद, पुरोगामी भारत अशी आणखी तीन पुस्तके त्यांची प्रसिद्ध आहेत. वरीलप्रमाणे प्रधान सरांचे साहित्य क्षेत्रातील भरीव असे योगदान आहे.

'साधना'चे संपादक पद सोडल्यानंतर सन १९९८ ते २००८ हा दहा वर्षांचा कालखंड प्रधानांच्या आयुष्यातील सहावा आणि शेवटचा टप्पा होता. या काळात त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमातून निवृत्ती घेतली, पुरस्कार स्वीकारणे थांबवले, प्रवास थांबवला. आयुष्याची निरवानिरव सुरू केली. अपत्य नसल्याने आणि २००३ मध्ये पत्नीचे निधन झाल्यावर एके काळी ते विश्वस्त असलेल्या हडपसरच्या साने गुरूजी रूग्णाल्यात वास्तव्यासाठी गेले. वृद्धापकाळात अन्य लोकांवर ताण नको, हा विचार त्यामागे होता. त्याचप्रमाणे आयुष्याच्या संध्याकाळी निवांतपणा मिळवून, गतआयुष्यात जे वाचायचे व लिहायचे राहून गेले ते पूर्ण करून जीवनयात्रा आनंदाने संपवण्यास तयार व्हावे, ही जाणीवही त्यामागे होती. हडपसरला वास्तव्यासाठी गेल्यावर त्यांनी संतसाहित्य पुन्हा वाचायला घेतले. त्यात तुकाराम, एकनाथ प्रमुख होते. त्यावेळी ते म्हणाले, तुकारामाइतके कठोर मला होता येत नाही. एकनाथ हा प्रापंचिकांचा संत आहे. तो मला जवळचा वाटतो. त्याच काळात त्यांनी डॉ.आंबेडकरही पुन्हा नव्याने वाचायला घेतले. तेथील सहा वर्षांच्या काळात त्यांनी 'आठा उत्तराची कहाणी', टॉलस्टॉय पत्रसंवाद, डॉ.आंबेडकर त्यांच्याच शब्दात, आचार्य जावडेकर, लेखणीचे ललित, लोकशाही समाजवाद इत्यादी सात पुस्तके लिहिली.

वयाच्या ८८ व्या वर्षी 'जे शक्य होते ते सर्व करून झाले. आता कसलीही इच्छा उरली नाही' अशी भावना त्यांच्या मनात घर करू लागली. कसलाही आजार नाही, पण शरीरयष्टी थकलेली होती. बरोबरीचे सर्व सवंगडी निघून गेलेले, नव्यांसी तितकी नाळ जुळत

नाही, जगण्यासाठी काही प्रयोजन राहिले नाही, अशा अवस्थेत त्यांना मृत्यूची ओढ लागलेली होती.

सतत शिकत राहणे आणि शिकवत राहणे हाच समाजशिक्षकाचा गाभा असतो. शिकण्याची व शिकवण्याची ऊर्मी व उमेद संपली तेव्हा प्रधानांचा जगण्यातील रसही संपला होता. प्राध्यापक असताना, समाजवादी पक्षाचे सदस्य असताना, विधानपरिषदेचे आमदार असताना, साधनाचे संपादक असताना, सार्वजनिक जीवनात वावरत असताना आणि लेखन करतानाही ग.प्र. प्रधान समाजशिक्षकाच्याच भूमिकेत वावरत राहिले. नवीन काही पाहिले, ऐकले, अनुभवले, समजवले तर ते इतरांना ऐकवणे, सांगणे, वाचायला देणे आणि नवीन कोणी भेटले तर त्यांच्याकडून समजावून घेणे ही प्रधानांची प्रमुख वृत्ती होती. हे शिकणे व शिकविणे सामान्यातील सामान्य माणसाबाबतही घडत होते. केवळ राजकीय, सामाजिक क्षेत्रातील किंवा बुद्धिजीवी वर्गातील लोकाबाबत नव्हे.

प्रधान सरांनी गोमंतक मुक्तीचा सत्याग्रह असो किंवा संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असो, एक गाव एक पाणवठा असो, मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा लढा असो की, अलीकडील अण्णा हजारे यांनी उठविलेला भ्रष्टाचाराविरोधी आवाज असो, ते निरंतर लोकलढयात पक्षातीत राहून सहभागी झाले.

स्वातंत्र्य सैनिक म्हणून महिनाकाठी मिळणारी १५०० रूपयांची पेन्शन व पुस्तकापोटी मिळणारी रॉयल्टी त्यांनी स्वतःसाठी न वापरता सार्वजनिक कामांकरिता देऊन टाकली. अध्ययन व अध्यापन, समाजसेवा प्रबोधन, उद्‌बोधक वैचारिक लेखन, महामानवाचे चरित्रकथन, जनजागरण अशा कितीतरी अंगांनी सर‘लोकशिक्षक’ म्हणून कार्य करीत राहिले.

अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी समाजाचा विचार केला. आपला वाडा व संपत्ती त्यांनी साधनासाठी अर्पण केली. पुरस्कार न स्वीकारण्याबरोबरच सार्वजनिक क्षेत्रात सहभागी न होण्याची भूमिका त्यांनी मध्यंतरी घेतली होती. त्यानंतर हडपसर येथील साने गुरूजी विद्यालयातच ते अतिशय साधेपणाने राहत होते.

प्रधानांनी आपले घर साधनाच्या स्वाधीन केलेले होते कारण साने गुरूजींनी स्थापन केलेली हीच संस्था आपले आवडते काम (समाजशिक्षणाचे) दीर्घकाळ करू शकेल, असा त्यांना विश्वास होता. हाती येणारे पैसे तर त्या त्या वेळीच विविध समाजसेवी संस्थांना ते

वाटून टाकत असत. त्यांचा मृत्यू २९ मे २०१० रोजी झाला. मृत्यूनंतर लगेच त्यांचे नेत्रदान केले गेले आणि त्यांचा देह मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलला देण्यात आला. एका समाजशिक्षकाचा देह अखेर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी देण्यात आला. प्रधानांची शेवटची इच्छा त्यावेळी वाचून दाखविण्यात आली. 'माझ्याबद्दल प्रेम असणाऱ्या व्यक्तींनी एक झाड लावून पाच वर्षे वाढवावे आणि माझ्याबद्दल आपुलकी असणाऱ्या संस्थांनी पाच झाडे लावून किमान पाच वर्षे वाढवावीत.' ही इच्छा व्यक्त करतानाही त्यांच्यातील समाजशिक्षक जागा होता. त्यांनी अवास्तव अपेक्षा व्यक्त केली नाही. साक्षर–निरक्षर, गरीब व श्रीमंत आणि कोणत्याही प्रवृत्तीचा, विचारधारेचा माणूस असेल त्याला करता येईल. असा कार्यक्रम दिला. किमान पाच वर्षे झाड जगवले तर ते आपोआप वाढेल ही व्यावहारिक दृष्टी त्यामागे होती. ही झाडे सावली देतील. समाधान देतील हा विचार त्यामागे आहे. प्रधान सरांनी तरी आयुष्यभर काय केले? तर त्यांच्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या लोकाना समाधानच दिले. समाधानी राहायलाच शिकवले. समाधानी कसे राहता येऊ शकते हेच स्वतःच्या आचाराविचारातून दाखवले. प्रधान चरित्र आणि प्रधान विचार त्यातील साधेपणामुळे, सरळपणामुळे आकर्षक वाटतो, पण अनुकरण करण्यास अत्यंत कठीण असतो. याची प्रधानांना पुरेपूर जाणीव होती. म्हणून कदाचित त्यांनी लोकांना स्वीकारता येईल इतका सोपा व समाधान देणार कार्यक्रम दिला असावा.

**गणेश प्रभाकर प्रधान यांचा समाजमनावरील पडलेला प्रभाव :–**

ग.प्र.प्रधान यांनी आपले संपूर्ण आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवले. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यानंतर कळते की, आजच्या समाजामध्ये अशी माणसे फार दुर्मिळ भेटतात. संसारी जीवन जगत असताना त्यांनी देशसेवा, समाजसेवा आणि शेवटी ज्ञानाचा – अनुभवाचा उपयोग समाजासाठी लेखन करण्यात घालवला. तात्कालिन समाजातील ग.प्र.प्रधान ज्यांनी जवळून पाहिले त्यांच्या व ग.प्र.प्रधान यांचा प्रभाव पडलेला दिसतो. राजकारण करत असताना कोठे राजकारन करणाऱ्या व्यक्तींनी कोठे थांबावे व कोठे थांबू नये हा आदर्श ग.प्र.प्रधान यांनी घालून दिला आहे. सत्तेसाठी त्यांनी कधी तत्वांची तडजोड केलेली दिसत नाही. ही शवटपर्यंत आपल्या विचारांशी बांधील राहिले. ते शेवटपर्यंत आपल्या विचारांशी बांधिल राहिले. त्यांच्या अंगी असलेल्या अनेक चांगल्या गुणांमुळे त्यांच्याकडे अनेक मोठी पदे त्यांना मिळाली. त्या सर्वाचा उपयोग त्यांनी स्वतःसाठी न करता समाजासाठी केला. आजच्या तरूण पिढीने हा

आदर्श घेण्यासारखा आहे. राजकारण करणाऱ्यामध्ये अशी व्यक्ती क्वचित भेटते. ग.प्र.प्रधान यांचे जवळचे सहकारी आणि त्यांचे विद्यार्थी यांच्यावर ग.प्र.प्रधान यांचा निश्चितच प्रभाव पडलेला दिसतो.

राजकारण, समाजकारण करत असताना त्यांनी निष्कलंक जीवन व्यथित केले. सत्तेवर आणि विरोधी पक्षामध्ये असताना कधीही कोणताच आरोप त्यांच्यावर झालेला दिसत नाही. त्यांनी ज्या ज्या क्षेत्रामध्ये कार्य केले. त्या क्षेत्रात त्यांनी कामाचा ठसा उमटविलेला दिसतो. ग.प्र.प्रधान यांनी स्वातंत्र्य सैनिक, प्राध्यापक, राजकारणी, संपादक, लेखक अशा अनेक भूमिकामधून ते गेले. परंतु ते साधे सरळ आणि निस्वार्थी जीवन जगले. त्यामुळे समाजामध्ये त्यांना एक वेगळेच स्थान होते.

**ग.प्र.प्रधान यांचे देशोपयोगी कार्य :–**

संस्कृतमध्ये म्हटले जाते 'जगाच्या कल्याणा संताची विभूती' ग.प्र.प्रधानाच्या बाबतीत हे बरोबर ठरते. त्यांनी आपली हयात समाजासाठी घालवली. त्यांच्यावर साने गुरूजी, महात्मा गांधी, यांचे संस्कार झाले होते. तर ना.ग.गोरे, एस.एम.जोशी यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. या थोर व्यक्तींच्या सान्निध्यात जीवन गेल्यामुळे त्यांच्या जडणघडणीमध्ये त्या थोर नेत्यांचा प्रभाव दिसून येतो. साधी रहाणी, त्यागी वृत्ती, समाजासाठी सतत काहीतरी चांगले करणे, समाजतील अन्याय अत्याचारामुळे मत व्यतित होणे इत्यादी सद्गुण ग.प्र.प्रधान यांच्या अंगी दिसतात. स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला त्यांना शिक्षाही झाली होती. शिक्षण घेत असताना व नोकरी करत असताना त्यांना जे शक्य होईल ते करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नोकरी करताना त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व्हावा म्हणून राष्ट्रसेवा दलामध्ये बौद्धिकतेचे काम केले होते. स्वातंत्र्यानंतर काही वर्षे नोकरी केल्यानंतर ते सक्रीय राजकारणात उतरले. राजकारण करताना त्यांनी संपुर्ण राजकीय कारकीर्द समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी घालवली. विधान परिषदेमध्ये वेगवेगळे प्रश्न मांडून ते सोडवण्याचे कार्य त्यांनी केले.

राजकारणातून निवृत्त झाल्यानंतरही ग.प्र.प्रधान मनाने निवृत्त झाले नाहीत. त्यांनी साने गुरूजींनी सुरू केलेल्या साधना साप्ताहिकाच्या संपादकाची जबाबदारी स्विकारली. साधना साप्ताहिकाची आर्थिक घडी बसविली. समाजातील प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी भारताचा विविध

भागामध्ये दौरा करून त्या प्रश्नांना वाचा फोडली. या काळात ग.प्र.प्रधान यांचे वाचन लेखन चिंतन चालूच होते. त्यामुळे त्यांचे साहित्य क्षेत्रातही मोठे कार्य आहे. त्यांच्या साहित्याचा समाजमनावर निश्चित परिणाम झालेला जाणवतो.

अशा विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तिने आपले आयुष्य समाजासाठी वेचले. आपल्या आयुष्याच्या शेवटी शिल्लक राहिलेली पूंजी विविध स्वयंसेवी संस्थेस दान दिली. स्वतःचे रहाते घर साधना साप्ताहिकास बक्षीस म्हणून दिले. व स्वतः सानेगुरूजी हॉस्पिटल हडपसर येथे एका १० X १० च्या खोलीमध्ये आयुष्याचा शेवटचा श्वास घेतला. मृत्यूनंतरही देहदान करून आजच्या समाजापुढे एक आदर्श ठेवला. त्यांची राहणी साधी, सरळमार्गी स्वभाव या सर्वांचा समाज मनावर निश्चितच प्रभाव जाणवतो.

**निष्कर्ष**

१) मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म घेऊन केवळ आई–वडिलांचे, गुरूजनांचे संस्कार व थोर व्यक्तिंच्या सहवासामुळे ग.प्र.प्रधान यांचे नेतृत्त्व उदयास आले.

२) ग.प्र.प्रधान हे निःष्काम, नि:स्पृह समाजसुधारक नेते होते.

३) ग.प्र.प्रधान हे कट्टर समाजवादी विचारवंत होते.

४) ग.प्र.प्रधान यांना व्यक्तिपूजा मान्य नव्हती, हे त्यांच्या साहित्यातून समजते.

५) ग.प्र.प्रधान हे कृतिशील शिक्षक, राजकारणी व लेखक होते.

६) ग.प्र.प्रधान यांनी सत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेसाठी केला.

७) ग.प्र.प्रधान हे इंग्रजीचे एक उत्तम शिक्षक होते.

८) ग.प्र.प्रधान हे एक उत्तम संसदपटू होते.

९) ग.प्र.प्रधान हे उत्तम लेखक व साहित्यिक म्हणून प्रसिद्ध होते.

१०) ग.प्र.प्रधान यांना संपत्ती व सत्तेचा मोह नव्हता. त्यांनी आपले कोटयावधी किमतीचे घर साधना ट्रस्टला बक्षीस दिले. सर्व संपत्ती संस्थांना बक्षीस दिली.

११) ग.प्र.प्रधान यांना भ्रष्टाचाराची प्रचंड चीड होती. त्यामुळे ते वार्धाक्यात सुद्धा भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात सहभागी झाले होते.

१२) ग.प्र.प्रधान यांनी गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी यांच्याविषयी त्यांच्या मनात तळमळ होती.

१३) ग.प्र.प्रधान यांना जातीयवाद मान्य नव्हता.

१४) ग.प्र.प्रधान हे त्यांच्या स्वभावात स्पष्टवक्तेपणा होता.

१५) ग.प्र.प्रधान हे समतेचे पुरस्कर्ते होते.

# संदर्भ ग्रंथ

## प्राथमिक साधने

### अ) मुलाखती

१) प्रधान ग.प्र. यांची शिरपूर यांनी घेतलेली मुलाखत

अ) भाग एक– प्रधान चरित्र – ४५ मिनिटे

आ) भाग दोन– प्रधान चरित्र

### ब) ग.प्र.प्रधान यांची ग्रंथसंपदा :–

### मराठी


१) आगरकर लेखसंग्रह(संपा.) साहित्य अकादमी, पुणे, १९६० पहिली आवृत्ती, २००७ (सातवी आवृत्ती)

२) आव्हानाशी संघर्ष, परिवर्तनाची दिशा, राष्ट्रसेवा दल

३) आठा उत्तराची कहानी, मौज प्रकाशन, पुणे, २००९

४) कांजरकोट, साधना प्रकाशन, पुणे, १९६८

५) टॉलस्टॉयशी पत्रव्यवहार, साधना प्रकाशन, पुणे, २००६, पहिली आवृत्ती, २००८, दुसरी आवृत्ती.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याच शब्दात, साधना प्रकाशन, पुणे, २००४, चौथी आवृत्ती.

७) भारतरत्न पं.जवाहरलाल नेहरू, शिव प्रकाशन, पुणे, २००५

८) भारताचे सुपुत्र टिळक, शिव प्रकाशन, पुणे,  २००५

९) भारतीय राजकारणातील दोन पैलू, लोकशाही व समाजवाद, साधना प्रकाशन, पुणे, २००८

१०) भारतीय स्वातंत्र्य संग्राम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १५ ऑगस्ट २००६

११) महाराष्ट्राचे शिल्पकार, एस.एम.जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पुणे, २००१

१२) महान लोकनेता जयप्रकाश नारायण,  साधना प्रकाशन, पुणे, २००१

१३) माझी वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे, ११ जून २००४, २००५, दुसरी आवृत्ती

१४) मला उमजलेले(प्रस्तावना संग्रह), प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००७

१५) लेखनीचे ललित, साधना प्रकाशन, पुणे, २००८

१६) लोकमान्य टिळक व्यक्ती, वाङ्मय, राजकारण, देशमुख आणि कंपनी, पुणे, २००७

१७) लोकमान्यांची राजकीय दूरदृष्टी आणि ज्ञानाचे उपासक लोकमान्य (दोन नाटीका), शिव प्रकाशन, पुणे, २००८

१८) साता उत्तराची कहानी, मौज प्रकाशन, पुणे, १९८१, तिसरी आवृत्ती, २००६

१९) सत्याग्रही गांधीजी, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, २००७

२०) सोनार बांगला, साधना प्रकाशन, पुणे, १९७२

२१) स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २००४

२२) हाजीपीर, साधना प्रकाशन, पुणे, १९६६

**क)विधान परिषद अहवाल**

१) विधानपरिषद अहवाल– २३ जून १९६७

२) विधानपरिषद अहवाल–२४ जुलै १९६७

३) विधान परिषद अहवाल, ९ जुलै १९६७

४) विधान परिषद अहवाल, ३० जून १९६७

५) विधान परिषद अहवाल, १ ऑगस्ट १९६९

६) विधानपरिषद अहवाल– सन १९६९– ७०

७) विधानपरिषद अहवाल– ४ ऑगस्ट १९७०

८) विधानपरिषद अहवाल– ५ ऑगस्ट १९७७

९) विधानपरिषद अहवाल– १ ऑगस्ट १९७७

१०) विधान परिषद अहवाल– १८ जुलै १९७९

११) विधानपरिषद अहवाल–८ ऑगस्ट १९७९

**ड) इतर**

१) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड ३, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९७०.

२) जोशी महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९७६,

३) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड– ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८०

४) पाठक अरूण (संपा.), पुणे जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९९९

५) महाराष्ट्र राज्य जनगणना अहवाल– २००१

## इंग्रजी ग्रंथ

१) Acharya Jawadekar : A Satyagrahi Socialist

२) Indian Freedom Struggle, Snehawardhan Prakashan, 2005

३) Letters to Tolstoy – Popular Publication, 2006

४) Lokmanya Tilak : National Book Trust, 1994, 2001, 2005

५) Mahatma Gandhi : Snehwardhan Prakashan, 2005

६) Pursuit of Ideals – Ameya Prakashan, 2005

७) Ram Ganesh Gadkari – Sahitya Academy, 1992

८) Sane guruji – Sahitya Academy, 1995

## दुय्यम साधने :–

१) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २ ऑक्टोबर २००५

२) कुंटे भ.ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोष, महाराष्ट्र राज्य, पश्चिम विभाग– खंड ३, मुंबई, १९८७

३) जावडेकर श.द., आधुनिक भारताचा, कॉन्टीनेंट प्रकाशन, पुणे

४) जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, २००४

५) जाधव व्ही.के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर

६) जोशी एस.एम., मी एस.एम., साधना प्रकाशन, पुणे, १९८९

७) दंडवते मधु, नानासाहेबांची राजकीय वाटचाल, मौज प्रकाशन, मुंबई, १९८७

८) दाभोळकर नरेंद्र(संपा.) निवडक साधना ग्रंथसंच, साधना प्रकाशन, खंड ८,देशमुख रा.नी. आपला पुणे जिल्हा, कल्पना प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती, २०१२

९) देशपांडे राजेश्वरी, आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर, गंधर्ववेध प्रकाशन, पुणे, २०१०

१०) पांढरे नीला, प्रा.ग.प्र.प्रधान व्यक्ती आणि वाङ्मय, उन्मेष प्रकाशन, पुणे, ३० जून २०११, प्रथमावृत्ती
११) पवार जयसिंगराव, आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध, डोंबिवली मुंबई, २००४
१२) प्रधान ग.प्र. व जाधव रा.ग. निवडक साधना खंड १ ते ८, साधना प्रकाशन, पुणे
१३) प्रधान ग.प्र., लोकमान्य टिळक व्यक्ती आणि कार्य, केसरी प्रकाशन पुणे, १९७१
१४) प्रधान ग.प्र., गो.ग.आगरकर निवडक लेखसंग्रह, प्रदिप प्रकाशन, प्रथम आवृत्ती जुलै २००६
१५) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड– २, विद्या प्रकाशन, पुणे, १९९१
१६) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड– ४, विद्या प्रकाशन, पुणे, १९९३
१७) फडतरे भूषण, भारतीय स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयाचे योगदन, डायमंड पब्लिकेशन पुणे, १५ ऑगस्ट २०१३
१८) फडतरे भूषण गोविंद, स्वातंत्र्य लढयाचे पाईक, अथर्व प्रकाशन, पुणे, ११ मार्च २०१५
१९) भट मंदाकिनी वासुदेव क्रांतिकारकांच्या सावल्या, मनोरमा प्रकाशन प्रथम आवृत्ती दत्त जयंती १६ डिसेंबर २०१३
२०) भावे विनायक लक्ष्मण, मराठी दफ्तर(रूमाल दुसरा), मराठी दफ्तर संस्था ठाणे, १९२२
२१) भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे,१९९८
२२) महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, २००४
२३) मंगुडकर मा.प., बदलते पुणे, प्रकाशक सौ.सविता जोशी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी २००१
२४) रानडे म.गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, मुंबई, १९८९
२५) लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च२००४
२६) वंजारी सारिका अशोक व काळे श्रुती, पुणे जिल्हा, प्रकाशक विवेक गोसावी(नियंत्रक) प्रथमावृत्ती, २००८, पुनर्मुद्रण तिसरे, २००८
२७) सोशे दिपाली अतिश, पुणे जिल्हा विशेष, आपल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १२ डिसेबर २००८
२८) सौताडेकर विवेक, पुणे जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, पुणे, २०११

### साप्ताहिके


१) 'साधना' साप्ताहिक, पुणे, शनिवार, दि.४ जून २०११

२) साप्ताहिक 'साधना', ५ जून २०१०

३) साप्ताहिक 'साधना', ५ जून २०११

४) डॉ.दाभोळकर नरेंद्र (संपा.), 'साधना' साप्ताहिक, वर्ष ६२, अंक ४३

५) डॉ.दाभोळकर नरेंद्र(संपा.) 'साधना' साप्ताहिक पुणे, दि. ४ जून २०११

६) बापट वसंत(संपा.), 'साधना' साप्ताहिक, ११ जून १९८४

७) बापट वसंत(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९८४

८) प्रधान ग.प्र., 'साधना ची संपादक परंपरा', निवडक साधना ग्रंथसंच– खंड ८

९) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १० ऑक्टोबर १९८५

१०) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, २६ जानेवारी १९८६ ते ३ एप्रिल १९८६

११) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९८६

१२) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, २६ जानेवारी १९८७

१३) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, ११ जून १९८७

१४) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, (दिवाळी अंक), ऑक्टोबर, १९८७

१५) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १ मे १९८८

१६) प्रधान ग.प्र.(संपा.), साधना साप्ताहिक, १७ मार्च १९८९

१७) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, २७ मे १९८९

१८) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, ऑक्टोबर १९८९

१९) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, मार्च, एप्रिल १९९०

२०) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९०

२१) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १ एप्रिल १९९२

२२) प्रधान ग.प्र.(संपा.), 'साधना' साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९२

२३) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९२

२४) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, २२ ऑगस्ट १९९२

२४) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १ मे १९९३

२५) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १ मे १९९३

२६) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १५ जून १९९३

२७) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १४ जुलै १९९३

२८) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १५ ऑगस्ट १९९४

२९) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, २६ नोव्हेंबर व २१ जानेवारी १९९५

३०) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १८ नोव्हेंबर १९९५

३१) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, ४ मे १९९६

३२) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, २२ जून १९९६

३३) प्रधान ग.प्र.(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक, १ फेब्रुवारी १९९७

३४) डॉ.दाभोळकर नरेंद्र(संपा.), ‘साधना’ साप्ताहिक पुणे, दि.५ जून २०१०,

**नियतकालिके व वृत्तपत्रे**

१) दैनिक ‘सकाळ’, पुणे. ३० मे २०१०

२) दैनिक ‘लोकसत्ता’, पुणे, ३० मे २०१०

३) दैनिक ‘सार्वमत’, अहमदनगर व पुणे

४) दैनिक ‘लोकमत’, अहमदनगर, दि.३० मे २०१०

५) दैनिक ‘केसरी’, पुणे, ३० मे २०१०

६) दैनिक ‘नवाकाळ’, पुणे, ३० मे २०१०

७) दैनिक ‘गावकरी’, पुणे, ३० मे २०१०

८) दैनिक ‘पुढारी’, पुणे, ३० मे २०१०

परिशिष्टये १

## दै. लोकमत ३० मे २०१०

... पूर्ववत सुरू करण्यात आली.

कारभारावरून निर्विवादपणे सिद्ध झाले आहे.

# राजकारण व समाजकारणातील सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व लोपले – मुख्यमंत्री

पुणे, २९ मे / प्रतिनिधी

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या निधनामुळे राजकारण आणि समाजकारणातील शालीन व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व लोप पावले असे मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी प्रधान सरांना आदरांजली वाहताना सांगितले. ते म्हणाले राजकारण आणि समाजकारण करत असतानाच त्यांनी आपला व्यासंगही कायम ठेवत मराठी साहित्यसृष्टीत महत्त्वाच्या वैचारिक ग्रंथाची भर घातली. शेवटच्या क्षणापर्यंत सामाजिक विषयावर त्यांचे चिंतन-मनन सुरू होते. राष्ट्रसेवा दल तसेच 'साधना' साप्ताहिकाच्या 'माध्यमातून त्यांनी शैक्षणिक प्रबोधनाचे कार्य केले. विधान परिषदेतील त्यांची कारकीर्द, अभ्यासू व आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून गाजली. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी याचे ते मूर्तिमंत प्रतीक होते. त्यांच्या निधनाने एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व हरपले.

**विलासराव देशमुख** - ग. प्र. प्रधान राजकारणातील सभ्यता आणि साधेपणाचा जवळचा संबंध असणारा संयमी, मृदू स्वभावाचा महान नेता होता. शेवटपर्यंत त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. लोकप्रतिनिधी या नात्याने समाजातील प्रश्न त्यांनी आग्रहीपणे मांडले. त्यांच्या निधनाने समाजशिक्षकाची भूमिका बजावणारे व्यक्तिमत्त्व आपल्यातून नाहीसे झाले आहे.

**रमेश बागवे** - राज्यातील समतेचे प्रणेते व गोरगरिबांचा आधार असलेल्या या विचारवंताची उणीव भासणार आहे.

**सुरेश कलमाडी**- 'प्रधान यांच्या निधनाने आदर्श मार्गदर्शक हरपला आहे. उपेक्षितांना न्याय मिळवून देणे हेच त्यांनी जीवनध्येय मानले आणि संपूर्ण आयुष्य ते निष्काम कर्मयोगी म्हणून जगले.'

**अण्णा हजारे**- 'सरांचे जीवन कार्यकर्त्यांनाच नव्हे, तर सर्वसामान्यांसाठी दीपस्तंभासारखे होते.

**भाई वैद्य** - प्रधानमास्तरांची व्याख्याने म्हणजे बौद्धिक मेजवानीच असे. त्यांची विषयाची मांडणी प्रेरणादायी व मनाचा वेध घेणारी होती. स्वतःजवळचे ज्ञान मुक्तपणे, दिलखुलासपणे इतरांना देण्याचा त्यांचा प्रयत्न कधीही विसरू शकत नाही. वयाच्या १८ व्या वर्षी घेतलेली समाजवादाची दीक्षा त्यांनी अखेरपर्यंत टिकविली.

**प्रकाश जावडेकर** - प्रधानसर हाडाचे समाज शिक्षक होते. त्यांनी आयुष्यभर केवळ समाजाची चिंता केली व त्यासाठी कार्यरत राहिले. ते एक तपस्वी जीवन जगले.

**नीलम गोऱ्हे**- 'सरांच्या निधनाने स्त्रियांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या संघटनांना फार मोठा धक्का बसला आहे त्यांच्यामुळेच आम्हाला समाजासाठी दोन पावले पुढे टाकण्याची ऊर्जा मिळाली आणि कार्यकर्तेही जोडले गेले.'


प्रवृत्तीचे प्रधान मास्तर राजकारणात असले तरी हाडाचे शिक्षक होते. चळवळीला सर्वस्व अर्पण करणारे ते ज्येष्ठ मार्गदर्शक आणि मित्र होते.'

**उल्हास पवार**- जीवनातील शेवटच्या क्षणापर्यंत समतेचा विचार आचरणात आणणारा अद्वितीय नेता हरपला.

**नरेंद्र दाभोलकर** - प्रधान सर एक लेखक, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत असण्याबरोबरच एक सक्षम व आदर्श राजकारणी होते. साने गुरुजींच्या विचारांचा सर्वांगीण वारसा चालविणाऱ्या या नेत्याचा नैतिक दबदबा समाजात होता. पारदर्शी व्यक्तिमत्त्व व निःस्वार्थी वृत्ती ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये होती.

**सुभाष वारे** - प्रधान सर म्हणजे गांधीजींच्या ... त्यांची गौरवशाली परंपरा सांभाळणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

**बाबा आढाव** - साने गुरुजींच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण योगदान देत असतानाच भविष्यातील भारताला समाजवादी वळण लागावे यासाठी आग्रह धरणाऱ्या पिढीचे प्रतिनिधी होते. त्यांनी लिहिलेला 'भाकरी की स्वातंत्र्य' हा ग्रंथ लोकशाही व समाजवादी संकल्पना स्पष्ट करणारा आणि कार्यकर्त्यांच्या मनातील गैरसमज दूर करणारा सर्वोत्कृष्ट ग्रंथ मी मानतो.



ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना प्रधान सरांचे अंत्यदर्शन घेताना अश्रू अनावर झाले. (छाया-अरूल होरायझन)

**मोहनसिंग राजपाल** - प्रधान सर म्हणजे साने गुरुजींच्या विचारांतून घडलेले एक आदर्श व दुर्मिळ समाजवादी व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्राबद्दलचे असीम प्रेम व संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील त्यांचे विचार प्रेरणादायी होते. जातीविरहित समाज कसा घडेल यासाठी धडपडणारा एक महान नेता म्हणजेच प्रधान सर.

**कुमार सप्तर्षी** - सार्वजनिक जीवनात शुद्ध बुद्धीने व प्रामाणिक ... देणारे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रधान गुरुजी. राजकारण, लेखन व अध्यापन या तीनही क्षेत्रांमध्ये त्या त्या क्षेत्रांच्या मानदंडाप्रमाणे ते यशस्वी होते. दुसऱ्याबद्दलचा अपार जिव्हाळा हे त्यांचे शक्तिस्थान होते.

**रा. ग. जाधव** - व्यक्तिगत, सार्वजनिक क्षेत्रातील तत्त्वनिष्ठ, मूल्यनिष्ठ चारित्र्याचा आदर्श प्रधानसरांच्या रूपाने अस्तंगत झाला आहे.

**प्रा. तेज निवळीकर** - प्रधान मास्तर हे विचार, निर्णय आणि कृती यांचा संगम असणारे व्यक्तिमत्त्व होते. माणूसपण जपणाऱ्या मास्तरांच्या निधनाने वैचारिक प्रवाह खंडित झाला आहे.

**सुनीती सु. र.** - दीर्घ समाजवादी चळवळीचा इतिहास प्रधान मास्तरांच्या रूपानेच संपला.

**माधुरी मिसाळ**, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण आणि समाजकारणावर प्रधान सरांचा प्रभाव होता. आपल्या आचारविचारांतून त्यांनी मापदंड निर्माण केला. त्यांच्या निधनाने एक सुसंस्कृत, तत्त्वनिष्ठ राजकारणी आणि मार्गदर्शक हरपला.

**अजित पवार** - एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन यांच्या तालमीत तयार झालेले प्रधान सर एक अष्टपैलू व जनमानसात आदरयुक्त प्रतिमा असणारे नेते होते. विधान परिषदेत विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी केलेली कामगिरी जनतेच्या कायम स्मरणात राहील, त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांच्या साखळीतील शेवटचा दुवा निखळला आहे.

**कॉ. अजित अभ्यंकर** - महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधन, महात्मा गांधींचा नैतिक विचार आणि लाल बावट्याचा वर्गीय संघर्ष यांचा मिलाफ म्हणजे प्रधान सरांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने श्रमिकांच्या चळवळीला लोकशाही क्रांतीमध्ये परावर्तित करणारा

**कॉ. दत्ता देसाई** - साने गुरूजींचा सात्त्विक स्वभाव, नैतिक व वैचारिक अधिष्ठानांचा विश्वास लोकांना वाटावा असे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रधान सर. सततचे वाचन, चिंतन आणि मनाला भावणारे प्रोत्साहक विचार यामुळे त्यांना भेटले की उत्साह वाढायचा.

**अनिल गुजर** - प्रधान मास्तरांच्या आधाराने चालणाऱ्या संस्थांची फार मोठी हानी झाली आहे. आमच्या जीवनात त्यांनी फार मोठा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी जीवनाच्या अखेरच्या काळात लिहिलेल्या ओळी मनाला चटका लावतात, त्या अशा-

'एका मागून एक चालले
पैल थडीला सर्व सवंगडी
रानपाखरा परी एकाकी
घुमतो मी या ऐलथडी'

**डॉ. रामचंद्र देखणे**- 'शब्दांना विचारांची, राजकारणाला तत्त्वांची आणि कृतीला नीतीची जोड देणारा द्रष्टा विचारवंत हरपला.'

**लक्ष्मीकांत किणकर** - अमोघ वक्तृत्व असणारे प्रधान मास्तर साधे शिक्षक होते. त्यांनी शिक्षकाचा मूळ पिंड शेवटपर्यंत कायम ठेवला.

**रतन सणस** - कामगारांची नेहमी आपुलकीने विचारपूस करणारे, घासातला घास देणारे प्रधान सर. स्वतःचे काम स्वतः करत.

**दिलीप आबा तुपे** - समाजाच्या विचाराचे अधिष्ठान आज प्रधान मास्तरांच्या रूपाने आपल्यामधून निघून गेले आहे.

**रामदास आठवले**- प्रधान सरांचे महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक चळळ समृद्ध करण्यासाठी सक्रिय योगदान फार मोलाचे आहे. आयुष्यभर त्यांनी परिवर्तनवादी व समतावादी मूल्ये जपली. त्यांच्या निधनाने परिवर्तनवादी चळवळीची फार मोठी हानी

परिशिष्टये २

## दै . सकाळ

पुणे • कोल्हापूर • नाशिक • मुंबई • औरंगाबाद • सोलापूर • नागपूर • सातारा • जळगाव येथून प्रसिद्ध

# 'प्रधान मास्तर' कालवश

## साने गुरुजींच्या 'धडपडणाऱ्या मुला'ची इहलोकीची यात्रा समाप्त

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. २९ : सभ्यता आणि साधेपणाने जीवन व्यतीत करून समाजासमोर आदर्शांचा वस्तुपाठ निर्माण करणाऱ्या प्रधान मास्तरांनी- प्रा. गणेश प्रभाकर ऊर्फ ग. प्र. प्रधान (वय ८८) यांनी- शनिवारी पहाटे जगाचा निरोप घेतला. साने गुरुजींच्या 'धडपडणाऱ्या मुलांपैकी' एक असलेल्या प्रधान सरांनी 'साने गुरुजी रुग्णालयात'च शेवटचा श्वास घेतला. त्यांनी नेत्रदान आणि देहदान केले आहे. शासकीय इतमामात प्रा. प्रधान यांचे पार्थिव सायंकाळी सुमतीबाई शाह आयुर्वेद महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आले.

ज्येष्ठ समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक, साहित्यिक-विचारवंत, 'साधना ट्रस्ट'चे विश्वस्त आणि विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अशी अनेक विशेषणे प्रा. ग. प्र. प्रधान यांना असली, तरी ते 'प्रधान मास्तर' किंवा 'प्रधान सर' म्हणून अधिक परिचित होते. गेल्या सहा वर्षांपासून ते हडपसर



ग. प्र. प्रधान

येथील महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या साने गुरुजी रुग्णालयात वास्तव्यास होते. अलीकडेच त्यांची प्रकृती नाजूक बनली होती. त्यांनी अन्नसेवन कमी केले होते. शुक्रवारपासून (ता. २१) प्रकृती खालावल्याने त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले होते. त्यातच त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर उपचार सुरू असले, तरी वार्धक्यामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. अखेर शनिवारी पहाटे पाच वाजून पाच मिनिटांनी प्रधान सरांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजवादी कार्यकर्त्यांसह राजकारण, शिक्षण, साहित्य अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हडपसर येथील रुग्णालयाकडे धाव घेतली.

पत्नी डॉ. मालविका प्रधान यांच्या निधनानंतर वानप्रस्थ स्वीकारताना प्रधान सरांनी सदाशिव पेठेतील आपले घर 'साधना ट्रस्ट'ला बक्षीस म्हणून दिले होते. आपले जीवन समाजहितासाठी अर्पण करणाऱ्या प्रधान सरांनी जगाचा निरोप घेताना नेत्रदान आणि देहदान करून आपल्या आदर्शांची प्रचिती समाजाला दिली.

'सकाळ'तर्फे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी श्रद्धांजली अर्पण केली. सायंकाळी प्रधान सरांचे पार्थिव रुग्णालयाकडे सुपूर्त करण्यात आले, तेव्हा अनेकांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली. पोलिस दलाने त्यांना मानवंदना दिली.

**'प्राधान्य' हरपले**

पान ६ वर ▶

...व्यक्त केली आहे.

...किमान पाच वर्षे जगवावे."

...नी आपल्या अपूर्णतेसह

..., त्याबद्दल त्यांचे आभार

...जवळ पुरेसे शब्द नाहीत,


ग.प्र.प्रधान

परिशिष्टये ३

## दैनिक पुढारी, ३० मे २०१०

पुढारी
रविवार, ३०

# एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व



**दत्ता ताम्हणे**

**विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, समाजाच्या विविध थरांमध्ये, पक्षांमध्येही मित्र जोडणारे अभ्यासू आमदार, चांगले लेखक आणि वक्ते अशा अनेक नात्यांनी प्रसिद्ध असलेल्या या संवेदनशील मनाच्या, पण कणखर वृत्तीच्या प्रधान मास्तरांविषयी...**

मते याचा किती र असतो, याचे चित्रण एकाच ग्रंथात करणारे हे लिखाण कदाचित राजकीय मयांत प्रथमच पाहावयास मिळते. नांचे भिन्न-भिन्न राजकीय पक्षांत काम गारे मित्र आहेत, त्यामागे हे इंगित आहे. पुस्तकात प्रधानांनी मनोगत व्यक्त न आहे, त्यावरून नांचा राजकीय पिंड हा अगदी वेगळा हे, हे सहज ध्यानात येते. राजकीय गत वावरत असताना प्रधानांनी आपल्या वसायाशी कधीही प्रतारणा केली ही. कॉलेजात प्राध्यापक व सेवादलात ास्तर' या दोन्ही भूमिका ते प्रामाणिकपणे तन्मयतेने पार पाडीत. राष्ट्र सेवादलाच्या निकांना 'बौद्धिक' देण्याचे काम धानांकडेच असे व त्यामुळेच सेवादल रिवारात ते 'प्रधान मास्तर' म्हणूनच ोळखले जातात.

**स्वत:च घातलेल्या मर्यादा**

१९४८ मध्ये मी काँग्रेसचा राजीनामा ऊन समाजवादी पक्षात प्रवेश केला व यानंतर प्रांतिक पक्षाचा मुख्य सचिव व त्यानंतर अध्यक्ष या पदांच्या जबाबदाऱ्या माझ्यावर आल्या. यासाठी मी पुण्याला जाऊन राहिलो. यामुळे प्रधानांच्या वारंवार भेटी होऊ लागल्या. तथापि, राजकीय चर्चेमध्ये प्रधानांनी कधीही हिरीरीने भाग घेतल्याचे मला आठवत नाही. खरे म्हणजे बेचाळीसच्या आंदोलनात प्रधान येरवडा कारागृहात होते. आचार्य जावडेकरांसारख्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाबरोबर त्यांना राहावयास मिळाले होते. त्यामुळे त्यांची लोकशाही समाजवादावरची मते व निष्ठा दृढ झाली होती; परंतु कॉलेजमधील नोकरी विचारात घेऊन त्यांनी स्वत:च्या काही मर्यादा आखून घेतल्या होत्या. या काळात महाराष्ट्र समाजवादी पक्षात काही अंतर्गत संघर्षही निर्माण झाले होते. कॉ. माधवराव गायकवाड यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई, मधू लिमये यांच्याबरोबर झालेला वैचारिक संघर्ष अशा घटनांबाबत प्रधानांनी पक्षाच्या बैठकीतही बोलण्याचे टाळले. जोपर्यंत आपण नोकरी सोडून पूर्णवेळ राजकीय कामासाठी देत नाही, तोपर्यंत स्वमताचा आग्रह धरणे योग्य नव्हे, अशी त्यांची भूमिका होती. परंतु, नानासाहेब गोरे किंवा एस. एम. जोशी यांच्याकडे जेव्हा गप्पांच्या ओघात राजकीय चर्चा रंगत, तेव्हा प्रधान आपली मते मोकळेपणाने मांडीत.

विषयाचा अभ्यास केल्याखेरीज व भाषणाची टिपणे तयार केल्याखेरीज प्रधान विधान परिषदेत कधीच भाषण करीत नसत. शिक्षण हा जरी त्यांचा विशेष आवडीचा व अभ्यासाचा विषय असला, तरी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील प्रश्नांवर प्रधानांची अभ्यासपूर्ण भाषणे मी ऐकलेली आहेत. यासाठी त्यांनी खूपच परिश्रम केले आहेत. विधान परिषदेचे अधिवेशन संपले की लागलीच ते दौऱ्यावर निघत. अधिवेशनात काय काय झाले. ते जनतेपर्यंत व विशेषत: आपल्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचविणे हा या दौऱ्यांचा मुख्य हेतू असे. याच दौऱ्यांमध्ये ते आगामी अधिवेशनात मांडावयाच्या प्रश्नांची तयारी करीत. प्रश्नाची सांगोपांग माहिती असल्याखेरीज ते सहसा तोंड उघडीत नसत. अठरा वर्षांच्या काळात उभा महाराष्ट्र त्यांनी पायदळी घातला. विदर्भ-मराठवाड्यापासून तळ कोकणापर्यंत एकही जिल्हा असा नसेल की, जेथे प्रधान गेलेले नाहीत. त्यांच्या मतदारसंघाच्या सतरा जिल्ह्यांत तर ते प्रत्येक तालुक्यापर्यंत व गावोगावी जाऊन आलेले आहेत. या दौऱ्यांतून मिळालेली माहिती ही पुढील अधिवेशनासाठी शिदोरी असे.

**कार्यकर्त्यांसाठी मुक्तद्वार**

विधिमंडळातील कामाचे त्यांचे खरे कर्तृत्व दिसून आले, ते १९८०-८२ या दोन वर्षांत, ते विरोधी पक्षनेते असताना. सरकारी बंगला आणि लाल दिव्याची गाडी त्यांच्या दिमतीला होती. मलबार हिलवरचा बंगला त्यांच्यासाठी होता; पण कार्यकर्त्यांना व भेटीस येणाऱ्या लोकांना सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी मंत्रालयासमोरील बैठा बंगलाच पसंत केला. त्या बंगल्यावरील एक दालन केवळ भेटीस येणाऱ्या किंवा मुंबईत कामानिमित्त येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी अतिथिगृह म्हणून ठेवले होते. दररोज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे १५-२० कार्यकर्ते येथे वस्तीला असत. त्यांचा सकाळचा चहा नाश्ता प्रधानांकडेच होई. याशिवाय मुंबईत येणारे पक्षांचे नेतेही अधूनमधून मुक्कामाला असत. एस.एम. नानासाहेब गोरे, शिरूभाऊ व अनुताई लिमये अशी कितीतरी नावे या संदर्भात सांगता येतील. या काळातील प्रधानांचा पत्रव्यवहारही फार मोठा होता. माझ्या अंदाजाप्रमाणे त्या दोन वर्षांत किमान दहा हजार पत्रे त्यांनी लिहिली असावीत. सरकारने त्यांना नेरुरकर नावाचे स्वीय सचिव व शि लघुलेखक दिले होते. प्रसं बारा तास काम करीत, पण कुरकूर केली नाही. दौरे क त्यांच्या संरक्षणासाठी सर अंगरक्षक देऊ केला होता त्यास नकार दिला. त्यांच दिव्याच्या गाडीत ते स्वत मोटरचालक, लघुलेखक भागात दौरा असेल तेथील कार्यकर्ता असे. डाक बं सरकारी अधिकाऱ्यांची कधी कधी त्यांच्या चुक दिरंगाईबद्दल ते परखडप पण त्यांचा पाणउतारा त केला नाही. प्रधानांच्या अधिकारी विनाविलंब याचे हेही कारण असावे


'शुभमंगल'मध्ये जाहिरात, मंगलकार्य घरात!

शुभमंगल


उत्सुक श्रोते एकचित्त करून ऐकत आहेत, खादीचा धुवट लेंगा ठसठशीत नाकाचे गव्हाळ वर्णाचे व लहानखोरा बांधा असलेले च मास्तर अगदी महत्त्वाचा, वैशिष्ट्यपूर्ण मुद्दा रेखीव पण अलंकृत श आहेत आणि श्रोत्यांचे डोळे चकाकून उठले आहेत, हे दृश्यआत शहरांतील सुशिक्षित लोकांना परिचित झाले आहे. अनेक वेळा हे दृ पानांवरही आपणास पाहायला मिळत असते. दृश्य परिचित, परंतु

परिशिष्टये ४

दैनिक लोकमत (पुणे आवृत्ती) दि. ३० मे. २०१०

११ | लोकमत

# जीवन त्यांना क[...]

# प्रधान सरांची स्वातंत्र्य 'साध[...]

**स्वातंत्र्य चळवळीत भाग घेताना प्रधान यांच्यावर महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, कर्मवीर भाऊराव पाटील, सानेगुरुजी, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, पं. जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबरच विविध विचारवंतांचा प्रभाव राहिला. त्यामुळेच त्यांनी सगळ्याच विचार प्रवाहातील सद्गुण आत्मसात केले. कार्यकर्त्यांनी सगळ्या विचारप्रवाहांना समजून घेतले पाहिजे, असे त्यांचे आग्रही मत होते. त्यामुळे पुढे राष्ट्र सेवा दलात कार्यकर्ते घडवितानाही त्यांनी विविध विचारांची ओळख कार्यकर्त्यांना घडवून दिली. त्यांनी १९४२ च्या लढ्यात तुरुंगवास सोसला. स्वातंत्र्यवीरांसाठी त्यांनी धाडसाने रसद पुरविली. गांधींजींचे स्वयंसेवक होण्याची संधी त्यांना मिळाली.**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी गोवामुक्ती लढा, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, तसेच आणीबाणीविरुद्धच्या लढ्यात सहभाग घेतला. प्रधान हे हाडाचे शिक्षक होते. त्यामुळेच फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच जीवनविषयक तत्त्वज्ञानही त्यांनी विद्यार्थ्यांना दिले. पुणे

**प्रधान सरांचे शेवटचे पत्र**



संपादक म्हणून प्रा. वसंत बापट यांच्या समवेत काम करावयास मिळाले आणि 'साधना ट्रस्ट' साठी मी काही करू शकलो — या सर्व घटनांमुळे मला जीवनात मोठा आनंद मिळाला आणि [illegible] 'साधना'च्या वाचकांशी दीर्घ काळ लेखना द्वारा माझा संवाद चालू होता, यामुळेही मला अपार समाधान लाभले. 'साधना'तील सर्व सहकारी आणि 'साधना'चे वाचक यांची मी ऋणी आहे.

आता ते पाच वर्षे तरी जगेल अशी व्यवस्था करावी. माझ्या बद्दल आपुलकी वाटणाऱ्या संस्थांनी प्राण [illegible] आणि ती पाच वर्षे जगेल अशी व्यवस्था करावी ही विनंती.

समाजाने आणि तुम्ही मित्रांनी माझ्या अपूर्णतेसह मला स्वीकारले, माझ्यावर प्रेम केले. माझे दोष [illegible] [illegible] [illegible] [illegible]

[illegible]

विद्यापीठाच्या सिनेटवर काम करताना ग्रामीण भागातील विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालये यांना त्यांनी भरघोस मदत केली. विधान परिषदेत शिक्षक मतदारसंघातून त्यांनी १९६६ ते ८४ अशी सलग १८ वर्षे काम केले. त्यामध्ये ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिलांना संरक्षण, विविध सोयी-सवलती मिळाव्यात, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तळागाळातील कार्यकर्त्यांचे ते मोठा आधार होते. त्यांचे आमदार निवास हे वाड्या-वस्त्यांतून काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांचेच घर बनले होते. विधायक विरोधक हे सूत्र सांभाळत त्यांनी काम केले. त्यामुळेच रोजगार हमी योजनेसारख्या अनेक चांगल्या योजनांना त्यांनी पाठिंबा दिला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या विधेयकाला मोठा विरोध असतानाही प्रधान यांनी तो मांडून कार्यकर्त्यांना दिलेला शब्द पाळला. त्या लढ्यात त्यांनी ७ दिवस तुरुंगवासाची शिक्षाही भोगली.

सानेगुरुजींच्या विचारांचा प्रधान यांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यामुळेच 'साधना'च्या स्थापनेपासून त्यांचे आपुलकीचे नाते होते. त्यामुळेच चौथ्या वेळी पक्षाने सांगूनही त्यांनी निवडणुकीला उभे राहण्यास विरोध केला आणि पुढील आयुष्य 'साधना'साठी घालविण्याचा मनोदय व्यक्त केला. वसंत बापट यांच्या बरोबर १९८४ मध्ये त्यांनी 'साधना'च्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. साधना ट्रस्टच्या विश्वस्त सचिवपदाचा कारभारही त्यांनी सांभाळला.

### समाजकार्यासाठी सोडली नोकरी

स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही प्रधान यांनी समाजासाठी, पक्षासाठी काम केले होते; पण नोकरीमुळे अनेक वेळेस पूर्णवेळ काम करता येत नव्हते. त्यांची पत्नी इंटर सायन्स झाली होती. त्यांना डॉक्टर व्हायचे होते. प्रधान यांनी त्यांना बीएएमएसचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रेरणा दिली. १९६५ मध्ये त्यांना पदवी मिळाल्यावर नानल रुग्णालयात नोकरी

### 'चले जाव'मध्ये ११ महिने द[...]

वर्ध्याला काँग्रेस वर्किंग कमिटीने 'चले जाव' ठराव संमत केला. त्[...] असे सांगून प्रधान ६ ऑगस्ट १९४२ला मुंबईला गेले आणि चळवळी[...] मैदानावर त्यांना ७ व ८ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य चळवळीने भारलेल्या [...] चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना येरवडा तुरुंगात टाकण्यात आले. [...] जावडेकर, सानेगुरुजी यांच्याबरोबर राहायला मिळाले आणि त्याचा प्रधान[...] झाला. याच काळात काकासाहेब गाडगीळ यांचे 'ग्यानबाचे अर्थशास[...] भांडवलशाही व्यवस्था बदलण्याचा विचार रुजला.

मिळाली. त्यापु[...] सोडण्याविषयी [...] करण्याविषयी [...] आनंदाने होकार [...] यांच्या पत्नीने स[...]

संयुक्त मह[...] होती. प्रधान य[...] अनेकदा पडद्याम[...] कार्यकर्त्यांना स[...] सहभाग घेतला. [...] शिवाजीमहाराज [...] पंतप्रधान पं. ज[...] होते. त्या वेळी [...] वाटेवर निदर्शने [...] प्रतापगडाच्या वा[...] रस्त्याच्या दोन्ही [...] नेहरूंचे आगमन [...] झालाच पाहिजे' [...] सहभागी झाले हो[...]

**एस. एम. जोशी[...]**

मुंबई विधान[...] झाली. पुण्यातून [...] जोशी व बाबूराव [...] वेळी प्रधान यांनी [...] केले. त्याचप्रमाणे [...] नानासाहेब गोरे व [...] झाली तेव्हा गोरे य[...] त्यांनी काम केले.

**समाज[...]**

समाजवादी पक्षात [...] समाजवादी पक्ष [...] अत्यंत दुःखद [...] नुकसान झाले. [...]

परिशिष्टये ५

## विधान परिषद अहवाल- दि . २० जून १९७९



[श्री. ग. प्र. प्रधान]

१९७९ रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात आपल्या परवानगीने नियम ९२ अन्वये
ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, न्यायालयामध्ये ज्या काही नेमणुका होत असतात त्याची जबाबदारी शासनावर
वा सिलेक्शन बोर्डाकडे नसते. त्यामुळे याचा दोष शासनाला द्यावयाचा म्हणून मी ही अर्धा तास
चर्चा उपस्थित केली आहे असे नाही. परंतु शासनाने राज्यव्यापी धोरण आखलेले आहे त्याप्रमाणे
अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व भटक्या आणि विमुक्त जाती ज्या आहेत त्यांचे अमुक
पर्सेंटेज नोकऱ्यामध्ये भरले पाहिजे व त्यानुसार वेगवेगळ्या ठिकाणी नेमणुका झाल्या पाहिजेत
शासनाचे धोरण आहे व त्या दृष्टीने शासकीय कर्मचारी नोकरीत घेत असताना या लोकांचा
लॉग भरून काढण्यासाठी शासनाकडून आदेश दिले जातात व हे आदेश शासनाचे जे विभाग
त्यांच्याकडून पाळले जातात. परंतु जेथे नेमणुका करण्याचा अधिकार शासनाला नाही तेथे ते
पाळले जात नाहीत. न्यायालयात नेमणुका करण्याचा अधिकार न्यायाधिशांना असल्यामुळे ते
आदेश पाळले जात नाहीत ही मोठी खेदाची गोष्ट आहे. याबाबत शासनाने काही आदेश
पाहिजे व न्यायालयांना कळविले पाहिजे. अध्यक्ष महाराज, आजच एका प्रश्नावर प्रश्नोत्तराच्या
तासाला चर्चा झाली असून एका जिल्हा सहकारी बँकेने ज्या एक-दोन नेमणुका मागासवर्गीयांच्या
करावयाच्या होत्या त्या केल्या नसल्याचे आढळून आले असून ज्याच्यावर नेमकी ही जबाबदारी
असते त्याच्या बाबत शासन काही करू शकत नाही. याची मला जाणीव असून या परिस्थितीचा
गैरफायदा या मंडळीकडून घेतला जातो. काही व्यक्तीकडून अशा प्रकारचे प्रमाद घडले
या संदर्भात पुणे विद्यापीठाच्या बाबतीत माझा अनुभव सांगतो. एक्झामिनेशनसाठी म्हणून नेमणुका
करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना असतो. मला वर्षानुवर्षे असे आढळून आले आहे
त्या ठिकाणी त्यांचीच माणसे घेतली जातात. तेव्हा या नेमणुका ज्या करावयाच्या आहेत त्या
साध्या असतात. एस. एस सी. पास झालेले लेखनिक जे घ्यावयाचे असतात त्यामध्ये दलित
नेमणुका केल्या जात नाहीत तर कर्मचाऱ्यांच्या घरातीलच मुलांच्या नेमणूका केल्या जातात.

अध्यक्ष महाराज, हा प्रश्न मी येथे उपस्थित केला याचे कारण म्हणजे पुण्यातील हे जे न्यायालय
आहे त्यात भरती केलेल्या नोकरवर्गाची मी पाहणी केली असून त्या नोकरवर्गापैकी मागास
वर्गाचे लोक किती आहेत याची माहिती घेतली आहे. मला असे दिसून आले आहे की न्याया-
धीशाच्या हाताखाली असणारे जे लेखनिक, शिरस्तेदार किंवा शिपाई असतात त्यांच्या घरातील मुला
मुलींनाच टायपिस्ट किंवा क्लार्क्स म्हणून लाऊन घेण्यात आले आहे. यात दुष्टबुद्धीने कोणी
केले असेल असा माझा मुळीच आरोप नाही. मनुष्य स्वभावातील जो वीकनेस आहे की
माणसाची आपल्याला भीड पडते त्यानुसार हे झालेले आहे. परंतु म्हणून जर आपण
दुर्लक्ष केले तर शतकानुशतके ज्यांच्यावर आपण अन्याय करीत आलो आहोत त्यांच्यावरचा
अन्याय कधीच दूर होऊ शकणार नाही. मला कोणावर हेतूचा आरोप करावयाचा नाही.
ही मला आरोप करावयाचा नाही. परंतु वस्तुस्थिती कटु असली तरी ती शासनाच्या निदर्शनास
आणून द्यावयाची आहे म्हणजे ती लक्षात घेऊन योग्य ती पावले टाकणे शासनाला शक्य होईल
शासनाकडून माझीच नव्हे तर सभागृहाची हीच अपेक्षा आहे, सामाजिक कार्यकर्त्यांची
आहे. नामदार विधिमंत्र्यांचा पुरोगामी दृष्टिकोन मला माहीत आहे व म्हणून
करू शकतील व काय करू इच्छितात हे सभागृहाला कळावे म्हणूनच मी ही अर्धा तास चर्चा
उपस्थित केली आहे.

परिशिष्टये ६

## विधान परिषद अहवाल- दि.२३ जून १९७९



The CHAIRMAN: For marking out constituencies, the Election Commission has no hand. And even if you appoint the Election Commission at the State level and spend lot of money and time over it, the difficulties would still remain. For that the easiest remedy is to get your own Act amended. Under the Act, as soon as the rules were framed, they came into operation. They were not subject to the vote of the House. So, we will have to amend the Act if necessary. Therefore, the remedy is not with the Election Commission certainly.

**श्री. ग. प्र. प्रधान**: इलेक्शन कमिशन निदान इलेक्शनच्या बाबतीत योग्य ते मार्गदर्शन करू शकेल. आज ही गोष्ट केली जात नाही. अध्यक्ष महाराज, मला असे सांगावयाचे आहे की, ठाणे जिल्ह्यात नुकतीच एक ग्रामपंचायतीची निवडणूक झाली. तेथे एक रिझर्व्ह सीट होती आणि काही जनरल सीटस् होत्या परंतु यांतला फरक संबंधित अधिकाऱ्याला माहीत नसल्यामुळे शेवटी ते प्रकरण कोर्टात गेले.

The CHAIRMAN: How will the appointment of the Commission remove these things?

Shri G. P. PRADHAN: The appointment of the Commission would facilitate one thing, namely, that the training can be imparted to the officials in an efficient manner.

The CHAIRMAN: They did not train them. Election Commission only supervises over those things. The training is not imparted by the Election Commission.

**श्री. श. ल. ओगले**: पण यासाठी शिक्षण द्यावे असा आदेश कमिशन देऊ शकते.

The CHAIRMAN: But ultimately who trains them? They have got a training programme. But there are certain defects in the machinery. They cannot be corrected by the appointment of the Election Commission. Of course, there are other amenities for appointing the Election Commission. You may point out those amenities, if you like.

**श्री. ग. प्र. प्रधान**: आपल्या राज्यात इतक्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या आहेत; त्यांच्या निवडणुका होत असताना इलेक्शन कमिशन असेल तर जसे निवडणुकांच्या कामावर नियंत्रण ठेवू शकेल व त्या बाबतीत शिक्षण आणि मार्गदर्शन देऊ शकेल तसे सध्या होत नाही. यामुळे अनेक ठिकाणी गोंधळ झालेले आहेत. ह्या सर्व निवडणुकांकडे पाहण्याचा सरकारचा जो दृष्टिकोन आहे त्याचे सिंहावलोकन सरकारने केले असते तर यात सुधारणेची काही आवश्यकता आहे किंवा नाही हे सरकारलाच समजून आले असते. तेव्हा इलेक्शन कमिशन ही एक ॲथॉरिटी असेल तर ती अधिक चांगल्या रितीने या गोष्टी करू शकेल. या दृष्टीने हा ठराव मी सभागृहापुढे ठेवला आहे त्याचा सरकारकडून योग्य तो विचार व्हावा. विकेंद्रीकरणाचा प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून ही एक विधायक सूचना मी केली आहे. ती सरकारकडून स्वीकारली जाईल अशी आशा व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

ठराव प्रस्तुत झाला.

**श्री. रामजीवन चौधरी**: अध्यक्ष महोदय, यह जो प्रस्ताव हमारे माननीय मित्र श्री. प्रधान जी ने प्रस्तुत किया है उसकी पार्श्वभूमिका से मैं सहमत हूं. आज की जो चुनाव पद्धति है उसमें जण गणना के बाद अलग अलग विधान सभा क्षेत्रों के लिये प्रदेश को वहां की लोकसंख्या के अनुपात में बांट दिया जाता है. इसके बाद यह निश्चित किया जाता है कि वह किस क्षेत्र का प्रतिनिधित्व करेगा. यही भूमिका निष्पक्षरूप से जिला परिषदों, नगरपालिकाओं और महानगरपालिकाओं के बारे में अमल में लानी चाहिये. जब शहरों का वार्डों में बटवारा होता है तो इस प्रकार के बटवारे के पीछे कुछ उद्देश्य होने चाहिये और कुछ प्रिन्सिपल्स होने चाहिये. यही बात माननीय मित्र श्री... में कही गई है. अभी की जो पद्धति है उसके ... अपने प्रयोजन्स कलेक्टर के पास ... पक्ष का ...

परिशिष्टये ७

## विधान परिषद अहवाल- दि . ३० जून १९६७



[श्री. पु. ग. खेर]

हाती घेण्यात आली आहे. पाणीपुरवठ्याचा प्रश्न समाधानकारकपणे सुटला तर ड्रेनेजचा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटू शकेल. या बाबतीत कमिटीने एक अहवाल आपल्यासमोर ठेवला आहे. ट्रान्सपोर्टच्या बाबतीतही काय योजना करावयाची हेही त्या रिपोर्टात आहे. गाडगीळ कमिटीने हा वाहतुकीचा प्रश्न काही प्रमाणात जलमार्गाने कसा सोडवावा हे सांगितले आहे. वाहतुकीमध्ये मालवाहतुकीसाठी शेवा नावाचे जे बंदर आहे त्याचा विकास करण्याचे काम पोर्ट ट्रस्टने आपल्या हाती घेतले आहे. तेव्हा मुंबई शहरातून जो माल बाहेर जातो त्याची देखील सोय होईल. त्यामुळे वाहतुकीचा प्रश्न लौकर सुटेल. गाडगीळ कमिटीच्या शिफारशींचा एक महत्त्वाचा भाग म्हणून एक शिफारस महत्त्वाची मानावी लागेल. ती म्हणजे मुंबईचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर एक रीजनल प्लॅनिंग समिती निर्माण केली पाहिजे. १९६५ साली रीजनल अँड टाऊन प्लॅनिंग अॅक्ट झाला. त्यामध्ये गाडगीळ समितीने सांगितल्याप्रमाणे खास आखणी करून रीजनल प्लॅनिंगची उभारणी करण्यात येत आहे. रीजनल प्लॅनिंग बोर्डासमोर मुंबई शहरात जी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे ती नाहीशी कशी करावयाची हे पहिले काम कमिटीने अंगावर घेतले पाहिजे. मुंबईमध्ये जे प्रश्न आणि ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या सोडविण्यासाठी हे रीजनल प्लॅनिंग बोर्ड निर्माण करण्यात आले आहे. हे जे रीजनल प्लॅनिंग बोर्ड अस्तित्वात येणार आहे त्या बोर्डाला मार्गदर्शन म्हणून गाडगीळ कमिटीचा रिपोर्ट आहे आणि मी आता जे इतर रिपोर्टस् सांगितले ते आहेत. त्याच्या सहायाने शिफारशी कशा अंमलात आणावयाच्या हा यक्ष प्रश्न असल्यामुळे चौथ्या पंचवार्षिक योजनेत आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीला अर्बन प्रश्नाला वाचा फोडली आहे आणि मी मघाशी सांगितल्यामुळे मुंबई महानगरपालिकेचा विकास योजनेचा प्लॅन तयार होणार आहे. ह्या सर्व प्रश्नाला चालना मिळाली पाहिजे म्हणून मी परवा सांगितल्याप्रमाणे दोन्ही सभागृहांची पार्लमेंटरी कमिटी नेमावयाची आहे. त्या कमिटीचे काम त्यांना काय पाहिजे याचा विचार करण्याचे आहे आणि त्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी पार्लमेंटरी कमिटी केली तरी त्याला माझी हरकत नाही. शासनाची कल्पना आहे की रीजनल प्लॅनिंग बोर्डातर्फे हे काम होऊ शकेल. ह्या योजनेची अम्मलबजावणी करताना त्यांना काय साधनसामग्री दिली पाहिजे हा प्रश्न महत्त्वाचा आहे व त्यासाठी पार्लमेंटरी कमिटीची नियुक्ती करणे इष्ट होईल. ह्या बाबतीत केवळ शासनाकडे नव्हे तर मध्यवर्ति सरकारकडेही तुम्हा-
५-३० आम्हाला प्रयत्न करावा लागेल. एवढा खुलासा केल्यानंतर सन्माननीय सभासद श्री. लिमये यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री. मा. पु. लिमये :** माझी भूमिका नामदार मंत्र्यांनी मान्य केली आहे आणि त्यांनी आश्वासन दिले त्याची अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा करून मी माझा ठराव मागे घेतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

---

### पुणे विभागातील जनतेचा न्यायालयीन कामकाजावरील बेसुमार खर्च वाचविण्यासाठी आणि त्यांना होत असलेला त्रास कमी करण्यासाठी पुणे विभागात उच्च न्यायालयाचे बेंच स्थापन करण्यासंबंधीचा श्री. ग. प्र. प्रधान यांचा ठराव.

**श्री. ग. प्र. प्रधान** (महाराष्ट्र पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा ठराव मांडतो.

"पुणे विभागातील जनतेचा न्यायालयीन कामकाजावरील बेसुमार खर्च वाचविण्याच्या व त्यांना होत असलेला त्रास कमी करण्याच्या दृष्टीने पुणे विभागात उद्भवणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत अधिकारक्षेत्र आणि अधिकार असणारे मुंबईच्या उच्च न्यायालयाचे एक कायम बेंच पुणे येथे स्थापन करण्यासंबंधात भारताच्या राष्ट्रपतींना विनंती करण्यात यावी, अशी या विधानपरिषदेची शासनाला [illegible]

परिशिष्टये ८

## विधान परिषद अहवाल- दि.२६ जून १९७७



Dec 11, 20

[श्री. ग. प्र. प्रधान]

विद्यापीठाकडे फक्त याबाबत शिफारस करण्याचा अधिकार असतो. ॲफिलिअेशन सरकार देत असते. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी आपल्या अधिकाराचे अतिक्रमण केले असे नसून त्यांनी फक्त शिफारस केली, ॲफिलिअेशन दिले ते शासनाने दिले.

**श्री. शं. भा. चव्हाण :** एका फॅकल्टीज मागे किती प्रोफेसर लावले याची आपण चौकशी केली आहे काय? दोन विद्यार्थ्यांमागे तीन प्रोफेसर्स लावण्याचे प्रयत्न विद्यापीठामार्फत त्या ठिकाणी चालणार असतील तर माझ्या कल्पनेप्रमाणे या गरीब देशाला न परवडणारी अशी ती गोष्ट आहे.

**श्री. ग. प्र. प्रधान :** अध्यक्ष महाराज, ज्या महाविद्यालयांची तयारी झालेली नाही किंवा शेजारच्या महाविद्यालयावर अनिष्ट परिणाम होईल अशी महाविद्यालये काढू नये असे सांगितले गेले होते. पण राजकीय दडपण आले आणि आम्ही ॲफिलिअेशन देऊ म्हणून सांगण्यात आले. फलटण येथील विद्यालयाला आम्ही त्यावेळी विरोध केला होता. तेथे कॉलेज काढू नका असे आम्ही सांगत असताना देखील राजकीय दडपणामुळे प्रेस्टिजचा प्रश्न करून त्या मतदारसंघामध्ये कॉलेज निघालेच पाहिजे असे सांगितले गेले. ही विद्यापीठे शासनाच्या ज्या काही मर्यादा आहेत त्याबाहेर जाऊ शकत नाहीत. राज्यात डायरेक्टर ऑफ हायर एज्युकेशन आहेत त्यांची सत्ता नाही काय? त्यांनी पॉईंट आऊट केले असते की असा दुरुपयोग चालू आहे तर तावडतोब त्या विद्यापीठाला थांबावे लागले असते. पैशाचा दुरुपयोग व्हावा असे मला वाटत नाही. नवीन ॲक्टमध्ये जे काही ठरले त्याला आम्ही विरोध केला नाही. प्राध्यापक मंगुडकर आणि मी त्यांच्याशी सहमत आहोत. कोठेही पैशाचा अपव्यय होऊ नये हे मान्य आहे. पण राजकीय कारणासाठी दोषांचे खापर विद्यापीठांवर फोडण्यात आले याचा खेद होतो. कुलगुरू यांना मान्य आहे की, आमच्याकडे ॲफिलिअेशनचा अधिकारच नाही. तेव्हा ही विद्यापीठे डबघाईला आली असतील तर नेमके काय करावयाचे? या ठिकाणी प्राध्यापकांची नोकरी जाण्याचा प्रश्न नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची संधी कमी होऊ नये. शेतकरी समाजातील विद्यार्थी आता पुढे यावयाला लागले आहेत. १० : २ : ३ पॅटर्न शैक्षणिकदृष्टचा योग्य आहे. याबाबत बरीच चर्चा झालेली आहे. याबाबत मी काही तालुक्याची उदाहरणे देणार आहे. मी तेथे जाऊन परिस्थिती बघून आलो. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात २४ हायस्कूल्स आहेत. मी काही ठिकाणी चौकशी केली. या गावामधील मुली १० वी पास झाल्या पण त्या काय करू शकतात? त्यांना पुढील शिक्षणासाठी परगावी पाठविणे शक्य नसते. अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रात ज्या परंपरा आहेत त्यांचा आम्हाला अभिमान आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री-शिक्षणासाठी पावले उचलली, महर्षी कर्वे यांनी या क्षेत्रात महत्वाची कामगिरी केली. ज्या भगिनी आहेत त्यांच्यासाठी होम सायन्सची व्यवस्था करा, बोर्डिंगची व्यवस्था करा असे सांगितल्यानंतरसुद्धा ते न करता आपण हा पॅटर्न आणता. यामुळे अनेक मुलींच्या शिक्षणाचे नुकसान होते. अनेक ठिकाणी व्होकेशनलायझेशन शक्य नाही. गाव सोडण्याइतपत त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. आपण रोजगार देऊ शकला नाही हे मी समजू शकतो. पण या कल्याणकारी राज्यामध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आपले शासन काय करणार आहे यासंबंधी या राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काही उल्लेख नाही. याबद्दल मला दुःख होते. याबाबत खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, दोन छोटचा गोष्टींसंबंधी मला माझे विचार मांडावयाचे आहेत. या अभिभाषणामध्ये इंडस्ट्रिअल रिलेशन्सचा उल्लेख केला. तेथे असे म्हटले आहे की,

"There was an all-round improvement in the sphere of industrial relations."

ले-ऑफ आता लॉकआऊट कसे कमी झाले त्याची आकडेवारी या ठिकाणी सांगण्यात आली. इंडस्ट्रियल रिलेशन्स सुधारले का? तेथे बुद्धीचे वातावरण आले का? सर्वसाधारणपणे तेथे मालक हा सुप्रीम असतो. देण्यात आले त्यामध्ये १ लाख २७ हजार २२५ मॅन डेज वाया गेले. म्हणजे अध्यक्ष महाराज, गिरण्या-कारखान्यांत काम करणारा जो मजूर असतो त्याची प्रतिकारशक्ती मर्यादित असते. तेव्हा याचा खुलासा हवा आहे. अध्यक्ष महाराज, आम्हाला औद्योगिक क्षेत्रामध्ये शांतता हवी आहे. परंतु स्मशान शांतता नको. आम्हाला संघर्षाची हौस नाही. सुसंवादाचे वातावरण पाहिजे. परंतु याचा अर्थ असा नाही की, एकजणाने चाबूक घेऊन बसावयाचे व दुसऱ्याला धमकावून ठेवावयाचे. समोरचा धमकावून बसला म्हणून त्याचा काही आवाज येत नाही आणि म्हणून हे काही बरोबर नाही. अध्यक्ष इसमाने म्हणायचे की सुसंवादाचे वातावरण आमच्या येथे आहे.

परिशिष्टये ९

## साधना साप्ताहिक १५ ऑगस्ट १९४८


# साधना

संपादक : साने गुरुजी

१, अंक १] रविवार १५ आगस्ट १९४८ [पानें १६, किं. ४ आ.


## बापूजींचे अमर विचार

### [illegible] डायरींतील उतारे

[illegible]

एक काळ होता जेव्हां तुम्ही प्रेमानें, निःशंकपणें माझ्या पाठोपाठ येत असा. तें तुमचें प्रेम आजहि कदाचित् जिवंत असेल, परंतु माझी हांक आज तुमच्या हृदयाला नि बुद्धीला जाऊन पोंचण्यांत इतबल ठरत आहे. तुम्ही दास्यांत होतां तोंवर माझी तुम्हांला जरूरी होती वाटते ? स्वतंत्र झाल्यावर मी का आतां तुम्हांला नको ? स्वातंत्र्य म्हणजे का मानवतेला तिलांजलि, संस्कृतीला रामराम ? इतकी वर्षे जें मी तुम्हांला सांगत आलों त्याच्याहून निराळें तुम्हांला मी काय सांगूं ?

* * *

चर्चिलसाहेबांच्या डोळ्यांत समाजवाद फार खुपतो. कामगार समाजवादीच असणार. समाजवाद हें एक महान् तत्त्वज्ञान आहे. तें धुडकावून नाहीं लावतां येणार. शहाणपणानें तें प्रत्यक्षांत आणावयाचें आहे, अंमलांत आणावयाचें आहे. समाजवादी कोणी वाईट असतील. परंतु समाजवाद हा कधींच वाईट नसणार. इंग्लंडांतील कामगार पक्षाचा विजय म्हणजे समाजवादाचाच विजय होय. तेथील कामगार-मंत्रिमंडळ म्हणजे कामगारांचेंच सरकार. त्यावेळेस कामगार आपली प्रतिष्ठा ओळखतील त्यावेळेस इतर सारे पक्ष हतप्रभ नि हतबल होतील. कधींपासूनचें हें माझें मत आहे.

एक गोष्ट तुम्ही कोणी विसरूं नका. जगांतील बलाढ्य राष्ट्रें मोठ्या कष्टानें मिळवलेलें तुमचें स्वातंत्र्य पुनश्च हिरावून घेतील. म्हणून सावध रहा. माणसाप्रमाणें वागा. पशुप्रमाणें वागाल तर अपार मोल देऊन मिळवलेलें स्वातंत्र्य गमावून बसाल. अशी भेसूर आपत्ति या राष्ट्रावर यायचीच असेल तर ती अनुभवास लागण्याआधींच माझे डोळे मिटोत. कारण मी एकटा हिंदुस्थानला कसें वांचवूं ? मी एकटा कोण ?

ऑगष्टच्या पंधरा तारखेला स्वराज्य आलें असें सर्वत्र सांगण्यांत आलें. परंतु [illegible] स्वराज्य म्हणूं शकत नाहीं. स्वराज्यांत भाऊ भावाचा गळा कापायला धांवत जाणार नाहीं. स्वतंत्र हिंदुस्थान [illegible] मैत्री जोडण्याची अपेक्षा आहे. [illegible] होण्याची उत्कंठा [illegible]. परंतु आज काय दिसत आहे ? [illegible] सारे [illegible] रक्षणासाठी [illegible] आहेत !

* * *

[illegible] मी दिल्ली, [illegible] एक [illegible] दरवाजावर " [illegible] वेथें

आहे, येथें आहे, येथें आहे " असा अर्थाचा एक चरण मी वाचला होता. मला तर तेथें कांहीं स्वर्ग वाटला नाहीं. पाकिस्तान जर दरवाजा दरवाज्यावर हें वाक्य लिहायला लायक बनलें तर त्यानें मला अपार आनंद होईल. हा स्वर्ग हिंदमध्यें होवो, वा पाकिस्तानमध्यें होवो. तेथें कोणी गरीब दीन दुबळा नसो म्हणजे झालें. तेथें कोणी राव नको, रंक नको. तेथें ना कोणी उच्च ना कोणी नीच. कोणी मालक कोट्याधीश नाहीं होणार नि कोणी कामगार अर्धपोटी नाहीं राहणार. तेथें दारू, अफू, इतर मादक पदार्थ दिसणार नाहींत. सारे राजीखुशीनें, स्वाभिमानानें आपापली भाकरी अंगमेहनत करून मिळवतील. या स्वर्गांत जी पुरुषाची प्रतिष्ठा तीच स्त्रियांनीहि असेल. स्त्री, पुरुष दोघें पवित्र असतील. त्यांच्या पावित्र्याचें रक्षण करण्यांत येईल. तेथें अस्पृश्यता असणार नाहीं. सर्व धर्मांना सारख्याच आदरानें वागवण्यांत येईल. हा खरा स्वर्ग. मग तो कोठेंहि असो, कोणीहि आणो.

सिद्धान्त मानतों. त्या सिद्धान्ताची [illegible] मला माहीत आहे. तथापि मी त्यालाच चिकटून आहें. हें कठीण तत्त्व आहे मी जाणतों. परंतु अहिंसा कठिणच आहे. रक्तपाताचा मार्ग अल्पच आणतो. तो कोठेंहि यशस्वी झाला नाहीं. रशियांत वरवर यशस्वी झाला म्हणतात. मला शंका आहे. इतक्यांतच त्याला चिर-यशस्वी म्हणणें योग्य होणार नाहीं. आपला अहिंसक प्रयोग चालू आहे. अजून प्रत्यक्ष फारसें दाखवतां येणार नाहीं हें खरें. परंतु समतेच्या दिशेनें आपली पावलें हळूहळू का होईना पडत आहेत असें मला वाटतें. अहिंसेचा मार्ग म्हणजे हृदय-परिवर्तनाचा मार्ग. हें हृदयपरिवर्तन कायमचें असायला हवें. अहिंसक समाज, अहिंसक राष्ट्र अन्तर्बाह्य हल्ल्यांना तोंड द्यायला समर्थ असलें पाहिजे.

* * *

सत्य म्हणजे माझा ईश्वर. अहिंसक रीतीनें केलेली अखंड लोकसेवा हें त्याच्या प्राप्तीचें साधन.



एकदां एका मोठ्या वकिलानें मला विचारलें "हिंदुधर्माची व्याख्या काय ?" मी उत्तर देतांना म्हटलें "हिंदुधर्माची व्याख्या मलाहि माहीत नाहीं. मी तुमच्याप्रमाणें वकील थोडाच आहे ? परंतु मी माझ्या हिंदुधर्माची व्याख्या हवी तर सांगतों. जो सर्व धर्मांना समान मानतो तो हिंदुधर्म. ही माझी व्याख्या.

* * *

लक्षपति आणि लाखों उपाशीपोटी यांच्यामध्यें जोंपर्यंत दुस्तर अंतर आहे तोंपर्यंत अहिंसक सरकार अशक्य आहे. न्यू दिल्लीतील राजवाडे आणि गरीब श्रमजीवींच्या भिकार झोंपड्या यांच्यांत केवढें अंतर ? परंतु हा फरक स्वतंत्र हिंदुस्थानांत एक दिवसहि टिकतां कामा नये; टिकूं शकणार नाहीं. स्वतंत्र भारतांत कोट्याधीशाला जी सत्ता तीच रस्त्यांतल्या गरीबासहि असेल. श्रीमंत लोक आपण होऊन श्रीमंतीचा त्याग न करतील, पैशानें प्राप्त होणाऱ्या सत्तेचा आपण होऊन त्याग न करतील तर रक्ताळ क्रान्ति अपरिहार्य होईल. उद्या नि लौकरच दुसऱ्यांसह भोगा. [illegible]

### प्रभु तुम्हीच तारा

भरला तिमिर अंध सारा
ये मरण आज दारा ॥भ०॥
मानवता ती मरुनी पडली
ना दयेस थारा ॥भ०॥
वणवण करिते विव्हळ जनता
ना कुणा निवारा ॥भ०॥
दिनदिन पळपळ वाढत जाई
सूड–बुद्धि–पारा ॥भ०॥
द्वेषमत्सरें झाला ग्रस्त
मुक्त देश प्यारा ॥भ०॥
अंधारीं या नयनां न दिसे
ध्येय–दिव्य–तारा ॥भ०॥
आकाश जणूं वाटे फाटे
प्रभु तुम्हीच तारा ॥भ०॥

कवि—पंढरीनाथ

### भारताचा यात्रेकरू

भारताचे मार्ग मी
चाळलों धुंडाळिले
काय तेथें शोधिलें ? ॥१॥
ठायिठायीं वांकुनी
ठायिठायीं थांबुनी
पाहतों मी हुंगुनी ॥२॥
एक मी यात्रेकरू
भारताचा जातसें
भक्तिभावें गा[illegible] ॥३॥
तीनरंगी हा ध्वज
घेतला खांद्यावरी
प्रेम भरलें [illegible]
मायभूच्या मो[illegible]
कोवळीं बाळें [illegible]
ठार झालीं ना [illegible] ॥५॥
आपुल्या छातीवरी
कैक गोळ्या झेलिती
मृत्युला आलिंगिती ॥६॥
मातृभू-पायांवरी
जीवनाचीं सत्फुलें
अर्पिताती ती मुलें ॥७॥
तेविं मेले वीर ते
चंड बंडा मांडुन
नीच गोऱ्या गर्जुन ॥८॥
वीर कोणी उत्कट
मुक्त करिती तालुके
झुंजले हो व्याघ्रसे ॥९॥
झुंजतां पडले रणीं
पर्वतीं वा काननीं
वा कुठें रस्त्यांतुनी ॥१०॥
मायभगिनी अन् किती
दुर्जनांनीं गांजिल्या
दुःखदावीं भाजिल्या ॥११॥
माउलींना सांकडें
पिळवटे तें [illegible]
अश्रुचे [illegible] गडे [illegible]
अश्रु पडले का [illegible]
रक्त सांडे का [illegible]
दृष्टि माझी शोधते ॥१३॥
दिव्य आला परिमळ
लोचनें ओलावलीं
सांपडे एक स्थळी ॥१४॥
थांबलों हो मी तिथें
पारिजातें अश्रुचीं
वाहिलीं मी भक्तिचीं ॥१५॥
लावुनीं ओंवाळिले
भावनानीरांजन
तेथले धूलीकण ॥१६॥
पावना त्या धूळित
लोळलों एक क्षण
सारु मिटुनी लोचन ॥१७॥
बोललों मी अंतरीं ।
चित्त होवो पावन
शुद्ध होवो जीवन ॥१८॥
हिंदभूचा होडें [illegible]
शोभणारा [illegible]
लोळुनी [illegible] ॥१९॥
[illegible]


या अंकीं: बापूजी नि विनोबाजींचे विचार, आचार्य भागवत [illegible] अशोक मेहता, रावसाहेब पटवर्धन, एस. एम., भाई गोरे, [illegible] गजानन जोशी, यांचे उद्बोधक लेख वाचा; सोपानदेव, [illegible] कविता; प्रान्तभारती व १२ वें मुलांचें पान ही सदरें [illegible]

परिशिष्टये १०

## साधना साप्ताहिक २३ फेब्रुवारी १९५२


# साधना

**संस्थापक : साने गुरुजी**

संपादक

पु. ह. पटवर्धन        शं. द. जावडेकर

वर्ष ४, अंक २९ ] शनिवार २३ फेब्रुवारी १९५२ [ पानें १२. किं. ४ आणे


• • • भारतामध्यें लोकशाहीच्या मार्गानें समाजवाद प्रस्थापित कसा होईल या एकाच दृष्टीनें आपलें पुढील धोरण पक्षाला निश्चित करावें लागेल. एका बाजूला पं. नेहरूंची काँग्रेस व दुसऱ्या बाजूला रशियाच्या मदतीनें चालणारा कम्युनिस्ट पक्ष अशा दुहेरी विरोधांना तोंड देऊन समाजवादी पक्षाला काम करावें लागणार आहे. सामाजिक तत्त्वज्ञानाचे बाबतींत कम्युनिस्ट पक्षाशीं दोन हात करून लोकशाही समाजवादाचें तत्त्वज्ञान त्यांना प्रभावी करून दाखवावें लागेल व सर्वकल्याण राज्य निर्माण करण्यास काँग्रेसच्या पंचवार्षिक योजनेंतील संमिश्र अर्थव्यवस्थेचा कार्यक्रम अत्यंत अपुरा आहे हें सिद्ध करून जमिनीच्या फेरवांटणीसारखे किंवा उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणासारखे प्रगतिपर कार्यक्रम स्वीकारणें काँग्रेसला भाग पाडावें लागेल. • • •

## समाजवादी पक्षापुढील प्रश्न

हिंदी प्रजासत्ताकाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचे बहुतेक निकाल जाहीर झाले आहेत. भारतांतील सव्वीस राज्यांपैकीं वीस राज्यांत काँग्रेस पक्षाला हमखास बहुमत मिळालें आहे. ओरिसांत स्वतंत्र उमेदवारांपैकीं कांहीं उमेदवार काँग्रेस पक्षांत सामील झाल्यामुळें काँग्रेसनें मंत्रिमंडळ स्थापन झालें आहे. पेप्सूंतहि तसें होण्याचा संभव दिसतो. आपल्या पूर्व सरहद्दीवर असलेल्या त्रिपुरा व मणिपूर या 'क' वर्गीय राज्यांना स्वतंत्र विधिमंडळ नसल्यामुळें मंत्रिमंडळ स्थापनेचा प्रश्न उद्भवत नाहीं. मद्रास व त्रावणकोर-कोचीन या दोन राज्यांतच मंत्रिमंडळ स्थापनेचा प्रश्न कठिण होणार आहे. म्हणजे भारतांतील सव्वीस राज्यांपैकीं चोवीस राज्यांत व मध्यवर्ति लोकसभेमध्यें काँग्रेस पक्षाची मंत्रिमंडळें स्थापन होणार हें आतां निश्चित झालें आहे.

### खोल अर्थ पाहिला पाहिजे

निवडणुकीकडे पहाण्याची ही स्थूल दृष्टि झाली. पण यापेक्षां अधिक खोल विचार केल्याशिवाय निवडणुकीचा अर्थ प्रतीत होणार नाहीं. या निवडणुकीमध्यें काँग्रेस पक्षाला कसेंबसें अल्पसें बहुमत मिळेल अशी बहुतेकांची कल्पना होती. एकूण मतदानापैकीं पन्नास टक्क्यांपेक्षां कमी मतें मिळून निवडणुकींत काँग्रेस पक्षाला जें नेत्रदीपक यश मिळालें आहे तें अनपेक्षित होतें हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. समाजवादी पक्षाचा झालेला सपशेल पराभव व हैद्राबाद, मद्रास व त्रावणकोर–कोचीनमध्यें कम्युनिस्ट पक्षाला मिळालेलें यश तितकेंच अनपेक्षित होतें. जातिनिष्ठांचेंहि शिरकाण होईल अशी कोणाला कल्पना नव्हती. निवडणुकींतील या आश्चर्यांचा अन्वयार्थ पक्षोपक्षांचे प्रमुख आपापल्या वृत्तीनुसार लावीत आहेत.

### भारतीय स्वातंत्र्ययुद्धांतील अखेरचा अंक

समाजवादी पक्षाला असें अपयश येईल अशी विरोधकांनाहि कल्पना नव्हती. समाजवादी पक्षाचा पराभव व दक्षिणेंतील तीन राज्यांत कम्युनिस्टांना मिळालेलें यश हेंच निवडणुकींतील सर्वांत मोठें आश्चर्य आहे. या घटनांचा शास्त्रशुद्ध अर्थ लावल्याखेरीज पुढील धोरण कोणालाच ठरवतां येणार नाहीं. "समाजवादी पक्षाचा सपशेल पराभव झाला याचा अर्थ भारतीय स्वातंत्र्ययुद्धाचा अन्तिम अंक समीप आला आहे असाच घ्यावा लागेल" असें बाबू संपूर्णानंदांनीं म्हटलें आहे तें खरें आहे. म्हणजे भारताचें स्वातंत्र्य अबाधित रहाणार व लोकशाहीच्या मार्गानें भारताची सामाजिक प्रगति होणार कीं जगांतील कोणत्यातरी लष्करी सामर्थ्याचा भारत मांडलिक बनणार हा प्रश्न निकरानें आतां पुढें आला आहे. तो फार काळ टाळतां येणार नाहीं. असें असून काँग्रेसचीं स्तुतिस्तोत्रें गाणारीं कांहीं पत्रें व काँग्रेसवर टीका करणारीं टाईम्स ऑफ इंडियासारखीं मातब्बर दैनिकें समाजवादी पक्षाच्या पराभवाचें आनंदानें स्वागत करून कम्युनिस्टांच्या विजयाचा गौरव करीत आहेत. निवडणुकींतील निकालामुळें समाजवादी पक्ष नामशेष झाला, आतां काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्येंच खरा सामना आहे असें तें उघडपणें सांगत आहेत. "कम्युनिस्ट पक्ष पडखाऊ धोरण स्वीकारून संयुक्त मंत्रिमंडळ स्थापण्याचा मद्रास व केरळमध्यें प्रयत्न करीत आहे हें अभिनंदनीय आहे; आपलें अत्याचारी धोरण सोडून सनदशीर धोरण स्वीकारण्यास ते तयार झाले आहेत याचा हा पुरावा आहे; तेव्हां त्यांना मंत्रिमंडळें बनविण्यास सर्वांनीं साहाय्यच केलें पाहिजे" असा सल्ला काँग्रेसची वकिली करणाऱ्या एका विद्वान संपादकांनीं दिला आहे. समाजवादी पक्षाच्या पराभवाबद्दल व कम्युनिस्ट पक्षाला मिळालेल्या अनपेक्षित विजयाबद्दल फारच थोड्यांना खंत वाटत असावी असें दिसतें. काँग्रेसश्रेष्ठ स्वाभाविकच आपल्या विजयानंदांत मग्न आहेत. समाजवादी पक्षाच्या पराभवाबद्दल त्यांना कांहींच सोयरसुतक नाहीं किंवा कम्युनिस्टांच्या यशाबद्दल त्यांना चिंता करण्याची आवश्यकता वाटत नाहीं. 'काँग्रेसला विरोध करील त्याची अशीच गत व्हावयाची' अशी स्वयंसंतुष्ट वृत्ति सर्वसाधारणपणें त्यांच्यांत दिसून येते. समाजवादी पक्षाच्या प्रचारामुळेंच कम्युनिस्ट पक्ष बळावला आहे असेंहि त्यांचेपैकीं अनेकांचें मत आहे. अशा रीतीनें समाजवादी पक्षावर सर्व बाजूंनीं सध्या आघात होत आहेत. असें असलांहि समाजवादी पक्षांतील प्रमुखांनी नाउमेद न होतां सर्व परिस्थितीचा नव्यानें आढावा घेऊन आपलें धोरण सुस्पष्ट केलें पाहिजे.

### चुकांचें निर्विकार परीक्षण केलें पाहिजे

समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक आज मद्रासमध्यें सुरू होणार आहे. कांहीं दिवसांपूर्वीं आचार्य नरेंद्र देव, श्री जयप्रकाश नारायण, अशोक मेहता प्रभृति पक्षाचे प्रमुख पुढारी काशी येथे भेटले व निवडणुकींतील पराजयांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची चर्चा त्यांनीं केली. प्रांतोप्रांतीं व जिल्हानिहाय पक्षांतील कार्यकर्त्यांच्या अशाच अनौपचारिक सभा होऊन निवडणुकींतील अनुभवांची चर्चा झालेली आहे. आज मद्रासमध्यें भरणाऱ्या पक्षाच्या कार्यकारिणीला निवडणुकीचा साकल्यानें विचार करून नवीन धोरण ठरवावें लागेल. आपल्या झालेल्या चुका निर्विकारपणें पहाव्या लागतील.

### पक्षाचें द्विविध कार्य

भारतामध्यें लोकशाहीच्या मार्गानें समाजवाद प्रस्थापित कसा होईल या एकाच दृष्टीनें आपलें



पुढील धोरण निश्चित करावें लागेल. एका बाजूला पं. नेहरूंची काँग्रेस व दुसऱ्या बाजूला रशियाच्या मदतीनें चालणारा कम्युनिस्ट पक्ष अशा दुहेरी विरोधांना तोंड देऊन समाजवादी पक्षाला काम करावें लागणार आहे. सामाजिक तत्त्वज्ञानाचे बाबतींत कम्युनिस्ट पक्षाशीं दोन हात करून लोकशाही समाजवादाचें तत्त्वज्ञान त्यांना प्रभावी करून दाखवावें लागेल व सर्वकल्याण राज्य निर्माण करण्यास काँग्रेसच्या पंचवार्षिक योजनेंतील संमिश्र अर्थव्यवस्थेचा कार्यक्रम अत्यंत अपुरा आहे हें सिद्ध करून जमिनीच्या फेरवांटणीसारखे किंवा मुख्य उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणासारखे प्रगतिपर कार्यक्रम स्वीकारणें काँग्रेसला भाग पाडावें लागेल. या दोन्ही आघाडीवर लढावयाचें म्हणजे दोहोंचा विरोध सहन करावयाचा. कदाचित् पक्षाला अनेक वर्षे असेंच अज्ञातवासांत रहावें लागेल. या दिव्यांत कदाचित् पक्ष नामशेषहि होईल. पण भविष्यकालीन यशापयशाची विशेष पर्वा न करतां पक्षानें आपलें उद्दिष्ट प्रथम सुस्पष्ट केलें पाहिजे. लोकशाही समाजवादावर पक्षाची खरोखरी निष्ठा असेल तर कोणीहि उपहास केला तरी निवडणुकींतील पराजयाबद्दल लाज वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. जागोजाग पक्षाच्या उमेदवारांना जीं मतें मिळालीं आहेत तीं पाहिलीं कीं पक्षाला जनतेकडून मिळणारा पाठिंबा आशादायक आहे असेंच म्हटलें पाहिजे. काँग्रेस बाहेर पडून स्वतंत्र पक्षरचना सुरू केल्याला चार पांचच वर्षे झालीं आहेत ना? एवढ्या अल्प काळांत काँग्रेसची जागा घेण्याएवढें सामर्थ्य कसें निर्माण होईल?

### काँग्रेस हें बोथट शस्त्र

निवडणुकीमध्यें इतका दणदणीत विजय मिळाला असला तरी आजची काँग्रेस संस्था हें एक गंजलेलें व बोथट शस्त्र आहे. समाजपरिवर्तन करण्याची शक्ति या संस्थेमध्यें नाहीं हें खुद्द पं. नेहरू सांगत आहेत. नेहरूंना निवडणुकींत यश आलें असलें तरी काँग्रेस संस्थेचा कायापालट करण्याची शक्ति त्यांच्यांत नाहीं याचें पदोपदीं प्रत्यंतर येत आहे. अशी वस्तुस्थिति असतां काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष एवढाच जर सामना असेल तर काँग्रेसला कम्युनिस्टांपुढें शरणागति स्वीकारावी लागणार असाच त्याचा अर्थ होईल.

### सवंगपणाला आळा घातला पाहिजे

पं. नेहरूंच्या गुणवैभवामध्यें व पराक्रमामध्यें एक उणीव आहे व ती म्हणजे त्यांनी तत्त्वनिष्ठ व झुंझार संघटना निर्माण करण्याचें सामर्थ्य त्यांच्यामध्यें नाहीं ही. आम जनतेला ते स्फूर्ति देऊं शकतात पण एखादें विधायक काम घडवून आणण्यास लागणारी कर्तबगार माणसांची संघटना त्यांच्याजवळ नाहीं. त्याचें नांवापलिकडे काँग्रेससंस्थेजवळ कोणतेंहि स्फूर्तिदायक तत्त्वज्ञान उरलेलें नाहीं. राष्ट्रांतील तरुणांच्या ध्येयनिष्ठेला व विधायक शक्तीला आवाहन करील असें कांहीं आकर्षण काँग्रेसजवळ उरलें नाहीं. समाजवादी पक्षाची या दृष्टीनें अत्यंत आवश्यकता आहे असें आम्ही मानतों. म्हणजे लोकशाही समाजवादाच्या तत्त्वज्ञानावर निष्ठा असलेल्या तरुणसेवकांची संघटना देशभर निर्माण करणें व लोकशाही मार्गानें समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठीं लोकमत तयार करणें हें समाजवादी पक्षाचें कार्य आहे.

साधनांच्या शुचितेवर समाजवादी पक्षानें भर दिल्यामुळें पक्षाला सवंग लोकप्रियता अनेक ठिकाणीं मिळवतां येणार नाहीं. सवंग लोकप्रियता मिळवण्याचा हा मोह आवरला पाहिजे. नाहीं तरी अशा दिखाऊ लोकप्रियतेचा शेवटीं उपयोग होत नाहींच. समाजवादी पक्षानें आपल्या शक्तीप्रमाणेंच आपले हातपाय पसरले पाहिजेत. आपली परिमित शक्ति देशभर विखरून न टाकतां मर्यादित क्षेत्रांत ती एकत्र जमवून अधिक परिणामकारक करतां येईल. Not things but men अशी इंग्रजींत एक म्हण आहे. प्रत्येक क्षेत्रांत कसलेले निष्णात कार्यकर्ते निर्माण करणें हें पक्षाचें उद्दिष्ट असलें पाहिजे.

### ध्येयधोरणांत अधिक एकवाक्यता पाहिजे

काँग्रेसच्या भवितव्यासंबंधी पक्षानें अचूक निदान केलें पाहिजे. भारताची आर्थिक परिस्थिति बिकट असली तरी पुढील पांच वर्षांत ती खराब होणार नसून सुधारण्याच्या मार्गावर लागणार आहे असें आमचें मत आहे. कम्युनिस्टांच्या

[ पान २ वर

## साधना साप्ताहिक दिवाळी विशेषांक ऑक्टोबर १९५४

साधना

संस्थापक
साने गुरुजी
संपादक
पु. ह. पटवर्धन
गं. द. आवडेकर
सहसंपादक
मंगेश पाडगांवकर
वसंत बापट
सदानंद वर्दे



वर्ष ७, अंक १०-११
दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर १९५४
किंमत १॥ रुपया

### अनुक्रम

दिशा निवळल्या आहेत — २
चिनी जीवनांतील शरद् — साने गुरुजी — ३
तीन हजारांची ही फौज... — ४
साहित्यांतील गणोबा — मं. वि. राजाध्यक्ष — ५
पिंजरा — गंगाधर गाडगीळ — ८
कथक — अरविंद गोखले — १८
बटाट्याच्या चाळींतील सांस्कृतिक शिष्टमंडळ — पु. ल. देशपांडे — २६
चांदणें — सदानंद रेगे — ३८
मानव — शांताराम — ४१
डायरींतील पानें — वा. ल. कुलकर्णी — ४८
हंसणाऱ्या माणसाची गोष्ट — श्री. म. माटे — ४९
बीज — ज्ञानेश्वर नाडकर्णी — ५५
सुस्वागतम् — ना. ग. गोरे — ६२
कोंडाळें — जयवंत दळवी — ६७
भवभूतीची नाट्यकला — गो. के. भट — ६९
ओलिंदा — लक्ष्मणराव सरदेसाई — ७६
मी संन्यास कसा घेऊं ? — एस्. एम्. जोशी — ८७
कथा — अच्युत बर्वे — ९२
सावल्या — दुर्गा भागवत — ९६
कमलाकान्ताची जबानी — लेखक : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, अनुवाद : मामा वरेरकर — १००
दामुअण्णांची गृहिणी — अंबादास अग्निहोत्री — १०७
उतरतें ऊन — कुसुमावती देशपांडे — ११४

#### कविता

मैत्री — इंदिरा — ११६
स्पर्शे केसाळ काळोख — कान्त — ११६
झूल — कृ. ब. निकुम्ब — ११६
कुंथी — पु. शि. रेगे — ११६
प्रेरणा — ना. घ. देशपांडे — ११६
मत्स्यगंधा — मंगेश पाडगांवकर — ११७
निद्रे — यशवन्त — ११७
काळी माया — बा. भ. बोरकर — ११७
नागीण — सदानंद रेगे — ११८
बीज — कुसुमाग्रज — ११८
षोडशी — प्रफुल्ल-दत्त — ११८
भूल — संजीवनी — ११९
ऊन — अरविंद कुळकर्णी — ११९
करुणा — राम शेवाळकर — ११९
ओझें — आरती प्रभू — ११९
भिजली चाहूल — वि. ब. बोरकर — ११९
मुक्तीमधलें... — विंदा करंदीकर — १२०
आज कळे — वसंत बापट — १२०
सांज गुलाबी — शांता शेळके — १२०

मुखपृष्ठ व आंतील चित्रें : प्रभाकर गोरे

## साधना साप्ताहिक १0 फेब्रुवारी १९५९


# साधना

संस्थापक : साने गुरुजी

वर्ष १२, अंक ९] शनिवार ता. १० ऑक्टोबर १९५९ [पानें १२, किंमत पाव रुपया


## अखेर समितीनें निर्णय घेतला !

ता. १ ऑक्टोबर रोजीं मुंबईस शिवाजी पार्क येथें प्रजासमाजवादी पक्षाच्या वतीनें भरलेल्या जाहीर सभेंत श्री. एस्. एम्. जोशी यांनीं चिनी आक्रमणाच्या संदर्भांत समितींतील कम्युनिस्ट, त्यांचे सहप्रवासी आणि वेळीं अवेळीं कम्युनिस्टांना पाठीशीं घालणारे इतर महाभाग यांवर जी झडझडून टीका केली त्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. "१९५६ सालीं एस्. एम्. नी एक भाषण करून समिति निर्माण करण्यांत पुढाकार घेतला आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा दिली. आजच्या त्यांच्या भाषणांचे परिणाम महाराष्ट्राच्या पुढील दहा वर्षांच्या राजकारणावर होतील." हें बॅ. नाथ पै यांनीं त्यांच्या भाषणावर व्यक्त केलेलें मत यथार्थ आहे असें आम्हांस वाटतें.

### कसोटीचा क्षण

एस्. एम्. नीं आपल्या त्या तेजस्वी व ऐतिहासिक भाषणांत कम्युनिस्टांना त्यांच्या राष्ट्रद्रोही कारवायांसाठीं समितीच्या पुण्याईचा व लोकप्रियतेचा वापर करूं देणार नाहीं, असें खडसावून बजावलें आहे. इतकेंच नव्हे तर जोंपर्यंत राष्ट्रद्रोही व लोकशाहीविरोधी कम्युनिस्ट समितींत आहेत तोंपर्यंत समिति प्रभावी पर्यायी पक्ष वा संघटना बनूं शकणार नाहीं, असें मतहि त्यांनीं स्पष्टपणें मांडलें आहे. 'संयुक्त महाराष्ट्र समितीचें चिनी आक्रमणासंबंधीं मत काय ?' हा खरोखरच मराठी जनतेच्या मनाला हेलकावे देणारा व संत्रस्त करणारा प्रश्न आहे. भारताचें सार्वभौमत्व मान्य करून 'समाजवादी भारतांत समाजवादी महाराष्ट्र' निर्मिण्यास बद्धपरिकर झालेल्या समितीस चिनी आक्रमणाबाबत कांहीं मतच नाहीं असें म्हणणें हास्यास्पद आहे. किंबहुना समितीच्या उद्घोषित राष्ट्रीयत्वाची खरी कसोटी लागणार आहे ती या प्रश्नाबाबतच्या तिच्या भूमिकेवरूनच.

### हेंहि नसे थोडकें !

याच दृष्टीनें समितीच्या पार्लमेंटरी बोर्डाची तांतडीची बैठक बोलावण्यांत आली होती. तीन दिवस प्रक्षुब्ध वातावरणांत चर्चा झाली, एकमतानें निर्णय घेण्याचें बंधन समितीनें स्वेच्छा स्वीकारलेलें असल्यानें सर्वमान्य ठराव करण्याची जीवतोड मेहनत करण्यांत आली. या चर्चेच्या निमित्तानें समितीतील राष्ट्रनिष्ठ लोक आणि परप्रत्ययनेय कम्युनिस्ट व त्यांचे पाठीराखे बनलेले शे. का. पक्ष व लाल निशाण गट यांचें स्वरूप स्पष्ट झालें. समितीच्या पार्लमेंटरी बोर्डातील चर्चेचें हें फलित कांहीं कमी महत्त्वाचें नाहीं. परंतु सर्वानुमतें प्रस्ताव करावयाचा असल्यानें समितीचा ठराव करावयास गुळमुळीत व्हावा लागला आहे. या बाबतींत जो निर्धार आणि निष्ठा ठरावांत अनुस्यूत असावयास हवी होती ती ठरावांत व्यक्त झालेली प्रत्ययास येत नाही. परंतु याबाबतींत ठराव करण्याला व कम्युनिस्टांची वळवळ असूनहि मॅक्मोहन रेषा मानण्याला समिती वचनबद्ध झाली हेंहि थोडकें नाहीं.

### नाटक पुरें झालें

चिनी आक्रमणासारख्या इतक्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नावर सारें राष्ट्र प्रभावित झालें असतां साडेतीन कोटि मराठी जनतेच्या वतीनें बोलणारी संयुक्त महाराष्ट्र समिति इतक्या उशीरा, तीन दिवस चर्चा करूनहि, राष्ट्रीय निर्धार व्यक्त करणारा एकमुखी निर्णय घेऊं शकत नाहीं, ही घटना मराठी जनतेची अप्रतिष्ठा करणारी आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे. चीन-रशियाला आपल्या जीवननिष्ठेंत अग्रगण्य स्थान देणारे व मायभूमीला कस्पटासमान मानणारे कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी यांनींच समितीची व मराठी जनतेची ही अप्रतिष्ठा चालवलेली आहे. त्यांना पटेल, रुचेल आणि त्यांच्या परभार्जिण्या वृत्तीस पेलवेल अशा पातळ, संदिग्ध ठरावास जोंपर्यंत राष्ट्रवादी पक्ष मान्यता देत नव्हते तोंपर्यंत सर्वमान्य ठराव संमत होऊंच शकला नाहीं. म्हणजे कम्युनिस्टांना सांभाळून घेण्यासाठीं समितीनें उघड उघड नरमाईची भूमिका स्वीकारली असाचा अर्थ होतो. आमचें स्पष्ट सांगणें आहे कीं हें नाटक पुरें झालें ! कारण यांत समितीची बदनामी व मराठी जनतेच्या राष्ट्रीय बाण्याची विटंबना होत आहे. म्हणून समितींतील राष्ट्रवादी पक्षांनीं कम्युनिस्ट व त्यांच्या सहप्रवाश्यांना कटाक्षानें बाजूला सारून आपली राष्ट्रवादी भूमिका जनतेसमोर स्वतंत्रपणें मांडावी आणि कम्युनिस्ट व त्यांची बाजू उचलून धरणाऱ्या इतर पक्षांमुळें समितीची या प्रश्नावर एकवाक्यता होणें कसें दुरापास्त झालें तें जनतेला समजावून सांगावें. संयुक्त महाराष्ट्र व समिती या दोहोंचें राजकीय भांडवल करून आपल्या पक्षाचें संघटनात्मक बस्तान महाराष्ट्राच्या राजकीय जीवनांत बसविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना आळा घातला जाणें आवश्यक आहे. समितीच्या एकजुटीची सबब या संदर्भात पुढें करणें अप्रस्तुत, नव्हे अराष्ट्रीय मनोवृत्तीचें द्योतक ठरण्याची शक्यता आहे.

### ऐक्याच्या घोषणा आतां कुठें गेल्या ?

'इस्रे नाज' लिमिट यांसारख्या प्रश्नावर समितीच्या एकजुटीच्या नांवानें टाहो फोडणारे कम्युनिस्ट व त्यांचे जिगर दोस्त मराठाकार आज चिनी आक्रमणाच्या संदर्भांत मात्र समितीच्या एकजुटीबद्दल ब्र काढायला तयार नाहींत ! आज या प्रश्नावर एका बाजूला राष्ट्रवादी पक्ष व दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी असे दोन तट उघड उघड पडलेले आहेतच ना ? पण यावेळीं कम्युनिस्ट समितीच्या एकजुटीबद्दल चकार शब्द काढणार नाहींत; कारण त्यांच्या समितीनिष्ठेपेक्षां त्यांची परराष्ट्रनिष्ठा, त्यांची गुलाम मार्क्सवादी

[पान ११ वर

## श्री. जयप्रकाशांना अभिवादन

जयप्रकाशजी, उद्यां विजयादशमीला अठ्ठावनाव्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. काळानें आपलीं पदचिन्हें त्यांच्या शरीरावर थोडीफार उमटविलीं असलीं तरी त्यांचें मन तरुणासारखें ग्रहणशील व समुत्सुक आणि बुद्धि कुशाग्र व ताजीतवानी आहे. चाकोरीला लागण्याचा त्यांचा स्वभावच नाहीं. चिंतनशील त्यांची वृत्ति आहे. असें चिंतन करतांना संप्रदायबुद्धीच्या मर्यादा त्यांच्यावर पडत नाहींत. आणि त्यामुळें आजच्या समाजानें मान्य केलेल्या कुठल्याहि चौकटींत किंवा साच्यांत त्यांचें व्यक्तिमत्त्व सामावलें जात नाहीं. अशा व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीच नवविचारांचीं उगमस्थानें बनत असतात. विचारविकासाला त्यांचें साह्य होतें. अशा व्यक्तींची मानवतेवर नितांत श्रद्धा असते. मानवाच्या सहज सुमंगल प्रवृत्तींवर त्यांचा अढळ विश्वास असतो. त्यामुळें लौकिकाची त्यांना भीड पडत नाहीं. त्यांची सहकार्य भावना सर्व भेदाच्या भिंतींना उल्लंघून सर्वांच्या विधायक शक्ति एकत्र करण्यासाठीं तत्पर असते. समन्वय हाच त्यांचा धर्म बनतो. कारण गुणसंग्रहाशिवाय त्यांना चैनच पडत नाहीं. त्यांच्या ह्या गुणग्राहकतेमुळें संकुचित हितबुद्धीला वश झालेल्यांना चमत्कारिक वाटूं लागतात. पण हा चमत्कारिकपणा हीच समाजव्यापी अनुबंध निर्माण करणारी एक प्रचंड शक्ति बनत असते.



### अक्षोभचिंतनाचें महत्त्व

राजकीय नेत्यांचें सापेक्ष सत्य आणि मर्यादित समाजहितबुद्धि त्यांना, अल्पसंख्याकांची संघटित शक्ति उभी करून, समाजनियंत्रणाचीं शासनादि सूत्रें हातीं घेण्याला प्रेरित करीत असते. अक्षोभचिंतनाची अशा राजकीय नेत्यांची शक्ति क्षीण झालेली असते. सत्योपासनेच्या प्रेरणेनें ते असे भयंकर झपाटले जातात कीं, वाल्मिकीच्या रामायणाप्रमाणें आपण सत्याच्या पुरोभागी आहोंत अशी भावना त्यांच्या मनांत ठाण मांडून बसते. आणि अशा सापेक्ष सत्याच्या भजनीं लागल्यानें वास्तव सत्यापासून त्यांची सर्वथा फारकत होते. अक्षोभचिंतनाची महति ज्याला कळली तो अशा शबल सत्यानें भारावला जात नाहीं. तो समग्र सत्याच्या दर्शनाची आकांक्षा धरतो. असें समग्र सत्यदर्शन एका व्यक्तीला, पंथाला, पक्षाला अशक्य असतें. त्यामुळें पंथ, पक्ष यांचीं बंधनें असा मनुष्य झुगारून देतो. सत्याच्या समग्र दर्शनासाठीं विश्वांतील सर्व विचारधारांची मदत आपल्याला होणार आहे, त्यांचा समन्वित परिणाम म्हणजे सत्याच्या निकट जाणें, अशी भावना असल्यानें अशा माणसाची सहिष्णुता पराकोटीची असते.

### अपार लोकश्रद्धा

जयप्रकाशजींचा पिंड मुळांतच असा. भूदान-ग्रामदानादि चळवळींत त्यांचा व्यापक समाजजीवनाशीं अधिक निकट संबंध आला. भारतीय समन्वय धर्माचे परात्पर उपासक विनोबाजी. त्यांचा संपर्क जयप्रकाशांना लाभला. त्यांच्या वृत्तिप्रवृत्तींना खरा बहर या आंदोलनामुळें आला. भारतीय समन्वय धर्माची नकळत शेंकडों वर्षे उपासना करणाऱ्या निरागस ग्रामीण जनतेशीं त्यांचें नातें जुळलें. सर्वसामान्य जीवननिष्ठ जनतेसारखें जयप्रकाशांचें वागणें, करणें असतें. हव्यासामुळें येणारा उतावळेपणा त्यांच्यांत आतां नाही. उलट करुणेमुळें "बुडते हे जन देखवे ना डोळा" अशी व्याकुळताच त्यांच्या वाणी-करणींतून प्रत्ययाला येते. ही करुणाच त्यांना नवविचारांबद्दल स्वागतशील बनवते आणि निरंतर कार्याची स्फूर्ति देते. अशा मंडळींना लोकांना समजावून सांगण्याचा कधींच कंटाळा येत नाहीं. लोकांना पटलें म्हणजे ते त्याप्रमाणें वागणारच, अशी त्यांची श्रद्धा असते. जोंपर्यंत लोक नवमार्गाचें अनुसरण करीत नाहींत तोंपर्यंत त्यांच्या मनांतील सर्व संशय फिटण्याइतका निर्दोष तो मार्ग झाला नाहीं, असें मनीं आणून ते चिंतन करीत राहतात आणि दिवसेंदिवस अधिकाधिक शुद्धता आणण्याचा ते प्रयत्न करतात. लोकांवर रागावत नाहींत. या प्रयत्नांतूनच विचारांचा नित्यनिरंतर विकास होत जातो. लोकांचीहि शक्ति वाढत जाते. आपल्याला निवडण्याचें निर्णयाचें स्वातंत्र्य आहे, असा विश्वास लोकांना वाटूं लागतो. व हेंच लोकशाहीचें खरें बळ असतें.

### विधायक शांतीचा आधार

जयप्रकाशजींची लोकशाहीची कल्पना संसदीय व राजकीय लोकशाहीपुरती मर्यादित नाहीं. त्यांना लोकशाही ही जीवननिष्ठा बनायला हवी आहे. अशा लोकशाहींत शासन किमान असतें आणि लोकांची उपक्रमशीलता कमाल असते. ह्या उपक्रमशीलतेमधून विधायक शक्ति जोपासली जाते व शासनावलंबनाऐवजीं परस्पर सहकार्याचे मंगल प्रयत्न सुरू होतात. अशी ही उपक्रमशील, सहकार्यप्रवण लोकशक्ति राज्यशक्तीलाहि मागें टाकूं शकते. अशी लोकशक्ति भारतांत निर्माण करण्यासाठीं जयप्रकाशांचे सारे प्रयत्न आहेत. त्यांच्या या शुभ प्रयत्नांतूनच विधायक शांति जगांत निर्माण होऊं शकेल. यासाठीं जयप्रकाशांना दीर्घायुरारोग्य मिळावें हीच या वाढदिवस प्रसंगीं शुभेच्छा.

★


दिवाळीनिमित्त लहानथोरांना सुरम्य भेट

पाचूचें बेट

लेखक : लीलाधर हेगडे ★ चित्रकार : प्रभाकर गोरे

किंमत दोन रुपये

आधी सवा दोन रुपये पाठवणारांना हें पुस्तक आपल्या प्रियजनांना दिवाळींत पोचतें करतां येईल.

साधना प्रकाशन, ४३०-४३१ शनिवार पुणें २.

## साधना साप्ताहिक २० फेब्रुवारी १९६०


# साधना

संस्थापक : साने गुरुजी

वर्ष १२, अंक २८] शनिवार ता. २० फेब्रुवारी १९६० [पानें १२, किंमत पाव रुपया


## लाल मातीचें आव्हान !

महाराष्ट्राची प्राणप्रतिष्ठा समीप आली असतांनाच त्याची दक्षिण सीमा पेटली आहे. बेळगांवच्या गोळीबाराचे पडसाद लोकसभेपर्यंत उमटून शांत झाल्यासारखे वाटत असले तरी त्या गोळीबारानें उठवलेलें काहूर सहजासहजीं विसरण्यासारखें, शमण्यासारखें नाहीं. सारांबंदीच्या चळवळीचा निःपात करण्यासाठीं जशी सरकारनें सूक्ष्मासूक्ष्म सर्व मार्गांचा अवलंब केला हें सत्य आतां कोणत्याहि दडपणानें लपून राहणार नाहीं. सरकारी खुलासे आणि महाराष्ट्राबद्दल आकस बाळगणारीं वृत्तपत्रें यांनीं सीमेवरील सत्य परिस्थितीचा कितीहि विपर्यास केला तरी बेळगांवच्या हजारों माणसांनीं जें अनुभवलें आहे, सोसलें आहे, तें पुसून कसें जाणार ? पोलिसांच्या दंडुकेशाहीला जशी सरकारनें मोकाट सोडल्यामुळें निरपराधी जनतेला स्वदेशीं डायरशाहीचा कटु अनुभव यावा ही गोष्ट किती लांच्छनास्पद आहे ! सुटका झाल्यानंतर पूर्वींचे गुलाम अधिक जुलमी मालक बनतात हें खरें म्हणावयाचें एकूण !

### डायरशाही जुलूम

लोकांच्या घरांत शिरून मारहाण करणें, रस्त्यावर बेकायदा संचारबंदी करणें, संशयावरून कुणालाहि बेदम बडवणें, कोणाच्याहि जीविताची पर्वा न करणें आणि जनतेला पूजनीय वाटणाऱ्या प्रतीकांची बेमुर्वत पायमल्ली करणें.... असली नंगी सैतानशाही मध्ययुगांत जमा झाली असें उगीचच आम्ही मानीत होतों. विशेष म्हणजे जगभर 'पंचशी ऽऽऽल' अशी हेल काढून आरोळी मारणाऱ्या पंचशील कॉंग्रेसवाल्यांकडूनच ही तिरस्करणीय दडपशाही होते आहे.

### दिल्लीश्वरांना आव्हान

असहाय पोलिसांच्यावर प्रक्षुब्ध जमाव चालून आला कीं, गोळीबार करावा लागतो हें तत्त्व आपण तूर्त मान्य करूं या. सीमेवर हान प्रकार घडतो आहे असा कांगावा म्हैसूर सरकारनें आणि त्यांना धार्जिण्या असणाऱ्या हितसंबंधी वृत्तपत्रांनीं चालविला आहे. परंतु आमच्याकडे 'चक्षुर्वैसत्यम्' अशी जी हकीकत उपलब्ध आहे तिची आग असल्या कागदी तटभिंतींना जुमानणारी नाहीं. सगळीं मराठी माणसें खोटें बोलतात, पुढारी स्वार्थासाठीं वणवा पेटवतात, उपरे उपद्व्यापी सीमा भागांत नसती पुंडाई करतात...... या सबबीवर कॉंग्रेसच्या पुरीणांचा आणि पंडित नेहरूंच्या सरकारचा विश्वास बसत असेल तर त्यांच्या शहाणपणानें शाक दिवाळें निघालें आहे असें म्हणावें लागेल. टिंबक्टू येथील कटकटींचा अभ्यास करण्यासाठीं आमचा देश एखाद्या शिष्ट स्वयंकजीला पाठवूं शकतो, पण देशांतल्या देशांत दोन लोकसमूहांचा संघर्ष निर्माण झाला कीं, तेथें दूत पाठविण्याचा विचारहि केंद्र सरकारला कधीं सुचत नाहीं ! सत्य पाहण्याची एवढी भीति कां वाटावी ? बेळगांवच्या लाल मातीचें दिल्लीश्वरांना आव्हान आहे कीं छाती असेल तर इथल्या प्रखर सत्याचें दर्शन घ्या आणि जुलूम करणाऱ्यांच्या हातांतला राजदंड हिंमतीनें काढून घ्या. मग तो जालीम कितीहि जवळचा असो. पण हें करण्याची ताकद किंवा नीतिधैर्य पक्षांध नेहरूसरकारजवळ नाहीं हेंच तर या देशाचें दुर्दैव आहे !

### आमची अस्वस्थता

पंडित नेहरू सच्छील आहेत, संजीव रेड्डी सज्जन आहेत; ढेबरभाई सत्प्रवृत्त आहेत ! पण त्यांची सारी सात्त्विकता आपल्या दिवाळखोर पक्षाची पाठराखणी करतांना खर्चीं पडते. त्यामुळें लोकशाहीचा ध्वज अवघ्या आशियाखंडात आम्हींच उंच ठेवला आहे असें म्हणणाऱ्या भारतीयांना आपल्या देशांतच लाठीगोळीचें राज्य पाहावें लागतें. नोकरशाहीचे संस्कार आमच्यावर किती खोलवर झालेले आहेत याची जाणीव होऊन अशावेळीं कोणाहि सुबद्ध माणसाची मान लाजेनें खालीं होईल. जर्त्यांच्या पोलिसांनीं नंगा नाच घातला त्या गोष्टीपेक्षां आमच्या देशाला अजून प्रौढ लोकशाही अज्ञात आहे या विचारानें आम्ही अधिक अस्वस्थ होतों.

### फुकाचे बोल

गेल्या आठवड्यात श्री. संजीव रेड्डी मुंबईला भाषण करते झाले. ते म्हणाले, "जेहेत्ते कालाचे ठायीं सीमा प्रश्नांना पाटसकर निवाडा किंवा सर्वमान्य असा दुसरा एखादा निवाडा लावायला हवा." आता आहे कीं नाहीं निलाजरेपणा ! गेलीं कांहीं वर्षें आम्हीं तरी दुसरें काय मागितलें आहे ? महाराष्ट्राच्या जीवनाशींच हा खेळ चालूं नसता तर रेड्डीबुवांच्या विनोदाला आम्ही खूप हंसलों असतों. ठीक आहे; उशीरा का होईना, कॉंग्रेसच्या अध्यक्षांना श हा ण प ण सुचलें ! पण आम्हांला कॉंग्रेसच्या नेत्यांचें हेंच आश्चर्य वाटतें कीं, ज्या ठिकाणी आपल्या सिद्धान्तांचा अविलम्ब अवलम्ब करायचा त्या ठिकाणीं हे लोक नुसते आशीर्वाद कशासाठीं देतात ! 'भाषणबाजी बंद केली पाहिजे.' मग करा. 'अन्नप्रश्न निकडीचा मानला पाहिजे.' मग माना. 'जमिनीचा प्रश्न सोडविला पाहिजे.' मग सोडवा कीं. 'जातिभेद तोडले पाहिजेत.' नको कोण म्हणतें ? तसेंच 'पाटसकर निवाडा लावला पाहिजे.' अरे, मग लावा कीं ! चार वर्षें आमचा कशासाठीं अंत पाहात आहांत ? ऊठसूठ जनतेची सत्त्वपरीक्षा काय म्हणून पाहातां ? सीतासुद्धां अग्निदिव्य आयुष्यांत एखादवेळींच करूं शकते. प्रत्येक प्रश्नासाठीं जनतेनें देहदण्ड सोसायचा; छळ, जुलूम यांना तोंड द्यावयाचें; रक्त सांडायचें; आणि मग हे सो ळ भो ग येऊन संभावितपणानें सोलीव सत्याचा उच्चार करणार ! 'न्याय करावा तो पटकन् करावा' असें एक सूत्र आहे. कॉंग्रेसच्या अध्यक्षाला न्याय व्हावा अशी पोटतिडीक असेल तर त्यानें आपल्या पक्षाच्या सरकारला तो न्याय देण्यास भाग पाडावें. त्यांत विलंब झालेला ज्यांना सहन होतो त्यांना जनतेनें मोदु म्हटलें तर त्यांत काय वावगें आहे ? पण जियें आश्चर्य वापरायचा तियें यांचा विध्यर्थ ! सीमा प्रश्नांत न्याय होणार असला तर तो करण्यासाठीं कोणत्या शुभमुहूर्ताची ही मंडळी वाट पाहताहेत ! किती प्राण हवे आहेत ! किती त्याग हवा आहे ? हे प्रश्न कदाचित् भडक वाटतील, पण हें विचारण्यामागची तीव्र भावना सत्ताधीशांनीं ध्यानांत घेतली पाहिजे. अजून वेळ गेलेली नाहीं. अजूनहि लाल मातीचें आव्हान हें सत्याग्रही आव्हान आहे. पण जनतेची शक्ति जशी प्रचंड असते तशी दुबळीहि असते. तिचा फार अंत पाहिला तर याच लाल मातीचें आव्हान लाल होईल, हें विसरणाऱ्यांना इतिहास क्षमा करणार नाहीं.

★

## आचार्य नरेंद्र देवांचें पुण्यस्मरण

आचार्य नरेंद्र देवांच्या निधनास १९ फेब्रुवारीस तीन वर्षें पूर्ण झालीं. त्यांच्या मृत्यूनें भारतीय समाजवादी आंदोलनांत जी पोकळी निर्माण झाली ती अद्यापि भरून निघालेली नाहीं. जीवन कोणाहि व्यक्तीकरतां अडून राहात नाहीं, हें खरें असलें तरी कांहीं व्यक्तींचें जीवन हा विशिष्ट प्रवृत्तीचा आविष्कार असतो व त्या प्रवृत्तीचा एखाद्या आंदोलनांतील प्रभाव कमी झाल्यावर त्या व्यक्तीच्या अस्तित्वाचा अभाव जाणवतो. आचार्य नरेन्द्र देवांच्या जीवनांत ज्या प्रवृत्ति व्यक्त झाल्या होत्या त्यांचें समाजवादी आंदोलनाच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. तात्कालिक राजकीय यशापयशापेक्षां या प्रवृत्ति निष्प्रभ झाल्या तर समाजवादी आंदोलनाची वाटचाल योग्य दिशेनें होणार नाहीं अशी भीति वाटते.

### तीन विशेष

निर्भय बुद्धिवाद, इतिहासाकडे पाहण्याची शास्त्रीय दृष्टि व समाजवादी आंदोलनांत सांस्कृतिक आशय निर्माण करण्याची दुर्दम्य धडपड हे तीन आचार्य नरेन्द्र देवांच्या जीवनाचे विशेष होते. आचार्यजींनीं राष्ट्रीय आंदोलनांत आघाडीवर राहून वार झेलले आणि आचार व विचार यांतून अनेक तरुणांना स्फूर्ति दिली. पण ही स्फूर्ति क्षणिक नसावी व उच्चंबळणाऱ्या भावनेऐवजीं स्थायी विचार हेंच तिचें अधिष्ठान असावें, असें आचार्य नरेन्द्र देवांना सतत वाटत असे. गांधीजींच्याबद्दल त्यांना नितांत प्रेम व आदर वाटत असला तरी गांधीवादी विचारांत बुद्धिवादाच्या विरोधी एक धारा आहे असें आचार्य नरेंद्रदेवांना वाटत असे. व म्हणून गांधीजींच्या विचारांतील 'आंतला आवाज', 'परमेश्वराचा आदेश' या कल्पनांना त्यांनीं तीव्र विरोध केला. गांधीवादांतील गरजा कमी करण्याच्या आदेशांतून ऐहिकाकडे पाठ फिरविण्याची वृत्ति निर्माण होईल व कर्मकांडाचें स्तोम माजून कार्यकर्त्यांच्या जीवनांत दांभिकता येईल, असा त्यांचा आक्षेप होता. मार्क्सची विचाराची पद्धति ही त्यांना अधिक शास्त्रशुद्ध वाटे. ते ठोकळेबाज मार्क्सवादी कधीहि नव्हते, परंतु मार्क्सच्या विचारपद्धतीचा त्यांच्या मनावर अखेरपर्यंत प्रभाव राहिला. भूतकालांतलि आणि वर्तमानकालांतील घटनांचें विश्लेषण करतांना आणि भविष्यकाळासंबंधी आडाखे बांधतांना त्यांनीं ऐतिहासिक भौतिकवादाचाच प्रामुख्यानें आश्रय केला. कम्युनिस्टांना मार्क्सवाद नीटसा आकलन झाला नाहीं व भारतीय जीवन तर मुळींच समजलें नाहीं, हें आचार्यजींनीं सुस्पष्ट रीतीनें मांडलें. वादाची चर्चा करतांना ते 'समाजवादी संस्कृति' हा शब्दप्रयोग सतत करीत व समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्यांनीं केवळ अर्थशास्त्रीय भागावर भर देऊन चालणार नाहीं, हें आग्रहानें प्रतिपादन करीत.

### विचारांचें मुख्य सूत्र

गया येथें झालेल्या प्रजासमाजवादी पक्षाच्या अधिवेशनांत त्यांनीं मांडलेले विचार त्यांच्या परिणत प्रज्ञेचे द्योतक आहेत. मानवतावादी मूल्यें हाच समाजवादी चळवळीचा खरा आशय आहे व आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करूनहि या मूल्यांची साधना करतां येते हें त्यांच्या विचारांचें मुख्य सूत्र आहे.




प्रजा समाजवादी पक्षावर गंडांतर आलें असतां जराजर्जर आचार्य नरेन्द्र देव पक्षाची धुरा घेण्यास ज्या तडफेनें पुढें आले त्यावरून त्यांच्या कठोर कर्मयोगाची कल्पना येईल. आचार्यजींनीं लिखाण कमी केलें असल्यामुळें नव्या कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याचें महत्त्व समजून घेणें कठिण जातें. परंतु त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना व असंख्य विद्यार्थ्यांना मात्र त्यांचें सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्त्व, प्रखर तत्त्वनिष्ठा व त्यागपरायण जीवन यांचा कधींहि विसर पडूं शकणार नाहीं.

### उचित पुण्यस्मरण


पुणें शहरांतील आ. नरेंद्र देवांच्या चाहत्यांची त्यांच्या स्मृतिदिनीं बैठक घेण्यांत आली आहे. समाजवादी विचार व व्यवहार यासंबंधीं सतत अभ्यास व प्रयोग करण्यांतच त्यांचें खरें पुण्यस्मरण आहे, हें जाणून तशी एखादी पक्षातीत शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा विचार या मित्रांनीं सुरू केला ही फार चांगली गोष्ट आहे. लोकशाही समाजवादी चळवळीला भरभक्कम तात्त्विक अधिष्ठान देणारे आ. नरेंद्र देव, आ. जावडेकर यांच्या परंपरेंत बसणारे नवे कार्यकर्ते जेवढे निर्माण होतील तेवढी समाजवादी चळवळ प्रगल्भ व परिपक्व होत जाईल. ★

### नानासाहेबांचें अभिनंदन

लोकसभेच्या अध्यक्षमंडळावर श्री. नानासाहेब गोरे यांची एक सभासद म्हणून निवड झाल्याचें वाचून सर्वांना आनंद होईल. सुस्पष्ट विचारसरणी, रेखीव भाषापद्धति आणि वेधक वक्तृत्वशैली यांच्याच जोडीला संसदीय शिष्टाचारांचें अगत्यपूर्वक पालन करण्याचा त्यांचा शिरस्ता यामुळें त्यांनीं फार थोड्या अवधीत संसदेंत मानाचें स्थान मिळविलें. अध्यक्ष मंडळांतील त्यांची निवड हा त्यांच्या गुणवत्तेचाच गौरव आहे. नानासाहेबांचें अभिनंदन ! ★




महाराष्ट्राचा नकाशा (संदर्भ- डॉ. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२) ऑक्टोबर, २००९




पुणे जिल्हा नकाशा (महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, पुणे जिल्हा)



विद्यार्थी

**भिन्न अवस्था**
**भिन्न मुद्रा**



आणीबाणीतील सत्याग्रही




आमदार




सुभाषचंद्र बोस  व पंडित जवाहरलाल नेहरू समवेत ग.प्र.प्रधान (१९३८)



ग.प्र.प्रधान व एस.एम.जोशी व भाई वैद्य (१९८५)



फर्ग्युसन कॉलेजमधील स्टाफ समवेत ग.प्र.प्रधान (इ.स.१९६१)



विरोधी पक्षनेता असताना दौऱ्यावर होते त्यावेळी ग.प्र.प्रधान व त्यांचे कार्यकर्ते

(१९८३)



ग.प्र.प्रधान हे त्यांची पत्नी व नातेवाईकासमेवत (१९८५)



ग.प्र.प्रधान हे त्यांचे वडील व पत्नीसमेवत सोबत इतर नातेवाईक(१९४७)



कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना (१९८३)



कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना (१९८३)



थोर समाजसेवक आण्णा हजारे समवेत ग.प्र.प्रधान (१९९७)




भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनात आण्णा हजारे याच्यासोबत सहभागी झालेले

ग.प्र.पधान (१९९७)




ग.प्र.प्रधान यांचे राहते घर हे साधना ट्रस्टला भेट दिले (१९८३)



डावीकडे ग.प्र.प्रधान साने गुरूजांचे भाषण ऐकताना (१९३७)




श्री.रावसाहेब शिंदे समवेत ग.प्र.पधान (१९८२)



श्रमसंस्कार शिबीरात श्रमदान करताना ग.प्र.प्रधान (१९४२)



वृक्षारोपन करताना ग.प्र.प्रधान (१९८७)




सत्कार करताना ग.प्र.प्रधान




भाषण करताना ग.प्र.प्रधान (१९८९)



वाचन करताना ग.प्र.प्रधान (१९९७)




साहित्याचे लिखाण करताना ग.प्र.प्रधान (१९९८)



ग्रंथालयातील पुस्तकांची पाहणी करताना ग.प्र.प्रधान



एकांतात विचार करताना ग.प्र.प्रधान (१९९७)



जलकुंभाचे उद्घाटन करताना ग . प्र . पधान




केसरी -मराठा ग्रंथशाळा पुणे यात सहभागी झालेले ग . प्र . पधान



ग.प्र.प्रधान आपला ८१ वा वाढदिवस साजरा करताना त्यांच्या पत्नीसमवेत (२००३)




साने गुरूजी आरोग्य केंद्राच्या उदघाटन प्रसंगी बोलताना ग.प्र.प्रधान (१९८४)



ग.प्र.प्रधान यांची अंत्ययात्रेच्या वेळचे दृश्य (३० मे २०१०)



ग.प्र.प्रधान यांच्या निधनानंतर त्यांना पुष्पहार घालताना थोर समाजसेवक अण्णा हजारे (३० मे २०१०)